# दोन घटका

## का.न.केळकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १२६५०

REFBK-0010876

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५८०१ दि: १-४-९१
क्रमांक ७२५० नों: दि: ८-१-६१

# दोन घटका मनोरंजन


लेखक

काशिनाथ नरसिंह केळकर,

ॲड्व्होकेट

नव्या स्मृतीची आवश्यकता, हिंदु-व्यवहारधर्म-शास्त्र, नेपोलियन व हिटलर, शमीपूजन, शंभर वर्षांपूर्वी, इत्यादि पुस्तकांचे कर्ते



सन १९६० तीन रुपये

मॉडर्न बुकडेपो. पुणे २.



REFBK-0010876

प्रथमावृत्ति, १९६०

[ या आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकांकडे आहेत. ]

[ या पुस्तकाचे पुढील आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे कॉपीराईट हक्क श्री. **काशिनाथ नरसिंह केळकर**, ॲड्व्होकेट, ३३-२५ डेक्कन जिमखाना, पुणें ४ यांजकडे आहेत. ]

प्रकाशक :
श्री. कमलाबाई भिडे
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें २.

मुद्रक :
सौ. उषा. ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर
५८०, सदाशिव पेठ, पुणें २.

माझ्या सर्व सुहृदांस —

# हृद्गत

आज दिपवाळीच्या निमित्तानें, गेल्या पंचवीस वर्षांतील माझ्या लेखांचा एक ' प्रातिनिधिक ' लेखसंग्रह वाचकांस सादर करितांना आनंद वाटतो.



गेलीं चाळीस वर्षें मी अनेक विषयांवर लेख लिहिले, व कांहीं पुस्तकेंहि लिहिलीं. पण पुस्तकांव्यतिरिक्त, वेळोवेळीं अभ्यासपूर्वक लिहिलेलें माझें वाङ्मय बरेंच शिल्लक होतें. त्यांतून निवड करून या पुस्तकाची रचना केली आहे. मात्र ती निवड करितांना एकाच विषयावरचे अनेक लेख एकत्र आणण्यापेक्षां, अनेक विषयांना स्पर्श करावा, मात्र प्रत्येक लेख विशिष्ट दर्जाचा असावा अशी मी काळजी घेतली आहे. या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेकडे नजर टाकली तर असें आढळून येईल कीं, पहिले चारपांच लेख वाङ्मय, कला, रंगभूमि, विनोद या विषयाचे; त्या पुढचे चार इतिहास व इतिहास विषयक; निंदा पावलेले देशभक्त, लुई पाश्चर, हर्षल वगैरे चरित्रपर; मुसोलिनी व स्त्रिया, जोसेफाईन, राणी कीं रखेली हे लेख समाजशास्त्राचे किंवा मानसशास्त्रविषयक; नेपोलियनचे धर्मविषयक विचार, तसेंच पुस्तकाच्या अखेरचा स्वामी विवेकानंदांविषयींचा लेख हे धर्म व तत्त्वज्ञान याविषयीं, अशी या पुस्तकाची सहेतुकपणें विविध रचना केली आहे. ती वाचकांस आवडेल, निदान त्यामुळें त्यांचें " **दोन घटका मनोरंजन** " होईल असा विश्वास वाटतो.

१९२१ सालीं केसरींत माझा पहिला लेख मी नेपोलियनच्या शताब्दीविषयीं लिहिला. त्याच वेळीं तीर्थरूप कै. तात्यासाहेबांनीं मला एक इशारा दिला होता : " वायफळ किंवा निरर्थक असें कधीं लिहूं नये. लिहावयाचें तें थोडक्यांत, पण विचारपूर्वक लिहिलेलें असावें. तुमच्या लिहिण्यावरून लोक तुमची परीक्षा करतील हें विसरूं नका ! केसरींत सहीनिशीं लेख

लिहून लोकांचेपुढें जाहीर रीतीनें परीक्षा देण्याला हरकत कसली?" हा त्यांचा उपदेश जन्मभर माझ्या उपयोगी पडला आहे. याच कारणानें, निनांवी लेख लिहिणें ही गोष्ट मी सहसा कधीहि केली नाहीं. आजवर जें जें मीं लिहिलें तें जाहीर रीतीनें, सहीनिशीं लिहिलें. गेल्या चाळीस वर्षांत अनेकांवर टीका करण्याचेहि मला प्रसंग आले; पण मी लिहिलेला शब्द परत घेण्याची वेळ मला कधीं आली नाहीं, या गोष्टीचें सारें श्रेय मी तात्यांचेकडेच देतों. माझ्या लेखणीनें त्यांचेशिवाय दुसरा गुरु मानला नाहीं! कित्येकदां आपण एखादी गोष्ट निर्हेतुक रीतीनें करतो पण ती सहेतुक केल्यासारखी भासावी असेंहि केव्हां केव्हां घडतें. हें माझें पुस्तक दिपवाळींत म्हणजे तात्यासाहेबांच्या पुण्यतिथीस हातावेगळें होत आहे, हा त्यांपैकींच एक योगायोग आहे.

मी स्वतः चित्रकार असल्यामुळें एक गोष्ट माझ्या नेहेमीं मनांत येते. ती अशी की तुम्ही एखादें चित्र काढा, लेख लिहा, किंवा गायक या नात्यानें एखादी रागिणी आळवा, तुमच्या व्यक्तित्वाचें ओझरतें दर्शन त्या कलाकृतींत हमखास झाल्याशिवाय राहणार नाहीं. स्वतःची ओळख करून देण्याकरितां आत्मचरित्र लिहिलें पाहिजे असें नाहीं! तुम्ही कांहीहि केलें तरी आपलें व्यक्तित्व लपवूं शकत नाहीं; कोणतेहि सुंदर चित्र पाहा, त्यातलें अर्धें चित्र त्यांतील वस्तुविषयाचें पण अर्धें त्या चित्रकाराचें आहे असें दिसेल! व ही गोष्ट अगदी साहजिक आहे. सर्व जगांत फिरत असतांना तुम्ही स्वतःला कसें हरवूं शकाल? या लेखसंग्रहालाहि तीच गोष्ट लागू आहे. हें सर्व पुस्तक जो नीटपणानें समग्र वाचील त्याच्या मनापुढें लेखकाच्याहि मनोभूमिकेचें स्पष्ट चित्र उमटूं शकेल. तें चित्र काय असेल हें अर्थात् वाचकांनींच ठरवावयाचें आहे!

या पुस्तकांतील लेख मूळ ज्या मासिकांतून वा साप्ताहिकांतून प्रसिद्ध झाले त्यांचा उल्लेख (लेखन-कालासह) दर लेखाच्या शेवटीं केला आहे. हें पुस्तक मॉडर्न बुकडेपोच्या चालकांनीं सुबक रीतीनें छापून प्रसिद्ध केलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. पुस्तकांतील नेपोलियनचें मी काढलेलें चित्र "भाग्यतारा" या लेखाला अनुलक्षून घातलेलें आहे.

पुणें, आश्विन वद्य १४
शके १८८२

**का. न. केळकर**

## दोन घटका मनोरंजन


| | | |
|---|---|---|
| १ | बंकिमचंद्रांची सौंदर्यसृष्टि | |
| २ | प्रतिभासाधन आणि वाङ्मयचौर्य | ६ |
| ३ | मराठी रंगभूमीचे पडसाद | २४ |
| ४ | मी पाहिलेली रंगभूमि | ३० |
| ५ | कलावन्ताची आस | ३७ |
| ६ | लो. टिळकांची विनोदबुद्धि | ४४ |
| ७ | निंदा पावलेले देशभक्त | ५६ |
| ८ | वसईच्या मोहिमेंतील ' हेतुसंशोधन ' ! | ६३ |
| ९ | संभाजीचे अखेरचे उद्गार | ७३ |
| १० | दत्तोपंत आपटे लेखसंग्रह | ७५ |
| ११ | शेजवलकरांचे लेख | ८० |
| १२ | मुसोलिनीचें आत्मचरित्र | ८८ |
| १३ | मुसोलिनी व स्त्रिया | ९३ |
| १४ | मान्यतारा | ९८ |
| १५ | राणी कीं रखेली ? | १०७ |
| १६ | नेपोलियनचे धर्मविषयक विचार | ११९ |
| १७ | अलौकिक ज्ञानपिपासा | १२६ |
| १८ | क्रांतिकारक हर्षेल | १३१ |
| १९ | मानससरोवर दर्शन | १३५ |
| २० | माझ्या अंत:करणांतील जीवनज्योति | १३९ |

दा. क्र. १०८७६

# बंकिमचंद्रांची सौंदर्यसृष्टि

बंगालचे साहित्यसम्राट् बंकिमचंद्र चतर्जी यांनी आपल्या ललित लेखनानें जी सौंदर्यसृष्टि निर्माण केली ती अमर आहे आणि सागराप्रमाणें अपार आहे. सर्वसंहारक मृत्यु मनुष्यदेहाचा, यौवनाचा आणि पाण्यावर बुडबुडे उत्पन्न व्हावेत त्याप्रमाणें यौवनामुळें निर्माण झालेल्या सौंदर्याचाहि नाश करतो. पण कल्पनासौंदर्याचा त्याला कांहीं नाश करतां येत नाहीं. वाङ्मय चिच्छक्ति आहे. परकायाप्रवेश करण्याची किमया ज्याला साधली त्याला मृत्यूवरहि विजय मिळवितां येतो. त्याचप्रमाणें ज्या कल्पनासौंदर्यानें वाङ्मयदेहांत प्रवेश केला त्याला जरा-मृत्यूची उपाधि नाहीं; किंबहुना विशिष्ट भाषा व राष्ट्रीयत्व यांचीहि आडकाठी नाहीं. बंकिमचंद्रांचें वाङ्मय कीर्तिरूपानें आज शंभर वर्षें टिकलें आणि भाषांतररूपानें एकच काय, पण अनेक देह त्यानें धारण केले हेंच याचें प्रत्यंतर.

शितावरून भाताची परीक्षा करतां येते. पण बिंदूवरून कांहीं समुद्राची कल्पना करतां येणार नाहीं. सुंदर स्त्रीच्या केवळ नखाग्रावरून त्या स्त्रीचें सौंदर्यदर्शन घडत नाहीं. कोटी ही विनोदाची जागा भरून काढीत नाहीं. तसेंच बंकिमचंद्रांच्या सौंदर्यसृष्टीचें आहे. एखाद्दुसऱ्या उदाहरणानें अगर उताऱ्यानें त्याचें समग्र यथातथ्य वर्णन होऊं शकत नाहीं. सौंदर्य ही वस्तुच अशी आहे कीं, तेथें वाणी मूक राहून फक्त हृदय बोलकें होतें. त्या बोलाचे

शब्द मातृवात्सल्यासारखे अस्फुट किंवा नादब्रह्मासारखे अव्यक्त असतात. जें व्यक्त करतां येतें तें परिमित आहे. अव्यक्ताला कसलीच मर्यादा नाहीं. निरागस अशा बालकाच्या हसण्याचें अगर जिनें तारुण्यांत अद्याप पुरतें पाऊलहि घातलें नाहीं अशा अल्लड नववधूच्या अनुरागाचें कोणी 'वर्णन' करूं शकेल काय ? खरी रमणीयता तीच, की जी प्रतिक्षणीं नवता धारण करते. आणि तिचें नावीन्य संपलेलें नसतें, प्रतिक्षणीं त्यामधून नवनवोन्मेष उत्पन्न होऊं शकतात, म्हणूनच सौंदर्याचें खरें वर्णन होऊं शकत नाहीं.

**पहिला बंगाली बी. ए.**

आणि बंकिमचंद्रांच्या साहित्यसृष्टीविषयीं वर्णन करूं जाणारा एक प्रकारें 'मंत्रमुग्ध' होत असल्यामुळें, त्यांच्या शतसांवत्सरिक उत्सवाप्रीत्यर्थ किंवा गुणसंकीर्तनाकरितां बंकिमचंद्रांच्या लेखनाचे इतर गुणच आधीं सांगणें प्राप्त आहे. बंकिमचंद्रांच्या अंगीं जी असामान्य प्रतिभा होती ती केवळ स्फूर्तीचें फळ नव्हतें. त्यासाठीं त्यांना अभ्यास व दीर्घ परिश्रम करावे लागले. ज्याला 'प्रतिभा' म्हणतात तीसुद्धां नव्वद टक्के परिश्रम व केवळ दहा टक्के स्फूर्ति आहे असेंच आढळून येईल. बंकिमचंद्रांची बुद्धि कुशाग्र व एकपाठी असल्यामुळें बी. ए. होण्याच्या आंतच त्यांनीं प्रचंड वाचन केलें होतें. त्यांची भाषा जितकी बालबोध तितकीच सुसंस्कृत; आणि ज्ञानेश्वरीप्रमाणें किंवा बाणाच्या कादंबरीप्रमाणें लिहिण्याच्या ओघांत कल्पनेवर कल्पना आणि उपमा, दृष्टान्त यांची बरसात झडूं लागली कीं, बंकिमचंद्रांची शब्दसृष्टि किती समृद्ध आहे याची वाचकास कल्पना येते.

बंकिमचंद्र हा समर्थांनीं वर्णिल्याप्रमाणें खरा कवि म्हणजे शब्दांचा ईश्वर होता. सामान्य मनुष्याला आपली भावना यथार्थ शब्दांनी व्यक्त करतां येत नाहीं; पण बंकिमचंद्रांचें तसें नव्हतें. अर्थानें वाणीला अनुसरावें अशी सिद्धि त्यांना प्राप्त झाली होती. आणि याचें कारण त्यांनीं केलेली विद्येची एकनिष्ठ आणि सुदीर्घ तपस्या होय. न्या. रानडे यांना ज्याप्रमाणें 'प्रिन्स ऑफ ग्रॅज्युएट्स' म्हणतात, त्याप्रमाणें, बंकिमचंद्र हे बंगालमधील 'पहिले बी. ए.' होते. आणि हें स्थान नुसतें क्रमानें नव्हे, तर गुणांनींहि त्यांनीं अद्याप टिकविलें आहे.

भाषा हें जर राष्ट्राचें हत्यार असेल तर तें बंकिमचंद्रांनींच बंगालला दिलें आहे. बंकिमचंद्रांच्या पूर्वीं बंगाल्यांतील सुशिक्षित लोकांची स्थिति अर्ध-

बाटग्या लोकांप्रमाणें होती. त्यांच्या घरींदारीं बसण्याउठण्यांत सर्व इंग्रजीच होतें. घरीं जो इंग्रजी बोलत नाहीं तो सुशिक्षित कसला? या 'देशी साहेबां'ची टर 'लोकरहस्य' या पुस्तकांत त्यांनीं फार मार्मिक उपरोधानें उडविली आहे ती वाचण्यासारखी आहे. त्या वेळीं जुने लाक संस्कृताशिवाय टांक धरीत नसत. नवे सुशिक्षित इंग्रजीशिवाय दुसरें ओळखीत नसत. अशा स्थितींत देशी भाषेनें कोठें जावें? प्राकृत भाषेप्रमाणें ती केवळ ग्राम्य बोली म्हणजे केवळ बोलण्याच्याच योग्यतेची होती काय?

### ऋषि बंकिमचंद्र

बंकिमचंद्रांच्या पूर्वीं कोणी बंगाली भाषेंत कादंबरी लिहील आणि विशेषतः बंगाली मनुष्य ती लिहूं शकेल, असें कोणास शक्य वाटलें नाहीं. पण 'वंगदर्शन' मासिकांत जेव्हां 'विषवृक्षा'चीं पहिलीं पानें प्रसिद्ध झालीं तेव्हां लोकांना चटका लागला. बंकिमचंद्रांच्या 'वंगदर्शन' मासिकानें मासिकांच्या राज्यांत अपूर्व क्रांति केली. त्यांत नीति, परराष्ट्रांचे इतिहास, मानववंश व प्राणिवंश यांची माहिती व इतर अनेक विषय सोप्या बंगाली भाषेंत येत असत. विषवृक्षाप्रमाणें त्यांतच 'दुर्गेशनंदिनी' 'कपालकुंडला' या कादंबऱ्या येत गेल्यानें नाविन्यांत भर पडली. शास्त्र, कला, तत्त्वज्ञान, कादंबरी वगैरे असा कोणताहि विषय नाहीं कीं बंगाली भाषेमध्यें तो मांडतांच येणार नाहीं ही गोष्ट बंकिमचंद्रांनीं सिद्ध करून दाखविली. प्रखर राष्ट्रीय अभिमानाशिवाय ही गोष्ट झाली नसती. ज्याला स्वतःला आत्मरूपाचा विसर पडलेला नसतो तोच दुसऱ्याला आत्मदर्शन घडवूं शकतो.

'वंदेमातरम्' या गीताला जो आज राष्ट्रीय मान मिळाला आहे तो यदृच्छया नव्हे. बंगाली राष्ट्र मोहनिद्रेंतून जागें झाल्यावर या गीताच्या कर्त्याची आणि त्याच्या थोर देशभक्तीची बंगाली राष्ट्रानें कृतज्ञतेनें आठवण ठेविली हाच त्याचा अर्थ! 'आनंदमठ' कादंबरींतील वंदेमातरम् या पद्यानें अमूर्त अशा राष्ट्रभक्तीचा नंदादीप त्यांनी तेवत ठेवला, पण त्याच कादंबरींत अत्याचारी सांप्रदायाच्या लोकांना असा विवेकानें उपदेश केला आहे कीं, इंग्रजांशीं लढून आज जय मिळवूं शकेल असा कोणी समर्थ नाहीं. आत्मिक ज्ञान हें श्रेष्ठ खरें. पण स्थूलाचें ज्ञान झाल्याशिवाय सूक्ष्माचें ज्ञान होऊं शकत नाहीं. या बाह्य ज्ञानांत किंवा भौतिक ज्ञानांत इंग्रज पंडित आहेत, लोक-

शिक्षणांत त्यांचा हातखंडा आहे. ज्या वेळेला हें ज्ञान मिळवूं तेव्हांच हिंदु राज्य येईल; तोंपर्यंत इंग्रजांचें राज्य अबाधित राहील. देशबांधवांना हा उपदेश १८८० च्या सुमारास बंकिमचंद्रांनी केला. त्या वेळीं बंड मोडलें होतें. देशांत कोणतीहि राजकीय चळवळ जाग्यावर नव्हती. सुशिक्षित लोकांच्या मनांतहि हिंदु संस्कृतीबद्दल विपरीत बुद्धिभ्रंश उत्पन्न झाला होता. अशा स्थितींत अत्याचाराचा उपदेश करून बंडाचें ध्येय त्यांच्या डोळ्यांपुढें कसें ठेवावयाचें? अर्थात् इतिहासाच्या उज्ज्वल पार्श्वभूमीवर हिंदी भावनेचें आणि हिंदी संस्कृतीचें उत्कृष्ट चित्र काढून राष्ट्रीय भावनेच्या अग्यारींतील धूप सतत जळता ठेवणें आणि धूसर व कल्पनामय कां होईना पण आशेचें वातावरण निर्माण करणें एवढेंच त्यांच्या कवित्वशक्तीला त्या वेळीं शक्य होतें. मुत्सद्दी जन्माला घालण्याच्या आधीं परमेश्वर राष्ट्रांत कविच निर्माण करतो. राजकीय आकांक्षांच्या दिशा उजळूं लागल्या असून पारतंत्र्याची रात्र सरण्याचा समय आला आहे, हें एखाद्या द्रष्ट्याप्रमाणें कविच आपल्या प्रतिभेनें प्रथम ओळखूं शकतो. बंकिमचंद्रानीं हें केलें म्हणूनच आजचे राजकीय योगी बाबू अरविंद घोष यांनीं बंकिमचंद्रांना द्रष्टा अगर ' ऋषि बंकिमचंद्र ' अशी पदवी दिली आहे !

**सत्यं शिवं सुंदरम्**

राष्ट्राशिवाय व्यक्तीला व्यक्तित्व नाहीं म्हणून कवीला किंवा लेखकाला राष्ट्रीय दृष्टि असणें महत्त्वाचें आहे हें खरें. पण राष्ट्राचें राष्ट्रीयत्व सिद्ध झाल्यावर केवळ राष्ट्रीयत्व अंगीं असणारा लेखक इतिहासकालांत जमा होतो. त्यालाहि कीर्ति असते, पण ती ऐतिहासिक. बंकिमचंद्रांचें तसें नाही; मनुष्य-स्वभावांतील त्रैगुण्याच्या व्यापक अधिष्ठानावर आणि हिंदु तत्त्वज्ञानाच्या चिरंतन सिद्धान्तांवर त्यांनीं आपल्या सौंदर्यसृष्टीची रचना केली असल्याने त्याला भंग नाही. शेक्सपिअर, कालिदास, भवभूति अगर गटे यांच्याप्रमाणेच बंकिमचंद्रांचें नांव अनेक शतकांपर्यंत प्रकाशमान राहील असें वाटतें. तत्त्वज्ञान हा जगांत सर्वांचाच पाया आहे. लेखनकला, राजकारण, नृत्यसंगीत, शिल्प-शास्त्र अगर अध्यात्म असो, त्याला तत्त्वज्ञान लागतेंच. पाथरवटाचा धंदा दगड व माती या उपकरणांचा असला तरी त्यांचेंहि कांही शास्त्र आहेच. प्रेम अगर द्वेष हे मनुष्याच्या त्रैगुण्याचे विकार; पण तें त्रैगुण्य ज्याने जाणलें

नाहीं त्याला या विकारांचें चित्रण यथार्थ रीतीनें कसें करतां येईल? चतुर्दश पारायणें करूनहि बंकिमचंद्रांची सौंदर्यसृष्टि अवीट वाटते याचें खरें कारण अनेक पात्रांच्या चित्रणांत त्याची सत्यसंशोधनाची अगर मूलगामी तत्त्व-जिज्ञासेची दृष्टि सुटत नाहीं हेंच होय. नुसत्या सौंदर्याला किंमत नाही. प्रथम-दर्शनाने जिज्ञासा पुरी झाल्यानंतर जें सौंदर्य खरें व टिकाऊ वाटत नाही त्याचें कौतुक नाहींसें होतें. सौंदर्याची व्याख्याच अशी आहे कीं, जें सत्य असेल आणि जें शिव असेल तेंच सुंदर!

आणि या व्याख्येच्या कसोटीला बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्या उतरतात. म्हणूनच बंकिमचंद्रांची सौंदर्यसृष्टि अमर आहे असें म्हटलें पाहिजे. मला तर असें प्रामाणिकपणानें वाटतें की, बंकिमचंद्रांच्या कादंबरीच्या जोडीला बसवितां येईल अशी कादंबरी मराठी भाषेंत विरळच असेल. महाराष्ट्र हा जसा व्यावहारिक राजकारणांत पुढें आहे, त्याप्रमाणें बंगाल हा भावनाप्रधानत्वा-मुळे ललितकलेंत अग्रेसर आहे असें म्हणावें लागलें तरी त्यांत प्रांतिक अभिमान आड येण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रत्येक प्रांताचें वैशिष्ट्य वेगळें असूं शकतें. बंकिमचंद्रांनीं आपल्या वाङ्मयांत जें मनोहर चित्र काढलें आहे तें हिंदु संस्कृतींचेंच आहे. हीं गोष्ट बंगाल व महाराष्ट्र या दोघांनाहि सारखीच अभिमानाची नाहीं काय? सरतेशेवटीं, कै. वासुदेव गोविंद आपटे यांनी परिश्रमपूर्वक हें दोन हजार पृष्ठांचें कादंबरीवाङ्मय मराठींत आणून मराठी वाङ्मयाच्या राज्याला एक नवा प्रांत जोडला याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावयास पाहिजेत. भाषांतराकरितां स्वतःची लेखणी राबविणें ही जरी 'चाकरी' म्हटली तरी ही चाकरीहि त्यांच्या हातून अशा श्रेष्ठ धन्याची घडली की त्यांच्यासंबंधाने 'अनामिका सार्थवती बभूव' असे उद्गार बहुधा काढावे लागतील. बंकिमचंद्रांच्या प्रतिभेच्या दीपानें तसा एखादा दीप महा-राष्ट्रांतहि प्रज्वलित होवो यापेक्षा मराठी वाङ्मयसेवकांची दुसरी कोणती इच्छा असणार?

(सह्याद्रि, जुलै १९३८)

★ ★ ★

# प्रतिभासाधन आणि वाङ्मयचौर्य

प्रो. ना. सी. फडके यांच्या 'प्रतिभासाधन' या ग्रंथाबद्दल फारच तीव्र वाद गेले आठ महिने मराठी वर्तमानपत्रांतून चालू असून या प्रकरणीं जी चौकशी कमिटी नेमली गेली होती, तिचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडलेला आहे. प्रतिभासाधन हा ग्रंथ अनुवादित आहे हें सिद्ध करण्याकरितां 'क्लेटन हॅमिल्टन' यांच्या 'आर्ट ऑफ् फिक्शन' या पुस्तकांतील जे उतारे 'ज्ञान-प्रकाशां'त जाहीर रीतीनें प्रसिद्ध केले होते, त्यावरून आमचें कांहीं एक मत आम्हीं बनविलेंच होतें. तथापि पुढें हा वाद उभयपक्षीं रीतसर चौकशीकरितां सदर कमिटीपुढे गेल्याकारणाने, एकप्रकारें न्यायाच्या शिष्टाचाराकरितां आम्हीं त्यावर कोणतेंच मत प्रदर्शित करून या वादांत भाग घेतला नाही. चौकशी मंडळीचा रिपोर्ट अधिकृत रीतीने प्रसिद्ध झाल्याने, आता आमचें मत खुल्या दिलाने मांडतां येईल व त्याबद्दल कोणाचा गैरसमजहि होण्याचें कारण नाही. एखाद्या अप्रिय वादांत भाग घेणारावर साहजिकच मत्सर, द्वेष, इत्यादि आरोप दुसऱ्याला सहज करतां येतात. तथापि प्रस्तुत प्रकरणीं जी चौकशीसभा अगर समिति नेमली गेली त्याबद्दल प्रो. फडके यांनींच "आपली ही सभा मी न्यायसभा मानावयाला तयार आहे." अशी कबुली दिली असल्याने, या चौकशी रिपोर्टातील अनुमानाबद्दल प्रो. फडके यांना (आमच्या मतें) कोणतीहि तक्रार करण्याला आतां कारण राहिलेलें नाही !

प्रस्तुत रिपोर्टसंबंधानें इतर लिहिण्यापूर्वी प्रथम मराठी वाङ्मयाच्या व साहित्यभक्तांच्या वतीनें चौकशी कमिटीचें मनःपूर्वक अभिनंदन करावेंसें वाटतें. वादी व प्रतिवादी यांचा तंट्याचा निःपक्षपातीपणानें निर्णय करणाऱ्या लवादाचे कोणीं आभार मानूं नये ही जगाची रीतच आहे. पण प्रस्तुत प्रकरणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, वाढत्या मराठी साहित्याबद्दल निःसीम प्रेम व आस्था, आणि अंगावर टाकलेल्या जबाबदारीची जाणीव या दोनच गोष्टींकडे कमिटीचें सर्वांत प्रमुखपणानें लक्ष होतें; व विशेषतः ज्यांच्या पुस्तकाकरितां हा सर्व उपद्व्याप व श्रम कमिटीनें अंगावर घेतले तिला (१) उपयोगासाठी "आर्ट ऑफ् फिक्शन" या पुस्तकाची स्वतःची खाजगी प्रत प्रो. फडके यांनी प्रथम कबूल करूनहि दिली नाही; (२) संदर्भ ग्रंथांची यादी दिली नाही, व दिली तीहि प्रतिभासाधनास प्रत्यक्ष उपयोगी पडलेल्या ग्रंथांची नव्हे, तर सामान्यतः उपयुक्त अशा इतर ग्रंथांची यादी दिली; (३) आर्ट ऑफ् फिक्शन हें पुस्तक हिंदुस्थानांत कुठेहि न मिळाल्यामुळे त्याच्या प्रती थेट अमेरिकेहून मागवाव्या लागल्या ! इत्यादि गोष्टी प्रो. फडके यांच्या विरुद्ध कमिटीनें रिपोर्टांत मोठ्या खेदानें नमूद केल्या आहेत.

खुद्द 'प्रतिभासाधन' ग्रंथासंबंधानें या रिपोर्टानें असें मत दिलें आहे की, "हा ग्रंथ स्वतंत्र न म्हटला तरी मराठी वाङ्मयापुरतें व मराठी वाचकांच्या दृष्टीनें पाहिलें असतां या प्रयत्नास, मर्यादित स्वरूपानें स्वतंत्र, म्हणजे 'स्वतंत्रप्राय' असें म्हणतां येईल. या ग्रंथांतील विचार मांडणी व भाषा हीं देखील सर्वस्वी स्वतंत्र म्हणतां येत नाहीत. विचार, रचना व भाषा अशा तिन्ही दृष्टींनी ग्रंथाचें स्वातंत्र्य किंवा पारतंत्र्य पारखावें लागतें. विचार हें सर्वांत प्रधान अंग होय. भाषा व मांडणी यांमध्ये विशेष अपूर्वाई असेल तर त्या ग्रंथास स्वतंत्र वर्गांत स्थान देण्याचा मोह होईल. समितीच्या मनाची अशी खात्री झाली आहे की, प्रतिभासाधन ग्रंथ लिहीत असतांना इतर कोणत्याहि अन्य इंग्रजी ग्रंथापेक्षां प्रो. फडके यांच्यासमोर क्लेटन हॅमिल्टन यांचा 'आर्ट ऑफ् फिक्शन' हाच ग्रंथ असला पाहिजे. नुसता असला पाहिजे एवढेच नव्हे, तर हॅमिल्टनच्या विचारसरणीचा धागा बळकटपणानें हातीं धरून प्रो. फडके यांच्या मागे क्लेटन हॅमिल्टन यांची मूर्ति ठळक उभी आहे असें वाचकांना दिसेल. वारसाला बापाचें नांव सांगण्यास लाज

वाटण्याचें कांहीच कारण नसतें. किंबहुना तसें सांगण्याची टाळाटाळ करील त्याच्या जन्मशुद्धीविषयीं संशय घेणें गैर ठरणार नाहीं ! हॅमिल्टनच्या ग्रंथाची छाया प्रतिभासाधनाच्या उत्तर विभागांत कोठे पुसट तर कोठे स्पष्ट, आणि कोठे दाट तर कोठे घनदाट अशी मधून मधून पसरलेली आहे......... हें साहाय्य मिळालेंच नाही असें मानणें किंवा म्हणणें ग्रंथकर्त्याला निःसंशय कमीपणा आणल्याशिवाय राहणार नाही. इतकेंच नव्हे तर, तसें म्हणण्याची आवश्यकता किंवा अपेक्षा असतां जर तसें म्हटलें नाही तर, किंवा म्हणणार नाहीं आणि म्हणण्याचें कारण नाहीं असाच आग्रह धरला तर तें अधिकच वाईट आहे असें साफ लिहिणें आमचें कर्तव्य आहे."

वरील म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ समितीने अनेक उदाहरणें दिलीं आहेत. प्रो. फडके यांचा 'बुद्धिमान्, चतुर व यशस्वी लेखक' असा योग्य उल्लेख करून कमिटीने शेवटीं म्हटलें आहे की, "खरोखर, ग्रंथाच्या सुंदरतेविषयीं किंवा उपयुक्ततेविषयीं कसलाच वाद नव्हता. कांही ठिकाणीं इतर ग्रंथकर्त्यांचा स्पष्ट उल्लेख करावयास पाहिजे होता, तो केला नाहीं. आपल्या ग्रंथाला प्रो. फडके यांनी प्रस्तावनाहि दिली नाही आणि आधारभूत ग्रंथांची यादीहि जोडली नाही, इतकेंच नव्हे तर विवेचनांत '**मी**' '**आपण**' अशीं प्रथम-पुरुषी सर्वनामें योजिलीं, यावरून ही सर्व विचारसंपत्ति प्रो. फडके यांच्या खास मालकीच्या खाणींत पैदा झाली आहे अशी अनभिज्ञ वाचकाची समजूत होऊन जाईल." सरतेशेवटीं एकाच सारभूत वाक्यांत कमिटीने म्हटलें आहे की "फक्त कोठेतरी ठळकपणे पुढील एक वाक्य किंवा वाक्यांश प्रो. फडके यांनी दाखल करावयास पाहिजे होता—"**क्लेटन व्हॅमिल्टनप्रभृति अनेक इंग्रजी ग्रंथांच्या साहाय्याने तयार केलेला प्रतिभासाधन ग्रंथ.**"

एखाद्या बुद्धिमान, चतुर व यशस्वी लेखकाच्या हातून दुसऱ्याचें वाङ्मय-ऋण कबूल न करण्याचा अपराध घडल्यास तो त्याच्या पदरांत घालणं ही गोष्ट एकप्रकारे अवघड व जबाबदारीची आहे. पण तीहि घडून येत नाहीं असें नाही ! जनता जितकी उदार तितकीच दक्ष असते. तिला कोणी फसवूं शकत नाहीं हें या रिपोर्टानें चांगलें सिद्ध झालें. तथापि, अनेकांच्या वाङ्मयकृतींवर उसनवारीचे आरोप हल्लीं जाहीर रीतीने घेण्यांत येतात व याचकरितां

वाङ्मय-व्यवहारांत इतर ग्रंथांचा उपयोग करण्याच्या अधिकृत मर्यादा कोणत्या व किती मर्यादा उल्लंघन झाली म्हणजे त्यास 'वाङ्मयचौर्य' हें नांव द्यावें असा प्रश्न साहजिकच कोणाच्याहिं मनांत आल्याशिवाय राहणार नाही. एखाद्या पुस्तकावर वाङ्मयचौर्याचा चटकन् आरोप करणें जितकें सोपें आहे, तितकें वाङ्मय-व्यवहाराच्या अभिजात मर्यादा कोणत्या याचें उत्तर देणें मात्र सोपें नाही इतकें येथे सांगितलें पाहिजे! साहित्य-समेलनाने या विषयावर मुद्दाम निबंध मागविले याचें कारण उघडच आहे. म्हणून प्रतिभासाधन व त्यावरील चौकशीकमिटीचा रिपोर्ट हे दोनहि विषय सोडून देऊन, प्रतिभा म्हणजे काय, प्रतिभाशाली मनुष्याचा मनोव्यापार कसकसा होतो, प्रतिभा परभृत असते काय, स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वाची मीमांसा, साहित्य व शर्विलक, इत्यादि विषयांची आम्ही सविस्तर चर्चा या लेखांत करणार आहों

**प्रतिभा म्हणजे काय?**

'प्रतिभा' या शब्दाचें लक्षण सांगतां येईल, व्याख्या करतां येणार नाही. याचें कारण प्रतिभा हा मनाच्या व बुद्धीच्या अंगीं असलेल्या अनेक गुणांचा समुच्चय दर्शवितो. 'प्रतिभाशाली' या विशेषणाने जेव्हा स्तुतीचा अगर सन्मानाचा करभार आपण दुसऱ्यास देतों तेव्हा प्रतिभा म्हणजे एक विशिष्ट किंवा अनन्यसामान्य असा 'गुणसमुच्चय' हीच गोष्ट आपणांस विवक्षित असते. प्रतिभा म्हणजे नुसती 'दिव्य कल्पनाशक्ति' नव्हे, मनांत स्फुरणाऱ्या अमूर्त कल्पनेचा मूर्त आविष्कार करून दाखविण्याची जी मनुष्याची पात्रता तिचाहि प्रतिभेंतच अंतर्भाव होतो. प्रतिभा हा शब्द फार व्यापक असून लेखनकला किंवा ललितकला यांनाच तो लागतो असें मानण्याचें कारण नाही. सामान्यापेक्षा एखाद्याच्या ठिकाणीं असलेला विशेष उत्कट गुण किंवा 'गुणविशेष' आपण 'प्रतिभा' याच शब्दाने दर्शवितों.

प्रत्यक्ष उदाहरणांनी हा मुद्दा अधिक सुगम होईल. कालिदास किंवा शेक्सपिअर हे कवी प्रतिभाशाली होते, त्याचप्रमाणे स्वर्गीय स्वरलहरी काढून श्रोत्यांचें हृदय उचंबळून आणणारा गायक हाहि प्रतिभाशालीच ठरेल. ताज-महालाची कल्पना आपल्या मनोमय कल्पनाचक्षूंपुढें ज्याने प्रथम आणली, त्या शिल्पकाराच्या मनःशक्तीचें वर्णन 'प्रतिभा' या शब्दानेच करावें लागेल.

सुंदर गोष्टी पुष्कळ असतात, पण सुंदरांतहि सुंदर गोष्टीची जो कल्पना करूं शकतो तोच प्रतिभाशाली! कारण प्रतिभा म्हणजे नुसता गुण नव्हे, तर 'गुणविशेष' होय. परकीय सत्तेची काळरात्र संपत आली असून दृष्टीनेहि दिसणार नाही अशा दूर क्षितिजावर दिशा उजळू लागल्या आहेत हें ज्या मॅझिनीने, शिवाजीने किंवा विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी अंतर्दृष्टीने प्रथम ओळखिलें तें त्यांच्या अंगच्या असामान्य प्रतिभेमुळेच! रणांगणावर खरी लढाई जिंकण्यापूर्वी नेपोलियन ती आपल्या खोलींत बसून 'नकाशावर' प्रथम जिंकीत असे याचें कारण कोणी प्रतिभेशिवाय दुसरें सांगूं शकेल काय?

इतिहाससंशोधकाचें संशोधन प्रतिभाच यशस्वी करते. तुरुंगाच्या आवारांतील एकांतवासांत चिंतन करीत असतांना दोन हजार वर्षांपूर्वी हरविलेल्या एका सांख्यकारिकेचा लो. टिळकांना शोध लागला; हजारों अनुमानांचा क्रम व परंपरा त्यांनी मनाशीं ठरविल्या, तेव्हाच आर्यांचें उत्तर ध्रुवाजवळील मूलस्थान त्यांना निश्चित करतां आलें. तें तरी त्यांच्या अंगीं दिव्य प्रतिभा होती म्हणूनच! 'तोतयाचें बंड' हें ऐतिहासिक नाटक लिहितांना, नाटक सजविण्याकरितां कल्पिलेल्या अनेक गोष्टीं नंतर इतिहास संशोधनांत सांपडून खऱ्या ठरल्या तेव्हा स्वतःच्या प्रतिभेला तें एक सर्टिफिकेट मिळालें असें श्री. केळकर यांना सहजच वाटलें नसेल काय? कारण जें पूर्वीं मनाने 'कल्पिलें' त्याचेंच सत्यमय प्रत्यंतर इतिहाससंशोधनाने दिलें. भूमिगत द्रव्याचा किंवा पाण्याच्या वाहत्या झऱ्याचा मनुष्य शोध लावतो ही शक्ति आधिदैविक मानली जाते. पण आदिभौतिकशास्त्राने त्या मनोव्यापाराचीहि मीमांसा करतां आल्यास आपण अशा पायाळू मनुष्याचा 'प्रतिभावान्' या शब्दानेच गौरव करूं. चहाच्या किटलीवरचें झांकण उडतांना जेम्स वॅटच्या डोळ्यांना वाफेच्या अंगीं असलेलें अफाट सामर्थ्य दृष्टिगोचर झालें, व विजेचा शोध लावणाऱ्या एडिसनच्या हातून आजची विसाव्या शतकांतली चमत्कारसृष्टि निर्माण झाली, हीं झालीं तरी प्रतिभाविलासाचींच उदाहरणें होत! "विचित्रो यस्य विन्यासो विदधाति जगत्पटं" या न्यायाने हा सर्व सृष्टिसंसार जसा परमेश्वराच्या प्रतिभेचा म्हणजे कल्पनाशक्तीचा खेळ आहे त्याप्रमाणे, मनुष्यमात्रालाहि आपल्या कल्पनाशक्तीचा ज्यांत आविष्कार करण्याचें सामर्थ्य असेल तें गद्य असो, पद्य असो, शिल्प संगीत यांपैकी ललितकला असो, रुक्ष राजकारण,

असो, किंवा अकाव्यमय इतिहाससंशोधन असो; भौतिकशास्त्रांतील एखादा शोध असो, किंवा तत्त्वज्ञानासारखा तो गूढ विषय असो; मनुष्याच्या ज्ञान-संभारांत असलेल्या गोष्टींपेक्षा एखादी विशेष कल्पना अगर नवा शोध अनुमानाने प्रथम सुचणें याला 'प्रतिभा' म्हणतां येईल. हा गुणविशेष किंवा अपूर्वत्व प्रकट करणारालाच "प्रतिभाशाली" ही पदवी देऊन आपण त्याचा गौरव करीत असतों.

प्रतिभा ही एक दिव्य शक्ति आहे; तिचा संचार अद्‌भुत आहे. अधिक व्यावहारिक शब्दांत सांगावयाचें तर प्रतिभा ही एक प्रकारची 'ज्ञानदृष्टि' आहे. काव्यापेक्षाहि जसे 'काव्यदृष्टि' असण्याला विशेष महत्त्व, तसेंच या ज्ञानदृष्टीचें आहे. 'सांगा हो मजला प्रकाश म्हणतां कोण्या तुम्ही वस्तुला?' असें लाँगफेलोच्या कवितेमधील आंधळ्या मुलाने उद्‌गार काढले आहेत. त्याचा अर्थ असा की, दृष्टि नसली तर जगांत प्रकाश असून अंधार होय! तसेंच, ज्याला प्रतिभेची दृष्टि नाही त्याला जगांतील भाराभर ज्ञानाचा काय उपयोग? खऱ्या प्रतिभेला सुवर्णाचीहि उपमा देतां येत नाही. कारण सुवर्ण फक्त उजेडांतच प्रकाशतें. प्रतिभा ही रेडियम धातूप्रमाणे स्वयंप्रकाश आहे. अंधारांतहि तिचे किरण लखलख प्रकाश पाडल्याशिवाय राहत नाहींत.

प्रतिभा म्हणजे नुसती कल्पनाशक्ति नव्हे, तर दिव्य कल्पनाशक्ति. आणि दिव्य म्हणजे काय? तर सामान्य लोकांना दुर्लभ, म्हणजे 'असामान्य' इतकेंच सांगतां येईल. तें 'देणें ईश्वराचें'. केवळ बुद्धि व कल्पनाशक्ति या घेतल्या तर प्रत्येक सामान्य मनुष्याच्या अंगीं त्या थोड्या थोड्या असतातच. अगदीं निर्बुद्ध असा मनुष्य सहसा आढळत नाही. शाळेंत हजारों विद्यार्थी शिकतात, पण त्यांत शिक्षकाने बुद्धीवर पाडलेले ज्ञानकिरण आत्मसात् करून ज्यांना पुनः परावर्तित करतां येतात असे विद्यार्थी किती? ते थोडे असतात, म्हणूनच "प्रभवति मणिः बिंबोद्ग्राहे मणिर्न मृदांचयः" असे कवीला उद्‌गार काढावे लागतात. विद्यार्थी दगड असेल तर त्याच्या डोक्यावर कितीहि ज्ञानगंगा ओतली तरी काय होणार? त्याच्या अंगीं स्वतःची कांही चमक आहे कीं नाही, बुद्धि 'प्रभावी' आहे की नाही इकडे शिक्षकाचें कां लक्ष असतें याचें कारण, ज्याचे अंगीं 'स्वतःचें' कांही असतें तोच मिळालेल्या विद्येचें खरें सार्थक करून दाखवितो. व्यासंग व परिशीलन

याने प्रतिभा अधिक तेजस्वी व कार्यक्षम होते. सामान्यपणे शिकलेला व उत्तम पढिक विद्वान् या दोहोंत जो फरक तोच सामान्य दर्जाचा लेखक व प्रतिभाशाली लेखक यांत होय.

'प्रतिभा' हा शब्द उच्चारला की मनांत समृद्धीची कल्पना उभी राहते ! जिकडे तिकडे सहारा वाळवंटाची रखरख पसरली असून ऊन करपत आहे, शहरें उध्वस्त झालीं असून जिकडे तिकडे भयाण रानोमाळ पसरलें आहे असें वाटत नाही. तर, याउलट, श्रावणाच्या महिन्यांत सृष्टि जिकडे तिकडे गवताच्या चाऱ्याने हिरवीगार झाली असून त्यावर पावसाच्या सरीवर सरी पडताहेत, धुकें आणि ढग यांचा डोंगराच्या पठारावर पाठशिवणीचा खेळ चालला आहे, रानांत चरणारीं गाय-वासरें अंगावरील पाणी निथळत झाडांच्या आश्रयार्थ कान पाडून गरीबपणाने उभीं आहेत, डोंगराच्या कपारींतून खळखळ नाद करीत स्वच्छ झरे वाहात आहेत, आणि आकाशांत निसर्गदेवतेच्या प्रतिभेचें जणूं कांही निशाणच असें सुंदर व भव्य इंद्रधनुष्य पृथ्वीच्या मानदंडाशीं स्पर्धा करीत आहे असें वाटतें ! किंवा, दुसरी उपमा द्यावयाची तर, वर्षाऋतूंतील पर्जन्याने समृद्धि होऊन जिकडे तिकडे हिरवेगार मळे पिकले आहेत व शाळू-हरबऱ्याचे भारे डोक्यावर घेऊन शेतकऱ्यांच्या युवतीं तोंडानें गाणीं म्हणत शेतांतील पाऊलवाटांमधून चालल्या आहेत अशी सुखमय कल्पना मनांत येते. प्रतिभा ही कधी दरिद्री असूं शकेल काय ? प्रतिभा म्हणजेच समृद्धि होय. "सुजलां सुफलां मलयजशीतला" हें वर्णन प्रतिभेलाहि सार्थपणाने लावितां येईल. देश सुपीक झाला आहे, सरिता उदकवती झाल्या आहेत, सर्वत्र प्रसन्नता पसरली असून "शांतिरस्तु पुष्टिरस्तु" असे समाधाचे उद्गार ऐकूं येत आहेत असा भास होतो.

प्रतिभा नुसती समृद्ध नाहीं, तर रमणीयहि आहे. बहुश्रुत माणसाच्या चतुरालापांप्रमाणे प्रतिभा केवळ आनंद देत नाही तर कांही एक 'नवा प्रकाश' बुद्धीवर पाडते व त्यामुळे रमणीयत्व अधिकच वाढतें. Every thing that it touches it adorns या म्हणीप्रमाणे ज्याला ज्याला प्रतिभेचा सुवर्णस्पर्श होतो तें सुवर्णमय होतें ! डोंगराचे घाटमार्थ रुक्ष असले तरी प्रतिभेच्या संध्याप्रकाशांत ते रम्य होतात. सर्व संसार रुक्ष आहे, पण प्रतिभा हें त्यांतलें 'गुलाबी कोडें' होय. प्रतिक्षणीं ज्याला रमणीयत्व येतें तेंच खरें

रमणीय ! प्रतिभा अशीच आहे. संध्यासमयीं निर्मनुष्य अशा समुद्रकिनाऱ्यावर क्षितिजाकडे तोंड करून लाटांकडे पाहात बसलें असतां किती तरी नवें नवे विचारतरंग आपल्या हृदयसागरावर प्रत्यहीं उठतात. त्या सागराच्या लाटांप्रमाणेच ' नवनवोन्मेशशाली ' हेंहि प्रतिभेचें लक्षण सांगतां येईल.

प्रतिभाशाली लेखकाचें अंतरंग विद्युत्शक्ति उत्पन्न करणाऱ्या पॉवर-हाऊसप्रमाणें असते. किंवा दुसरी उपमा द्यावयाची तर बरसातीच्या जलधारा ज्यांत ठेंचून भरलेल्या आहेत अशा कृष्णवर्ण मेघांची देतां येईल. अशा मेघाने गंभीर नाद केला की, आपण वर आकाशाकडे पाहून किंचित् भीतीने म्हणतों की, " या ढगांत वीज कशी अगदीं भरून राहिली आहे पहा ! " व त्याचाहि अर्थ असा की ती केव्हा आदळेल याचा नेम नाही ! प्रतिभेच्या अनिरुद्ध संचाराचें वर्णनहि असें केलें तरच समर्पक होईल. ग्रीष्मऋतूमध्ये आकाशात उगाच कापसाच्या राशीप्रमाणे तरंगणाऱ्या ढगांत वीज एखादे वेळ चमकली तरी त्याचा पोकळपणा मात्र निदर्शनास येतो. याच्या उलट, बरसातीच्या कृष्णमेघांतून विजेने क्षणभरच चकचकाट केला तरी, जलराशींनी आसन्नप्रसव झालेल्या युवतीप्रमाणे मेघ कसा भारावला आहे हें स्पष्ट दिसतें. नागव्या पावसाप्रमाणें कोरड्या विद्वानानें पाडलेल्या ज्ञानतुषारांनी ऐकणाराच्या मनाला क्षणभर हर्ष वाटला तरी, खरें टिकाऊ वाङ्मयकार्य त्याने कधींच होत नाही. वाङ्मयाचा मळा गाढ विद्वानच पिकवूं शकतो !

प्रतिभाशाली मनुष्याचें अंतरंग अत्यंत व्यापक व समृद्ध असावें लागतें. त्याची संग्राहक शक्ति मोठी असते व जणूं कांही अनेक रत्नांचा, अनेक विचारांचा, अनेक कल्पनांचा मोठ्या दक्षतेनें संग्रह ज्यांत केला आहे असें तें ' रत्नागार ' असतें. न्या. रानडे यांच्या सर्वव्यापी बुद्धीबद्दल असें सांगतात कीं, बुद्धीचा असा एकहि प्रांत नव्हता कीं ज्यांत त्यांची मति चालत नसे. लो. टिळकांच्या खोल व अत्यंत व्यापक मनाचें वर्णन श्री. केळकर यांनी पुढील शब्दांनीं केलें आहे—" समुद्राच्या बाहेर जितकी सृष्टि दिसते त्यापेक्षा कितीतरी अधिक सृष्टि सागराच्या पोटात सांठवलेली असते, तसेंच टिळकांच्याहि मनाचें होतें. लो. टिळकांचें समग्र अंतरंग कोणी कधीच पाहूं शकला नाही ! " माधवाचार्यांचें वर्णन ' सर्वज्ञः स हि माधवः ' असें

केलेलें प्रसिद्ध आहे; व महाभारतकार व्यासाच्या बुद्धिमत्तेचा गौरव "व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं" या एकाच शब्दाने करून प्राचीन ग्रंथकारांनी आपणांस वाटणाऱ्या कृतज्ञतेचा करभार व्यासांना सादर केला आहे. याचा अर्थ इतकाच लक्षांत घ्यावयाचा की, ज्यांची 'प्रतिभाशाली' अशी दिगंत कीर्ति झाली, त्यांना व्यासंग, तपस्या व परिशीलन यांचें मोल फार मोठें द्यावें लागलें आहे !

**प्रतिभा परभृत असते काय ?**

खरा प्रतिभाशाली मनुष्य 'परभृत' असूं शकतो काय? या प्रश्नाचें यानंतर उत्तर द्यावयाचें आहे. कावळ्याच्या घरट्यांत आपलीं अंडीं उबवून तीं फुटल्यावर 'कोकिळ' म्हणून आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या 'परभृता' चें निसर्गसृष्टींत त्याच्या बुद्धिचातुर्याबद्दल कौतुक होतें; मग वाङ्मयांतच तसें कां होऊं नये ? इतरांच्या ज्ञानावर आपल्या ग्रंथाची जोपासना करणाऱ्या व्यासंगी विद्वानाचा 'शर्विलक' म्हणून कां धिक्कार व्हावा ? प्रतिभा व परभृतता हीं विसंवादी विसंगत आहेत काय ? की खरा प्रतिभाशाली लेखक हा इतक्या स्वयंभू व स्वतंत्र बुद्धिमत्तेचा असतो, की तो नांवालाहि दुसऱ्याची कल्पना किंवा तिचा आधार घेत नाही ? 'दिव्य' म्हटली जाणारी प्रतिभा ही आकाशांतून उतरते काय ?

निसर्गसृष्टि पाहिली तरी देंठातूनच देंठ उगवतें व कळींतूनच दुसरी कळी फुलते. मग प्रतिभा यापेक्षा वेगळा नियम अनुसरते काय ? पतगाने आकाशांत भरारी मारली तरी सुताच्या आधाराशिवाय त्याला स्वर्गांत जातां येत नाही ! मग मानवी मनाच्या प्रतिभेला इतकाहि आधार घेण्याची अपेक्षा नसेल ? आणि जर एखाद्याने तो आधार घेतला तर तेवढ्याने तो 'परभृत' ठरावा ? 'उसनवारी' म्हणून त्याच्याकडे पाहून लोकांनी कपाळाला आंठी घालावी ? 'शर्विलक' म्हणून त्याचा उघड उपहास करावा ? असें असेल तर उसनवारीच्या मर्यादा तरी काय ? की ज्या मर्यादेपर्यंत दुसऱ्याच्या ज्ञानाचा उपयोग करणें हें शिष्टसंमत ठरेल व त्यापुढे गेलें असतां परभृतत्वाचा आरोप त्याच्यावर रास्त रीतीने शाबीत होईल ?

हा प्रश्न अत्यंत नाजूक खरा, पण आत्मौपम्यबुद्धीने स्वतःच्या लेखनशक्तीचें कोणीं परीक्षण केलें तर याचें उत्तर अवघड नाही. किंबहुना प्रतिभेच्या

विलासाचें सूक्ष्म पृथःकरण व चिकित्सा केली तर असें आढळून येईल की, आत्मा हा ‘ आत्मौपम्य ’ बुद्धीने परकायाप्रवेश करतो तेव्हाच त्याच्या कल्पनादेहाला प्रतिभेचे सुवर्णपंख फुटतात. प्रतिभा ही आत्मौपम्यानेच सुफलित होते. परकायचा आश्रय जर आत्म्यास करावाच लागतो, तर प्रतिभा ही ‘ सापेक्ष ’ ठरलीच ! प्रौढ मनुष्याने आपणास ‘ स्वतंत्र ’ म्हटलें तरी अर्भकस्थितींत त्याला मातेच्या दुधाची अपेक्षा असतेच व तितकाहि आश्रय नसेल तर लहानपणीं त्याचें पालनपोषण कोण करणार ? तसेंच प्रथमतः मनुष्य परावलंबी व परतंत्र असतो म्हणूनच पुढे ‘ स्वतंत्र ’ होतो हेंच जर अधिक खरें, तर प्रतिभेच्या संसारालाहि तोच न्याय कां लागूं नये ?

संगमरवरी पुतळा उच्च बैठकीवर ( पेडेस्टल ) ठेवला तरच शोभतो, त्याचप्रमाणे जगाचें ज्ञान, अनुभव, प्रज्ञा, बहुश्रुतता इत्यादि अनेक गोष्टींची प्रतिभेला अपेक्षा असते. किंबहुना या आनुषंगिक गुणांची ही बैठक जितकी अधिक व्यापक, खोल, भरीव व उंच असेल तितकी त्यावर अधिष्ठित असलेल्या प्रतिभेच्या पुतळ्याची शोभा जास्त ! प्रतिभेचा पुतळा प्रज्ञेच्या अधिष्ठानावरच खुलतो. चमकणाऱ्या हिऱ्याला अंगठीचें कोंदण पाहावेंच लागतें. ‘ तू काय वाचलें आहेस ? ’ असा प्रश्न जर आपण सामान्य मनुष्यालाहि विचारतों, तर ज्याचा तुम्ही आम्ही ‘ प्रतिभाशाली ’ असा गौरव करणार त्याने कांहींहि वाचलें नसावें अशी आपली अपेक्षा असावी ? किंवा, त्याचा व्यासंग होता हेंच उलट त्याचें दूषण ठरावें ?

विद्वान् हा विद्याऋणाखालीं वांकलेला असावा हें भूषण आहे, दूषण नव्हे ! जगांतील इतर धन व विद्याधन यांत हाच मोठा फरक आहे. ‘ प्रतिभाशाली मनुष्य हा जगांत सर्वांत अधिक ऋणकरी असतो ’ असें इमर्सन याने म्हटलें आहे. प्रतिभाशालित्व व परभृतत्व यांत विरोधाभास नाही. व्यापक व विस्तृत दृष्टि असणें व त्या दृष्टिक्षेत्रांत येणारा सर्व अनुभव व ज्ञान यांचा संग्रह करणें हाच जर प्रतिभेचा गुणविशेष, तर प्रतिभाशाली मनुष्य या गुणाचा जास्तींत जास्त उपयोग करून मनुष्यजातीच्या दृष्टीचाहि विकास करणारच ! प्रतिभाशाली मनुष्यास ‘ परभृत ’ हा शब्द लावल्याने त्याविषयीं निंदेचा ध्वनि देखील उमटूं शकत नाही. फलपुष्पांनी अवनत झालेल्या तरुवराप्रमाणे अशा व्यासंगी विद्वानाचें दर्शन कौतुकास्पदच होतें.

कारण विवेकी माणसांना हें ठाऊक असतें की, परभृताला आपल्या कंठांतून सुस्वर शब्द काढतांना कांहीतरी स्वतःची बुद्धि चालवावीच लागते. परभृताने नुसतें तोंड उघडण्याचा अवकाश. अखेर ' कावळा तो कावळा, व कोकिळ तो कोकिळ ' असें ठरतें यांतलें मर्म हेंच आहे !

संगीतांतील सप्तस्वर हे सर्व जगाला सारखेच सुलभ व समान आहेत. पण त्याचें विशिष्ट मिश्रण करून आलाप काढणें हें ज्या त्या गायकाचें स्वतंत्र सौष्ठव व व्यक्तिमत्त्व समजलें जातें ! सप्तस्वरांप्रमाणे मुख्य रंगहि सातच आहेत. पण सात रंग हातीं आल्याने कोणी मनुष्य 'चित्रकार' होणार नाही. ' I mix my colours with my brains ' हें जसें एका चित्रकाराने उत्तर दिले, तसेंच उत्तर प्रतिभाशाली लेखकालाहि द्यावें लागेल.

' प्रतिभाशाली मनुष्याच्या वाङ्मयकृतींत ९० टक्के इतरांच्या परिश्रमाचे व दहा टक्के स्वतः ग्रंथकर्त्यांच्या प्रतिभेचे असतात ' असें विधान एका ग्रंथकाराने केलें आहे. प्रत्येक ग्रंथाचें वैशिष्ट्य दर्शविणारा ' स्वतंत्र भाग ' ग्रंथांत शेंकडा दोन टक्केहि असूं शकेल किंवा नसेल. जगांतला कोणताहि मोठा ग्रंथ घ्या, मनुष्यजातीच्या ज्ञानांत त्याने फार तर नव्या एका शब्दाचीच भर घातली असें दिसेल ! न्यूटनने सर्व जन्म शास्त्रसंशोधनांत घालविला. पण जगाच्या ज्ञानांत ' गुरुत्वाकर्षण ' या एका शब्दाचीच भर पडली. लो. टिळकांनी गीतारहस्यांतील मुख्य सिद्धान्ताचें चाळीस वर्षे मनन करून हजार पृष्ठांचा ग्रंथ लिहिला. तथापि मराठी भाषेचा भावी कोशकार त्यांचे खातीं ' कर्मयोग ' हा एकच शब्द लिहील ! हिरकणीप्रमाणें अशा एकहि शब्दाचें महत्त्व फार मोठें आहे हें उघड आहे. कारण 'कर्मयोग' हा शब्द सहस्रावधि माणसांत जसा एकट्या टिळकांना सुचला तसा इतर कोणाला सुचला नाही !

प्रज्ञा आणि प्रतिभा याच्या उभ्या आडव्या धाग्यांनी ग्रंथकार आपल्या ग्रंथनिर्मितीचा पट तयार करीत असतो. प्रज्ञा किंवा पूर्वज्ञान याचा उभा धागा व कल्पना किंवा प्रतिभेचा आडवा धागा पडतो तेव्हाच त्या ज्ञानाला सविकल्पत्व येतें. कोणताहि ग्रंथ आपलें ' पूर्वत्व ' व ' अपूर्वत्व ' दोन्ही दाखवितो. कोणताहि ग्रंथ तत्पूर्वी ज्ञानाची मर्यादा किती पोंचली होती हें पूर्वत्व सांगून जेव्हा स्वतःचें वैशिष्ट्य सिद्ध करतो तेव्हाच त्या ग्रंथाला ' अपूर्वत्व ' लाभतें. जगांत सर्वस्वी नवें किंवा स्वतंत्र असें कांही असूं शकत नाही. " नव्वद टक्के

परिश्रम किंवा पूर्वानुभव व दहा टक्के प्रतिभा " या ग्रंथकर्तृत्वाच्या किमयेचा अर्थ हाच होय.

प्रतिभा ही ' परभृत ' असते काय ? असा प्रश्न वाचकांच्या मनापुढे वरील विवेचनांत मुद्दाम एवढ्याकरितांच टाकला की, प्रतिभा ही केवळ साक्षेप आहे व जगांत सर्वस्वी स्वतंत्र किंवा नवें असें फारसें कांही असूं शकत नाही हें लक्षांत यावें. बापाच्या खांद्यावर बसलेला मुलगा जसें त्याहून अधिक क्षितिज पाहूं शकतो त्याप्रमाणे, प्रतिभा ही प्रज्ञेच्या खांद्यावर बसते तेव्हाच तिचें तेज पडतें. बापाच्या खांद्यावर बसणाऱ्या मुलाला अधिक व्यापक क्षितिज दिसतें. पण याचें श्रेय कोणाला द्याल ? बापाला की मुलाला ? कोण कोणाहून मोठा ? किंवा अधिक खरें बोलावयाचें तर कोण कोणामुळे मोठा ? तर बापामुळे मुलगा मोठा हेंच त्याचें उत्तर ! देवालयांत शिरतांना मुमुक्षु प्रथम सभामंडपाच्या पायरीला स्पर्श करतो त्याचप्रमाणे, ' अपूर्व ' म्हणजे भावी ग्रंथकार हा पूर्व ग्रंथकारांच्या ज्ञानसंपत्तीला स्पर्श करून जातो, म्हणूनच ' अपूर्व ' ठरतो. All knowledge is remembrance ही म्हण ज्यांना माहीत असेल त्यांना कोणत्या ग्रंथाला स्वतंत्र किंवा अस्वतंत्र म्हणावें याचा विवेक करतांना अडचण पडणार नाहीं. पण हें ज्याला माहीत नाहीं अशा मनुष्याला समजा विचारलें की, अमुक ग्रंथ हा स्वतंत्र कां, व अमुक ग्रंथ स्वतंत्र योग्यतेचा कां म्हणूं नये ? तर त्याला मोठी अडचणच उपस्थित होईल !

जगांतले सर्वमान्य ग्रंथ नजरेसमोर आणा म्हणजे हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. कर्तृत्वाच्या दृष्टीने जगांत खुद्द परमेश्वरापेक्षा अधिक प्रतिभाशाली किंवा स्वतंत्र बुद्धीचा असें दुसऱ्या कोणास यथार्थपणे म्हणतां येईल ? पण परमेश्वराने मनुष्य निर्माण केला तो तरी स्वतःची आकृति पाहूनच, स्वतंत्र कल्पनेने नव्हे असें बायबलमध्येच सांगितलें आहे. वेदांची गोष्ट घेतली तर ऋषींनी वेद ' केले ' नाहींत. प्राचीन ऋषींना जसे वेद ' दिसले ' किंवा त्यांनीं ' पाहिले ' तसेच त्यांनी लिहून ठेवले; म्हणून तर त्यांना ' मंत्रद्रष्टे ' म्हणतात, मंत्रकर्ते म्हणत नाहींत ! बायबल व कुराण यांत येशू ख्रिस्त किंवा पैगंबर यांचीं खास स्वतःचीं अशीं दहा पानेंहि सांपडणार नाहींत. बहुतेक भाग त्यांच्या शिष्यांनीच लिहिला आहे. पण या दोन्ही ग्रंथांवर ख्रिस्त व महंमद यांच्या कर्तृत्वाचीच छाप आपण अधिक मानतों.

स्मृति तर बोलून चालून आठवणीने लिहिलेले ग्रंथ ! स्वतः स्मृतीच जर वेदप्रामाण्याकडे बोट दाखवितात, तर कर्तृत्वाच्या दृष्टीने त्यांचे स्वतःप्रामाण्य कोणीं काय म्हणून मानावें ? मनुस्मृति कांही मनूने लिहिलेली नाही. हल्लींची मनुस्मृति 'पारंपरिक' आहे, तिचें कर्तृत्व अनेकांच्या हातांमधून गेलें आहे. पण वादाची वेळ आली तर आपणहि असा आग्रह धरू की तिला भृगुसंहिता म्हणूं नका, तर मनुस्मृतीच म्हणा ! 'जयग्रथ' लिहिणाऱ्या व्यासांना आजचें लक्षश्लोकात्मक महाभारत पुनः एकट्याने लिहिण्याची वेळ येती तर त्यांच्या प्रतिभेने बहुधा जरत्कारूचेंच अनुकरण केलें असतें. अनेक पिढ्या गेल्या व सौति-वैशंपायनासारखे दीर्घश्रमी ग्रंथकार पुढें लाभले तेव्हाच भारत-रामायणाला आजचें बृहत्स्वरूप प्राप्त झालें. गीताग्रंथ हीच रणांगणावर श्रीकृष्णाने अर्जुनाला अक्षरशः सांगितलेली गीता नव्हे, असा कोणाला सहज आक्षेप घेतां येण्यासारखा आहे. पण हें माहीत असूनहि गीता श्रीकृष्णाची नव्हे, असें आपण म्हणूं काय ?

पुढे अनुकरणाने एका गीतेच्या एकशेंआठ गीता झाल्या. पण त्याला अनुवाद, शब्दशः भाषांतर, रूपांतर इत्यादि गौणत्वदर्शक शब्द आपण लावीत नाही याचें कारण, या प्रत्येक ग्रंथांत कांहीं वैशिष्ट्य होतें. मूळ गीताग्रंथाला लोकमान्यता मिळाली, म्हणून त्या पद्धतीचें इतरांनीं अनुकरण केलें इतकेंच ! ज्ञानेश्वरी हा सांप्रदायिक ग्रंथ म्हणजे भागवतधर्माला पुढे जें परिणत स्वरूप आलें त्या विशिष्ट तत्त्वज्ञानाचा ग्रंथ म्हणाल, की गीतेचा नुसता अनुवाद अगर मराठी टीका म्हणाल ? एखादा वावदूक टीकाकार असें म्हणूं शकेल कीं ज्ञानेश्वरांना उपमा-अलंकारांनी भाषा सजवितां आली तरी, ग्रंथाची मध्यवर्ती कल्पना, तत्त्वज्ञान किंवा रचना यांपैकीं त्यांचें कांहीच नाही ! आणि टिळकांनीं तरी गीतारहस्यांतला 'कर्मयोग' स्वतंत्र कोठून आणला ? प्राचीन नारायणीय धर्मांत कर्मयोगाची मूळ कल्पना होतीच ! नवी परंपरा निर्माण करणाऱ्या टिळकांनी एका जुन्या कल्पनेचें फक्त पुनरुज्जीवन केलें. त्यांनी नवीन काय सांगितलें, असें कोणीं म्हटलें तर चालेल काय ?

'कोड नेपोलियन' किंवा शिवाजीचा 'राज्यव्यवहारकोश' या ग्रंथांची उदाहरणें पाहा. हे दोन्ही ग्रंथ शिवाजी व नेपोलियन यांनीं बहुतांशीं तज्ज्ञांच्या मदतीने पण स्वतःच्या देखरेखीखालीं तयार केले. या ग्रंथांच्या

मूळ लेखकाचें नांवहि आज फारसें कोणाला माहीत नाही. पण शिवाजी किंवा नेपोलियन यांच्या बुद्धीची धारणाच इतकी व्यापक होती की, या ग्रंथांचें पितृत्व त्यांच्याकडे दिलें, तर तें मुळींच विसंगत दिसणार नाही. अकबराच्या ' ऐने अकबरी 'बद्दलहि असेंच म्हणतां येईल.

कालिदासाचा रघुवंश हा वाल्मीकि रामायणाइतकाच स्वतंत्र ग्रंथ समजावा लागेल. त्याचें कथानक रामायणांतलेंच असलें, तरी रघुवंशाची मांडणी, भाषा व काव्यशक्ति हीं अलौकिक आहेत. संस्कृत नाटकांपैकीं पुष्कळांना महाभारत किंवा पुराणांचा आधार आहे, पण रचना वेगळी म्हणून त्यांना नावीन्य आलें. इंग्रजी वाङ्मयाचें पितृत्व असलेला पहिला ग्रंथकार चॉसर याच्या ग्रंथांतून त्याच्या स्वतःच्या लिखाणापेक्षां उतारेच अधिक दाखवितां येतात; आणि शेक्सपिअरच्या नाटकांची ऐतिहासिक पद्धतीनें मॅलोन या टीकाकाराने जेव्हा चिकित्सा केली, तेव्हा " सहावा हेन्री या नाटकाच्या एकंदर ६०४३ ओळींत १७७१ ओळी शेक्सपिअर यानें आपणांपूर्वींच्या कोणा ग्रंथकारावरून जशाच्या तशा घेतल्या; २३७३ ओळी इतर ग्रंथांच्या सामान्य माहितीच्या आधारें लिहिल्या; खास त्याच्या म्हणतां येतील अशा केवळ १८९९ म्हणजे सुमारें दोन हजारच ओळी या नाटकांत आढळून आल्या. " त्याच्या ऐतिहासिक नाटकांत इतिहास ही पूर्वार्जित मिळकत होती. नाट्यदृष्टीने ऐतिहासिक प्रसंगांची त्याने रचना केली. फक्त कांही विशेष प्रसंगाकरितां जें संशोधन त्याला करावें लागलें असेल तेवढेंच शेक्सपिअरचें.

यावर इमर्सनने विनोदाने म्हटलें आहे की, संशोधनाची गोष्ट कशाला ? शेक्सपिअरच्या आजूबाजूस जीं सामान्य माणसें वावरत असतील, त्यांच्या तोंडच्या वाक्यांनी देखील शेक्सपिअरला कित्येक कल्पना सुचून त्यांचा त्याने उपयोग केला असेल. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें तर, आपण एवढे साहित्यसम्राट्; ' साहित्याच्या अमोल रत्नांची वाग्वैजयंति आपल्या कंठांत रुळत असतांना एखाद्या सामान्य मनुष्याच्या गळ्यांतील हांसळीचा आपण कां मोह धरावा ? ' असें त्याच्या मनांतहि चुकून आलें नसेल ! सामान्य माणसेंहि क्वचित् एखादें सुभाषित किंवा सुंदर कल्पना व्यक्त करतात. पण त्याचबरोबर इतर वायफळ व मूर्खपणाच्या गोष्टीच ते अधिक बोलतात !

कलेची दृष्टि किंवा कान असणारा कलाचतुर शर्विलकाप्रमाणे तेवढाच सुवर्ण-कण चटकन टिपून घेतो व आपल्या बटव्यांत टाकून मार्गस्थ होतो 'गाईल त्याचा गळा आणि शिंपील त्याचा मळा' हें नीतिवचन त्याला पूर्ण माहीत असतें; म्हणून या परधनहरणाबद्दल त्याला कधींहि फिकीर वाटत नाही !

**वाङ्मय-ऋणाच्या मर्यादा**

'गाईल त्याचा गळा' ही म्हण राजरोसपणे वाङ्मय-व्यवहारांत वाङ्मय-सेवक उपयोगांत आणतात; पण त्याचा अर्थ असा नव्हे की लेखकाने दुसऱ्याच्या ग्रंथाचें शब्दशः किंवा साररूपाने भाषांतर करावें व तें बेलाशक आपलें म्हणून मिरवावें ! किंवा, स्वतंत्र लिहिण्याची ज्याची पात्रता आहे त्याने चोरी करण्यास प्रत्यवाय नाही असाहि त्याचा अर्थ नव्हे. एखाद्या ग्रंथकाराच्या कृतीचा दुसऱ्याने कसा व किती मर्यादेपर्यंत उपयोग करावा, याला कॉपीराईटच्या कायद्यांची एक मर्यादा आहेच, पण दुसरी नैतिक मर्यादा सदभिरुचीची आहे.

निव्वळ भाषांतरित ग्रंथाची गोष्ट निर्विवाद्य म्हणून आपण सोडून देऊं. कारण भाषांतरकार मूळ ग्रंथकाराचें ऋण बहुधा कबूल करतो. तथापि भाषांतरित ग्रंथाचें मोल त्याच्या उपयुक्ततेवरूनच अधिक ठरतें हें लक्षांत ठेवावें. कारण एखादा 'स्वतंत्र ग्रंथ' अगदीं भिकार असूं शकेल व भाषांतरित ग्रंथ फार मौल्यवानहि ठरण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, वाग्भट, सुश्रुत हे ग्रंथ, किंवा मंडलिकांचे मिताक्षरा, मनुस्मृति हे ग्रंथ, धर्मकोश, शब्दकोश, थोरल्या चिपळूणकरांच्या आरबी भाषेंतील सुरस गोष्टी, आनंद-कर्ते आपटे यांची बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांचीं भाषांतरें हे ग्रंथ भाषांतररूप असले तरी हीन गणतां यावयाचे नाहींत. परभाषेंतील उत्तम उत्तम ग्रंथांचीं भाषांतरें करून आपली भाषा समृद्ध करणें हाहि एक वाङ्मयांतील सदुद्योगच आहे; व इतर लेखनानें स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वाविषयीं लेखक आपली पात्रता जितकी स्थापित करील तितकी त्याच्या भाषांतरित पुस्काची किंमत वाढेल हें उघड आहे. भाषांतर या विषयावर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं निबंधमालेंत एक स्वतंत्र निबंधच लिहिला आहे; व उत्तम भाषांतर करणें हें वाटतें तितकें सोपें नाहीं हें प्रयत्न करून पाहणाराच्या सहज लक्षांत येईल.

भाषांतरित ग्रंथाची गोष्ट सोडली तर दुसरें टोंक स्वतंत्र ग्रंथाचें म्हणतां येईल. ज्यांतील मुख्य सिद्धान्त किंवा प्रधान विचार हा ग्रंथकर्त्याचा असून

त्यांत त्याने पूर्व ग्रंथकारापेक्षा आपलें वैशिष्ट्य दाखविलें असेल, अशा ग्रंथाला स्वतंत्र म्हणतां येईल. पुष्कळदा विचाराच्या नाविन्याइतकेंच मांडणींतहि इतकें कौशल्य असतें की, अशा ग्रंथास स्वतंत्रप्राय ग्रंथांतच जमा करावें लागतें. कोर्टापुढे काम चालविणारे वकील सर्वच कायदा जाणणारे असतात, पण उत्कृष्ट मांडणी करतां येणारालाच 'कायदेपंडित' म्हणतात. कायदा तोच, पण त्यावर शेकडों पुस्तकें दरवर्षी प्रसिद्ध होतात. त्यांत बहुधा प्रत्येकाच्या मांडणींत कांही नावीन्य असतें, म्हणूनच वाङ्मयचौर्याच्या फिर्यादी होत नाहीत. कायदा किंवा एखादें शास्त्र कोणाला किती कळलें हें नुसत्या मांडणीनेहि समजतें! इतिहास हा विषय एकच असतां, इतिहासकार अनेक कां याचें मर्म वेगळी मांडणी किंवा विवेचनपद्धति हेंच आहे.

पण वरील दोहोंपेक्षाहि दुसऱ्याच्या ज्ञानाचा किंवा कल्पनेचा रास्त रीतीने कसा व किती मर्यादेपर्यंत उपयोग करतां येतो याचें निश्चित असें सर्वसामान्य उत्तर देतां येणार नाही. तें प्रत्येक उदाहरणावरून वेगळें ठरवावें लागेल. तसेंच दुसऱ्याच्या कल्पनेचा थोड्याफार वेगळ्या स्वरूपांत एखाद्याने उपयोग केला असेंहि दाखवितां आलें तरी, या संशोधनाने फार तर संशोधनविद्या सफल होईल, तथापि साहित्यशर्विलक असा आरोप दुसऱ्यावर शाबीत होऊं शकेलच असें म्हणतां येणार नाही.

याचें एक कारण असें की, एखाद्या ग्रंथकाराने एखादें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें, म्हणजे तें ज्ञान एकप्रकारें सार्वजनिक मिळकत होते, व तें सहजगत्या उपयोगांत आणणें हा कायदेशीर किंवा नैतिक दृष्टीनेहि अपहार होऊं शकत नाही. ज्ञानामध्येहि बहुजनसमाजाला पूर्ण मुक्तद्वार (Common pasture) असा एक प्रांत असतो, व त्यांतील ज्ञान हें काल व विस्मृति यांनी पूर्ण सार्वजनिक होत असल्याने, उपमा व अवतरणें यांच्या बाबतींत जें एकाला सुचलें, तें त्याच वेळीं दुसऱ्याला सुचावें असें सहज घडूं शकतें.

याबद्दल प्रस्तुत लेखकाला स्वतःच्या अनुभवाची अशी गोष्ट सांगतां येईल कीं, प्रतिभासाधन चौकशी रिपोर्ट प्रसिद्ध होण्याच्या आधीं एक आठवडा त्याने सदर विषयावर लेख लिहावयाचें योजिलें होतें.

तीं तीं पदें नित्य फिरोनि येती।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती।

कौशल्य मोठें रचनेंत आहे।
सत्काव्य तेणें नव वाटताहे ।।

हा श्लोक सहज सुचला, तो उपयोगांत आणण्याचें ठरविलें होतें. कारण सर्व कॉपीराईट ॲक्टाचें सार या एकाच श्लोकांत सांगतां येईल. पण 'ज्ञानप्रकाशां'-तील रिपोर्ट वाचतांना जेव्हा त्यांत नेमका हाच श्लोक उपयोजिलेला आढळला, तेव्हा दोन ठिकाणीं दूर असणाऱ्या लेखकांतहि सहविचार कसे येतात हें अनुभवून मोठें नवल वाटलें, व अर्थातच या श्लोकाचा उपयोग करण्याचा विचार प्रस्तुत लेखकाने रद्द केला!

तथापि, एखाद्याने असा दुसऱ्याच्या विचाराचा, कल्पनेचा किंवा अवतरणाचा उपयोग केला असें आढळलें, तर केवळ एवढ्याच पुराव्यावरून 'शर्विलक' या शेलक्या विशेषणाने त्याची संभावना होणें मात्र अन्यायाचें आहे असें वाटतें. स्वतःचें ज्ञान व दुसऱ्याची कल्पना यांची पुष्कळदां भेसळ होऊनच नवा विचार प्रकट होतो. बावनकशी सुवर्णाइतकी जरी गिनी गोल्डला किंमत दिली नाही, तरी भेसळ केलेलें नाणेंच व्यवहारांत वापरलें जातें. त्याला जर आपण निषिद्ध मानीत नाहीं, तर केवळ दुसऱ्याचें विचारसादृश्य आढळलें म्हणून लेखकावर गहजब करूं नये. खरा लेखक दुसऱ्याची वस्तु जशाची तशी उचलून स्वतःची म्हणून कधीहि मिरवूं शकत नाही. किंबहुना जो असें करील तो लेखकच नव्हे! अक्षरशः नक्कल किंवा प्यारे छेदक क्रमवार नक्कल जो करतो तो उघडच भाषांतऱ्या ठरेल! जे ज्ञान पचलें नाहीं तेंच ओकून पडतें. पण मनन व परिशीलन यांच्या संस्काराने ज्याने ज्ञान पचविलें, तो दुसऱ्याची शब्दशः नक्कल करूं शकणारच नाहीं. दुसऱ्याच्या चार गोष्टी त्याने सांगितल्या, तरी स्वतांच्या दोन गोष्टी भरीला घालून तो मुद्दा आणखी विशद करील. ज्यांना स्वतःला लेखनकला थोडी-बहुत अवगत असेल, त्यांना ही अनुभवाची गोष्ट सहज पटेल.

समुद्राच्या पाण्याचें डोळ्याला न दिसतां बाष्पीभवन होतें, व पुनः तें पाणी वेगळ्या गुणधर्मांनें पर्जन्याच्या रूपानें येतें. किंवा जठराशयांत जाण्या-पूर्वीचें अन्न व तें पोटांत गेल्यावर इतर पिंडरस त्याला मिळाल्यावर होणारें अन्नरसाचें स्वरूप यांत जसा स्वरूपतः भेद होतो, असेंच प्रतिभाशाली मनुष्याच्या मनोव्यापाराचें आहे. तो दुसऱ्याचें ज्ञान घेतो, पण जशाचें तसेंच

कधी प्रकट करीत नाही. परत देतांना आपला 'हातचा' त्यांत मिळवितो. म्हणूनच त्यानें दुसऱ्याच्या ज्ञानाचा केलेला उपयोग दूषणास्पद ठरत नाही !

आजच्या कम्युनिस्ट मनुष्याप्रमाणे विद्वान् मनुष्य सगळ्या जगांतील ज्ञानाच्या मिळकतीवर आपला राजरोस हक्क सांगतो. मिळकत कोणाची ? तर ज्याला जरुरी असेल त्याची ! व ज्याला उपयोग करतां येत असेल असेल त्याची ! ! तसेंच ज्ञानाचा सुवर्णकण लाभलेला मनुष्य म्हणतो की, 'हा सुवर्णकण आहे हें तरी मींच प्रथम ओळखलें. त्यापूर्वी ती केवळ अशोधित धातु होती. त्यावर 'संस्कार' करून मींच त्याचें तेज पाडलें. एरवीं त्याला कोण विचारीत होता ? इमर्सन यानें शेक्सपिअरवरील निबंधांत पुढील उद्‌गार काढले आहेत :

He (Chaucer) steals by this apology that what he takes has no worth where he finds it, and the greatest where he leaves it. It has come to be practically a sort of a rule in literature, that a man having once shown himself capable of original writing, is entitled thenceforth to steal from the writings of others at discretion. Thought is the property of him who can entertain it and of him who can adequately place it.''

तात्पर्य, कोणीं कोणापासूनहि विचार घेतले असले तरी, त्यांचा उपयोग त्याने अखेर कसा केला हेंच मुख्यतः पाहावयाचें असतें. कला साधली तर तें चातुर्य ठरतें, न साधली तर चोरी ठरते, हा न्याय जगांत सगळीकडे आहेच ! पण तेवढ्यामुळें दुसऱ्याच्या ज्ञानाचा उपयोग करणें गैर हें जसें ठरणार नाही, त्याचप्रमाणें, ग्रंथकाराला 'कसें व किती' या दोन रखवालदारांच्या नैतिक मर्यादाच नाहीत असें समजणेंहि चुकीचें आहे.

(प्रभात-साहित्यसंमेलन अंक, डिसेंबर १९३३) मुंबई

* * *

# मराठी रंगभूमीचे पडसाद

मराठी रंगभूमी हें एक माझें सुखस्वप्न आहे. पंचवीस वर्षें ती रंगभूमि मी पाहिली. अर्धशतकाचा इतिहास असलेली ती रंगभूमी आज हयात नसल्यामुळें तें 'विरलेलं स्वप्न' आहे हें खरें; पण जुन्या रंगभूमीच्या स्मृति माझ्या मनांत अद्यापि विहरत असतात.

संगीत नाटकांची परंपरा किर्लोस्करांनी प्रथम सुरू केली अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें मन प्रतिभाशाली होतें. पूर्वींची पौराणिक नाट्यसृष्टि बदलून टाकण्याकरितां आपण संगीत नाट्यसृष्टि उत्पन्न करावी अशी एक दिवस आकाशांतील धांवत्या ढगाप्रमाणे त्यांना कल्पना सुचली आणि शाकुंतल नाटकाचें भाषांतर करून त्यांनी ती अंमलांत आणली. 'या एका शाकुंतल नाटकावर मी लाख रुपये मिळवीन' असें ते म्हणत व खरोखरच लाख रुपये त्यांनी मिळविलेहि.

कंपनी म्हटली म्हणजे अनेक माणसांच्या स्वभावांचें तें संमेलन असतें. त्या सर्वांना सांभाळण्याची त्यांना हातोटी होती. मी मालक किंवा 'नाटककर्ता' हा अहंकार त्यांना शिवला नाही. गुणांची अचूक पारख आणि लोकसंग्रह हे मोठे गुण त्यांचेजवळ होते. किर्लोस्करांचे घराण्यांतील विरक्तपणा अण्णासाहेबांतहि होता. ते अवघ्या बेचाळिसाव्या वर्षी वारले. मृत्यूपूर्वी त्यांनी संन्यास घेतला होता. अनेक कंपन्यांनी त्यांची परंपरा पुढे चालविली, त्यांत

दर खेळापूर्वी अण्णासाहेबांच्या प्रतिमेला हार घालण्याची वहिवाट असे.

**अष्टपैलू नट—भाऊराव**

भाऊराव कोल्हटकर हेहि अण्णासाहेब किर्लोस्करांप्रमाणेच अल्पायुषी वारले. तथापि त्यांनी सुमारें १८ वर्षें रंगभूमीवर काम केलें. स्त्री-पुरुषांच्या भूमिका ते सफाईने करीत. केतकीसारखा गौरवर्ण, उत्तम स्वरूप, शब्दोच्चार सुस्पष्ट व आवाज कमालीचा भरदार आणि सुस्वर असे सगळे गुण त्यांच्यांत असल्याने, इतका अष्टपैलू व जातिवंत नट त्यांच्याइतका संगीत रंगभूमीवर झालाच नाही असें अद्यापिहि लोक म्हणतात. आकाशांतील पौर्णिमेचा चंद्र आपल्या आकर्षणाची मोहिनी सर्वांवर घालतो, त्याचप्रमाणे त्यांच्या शांत स्निग्ध चेहेऱ्याची छाप सर्वांवर पडे ती कांही अपूर्वच. भाऊराव वारल्याची बातमी आली तेव्हा अंतःकरणांत एखादा बाण खोल रुतून बसावा असें अनेकांना दुःख झालें. त्यांच्याबद्दल ‘ काळ ’ पत्रांत लिहितांना शिवराम-पंतांनी Last of the Romans या विशेषणाने त्यांचें महनीय स्थान दर्शविलें होतें.

अण्णासाहेब किर्लोस्कर हे मराठी रंगभूमीच्या इतिहासांत युगकर्ते होऊन गेले. चिपळूणकर हे जसे मराठी भाषेचे शिवाजी, तसेच किर्लोस्कर हेहि मराठी रंगभूमीवर वेगळी परंपरा उत्पन्न करणारे शककर्तेच होते. त्यांच्या उदाहरणाने आणखी कंपन्या व नवे नाटककार निर्माण होऊन मराठी रंग-भूमीचें यश ‘ प्रतिपर्वरसोदय ’ अशा जोमाने दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेलें. पेशवाईत ज्याप्रमाणे सहा पेशवे लागोपाठ व एकाहून एक सरस झाले, त्या-प्रमाणे अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, खाडिलकर, केळकर, गडकरी अशी महाराष्ट्र रंगभूमीला विद्वान् नाटककर्त्यांची परंपरा लाभली. एका दिव्याने दुसरा दिवा उजळावा त्याप्रमाणे सतत पन्नास वर्षें रंगभूमीचें चिराखदान आपल्या अपूर्व तेजाने सतत प्रकाशमान राहिलें होतें.

**नाटककार देवल**

देवल हे अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याप्रमाणेच स्वतः नट व उत्कृष्ट नाटककार होते. किर्लोस्करांपेक्षा त्यांच्या रचनेंत रेखीवपणा अधिक होता. पद्यरचना अगदी सोपी, प्रासादिक व सुबोध. त्यांनीं मूळच्या मृच्छकटिकांत

अनेक ठिकाणीं छाटाछाट करून त्याचें प्रयोगाला आटपशीर असें भाषांतर केलें, व शाकुंतलाप्रमाणेच एक उत्कृष्ट नाटक रंगभूमीवर आणलें. झुंझारराव हें मॅक्बेथचें, तसेंच फाल्गुनराव हें मर्फीच्या नाटकाचें रूपांतर आहे. पण रूपांतर करतांना आपल्या इकडील आचार-विचार व सामाजिक कल्पना यांना साजेसा पेहेराव त्यांनी चढविल्यामुळे तें रूपांतर असेल अशी शंकाहि येत नाही ! एका अर्थाने असें म्हणतां येईल की, स्वतंत्र नाटक लिहिणें एक वेळ सोपें; पण भाषांतर करण्याची ताबेदारी पत्करून, ओळखूं न येण्या-इतकें हुबेहुब रूपांतर करणें ही अवघड गोष्ट आहे. मागे कोणी एका नटाने स्त्रीवेषाने जाऊन एका स्त्री-समाजांत हळदीकुंकू घेतल्याची आख्यायिका सांगतात. सदर गोष्ट खरी असो किंवा नवलकथा असो, तथापि उत्तम भाषांतराला मात्र ती गोष्ट पूर्णपणे लागू आहे यांत शंका नाही. परकी नाटकाने भिन्न सामाजिक चाली असलेल्या समाजापुढे येणें आणि स्त्रीवेषाने का होईना, पण पुरुषनटाने स्त्री-समाजांत वावरणें या दोन्ही गोष्टी सारख्याच अवघड आहेत. पण देवल कसलेले लेखक असल्यामुळे ही गोष्ट ते करूं शकले. १८९९ मध्ये त्यांनी ‘ शारदा ’ हें स्वतंत्र नाटक लिहून आपल्या कीर्तीवर कळस चढविला. या नाटकाने खरोखरच सामाजिक क्रांति केली.

### शारदा नाटक आणि सामाजिक स्थित्यंतर

पन्नास वर्षांपूर्वी हिंदु समाज कुमारिकांच्या बाबतींत किती हीन अवस्थेंत होता हें पाहून मनांत कालवाकालव उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाही ! ‘ पण लक्षांत कोण घेतो ? ’ या कादंबरीपेक्षाहि शारदा नाटकाने सामाजिक स्थित्यंतराची उलथापालथ अधिक केली. स्त्रियांच्याभोवती रूढीच्या परवेशतचा जाच इतका होता की, जरठकुमारी विवाह ही मोठी लज्जास्पद किंवा शरमेची गोष्ट आहे असें कोणाच्या मनांतहि येत नसे ! गळ्याला दावें बांधून डोळ्यांत आसवें असलेल्या, पण दुःख व्यक्त करण्याला वाचा नसलेल्या, गरीब गाईला जसें कोणाहि कसायाने ओढून घेऊन जावें, त्याप्रमाणे कित्येक कांचनभट अजाण कुमारिकांची लग्नगाठ एखाद्या थेरड्याशीं लावून मोकळे होत ! ‘ अष्टवर्षा भवेत् कन्या ’ असें शास्त्रांतच लिहिलें होतें ना ! मग लग्नाला मोठी मुलगी कशी चालेल ? एकदा पुण्यांत त्या वेळीं असें झालें की, लग्नाला अंतरपाट धरून उभें राहिल्यावर मंडपांतच नवरदेवाने ‘ राम ’

म्हटला ! त्याबरोबर हाहाकार उडाला. त्यांत मुलीच्या बापाला असा पेच उत्पन्न झाला की आपली मुलगी विधवा म्हणावयाची की अद्याप अविवाहित अशी कुमारी म्हणावयाची ? वाग्दान तर होऊन गेलें होतें. अशा मुलीशीं लग्न करण्याला पुनः कोण तयार होणार ? असा घोळ पडून ती मंडळी टिळकांकडे आली. टिळकांनी सांगितलें, “ कायदा आणि शास्त्रार्थ या दोन्ही दृष्टींनी हें लग्न अद्याप झालेलें नाही. सप्तपदीशिवाय कोणतेंहि लग्न निर्णायक रीतीने झालें असें म्हणतांच येत नाही ! ” शारदेचें लग्न मोडल्यावर “ मी समजुं तरी काय भुले मन ” या मनोहर पदांत तिच्या आईची मनःस्थिति कशी केविलवाणी झाली तें दाखविलें आहे. कायद्याच्या याच मुद्यावर शंकराचार्यांसमोर वाद करून कोदंड शारदेशीं पुनः लग्न लावण्याला तयार होतो, यावरून समाजसुधारणेचा किती अचूक आणि शास्त्रसिद्ध मार्ग या नाटकाने त्या वेळीं दाखविला, हें दिसून येईल. अलीकडे या शारदेच्या कथानकावर चित्रपट झाला आहे. पण जुन्या समाजस्थितीची आणि सामाजिक कल्पनांची ज्याला काडीमात्र ओळख नाही अशा दिग्दर्शकाच्या हातीं एखादें अव्याजमनोहर कथानक पडलें म्हणजे त्याची कशी माती होते, याचें तें एक उदाहरण आहे. देवलांची शारदा फार वर्षांपूर्वीं कृष्णानदीच्या डोहांत बुडाली ! ‘शारदा’ चित्रपट हें जुन्या अनुपम सुंदर शारदा नाटकाचें एक निर्दय विडंबन आहे !

## टिळकांनी दिलेलें उत्तेजन

शारदा नाटकांत भाऊराव कोल्हटकर कोदंडाची भूमिका करीत. दहा वर्षें स्त्री-भूमिका केल्यानंतर पुढे ते पुरुषपार्ट करूं लागले. अमक्याचाच स्त्रीपार्ट असला तर नाटक व्हावयाचें हा आग्रह भाऊरावांना मान्य नव्हता ! व्यक्तिशः त्या नटाचा तो अपूर्व गौरव वाटला तरी नाट्यसंस्था यामुळे कायमच्या परतंत्र होतात. बरें, स्त्रीपार्ट करणारा स्वतःच्या वाढत्या वयापुढे काय करणार ? १८-२० वर्षांचा नट शकुंतला किंवा सुभद्रा यांच्या कामाला प्रथम चालला, तरी तीस वर्षें झाल्यावर तरी तें काम सोडून त्याने पुरुषपार्टच करावयास हवा ना ? स्त्री-पार्ट करणारा नट पांचशे रुपयांची जाहिरात देऊनहि मिळेना, तेव्हा १८९१ सालीं किर्लोस्कर कंपनी बंद करावी असेंहि चालकांच्या मनांत येत होतें. यानंतर तशींच पांच-सहा वर्षें पुढे गेलीं. पुढे

शारदा नाटकाने हात दिला. पण अखेर भाऊराव अखेरच्या दुखण्याने आजारी पडले, तेव्हा मात्र खरें संकट उत्पन्न झालें. या वेळीं टिळकांनीच लॉ क्लासमध्ये शिकत असलेल्या नारायणराव जोगळेकरांना किर्लोस्कर कंपनींत जाण्याचा सल्ला देऊन किर्लोस्कर मंडळीला या अडचणीच्या वेळीं साह्य केलें. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांनाहि टिळकांनीच किर्लोस्कर मंडळींत जाण्यास सांगितलें. टिळकांना गायन किंवा नाट्य यांची आवड असेल किंवा नसेलहि; पण त्यांना माणसाची पारख फार होती. मनुष्यांत ठळक गुण कोणता आहे, आणि त्याचा राष्ट्रीय दृष्टीने उपयोग नेमका कुठे होईल, हें लो. टिळकांइतकें कोणींच जाणलें नाही. मनुष्य सर्व करून 'अकर्ता' कसा असतो, याचें हें एक उदाहरण आहे!

**लो. टिळक आणि बालगंधर्व**

टिळकांच्या या पुरस्काराची किंमत आज कोणाच्या नीटशी लक्षांत येणार नाही. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, १८९७ साली पहिला राजद्रोहाचा खटला होईपर्यंत टिळक 'लोकमान्य' झाले नव्हते. आणि नाटकानी जरी सामान्य बहुजनसमाजाला भुरळ पाडली, तरी नाटक हें शिष्टमान्य झालेलें नव्हतें. टिळक, आगरकर, गर्दे इत्यादिकांनी नाटकाच्या हँडबिलावर सही घातली, यावर वर्तमानपत्रांतून टीका करणारे त्या वेळी होतेच! हे लोक म्हणत, 'एखाद्या गोष्टीची स्तुति कोणीं किती करावी याला मर्यादा असावी! हँडबिलावर पुरस्कार करणारे म्हणून आपली सही घालणारांना स्वतःचा मोठेपणा मिरविण्याची हौस आलेली दिसते! कित्येक तरुण मुलें आईबापांना न विचारतां नाटक कंपनींत पळून जात. यामुळे आईबापांच्या जिवाला इतका घोर लागत असे की, ते अन्नपाणी देखील वर्ज्य करीत! एका गृहस्थाने वर्तमानपत्रात उघड सूचना केली होती की, अठरा वर्षांखालील मुलास जर कोणीं नाटकांत फूस लावून नेलें, तर त्याला 'किडनॅपिंग'सारखी शिक्षा करता येण्यासारखा सरकारने कायदा करावा! मुलगा नाटकांत गेला की त्याच्या सामाजक आयुष्याचा निकाल होत असे! नारायणराव बालगंधर्व यांना किर्लोस्कर कंपनींत घालतांना त्यांच्या आईने टिळकांना भेटून विचारलें की, "हा मुलगा जर कपनीत गेला तर याचें लग्न कसचें होणार? आणि त्याला मुलगी तरी कोण देणार?" त्यावर "या मुलाचें कंपनींत गेल्याने

कोणतेंहि अकल्याण होणार नाही, याची जिम्मा माझ्याकडे लागली. त्याबद्दल तुम्ही अगदी निर्धास्त असा " असें टिळकांनी आश्वासन दिल्यावर त्या बिचारीची खात्री पटली.

**केसरीचें ऋण**

रंगभूमीवर एखाद्याने दृष्ट लागण्याइतके सुंदर काम केलें, तरी अश्लीलपणाने त्याची टवाळी वर्तमानपत्रांतून करणारे होतेच. मग बुधवार पेठेतल्या 'गटारयंत्रां'त तोंडी टीकेची मजल किती जात असेल याची कल्पनाच केलेली बरी. शंकरराव मुजुमदार हे ज्या वेळी शकुंतलेचा पार्ट करीत, त्या वेळी फारच खुपसुरत दिसत. एकदा कलेक्टर नाटक पाहावयास आल्यावर त्याने नाटकाची फार फार प्रशंसा केली. यावर 'पुणेवैभवकारा'ने लिहिलें की, "शकुंतलेला कलेक्टराने आपल्या बंगल्यावर बोलावून नेलें होतें. आणि 'दौलतजादा' म्हणून दोन-चार रुपयेहि दिले असें समजतें!" अशा अवखळ लोकमताच्या परिस्थितींत चांगली गोष्ट केवळ कुचेष्टेखोर निंदेमुळे बुडूं न देणें हें जें वर्तमानपत्रकाराचें कर्तव्य तें चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनी केसरीद्वारा निर्भयपणाने केलें. हें केसरीचें ऋण नाटककंपन्यांचे चालक स्मरत असत. केसरीवर ज्या ज्या वेळीं खटल्याचें संकट आलें त्या त्या वेळीं किर्लोस्कर, शाहूनगरवासी इत्यादि मंडळींनी डिफेन्स फंडाला मुक्त हस्ताने द्रव्याची मदत केली आहे. आणि नटसम्राट् गणपतराव जोशी यांची टिळकांच्याबद्दल इतकी नितान्त आदरबुद्धि होती की, कांही प्रसंगी तर खर्चवेंच देखील न घेतां, एकेका सबंध खेळाचें उत्पन्न त्यांनी डिफेन्स फंडाकडे पाठवून दिलें होतें.

(सह्याद्रि-नोव्हेंबर १९५४)

★ ★ ★

# मी पाहिलेली रंगभूमी

माझ्या आयुष्यांत लहानपणीं मीं भोगलेल्या सुखांत, मीं पाहिलेली रंगभूमि आणि ऐकलेलें गायन यांना मी पहिलें स्थान देईन. मग सुखाची माझी व्याख्या 'काव्यात्म' आहे असें वाटल्यास म्हणा. निःशब्द भावनेला सजीव करणारें, आणि अंतरात्म्याचा ठाव घेणारें संगीतावांचून दुसरें काय असूं शकेल ? मनुष्याचें मन ही एक सारंगी आहे. कोठेहि दूर सुस्वर आलाप निघाला कीं वीणेंत तत्काल संवादी अनुकरण झाल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र कल्पकतेने ती सारंगी नीट लावतां आली पाहिजे. काव्य, नाट्य, गायन, शिल्पकला यांनी मनुष्यजीवनाला सौंदर्यदृष्टि प्राप्त होते. उज्ज्वल देशभक्तीकरितां केलेला स्वार्थत्याग हेंहि एक सौंदर्यच आहे. पण त्याबद्दल एखाद्या वेळीं लिहीन.

किर्लोस्करांचें 'शाकुंतल' हें मीं पहिलें नाटक पाहिलें, तेव्हा मी सहासात वर्षांचा असेन. तेव्हापासून पुढें पंचवीस वर्षांत जीं नाटकें मीं पाहिलीं त्यावरून मराठी रंगभूमीचा ऐन उत्कर्षाचा काळ मीं पाहिला असें म्हणतां येईल. १९०६ सालीं किर्लोस्कर मंडळीने पुण्यांत स्वतःचें भव्य नाटकगृह नुकतेंच बांधलें होतें. त्याचा अनावरणसमारंभ 'मूकनायक' नाटकाने मोठ्या थाटांत झाला. मीं पाहिलेलें 'शाकुंतल' दुसऱ्याच दिवशीं होतें. स्टेजच्या थोडें वर कै. अण्णासाहेब किर्लोस्करांचें तैलचित्र हार घालून ठेवलें होतें.

चित्राखाली आळित्यासारख्या सुरेख लाल शाईने एक संस्कृत श्लोक लिहिला होता—

प्रज्ञाविधृष्ट प्रतिभा—
मणिदीपप्रकाशितं ।
संसारालेख्य भांडारं
पश्येदं रंगमंदिरम् ।।

ती. तात्यासाहेबांनी स्वतः हा श्लोक रचलेला होता. किर्लोस्कर नाटकगृहाच्या डोक्यावर हा श्लोक आजहि विराजमान आहे हें सांगितलें म्हणजे, किर्लोस्कर नाटक मंडळीचे व आमच्या घराचे ऋणानुबंध काय होते हें वेगळें सांगावयाचें कारण नाही.

मीं 'शाकुंतल' नाटक पाहिलें तेव्हा बालगंधर्वाचें वय सारें १८।१९ असेल. त्या कोंवळ्या पोरसवदा वयाला स्त्रीपार्ट फारच शोभून दिसे. अंगकांति गौर, गळा सुरेल व आर्जवी, रूपाबद्दल प्रश्नच नाही, अभिनयांत सहजपणा व गातांना अंगविक्षेपाची खोड मुळींच नाही, इत्यादि अनेक गुणविशेषांमुळे या पहिल्याच प्रयोगांत बालगंधर्वांची जी छाप पुणेंकरांवर पडली ती कायमचीच. 'शाकुंतला'च्या पांचव्या अंकांत दुष्यंत विस्मरणाने 'शकुंतले'चा अव्हेर करतो त्या वेळीं, दुःख, लज्जा व संताप व्यक्त करतांना आरक्त झालेला चेहेरा, लोकापवादाच्या भीतीने स्त्रीच्या तोंडावर येणारें काहूर आणि वाटणारा त्वेष हीं गंधर्वाने इतकीं सुरेख व्यक्त केलीं की, हा एक उत्तम जन्मसिद्ध नट आहे, याबद्दल त्याने लोकांची खात्रीच पटविली. त्या वेळचा शकुंतलेचा तो आरक्त चेहेरा मला आजहि आठवतो!

तीस वर्षांपूर्वी नाट्यसंस्था उत्तम जोमांत होती. अनेक नाटक मंडळ्यांचे चालक, नट व नाटककार यांचा ती. तात्यांशीं ऋणानुबंध फार चांगल्या प्रकारचा होता. केसरी, ज्ञानप्रकाश यांतून त्या वेळीं नाटकांचीं जितकीं मार्मिक परीक्षणें होत तितकीं आतांहि होत नाहीत, त्या वेळीं राजकारणच देशांत थोडें होतें म्हणून वाङ्मयविषयाला साहजिकच अधिक अवसर मिळे. टिळकांना स्वतःला ललितकलेची आवड फारशी नव्हती, पण भिन्न रुचींच्या आणि भिन्न प्रकृतींच्या अनेक लोकांचें नाट्य हेंच एक मनोरंजनाचें साधन आहे हें 'लोकनायक' टिळकांना अवगत कसें नसेल? अण्णासाहेब किर्लो-

स्करांनी किर्लोस्कर कंपनी काढली तिच्या अगदीं पहिल्या प्रसिद्धिपत्रकावर आगरकरांप्रमाणे लो. टिळकांनीहि सही केली, आणि अनेक वेळेलां सल्ला-मसलतीने हजर राहून किंवा वेळीं पैशाचीहि मदत करून नोटयकलेला त्यांनी साहाय्य केलें. भाऊराव कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर, नारायणराव जोगळेकर आणि बालगंधर्व हे टिळकांच्याच प्रेरणेने किर्लोस्कर कंपनींत आले. टिळकांनीं ठेवलेला हा सक्रिय ऋणानुबंध सहजच तात्या 'केसरी'चे संपादक असतां पुढे चालू राहिला. मला आठवतें की, लहानपणीं किर्लोस्कर कंपनी पुण्यांत असतां वर्षांतून एखादे वेळ सर्व नट, मालक, चालक वगैरेंना आमच्या घरीं जेवणाचें आमंत्रण असे. नंतर गप्पागोष्टी, हास्यविनोद, गाणें वगैरेहि होई. कोल्हटकर किंवा गडकरी या घरगुती कार्यक्रमास कित्येकदां हजर असल्यामुळे फार मौज येत असे. असा हा ऋणानुबंध किर्लोस्कर मंडळीच्या अखेरपर्यंत टिकला. "तात्यासाहेब हे आमच्या कंपनीचे सूत्रचालक आहेत" असें कै. शंकरराव मुजुमदार अभिमानाने म्हणत. अखेर जेव्हा कंपनी मोडली तेव्हा तडजोडीची शेवटची बैठक आमच्या घरींच झाली होती.

भारत नाटक मंडळी, चित्ताकर्षक, लोकमान्य, बलवंत, राजापुरकर, ललितकलादर्श या पांच कंपन्या तात्यांनीं लिहिलेलीं नाटकें करीत. 'तोतयाच्या बंडा'मध्ये पोतनीस पार्वतीबाईची भूमिका आणि नानबा गोखले हे नाना फडणिसांचें काम अप्रतिम करीत. इतर नाटकेंहि चांगलीं होत.

तात्यांच्या सहा नाटकांत 'तोतयाचें बंड' व 'कृष्णार्जुन-युद्ध' हींच' रंगभूमीवर टिकलीं. एक शोकान्त व दुसरें आनंदपर्यवसायी असलें तरी दोन्ही नाटकांत भावनेपेक्षा बुद्धिप्रधानता अधिक. पार्वतीबाई व अमला दोघी दुःखीकष्टी; पण आपणांभोंवतीं जो समाज आहे त्याची सदैव जाणीव ठेवून आपला मार्ग काढला पाहिजे हें विवेकाने ओळखणाऱ्या म्हणजे बुद्धिप्रधानच. संसारांतल्या या अतिशय नाजूक परिस्थितींत हरघडी मोठ्या दक्षतेनें वागून, पेशव्यांच्या घराण्याच्या अब्रूचें संरक्षण करीत असतां, नाना फडणिसांच्या बुद्धीवर दहा वर्षें केवढा ताण पडला असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे! 'नानांवर संकट आलें आहे' अशी हें नाटक लिहितांना तात्यांच्या मनांत भावना वावरत होती. 'कृष्णार्जुन-युद्धां'त श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघेहि चित्ररथाच्या बाबतींत परस्परविरोधी प्रतिज्ञा केल्यामुळे

संकटांत येतात. अर्जुनाशीं लढावें तर मित्रप्रेम आडवें येतें. न लढावें तर क्षत्रियाचे पदरीं प्रतिज्ञाभंगाचा दोष येतो, असा पेचप्रसंग दाखवून त्यांतूनच मित्रामित्रांचें भांडण, नवराबायकोचें भांडण, नणंदाजावेचें भांडण अशीं द्वंद्वें निर्माण केलीं आहेत. अर्थात् मित्राला जें मित्रप्रेम वाटतें तें मित्राकरितां नव्हे, तर तो मित्र स्वतःला प्रिय असतो म्हणून! (आत्मनस्तु कामाय) असें या वादाचें तात्त्विक उत्तर नारदाच्या तोंडून दिलें आहे. बुद्धिप्रधान खेळकर विनोदाची या सर्व नाटकांत फार मौज आहे. न्या. जयकरांनी हें नाटक पाहिलें तेव्हा ते फार खूष होऊन गेले.

१९१० ते १९३० या काळांत किती तरी नव्या कंपन्या निघून नवे नट उदयाला आले व त्यांनी रंगभूमीचा संसार समृद्ध केला. वरेरकरांनी आपल्या पुस्तकांत त्याचें सुरेख वर्णन केलें आहे. होमरूलच्या चळवळीच्या दिवसांत लोकजीवनाला भरती येत होती व तिने जणूं कांही नाट्यकलेच्या क्षेत्रांतहि प्रवेश केला होता. या काळांत बालगंधर्व, केशवराव भोसले, सरनाईक, टेंबे, तसेंच गणपतराव जोशी, नानबा गोखले, चिंतामणराव कोल्हटकर, दीनानाथ, कामण्णा वगैरे नट मंडळी विशेष उदयाला आली. याच काळांत विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी हिंदुस्थानांत दौरे करून महाराष्ट्र गायकांचें नांव केलें; आणि भास्करबुवा बखले यांनी कल्पकतेने उत्तम चिजा व चाली नाट्यसंगीतांत आणून संगीत रंगभूमींत क्रांति केली. केशवराव भोसले, विष्णु दिगंबर पलुस्कर, नारायणराव बालगंधर्व ही मंडळी सार्वजनिक दानतीनेहि फार श्रेष्ठ होती. अनेक सार्वजनिक कामांना त्यांनी मदत केली. गंधर्व नाटक मंडळीला नेहमीच कर्ज असे. गंधर्वांच्या चाहत्यांनी १९२९ सालीं तें कर्ज फेडण्याकरिता दीड लक्षाची पर्स देण्याचें योजलें होतें, पण नारायणरावांनी ती देणगी घेतली नाही आणि कर्ज स्वतःच्या बळावरच फेडण्याचें ठरविले, ही गोष्ट अनेकांना माहीत आहे.

एकदा लो. टिळक मंडालेहून सुटल्यावर गायकवाड वाड्यांत गणपतिउत्सव होता; त्यांत भास्करबुवा बखले, कृष्णा-मास्तर व नारायणराव बालगंधर्व यांची गाण्याची मैफल झाली होती, ती पुष्कळांच्या स्मरणांत असेल. प्रारंभीचीं तीन-चार पद्यें झाल्यावर, रात्री दीडच्या सुमारास गंधर्वाने बागेश्रीला सुरुवात केली, व त्यांतहि पद निवडलें तें अत्यंत लोकप्रिय जुन्या शारदा नाटकांतील.

" जो लोककल्याण साधावया जाण । घेई करी प्राण त्या सौख्य कैचे ।। हें ध्रुपद म्हणताक्षणींच साऱ्या जनतेनें ' वाहवा ' म्हणून आनंदाने मान डोलाविली. आणि पुढे जेव्हा त्या पदांतील—

निंदा जनीं त्रास, अपमान उपहास ।
अर्थी विपर्यास, हे भोग त्याचे ।।

हा अंतरा त्याने म्हटला, तेव्हा त्या पद्यांतील बहारीची समर्पकता आणि गायकाची समुचितबुद्धि यांचा मेळ पडून सर्वांना फार कौतुक वाटलें. गाणारे पुष्कळ असतात, पण गंधर्वांत जो विशेष गुण होता तो हाच !

गद्य नाटकांपेक्षाहि संगीत नाटकांकडेच माझा ओढा अधिक. कारण भावना अमर करणारें असें संगीतच. " पियाऽके मिलन ऽऽ की आस " या जोगीच्या आर्त आलापांत जी तीव्र दुःखमिश्रित संवेदना आहे ती शब्दांनीं कशी व्यक्त होईल ? मेघमल्हाराचे सूर ऐकले कीं, आकाश मेघाक्रांत झाले असून सारे सृष्टिजात व वृक्षवेलीहि पल्लवांच्या रूपाने आपलीं मुखें उत्कंठित करून मेघाकडे पाहात आहेत असा भास होतो. मनुष्याच्या मनांत अशा वेळी कांही तरी अनिर्वचनीय उत्कंठा किंवा हुरहूर साद घालते. ती उत्कंठा कोणत्या शब्दांनीं कोण सांगू शकेल ? कांही सौंदर्य रूपांत प्रतीत होतें, तर कांही सुस्वर आलापांत असतें. वाङ्मयालाहि त्याचें निराळें सौंदर्य आहेच. पण या तिहींचा जो त्रिवेणीसंगम संगीत नाटकांत साधतो त्यामुळे संगीत नाटकें मला अधिक आवडत. मूकनायक, सौभद्र, स्वयंवर, विद्याहरण, भावबंधन, एकच प्याला, इत्यादि नाटकें लोकांना इतकीं आवडत की, हजारो प्रेक्षकांनी ती पुनः पुन्हा पाहिलीं असतील. खाडिलकरांच्या नाटकांत विद्याहरण व स्वयंवर मला विशेष आवडे. श्री. खाडिलकर हे चेहेऱ्यावरून कांहीसे रुक्ष दिसत असले तरी त्यांनी आपल्या नाटकांमधून निर्माण केलेली स्त्रीसृष्टि मनाने इतकी थोर व मनोहर आहे की, स्त्रीहृदयाच्या सूक्ष्म भावनांची खाडिलकर यांना कल्पना नाही, असें कोणीच म्हणूं शकणार नाही ! यमुनातटाकावर उभें राहून " होय, मीच ती राधा ! " असें प्रेमाच्या एकरूपतेने किंवा सविकल्पक मनःसमाधीमध्ये स्वतःचें वर्णन करणारी स्वयंवरांतील रुक्मिणी, अगर

**जननी चलाचला**
**प्रीती जीवकला ॥**
**लोल लोकां सूत्र असे**
**अचला प्रीती लीला ॥**

असें प्रेमाचें उदात्त व स्वर्गीय वर्णन करणारी देवयानी, हीं पात्रें इतकीं अव्याज सुंदर वठलीं आहेत कीं, कण्वाच्या शकुंतलेप्रमाणेच त्यांचें कौतुक करावेंसें वाटतें. वेदाभ्यासजड अशा कण्वाच्या आश्रमांत शकुंतलेला पाहून, तिच्या पित्याबद्दल दुष्यंताला जें नवल वाटलें, तसेंच नवल व कौतुक खाडिलकरांच्या या मानसकन्यांना पाहून वाटतें! जितक्या नाजुक हाताने महर्षि कण्वाने शकुंतलेचें लालन केलें असेल, तितक्याच नाजुक हाताने रुक्मिणी, देवयानी या मानसकन्या निर्माण करून श्री. खाडिलकरांनी त्यांच्या भावनांचें चित्रण केलें आहे.

त्यांचेंहि सुदैव असें कीं, या भूमिकांतील भावसौंदर्य रंगभूमीवर वठविण्यास गंधर्वासारखा विख्यात नट,–'नटसम्राट्'–त्यांना लाभला! जवळ जवळ पंचवीस वर्षे महाराष्ट्र जनतेवर गंधर्वांने आपली छाप कायम ठेवली होती. स्त्रीभूमिका करणाऱ्या स्त्रीनटांपेक्षाहि बालगंधर्वांची भूमिका अधिक सरस होई. ऑर्गनच्या साथीला स्वर लावून त्याच्या पहिल्या पदाला सुरुवात झाली की साक्षात् रंगदेवताच रगभूमीवर अवतरल्याचा भास होई! सौंदर्याप्रमाणे त्याच्या आवाजांत अभिजातपणा आणि विलक्षण मोहकता होती; इतकी की, नाटक संपवून घरीं परत येऊन झोंपल्यावर देखील डोक्यांत त्या गायनाचे सुस्वर आलाप किती तरी वेळ भरून राहिलेले असत. तेंहि दिव्य गायन आता 'अगात् स्मृतिपंथ' म्हणावयाचें! तथापि एका गोष्टीचें मोठें नवल वाटतें; गेल्या पंधरा वर्षांत गंधर्वांचें नाटक मीं पाहिलें नाही, गाणेंहि ऐकलें नाही. पण अद्यापि एखादे वेळी पहाटे अर्धवट झोपेंत असतां असा अनुभव येतो की, ऑर्गनची साथ सुरू असून गंधर्वांच्या आलाप-लहरींनी वातावरण अगदी भरून गेलें आहे. तें गायन म्हणजे आभास नव्हे; किती तरी वेळ तें गायन मी ऐकत असतों. ते क्षण इतके सुखाचे असतात की, झोपेंतून जागें झाल्यावर वाईट वाटतें. बालगंधर्वांच्या गाण्याला मी जें

" स्वर्गीय " हें विशेषण लावतों तें याकरितां! माझ्या पुष्कळदा मनांत येतें की, या नश्वर जगांत संगीत हेंच अमर असेल काय?

मी कांही स्वतःला मोठा कलावन्त, गायक किंवा रसिक मानीत नाही. मी फक्त एक सामान्य मनुष्य या नात्याने माझा येथे अनुभव सांगितला. मला वाटतें की, गायन ही एक 'संजीवनी'–विद्याच असावी. 'विद्याहरण' नाटकांत देवयानीने म्हटलें आहे की, " पहाटेच्या प्रशान्त समयीं मन सहज रीतीने योगारूढ अवस्थेंत गेलें म्हणजे, बाबांच्या हृदयांत त्या संजीवनी विद्येचा उदय आपोआप होईल. त्याकरितां मुद्दाम प्रयत्न कशाला हवा?" गाण्याच्या बाबतींत तरी या वाक्याचा मला साक्षात् अनुभव आला आहे. गाण्याने हृदयांतील गूढस्थ कुंडलिनी जागृत व्हावी अशीहि कदाचित् माझी प्रकृति असेल. मनुष्याच्या मनावर गायनाने कांही नैतिक परिणाम अवश्य घडतो अशी माझी समजूत आहे. कित्येक लेखक ' नीति आणि कला ' यांचे वाङ्मयविषयक वाद करीत असतात. हे वाद तात्त्विक रीतीने करावयाचे नसतात. त्याचें उत्तर जगांत दुसरीकडे कोठे तरी शोधावयाचें असतें. ज्यांनी वीस वर्षांपूर्वींची रंगभूमि व त्यांतील बालगंधर्वांची भूमिका नीट पाहिली असेल त्यांना ' नीति आणि कला ' यांच्या अभिजात मर्यादा काय याचें उत्तर आपोआप मिळालें असेल!

' वाङ्मयशोभा '–जून १९४५

* * *

# कलावन्ताची आस !

'गायन हें शास्त्र की कला' हा प्रश्न मीं गेल्या अंकांत मांडला. 'कला व जीवन' यासंबंधीं दुसरा असाच एक प्रश्न मी या अंकांत वाचकांपुढें मांडण्याचें धाडस करीत आहें. असे प्रश्न मनांत सदैव रुखरुख उत्पन्न करतात. मनोदुःख हें कलेने निर्माण केलें तरी तें दुःखच. एकीकडे जीवन जगत असतां नाजूक शलाकेप्रमाणें तें दुःख कोठे तरी खुपत असतें. कलेच्या प्रश्नांबद्दल आजवर तात्त्विक चर्चा थोड्या लोकांनी का केली आहे ? पण मनुष्यजीवनाच्या लहरी कलावन्ताच्या मनांत जे अनेक तरंग उठवितात, त्या सर्वांचीं उत्तरें पुस्तकांत कशीं सांपडतील ? पुस्तकांत नसणारे पण जीवनांत असणारे असे प्रश्न थोडे का आहेत ! फक्त कलावंत हाच कलावन्ताचें मनोदुःख जाणूं शकतो. इतरांना तें कळतहि नाही. म्हणून मींहि असे ठरविलें आहे की, कलेसंबंधानें तात्त्विक वाङ्मय फार करून वाचावयाचेंच नाही. आपल्याला जो कांहीं अनुभव येईल तो खरा. हें सारें जग नश्वर आहे असे सिद्धान्ति लोकांनी कंठशोष करून सांगितले असतांहि संसारी मनुष्य संसार करून जगाचा अनुभव घेतच असतो. तोच दाखला पुढें ठेवून कलावन्त आपली जीवन-यात्रा करीत असतो. पण वाईट इतकेंच वाटतें की, कलेचें साध्य काय, तिचा स्थायीभाव कोणता, आणि तिचा अंतिम शेवट कोणता याचें उत्तर, सारा जन्म कलेची आराधना करणारांनाहि सांपडत

नाही. कला हें मृगजळ आहे काय ? एका जन्मांतहि कला साध्य होत नाही, मग कलेला अंतच नाही काय ? असे अनेक प्रश्न उद्‌भवतात, आणि सारा दिवस श्रम करून श्रमलेल्या कलावन्ताच्या मनांत ते आले म्हणजे ते त्याला किती दुःखी करीत असतील तें मी सांगूं इच्छित नाही !

माझें सर्व पूर्व आयुष्य लेखक म्हणून गेलें असतां अलीकडे दोन वर्षें मीं चित्रकाराचा पेशा पत्करला याचें माझे मित्र श्री. वामनराव देशपांडे यांना फार नवल वाटलें; व त्यांनी सामरसेट मॉम याची The moon and six pence ही कादंबरी माझ्याकडे पाठवून दिली. लंडनच्या शेअर-बाजारांत ब्रोकरचा धंदा करीत असलेल्या या कादंबरीच्या नायकाने वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षीं चित्रकलेला सुरुवात केली ! त्याने संसाराला रामराम ठोकला आणि राहिलेलें सारें आयुष्य दूर देशीं चित्रकलेंत खर्च केलें. अखेर दृष्टि खराब झाली, रक्तपितीचा रोग बळावला, तरीहि आयुष्याच्या अखेरपर्यंत त्याचें काम चालू होतें. Garden of Eden हें अत्यंत भव्य चित्र त्याने पुरें केलें. तें राहतें तर त्या चित्राची जगभर वाखाणणी झाली असती. पण त्या चित्राचा नाश करावा अशी शेवटची इच्छा त्यानेच दर्शविली होती. या चित्रकाराला कीर्ति मिळाली पण ती मरणोत्तर !

कोणताहि साहित्यिक आपल्या निर्मितीचा नाश व्हावा अशी इच्छा करीत नाही. स्वतःच्या कलाकृतीवर त्याचें अपत्यप्रेम निर्माण होतें. स्वतःच्या अपत्याची जोपासना, वाढ ज्याप्रमाणें मनुष्य वाटेल ती आपत्ति सोसून, दारिद्र्यांतहि दिवस कंठून करतो त्याप्रमाणे, कलावन्त स्वतः अज्ञातवास, हाल, उमासमार हीं सर्व सहन करून, आपल्या ‘ राजस बाळा ’ला वैभवांत वाढवीत असतो. पण या चित्रकाराची भावना याहि पुढें गेली. ‘ नंदनवन ’ [ गार्डन ऑफ् एडन ] हें चित्र रंगवितांना त्याची आत्मीयता इतकी पुढे गेली की, हें चित्र म्हणजे जणूं कांही आपणच, इतका तो तें चित्र काढतांना समरस झाला. शरीर झिजत झिजत मृत्यूपर्यंत आलें होतें. पण तो केवळ आपल्या मानससृष्टींत जगत होता. तें चित्र मनासारखें पुरें झाल्यावर त्याचें जीवितकार्य संपलें ! त्यानंतर त्या चित्रावरहि त्याची वासना राहिली नाही. आपलें दफन झाल्यावर त्या चित्रालाहि आग लावून तें अग्निसात् करावें,

अशी इच्छा त्याने आपल्या परिचारिकेला सांगितली आणि तिनेहि ती अक्षरशः अंमलांत आणली !

माझा या कादंबरीशीं संबंध अनपेक्षित रीतीने आला तो येथेच सांगतों. संगीताची माझी आवड जन्मजात असून अलीकडे बहिरेपणा वाढल्यामुळे त्या आनंदाचा उपभोग मला घेतां येत नाही. व्यवहारांतहि या व्यंगामुळे अडचणी येतात. माझे एक स्नेही थिऑसफिस्ट असून उत्तम होमिओपाथी जाणतात. त्यांना माझ्या बहिरेपणावर औषध देण्याची मीं फार कळकळीने विनंति केली. त्यांना मी म्हटलें, “ साऱ्या जगांतील लोकांना, गोरगरिबांना पांच इंद्रियें असतात. त्या पांच ज्ञानेंद्रियांपैकी एक जाऊन जर मला चार इंद्रियांवरच निर्वाह करण्याची पाळी आली, तर माझ्यासारख्या बुद्धिजीवि माणसावर तें केवढें संकट म्हणावयाचें ?” यावर माझे स्नेही डॉक्टर नकारार्थी मान हालवून म्हणाले “ तुम्ही चुकतां. मलाहि अशी इच्छा होते की दुसऱ्या मनुष्याच्या अंतर्मनांत जे जे विचार येतात ते मला रेडिओसारखे आपोआप कळावे यासाठीं, एक सहावें इंद्रिय मजपाशीं असतें तर हवें होतें ! पण तें नसल्यामुळें जर मी दुःखी होत नाही तर, पांचापैकीं एक इंद्रिय नसल्यामुळे तुम्ही दुःखी कां होता ? तुम्ही बुद्धिवान्, विशेषतः कलावन्त आहां. कलावन्ताचे जीवन हें नदीच्या वेगवान प्रवाहाप्रमाणे आहे. कोणीहि त्याला बांध घालून आडवूं शकत नाही. मध्यतरी अडथळा आला तर किंचित्काळ तें स्थिरावल्यासारखें दिसतें; पण बांधावरून नदीचा प्रवाह पुनः वाहू लागतो. कलावन्ताचे जीवन देखील तसाच मार्ग काढल्याशिवाय राहात नाही. ”

हे विचार ऐकल्यावर मी उठून गेलों व कांही दिवसांनी सहज पेन्सिलीने स्केचिंग करावयास सुरुवात केली. ड्रॉइंगचा मला विद्यार्थीदशेंत नाद होता, याकरितां पेंटिंगचें सर्व सामान आणलें व थोड्याच दिवसांत, स्वस्थ विश्रांति घेत असलेल्या सिंहाचें एक मोठें ऑइल पेंटिंग मीं काढलें. सारखा आठ दिवस त्या चित्रावर मीं काम करीत होतों. पण तें पुरें होतांच माझा मीच आश्चर्यचकित झालो ! आणि आपण स्वतः, इतर कांहीहि असलों किंवा नसलों तरी, कलावन्त आहों असें आत्मदर्शन झाल्याप्रमाणें मला मनोमन वाटलें. श्री. वामनराव देशपांडे यांनी पाठविलेली सॉमरसेट मॉमची कादंबरी याच वेळीं माझे हातीं आली.

एका गोष्टीच्या योगायोगाचें फारच नवल वाटलें. तें असें की, त्या कादंबरींतील नायकाच्या चित्रकलेला वयाच्या ४७ व्या वर्षीं सुरुवात झाली. आणि पेंटिंगला मीं सुरुवात केली त्या वेळीं माझेंहि ४७ वें वर्षच सुरूं होतें ! पण हें साम्य आणखी पुढें नेण्याला मन धजावेना. कलेच्या नादांत त्या चित्रकाराचा जो विलक्षण शेवट झाला, तसाच माझाहि होणार काय ? अशी भीतिदायक कल्पना मनांत चमकून गेली.

माझें सर्व आयुष्य मी सांगत नाही. येथें इतकेंच सांगतों की, सर्व दिवस-भर या कलेचा नाद घेऊन मीं पुरीं दोन वर्षे घालविलीं, व कलेचा अभ्यास करीत असतां किंवा वाङ्मय-लेखन करीत असतां जितका मी तन्मय होत असे तितक्याच तन्मयतेनें व चिकाटीने मीं चित्रें काढण्याचें काम केलें. सर्व सृष्टिजात मला रंगमय भासूं लागली. एकदां सायंकाळीं नुकताच पाऊस पडून गेल्यावर एक मैदान माझ्या दृष्टीस पडलें. ठिकठिकाणीं त्यावर पिवळी पांढरीं फुलें पसरलेलीं होतीं. मला वाटलें, अहाहा ! इतकी सुंदर सृष्टिशोभा आपण पूर्वीं कधींच पाहिली नव्हती ! पूर्वींचेंच सृष्टिजात पण तें अगदी नवोनव भासूं लागलें. सुंदर स्त्रिया किंवा एखादें मुग्धमनोहर बालक दिसलें की त्यांच्या रेखाकृतीच मनांत भरत. जणूं कांही या रेखाकृतीशिवाय त्यांना दुसरें अस्तित्वच नाही, असें माझें सर्व अंतर्याम आणि जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून गेली. पुनर्जन्म घेण्याला मनुष्याला कांही प्रत्यक्ष मरावेंच लागत नाही. एकाच देहांत किती तर्‍हा निरनिराळे जन्म आपण घेतलेले अनुभवास येतात. जे आपण काल होतों ते आज नाही. किंबहुना काल असलेली आपली व्यक्ति अगदीं वेगळी होती, इतकें आपलें अवस्थांतर झालें आहे असेंच आपणांला आढळतें. हा अनुभव जेव्हां आला तेव्हां मला वाटलें की, इतर सर्व समाजाचे नीतिनियम कलावन्ताला लावणें हें खरोखर अन्यायाचें आहे ! तो बिचारा जगांत राहतो इतकेंच. पण मनाने तो अगदी वेगळ्या जगांत वावरत असतो. लौकिक दृष्टीनें असें जीवन असणें ही गोष्ट शहाण-पणाची अगर मूर्खपणाची कशीहि असेल, पण ती वस्तुस्थिति ( fact ) आहे ही गोष्ट मान्य करणें हेंच न्यायाचें होईल.

वर दिलेलें चित्रकाराचें उदाहरण हें उपलक्षण समजा; पण सगळ्या कलावन्ताचें जीवन हें थोडेंफार असेंच असतें. कवि, मूर्तिकार, चित्रकार,

गायक यांच्या कलेच्या आविष्काराचीं साधनें वेगळीं, पण त्यांची जात एकच. हे सारे सौंदर्याचे उपासक. जें नाद-सौंदर्य मनांत भरून राहिलेलें असतें तेंच साकार करण्याचा आटोकाट प्रयत्न गायक करतो. कवीने लिहिलेलें भावगीत आणि चित्रकाराने काढलेलें कल्पनाचित्र यांत फरक काय ? पण सौंदर्याचें जें इंद्रधनुष्य मनांत उभें राहिलेलें असतें तें वठविण्याचा सारे कलावन्त अट्टाहास करीत असतात. लोक त्यांच्या कलेची प्रशंसा करोत; पण आपण अयशस्वी आहोंत, असेंच त्याचे मन ग्वाही देत असतें. मला वाटतें, मेघदूत लिहिणारा कालिदासच फक्त या नियमाला अपवाद असेल. पण त्याचा तरी काय नेम ! कालिदासाचें जीवनचरित्र सांपडलें तर इतर कलावन्तांचीं दुःखें त्यालाहि भोगावीं लागलीं होती असेंहि कदाचित् आढळून येईल !

कला हें मनुष्याच्या आयुष्यांतील सुखस्वप्न आहे. त्याचा भंग होऊं नये असें त्याला वाटतें. इतकी त्याची गोडी अवीट असते. सुखलोलुप मनुष्य सुखाधीन होतो, व्यसनी मनुष्य व्यसनासक्त होतो, तसाच कलावन्त हाहि पूर्णपणे कलाधीन होऊन कलेच्या आहारीं जातो. कलेच्या मृगयेच्या इच्छेने फिरत असतां या सुवर्णमृगाने आपल्या मोहक कांतीने मला भुलविलें, आणि इतक्या दूरवर नेलें की आपल्या विश्रांतिस्थळीं परत येण्याची इच्छा असून सुद्धा मला वाट सांपडेना ! जितका जितका मी कलाधीन झालों तितकें तितकें माझें स्वत्व, माझा निश्चय, किंबहुना माझें शरीरहि नाहीसें होत आहे असें मला आढळून आलें. ही स्थिति चांगली की वाईट देव जाणें, पण ती एक मादक आत्मविस्मृति होती यांत शंका नाही. उमर खय्याममधील नायकाने आपल्या प्रियकरिणीच्या सहवासांत एका शीतल तरुतलाशीं बसून मद्याचे प्यालयावर प्याले झोकीत कसें सुख अनुभविलें असेल याचें मला अनुमान झालें. केव्हां केव्हां माझ्याहि मनांत असें ओझरतें येई की, कला हें विष की अमृत ? ती सुधा आहे की मदिरा आहे ? कांहीहि असो, ती 'स्वर्गीय' आहे इतकें तरी खरें !

कलेच्या प्रवासाची ही वाट चालतां चालतां आपोआपच पुढें उतार होतो. या जगांत कोठलेंच सुख पूर्ण नाही; कोठलेंहि दुःख पूर्ण नाही. सुख आणि दुःख अनुबंधि असून एकमेकांत अनुस्यूत असतात. सुखाच्या पाठोपाठ दुःख हें आपोआप येतें. त्याकरितां शोधावें लागत नाही. हें दुःख प्रश्नात्मक असतें आणि विवेकाच्या टोंचणीप्रमाणें तें भासतें. दुसऱ्याशीं तुम्ही

प्रतारणा करूं शकाल, पण अंतर्यामी सर्व देवतांची देवता अशी जी सद्-सद्विवेकबुद्धि विराजमान झाली आहे, तिची प्रतारणा तुम्ही कोठवर करूं शकाल ? एक दिवस माझा सर्व स्टुडिओ मीं लाविला. सामान्य चित्रें टाकून दिलीं व बऱ्यापैकी अशीं कांही काचेंत बसवून भिंतीवर लावलीं. तीं सारीं अठरा भरलीं. अठरा महिन्यांत दाखविण्यासारखीं अशीं फक्त अठरा चित्रें मी काढूं शकलों, हें पाहून माझ्याच मनावर प्रतिक्रिया झाली ! या कलेला केवळ अंत नाही, तेव्हां आपणच थांबावें असें वाटलें. आणि तसें कांही काळ मीं केलेंहि.

याच काळांत मीं थॉमस पति-पत्नींनी लिहिलेलें living Biogrophies of great Painters हें पुस्तक वाचलें. त्यांत मायकेल अँजीलो, रॅफेल, रेंब्रांट, होगार्थ, रेनॉल्ड्स, टर्नर, मिलेट, गोगा, व्हिसलर वगैरे नामांकित चित्रकारांचीं चरित्रें दिलीं आहेत. तीं सर्व मननपूर्वक वाचून मात्र माझ्या मनावर कांही वेगळा प्रकाश पडला. आणि माझें मलाच असें वाटलें की, या कलेसंबंधीं कांहींतरी निश्चित तत्त्वज्ञान आपण मनाशीं ठरविलें पाहिजे व तसें वागलें पाहिजे. पुष्कळ शब्दांचे अर्थ आपण फार ढोबळ रीतीनें समजतों, पण त्यांत कदाचित् कार्यकारण संबंध असतो तो आपल्या लक्षांत येत नाही. कलेच्या आनंद सेवन करीत असतां, ज्याला समाधि किंवा आत्मविस्मृति म्हणतात ती स्थिति अखेर प्राप्त होते. उत्तम वाङ्मय किंवा उत्कृष्ट कलाकृति याच स्थितींत निर्माण होते. आत्मविस्मृतीसारखा आनंद दुसऱ्या कशांतच नाही हें खरें, पण ती समाधि देखील फार काल टिकणें हें अपायकारक आहे. ती कांही काळ टिकणें हेंच हितकर आहे. एका श्रेष्ठ साहित्यिकानें याचकरितां साहित्यानंदाची व्याख्या करतांना "सविकल्पक समाधि" असें सहेतुक विशेषण लावून ती व्याख्या मर्यादित केली आहे.

माझे मित्र श्री. वामनराव देशपांडे यांनी या विषयाची एकदां फार उत्तम तात्त्विक चर्चा केली. ते म्हणाले, "आनंदनिर्मिती हेंच केलेचें ध्येय किंवा साध्य आहे. तो प्राप्त झाला म्हणजे झालें. त्या शिवाय कलावन्ताला आणखी कांही प्राप्त होईल किंवा न होईल; किंवा ऐहिक जगाच्या दृष्टीने कदाचित् तो नष्टहि होईल. स्वतः कलावन्त त्याची फिकीर करीत नाही. त्याचें ध्येयवादित्व इतकें थोर असतें असेंहि वाटल्यास म्हणा. मरूनहि अमर राहिलेले जर साहित्यिक असतात, तर तसें कलावन्तहि कां असूं नयेत ?

पण यावरहि असें म्हणतां येतें की, आत्मविस्मृति हा कलावन्ताचा गुण खरा, पण आत्माविस्मृति म्हणजे आत्मनाश नव्हे ! पतंग हा दीपज्योतीवर झडप घालून नष्ट होतो, तसेंच कलावंताचेंहि होणें इष्ट आहे काय ? दीपज्योतीइतकें दिव्य काय असेल ? कलेच्याहि अंगांत तसलेंच मादक व दाहक सामर्थ्य आहे. सौंदर्यसेवनाकरितां आत्मनाशाकडेहि न पाहणाराचें क्षणभर कौतुक वाटलें तरी, शेवटीं मनांत सहानुभूति किंवा करुणाच उत्पन्न होत नाहीं काय ? त्याची सौंदर्यासक्ति त्याच्या आत्मनाशाशिवायहि जगाने खरी मानली असती ! सुख आणि सुखोपभोग या दोन वेगळ्या वस्तु मानावयाच्या तर 'संयम' ही तिसरी वस्तु आलीच ! त्यानेंच सुखोपभोग म्हणजे आनंदाचा आस्वाद सार्थ होतो. कलेचा आनंद हा अद्वैत मानित नाहीं. तो द्वैती आहे. 'सविकल्पक' या विशेषणामुळे त्याला विशिष्टाद्वैती कां म्हणाना ?

Truth is beauty & Beauty is truth अशी एक व्याख्या आहे. पण ती संपूर्ण नाही. तींत सत्यार्ध आहे. "सत्यं शिवं सुन्दरम्" हीच व्याख्या व्यावहारिक दृष्टीनेंहि अधिक समर्पक आहे. सौंदर्य हेच केवळ सत्य असतें तर जगाची धुळधाण होण्याला वेळ नाही ! पुष्कळ कलावंतांनीं अशा भ्रामक समजुतीनें आपल्या आयुष्याचें मातेरें केलें आहे. 'सौंदर्य' आणि 'सत्य' हे दोन शब्दहि आत्मसापेक्ष आहेत. म्हणजे, त्याचा अर्थ काय हें अखेर कलावंताच्या मानण्यावरच अवलंबून आहे ! सौंदर्यसाधन व सत्यानुभूति दोन्हीहि कलावंताला लाभली तर मग उरलें काय ? मग अनेक कलावंतांचे आयुष्य हें दुर्दैवी व निराशामय होण्याचें कारण काय ? याचकरितां वरील व्याख्येंत जो 'शिवं' हा परसापेक्ष Objective शब्द आहे तो फार महत्त्वाचा मानला पाहिजे. तराजूच्या दोन्ही पारड्यांचे आपल्या विवेकशक्तीनें समतोलन करणारा, आणि दोहोंच्या मध्यभागी अचल राहणारा 'शिव' हा जो सुवर्णशब्द आहे त्यानेंच वरील व्याख्या परिपूर्ण झाली आहे. किंबहुना असें आग्रहानें प्रतिपादन करितां येईल कीं "जें 'शिव' नव्हे, तें सत्य नव्हे व सुंदरहि नव्हे." आत्मा हा आनंदमय खरा, पण आनंदाचा उपभोग घेणारा स्वामी आहे. कला कितीहि श्रेष्ठ झाली तरी ती आत्म्याची दासी आहे मालकीण नव्हे, हें कलावन्तांनीं कधींहि विसरूं नये !

(संगीत कला विहार-नोव्हेंबर १९५०)

★ ★ ★

# लो. टिळकांची विनोदबुद्धि

अनेकांची अशी समजूत आहे की, लो. टिळक हे पक्के अरसिक व रुक्ष असावेत. ललितकला, काव्यगायन, नाटकें, विनोद या सर्वांचें त्यांना वावडें असावें. टिळक म्हणजे अत्यंत विद्वान् व सर्वांत मोठे देशभक्त. अर्थात् गंभीरपणा हाच त्यांना योग्य. गंभीर मनुष्याने विनोद करावयाचा किंवा हंसावयाचें कसलें? जणूं कांही टिळकांनीं आपल्या दारावर, "विनोद आणि जोडे आंत आणूं नयेत" अशी पाटी लावली असेल! पण टिळकांना विनोद प्रिय नव्हता किंवा ललिकलांचें महत्त्वच वाटत नव्हतें यासारखी चुकीची कल्पना दुसरी कोणतीच नसेल. विनोद ही मनुष्यामधील माणुसकी वाढविणारी, किंवा अंगांतील माणुसकीला उजळा देणारी वस्तु आहे. विनोदबुद्धि नसलेला राजकारणी मनुष्य व विनोदप्रिय असलेला राजकारणी मनुष्य यांत सरस व नीरस काय हें उघडच आहे. औरंगजेब बादशहा हा कधीहि फार करून हसत नसे व ललितकलांनाहि त्याने बंदी केली होती ही गोष्ट प्रसिद्ध आहे. एकदां त्याच्या महालाच्या खिडकींतून त्याला असें दिसून आलें की, खालीं कांही माणसें जमा झाली असून कोणाच्या तरी दफनाच्या तयारींत आहेत. तेव्हां कोणाला पुरतां? म्हणून त्याने वरून चौकशी केली. बादशहाच्या महालाखालील बागेंतली जागा म्हणजे कांही स्मशान किंवा दफनभूमि नव्हे; अर्थात् कांही तरी थट्टेखोरी

करण्यांकरिताच ती मंडळी सहेतुकपणें आली होती. बादशहाला उद्देशून त्यांपैकी एकजण म्हणाला, "जहांपन्हा! आपल्या राज्यांत ललितकला होती ती मरून गेली. तिचा दफनविधि करीत आहों!" बादशहाहि कांही बोलण्यांत कमी नव्हता. तोहि लगेच म्हणाला, "खरें की काय? मग तिला इतकी खोल पुरून टाका की पुनः तिने आपलें डोकेंच वर काढूं नये!" टिळकांची गोष्ट अशांपैकीं नव्हती. त्यांनीं 'आर्योद्धारक नाटक मंडळीच्या खेळाचे वेळीं रंगभूमीचे पडदे ओढल्याचें सांगतात! त्यांच्या परिवारापैकी दादासाहेब खापर्डे, दादासाहेब करंदीकर, तात्यासाहेब केळकर, कृष्णाजीपंत खाडिलकर, शिवरामपंत परांजपे, बॅप्टिस्टा वगैरे मंडळी अत्यंत विनोदप्रिय म्हणतां येतील, व इतरांनाहि कमीअधिक प्रमाणाने विनोद आवडे. टिळकांच्या जुन्या परिवारांतील चिपळूणकर-आगरकर यांना विनोद प्रिय होता ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

लोकमान्य टिळकांच्या संभाषणांत विनोद, कोटिक्रम, हजरबाजीपणा व समर्पकता हे गुण वसत होते याचा अनुभव, त्यांच्याशीं संभाषण करण्याचा ज्यांना प्रसंग आला त्यांना पुष्कळदा आला असेल. टिळकांच्या लेखांत अगर व्याख्यानांतून आवेश आणि मुद्देसूद कोटिक्रमावरच भर अधिक असल्याने, विनोदाचीं उदाहरणें फारशीं आढळत नाहीत. पण एरवी प्रसंगाने ही विनोदबुद्धि प्रकट होई. टिळकांचा स्वभाव मनमोकळा होता. अनेकांत मिसळावें व प्रतिपक्षी भेटला तरी दोन द्यावे दोन घ्यावे, अशी त्यांची उघडी वृत्ति होती. अशा मनोभूमींतच विनोदबुद्धीचें बीज रुजतें. ज्यांना छद्मी भाषण अगर वक्रोक्ति आवडते, तीं माणसें सामान्यतः माणुसघाणी असून त्यांना विनोदबुद्धीचेंहि वावडें असतें. विसंगतता हा विनोदाचा आत्मा आहे, व टिळकांसारख्या शोधक व मार्मिक मनुष्याचा अनेक लोकव्यवहाराशीं संबंध आल्यावर अशीं विनोदस्थळें किती तरी उत्पन्न झालीं असतील! विसंगतीच्या चमत्कृतीचें एक उदाहरण सुप्रसिद्ध आहे. लो. टिळकांचा मुलगा विश्वनाथ हा मृत्युवश झाला असतां इतर मंडळी त्याच्या अंत्यसंस्काराची तयारी करीत होती, आणि त्याच वेळीं टिळक कोणातरी शेतकऱ्याचा कायदेशीर अर्ज लिहिण्यांत गुंतले होते असें म्हणतात! "या वेळीं हें काम कां करता?" असें त्यांना कोणी विचारलें. तेव्हां टिळक म्हणाले, "चिता पेटलेली असली

तरी माझी विडी पेटलीच पाहिजे, असें म्हणणारे कित्येक असतातच ! ”
[ ही आख्यायिका खरी नसावी !–संचा. स. ]

टिळकांना विनोद मनापासून आवडत असे इतकेंच नव्हे, तर क्वचित् स्वतःची देखील कांही योग्य मर्यादेपर्यंत त्यांच्या स्नेह्यांनी एखादे वेळीं थट्टा केली तरी त्यांना त्याचा राग नसे. कर्नाटकांतील दौऱ्यांत टिळकांनी सर्व व्याख्यानांतून सर्व रोगांवर ‘ स्वराज्य ’ हा एकच उपाय असें सांगितलें. चिकोडी-बेळगांवकडे जात असतांना गंगाधरराव देशपांडे, दादासाहेब करंदीकर, बेळवी वगैरे मंडळी बरोबर दौऱ्यांत होती. त्यानी विनोदाने टिळकांना एका ‘ केराप्पा ’ साधूची गोष्ट सांगितली. या साधूकडे अनेकजण भाविकपणें येत. कोणी डोकें दुखतें म्हणून, तर कोणी संधिवाताकरिता, तर कोणी पुत्र नाही म्हणून, तर कोणी कर्ज कधी फिटेल, वगैरे नाना प्रश्न विचारून त्याचा आशीर्वाद मागत. आणि साधूहि उपाय अगर तोडगा म्हणून आपल्या भांड्यांतील बिब्याच्या तेलाची एक फुली भाविकाच्या हातावर काढीत असे. बिब्याच्या फुलीला कानडी प्रांतांत ‘ केरू ’ म्हणतात; आणि सर्वांच्या व्याधींना तो साधू हें ‘ केरू ’चें एकच औषध देत असे.

ही गोष्ट सांगून बेळवी यांनी टिळकांना म्हटलें की आम्हीहि तुम्हांला त्या साधूप्रमाणें ‘ केराप्पा ’ म्हणणार आहों. कारण सर्व रोगांवर ‘ स्वराज्य ’ हें एकच औषध तुमच्या बटव्यांत आहे !

टिळकांना विनोद हा स्वभावतःच मानवत असल्याने त्यांनाहि बेळवींचें भाषण आवडलें. पुढे दौऱ्यांत एकदोन व्याख्यानें देऊन घरीं आल्यावर ते बेळवींना उद्देशून म्हणाले, “ कसें काय ? आज फुली बरोबर उमटली की नाही ? ”

दादासाहेब करंदीकर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त ( सन १९१७ ) लोकमान्य व त्यांच्या पक्षांतली पुण्यांतील बहुतेक थोर मंडळी साताऱ्यास आली होती. त्या प्रसंगीं लोकमान्यांस अनेक ठिकाणीं पानासुपाऱ्या झाल्या. त्यांत कांहीजणांनी पानसुपाऱ्या आपआपल्या माडीवर केल्या. त्यामुळें मोटारींतून रस्त्यावर, तेथून पायऱ्यांवरून घरांत, व तेथून जिन्याने माडीवर, असा चढउतार करून, लोकमान्य थकल्याचें स्पष्ट दिसत असे. श्री. लक्ष्मणराव आपटे यांच्या माडीवर पानसुपारी होऊन लोकमान्य, दादासाहेब वगैरे मंडळी

उठली, त्या वेळीं लोकमान्यांस एक गृहस्थ अत्यंत भक्तीने म्हणाले, " बळवंतरावजी, आपण आतां आणखी किती पानसुपाऱ्या घेणार ? आतां हे हाल पुरे झाले. " यावर टिळक आपल्या विनोदी स्वभावास अनुसरून म्हणाले— " अहो, अस्वलाने किती घरीं जाऊन खेळ करून दाखवावयाचा, ही गोष्ट कोणी अस्वलाला विचारतात का ? आमचे दरवेशी दादासाहेब करंदीकर ! ( कारण त्यांच्या वाढदिवसानिमित्त लोकमान्यांस बोलावलें होतें. ) अस्वलाला काय ? दरवेशाने चल म्हटलें की तें चाललें; बस म्हटलें की तें बसणार ! " ( आ. २-१३१. )

दादासाहेब खापर्डे किंवा दादासाहेब करंदीकर या प्रमाणेंच चित्रशाळेचे श्री. वासुकाका जोशी हे टिळकांच्या लोभांतले होते. एकदां ' चित्रमय-जगत् ' करितां एकाने खालील जाहिरात पाठविली—

**' वधू पाहिजे '**

" हल्लीच्या कुटुंबास मुलें होत नाहीत. वधू कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे कोणतीहि चालेल. " यावर लोकमान्य म्हणाले, " तर मग या गृहस्थाने मुलें होण्याबद्दल सर्टिफिकेट असलेल्या वधूपाशींच विवाह करावा ! नाही तर या दुसऱ्या कुटुंबास खात्रीने मुलें होतील हें कशावरून ! " ( आ. २-१३५. )

गीतारहस्यासंबंधाने एकदां कै. विष्णुशास्त्री बापट यांचा टिळकांशीं तीन-चार तास कसून वाद चालला होता. त्यांत निष्काम कर्मयोग, ज्ञाननिष्ठा, प्रवृत्ति, आत्मज्ञान, सांख्य व वेदान्त असे अनेक शब्द मधून मधून उच्चारले जात असतांनाच, चित्रशाळेचे वासुकाका जोशी तेथें येऊन बराच वेळ उभे राहिले. टिळकांचें संभाषण संपण्याचा रंग दिसेना, तेव्हां ते मुकाट्याने जाऊं लागले. त्यावर टिळक म्हणाले, " कां हो, निघालां कां ? यांत कांही तुमच्या ओळखीचे शब्द नाहीत म्हणून की काय ? यांत टाईप, कागद, फॉर्म किंवा भाव यांपैकीं कशाचेंच नांव निघत नाही म्हणून कंटाळला वाटतें ? " यावर वासुकाका " आपल्याला बुवा, ही कर्मकटकट नको. त्यांत कांही 'तत्त्वमसि' दिसत नाही " असें म्हणून सरळ निघूनच गेले.

यावर कांही दिवसांनी ' गोविंदसुत ' चिंचाळकर यांचें गीतारहस्यावरील टीकेचें एक पुस्तक चित्रशाळेंत छापण्याकरितां आलें. पुस्तक विनोदी भाषेंत लिहिलेलें असल्यामुळें कंपॉझिटर लोक कामाला सुरुवात करण्याआधी कॉपी

वाचण्यांत वेळ घालवीत. साहजिक वासुकाका त्यांना रागे भरत. ही तक्रार लो. टिळकांच्या कानावर गेली, तेव्हां त्यांनी वासुकाकांना निरोप धाडला की, "मजजवळ दोन मुसलमान कंपॉझिटर आहेत, त्यांना पाठवून देतों! म्हणजे तुमच्या कंपॉझिटरांचा मजकूर वाचण्यांत वेळ जाणार नाही!"

१९१८ सालीं गोध्रा येथे राजकीय परिषद भरली. त्यानंतर तेथें सामाजिक परिषदेचें अधिवेशन होतें. (गुजराथींत याला संसारसुधारणा परिषद असें नांव आहे.) टिळक व दादासाहेब खापर्डे राजकीय परिषदेच्या अधिवेशनाहून परत आले, तेव्हा एकाने सहज विचारलें "संसारसुधारणा परिषदेकरिता थांबला नाही वाटतें!" यावर टिळक म्हणाले, "माझी बायको मेली आहे, तेव्हां माझा संसार संपला आहे. दादासाहेबहि म्हातारे झाले आहेत. त्यांसहि आतां संसार सुधारण्याची गरज नाही. म्हणून आम्ही थांबलों नाही!"

धुळें येथें प्रांतिक परिषद भरली होती, त्या वेळीं एका ठरावाच्या भाषेंत कोणत्या शब्दाची योजना करावी याबद्दल खाजगी रीतीने कडाक्याचा वाद चालला होता. त्याचा निर्णय होण्यापूर्वीं जवळ आलेल्या एका साधूच्या दर्शनास जाण्याची गोष्ट कांहीजण बोलूं लागले. तेव्हा लोकमान्यांनी विनोदाने प्रश्न केला, "एकूण माझ्या शेंडीचे केस डोक्यावर आहेत, तोपर्यंत तुम्ही मला साधु किंवा संन्यासी मानत नाही म्हणावयाचें?" हा प्रश्न ऐकतांच मंडळी ठरावाकडे लक्ष घालून विचार करूं लागली. (आ. १-११२.)

एके दिवशीं कोणी एक इसम लोकमान्याच्या भेटीस येऊन सांगूं लागला—"मी अगदी गरीब असून, सध्यां पैशाच्या अडचणींत आलों आहे. प्रापंचिक विवंचनेंत काळ कंठीत असतां काल रात्रीं मला एकाएकी असा दृष्टांत झाला की, 'तूं टिळकांकडे जा म्हणजे ते तुझी काळजी तत्काळ दूर करतील.' त्याप्रमाणें मी आपल्याकडे आलों आहें. मला तूर्त पांचशें रुपयांची नड आहे. मेहरबानी करून तेवढी रक्कम द्याल तर माझ्यावरील संकट निवारण होईल." त्याच्या चेहऱ्याकडे पाहून हा भिक्षेकरी संभावित लफंग्यांच्या कोटींतील एक असावा हें लोकमान्यांनी ताडलें, व उत्तर दिलें—"बाबा रे, तुला दृष्टांत झाला खरा, पण अद्याप मला कोठे झाला आहे? ज्या भगवंताला तुझी येवढी काळजी, त्याने मलाहि त्याच घटकेस आगाऊ दृष्टांत द्यावयास पाहिजे

होता की, अमुक अमुक इसमास मी आपल्याकडे पाठविणार आहें. त्याला पैशाची मदत करा. मला जोंपर्यंत तसा साक्षात्कार होत नाही, तोंपर्यंत मी या बाबतींत कांहीएक करूं शकत नाही. "

" मी केरूनानांचा शिष्य आहें " असें डेक्कन कॉलेजांतील गणिताचे शिक्षक प्रा. हॅथॉर्नवेट यांना टिळकांनी बाणेदार उत्तर दिलें होतें हें सुप्रसिद्ध आहे. या सुभाषिताचा स्वतः टिळकांनाच एक गमतीदार अनुभव आला. लोकमान्य विलायतेहून परत आल्यावर पुण्यांत त्यांची जंगी मिरवणूक निघाली. मिरवणूक पासोड्या मारुतीपाशीं आली, तेव्हां समोरच्याच दुकानांत एक पाटी लावली होती. " मी केरूनानांचा शिष्य आहें " एवढींच तीवर अक्षरें होतीं. दुकानांतील मालक टिळकांना हार घालण्याकरिता पुढे आला. त्या वेळीं लोकमान्य त्याला हसून म्हणाले, " अहो शेठजी, तो हक्क फक्त माझाच आहे असें मला वाटत होतें !"

एकदा भाऊशास्त्री लेले टिळकांना सुपारी खातांना विनोदाने म्हणाले, " सुपारी खाल्ल्याने जीभ जड होते म्हणतात ! " यावर टिळक म्हणाले, " अशी सुपारी खाऊन जीभ जड होत असती, तर अक्कलखारा खाऊन घरोघरीं नाना फडणीसच निर्माण व्हावयास पाहिजे होते !"

एकदा पारसनिसांना टिळकांनी असेंच गमतीदार उत्तर दिलें होतें. केरळ-कोकिळांतील लेखांसंबंधाने उत्तेजनपर उद्गार काढून टिळकांनी तरुण पारस-निसांना प्रोत्साहन दिलें, व केसरीकरिता " उत्तर-हिंदुस्थानाचा प्रवास " ही लेखमाला लिहून घेतली. आगरकरांना ही लेखमाला आवडली. आणि "केसरीने उत्तर-हिंदुस्थान घेतलें, तर सुधारक दक्षिण-हिंदुस्थान घेण्यास तयार आहे " असें आगरकरांनीं पारसनीस यांना कळविलें, व त्यांनीहि 'सुधारका'करिता 'दक्षिण-हिंदुस्थानाचा प्रवास' अशी लेखमाला लिहून दिली. पुढे टिळकांची दत्तोपंत पारसनीस याची जेव्हा गांठ पडली, तेव्हां त्यांनी यत्किंचित्‌हि मत्सर-बुद्धि न दाखवितां उलट हास्यमुद्रेने उद्गार काढले " एकंदरींत तुम्ही सातार-शाही मुत्सद्देगिरी लढविली म्हणावयाची ! नानासाहेब पेशवे व रघोजी भोंसले यांचें भांडण झालें तेव्हां शाहूराजाने नानासाहेबास उत्तर-हिंदुस्थान दिलें, व रघोजी भोंसल्यास कर्नाटक दिलें. त्याप्रमाणें तुम्ही वांटणी केली की काय ? पण लक्षांत ठेवा ! आम्ही दोघेहि पुणेकर आहोंत, साताराच काबीज करून टाकूं !"

शाद्बिक कोट्याहि टिळकांच्या भाषणांत केव्हां केव्हां येत असत. एकदा ‘ पांच वर्षांचें पंचांग ’ या पुस्तकांत वधूवरांच्या गुणसंमेलनासंबंधी कोष्टक टिळक पाहत होते. शेजारी कोणीएक इसम होते. ते म्हणाले, “ एकाखालीं एक असे हे गुण सगळे एकत्रच दिले आहेत. यांत वराचे गुण कोणते आणि वधूचे कोणते हें कसें समजावें ? ”

टिळक म्हणाले, “ अरे ! पंचांगांत वर तो ‘वर’ ! ” मथळ्यांत जरी “ वधूवरांच्या गुणांचें कोष्टक ” असें दिलें होतें, तरी खरोखर वरांचेच गुण वर म्हणजे आधी दिले होते.

लोकमान्य मुंबईत १९०४-५ सालांत कांहीं महिने स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिले असतां एक गृहस्थ त्यांस भेटण्यास आले होते. ते नुकतेच एम. ए. झाले होते. पुढे काय करणार ? असें लोकमान्यांनी त्यास विचारलें. तेव्हां ‘ सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटींत जाणार ’ असें त्यांनी सांगितलें. सोसायटींत राहून काय काम करण्याचें मनांत योजलें आहे, असें पुढे विचारलें. तेव्हां ‘ गोखले सांगतील तें काम करणार ’ असें उत्तर येतांच ‘ एकूण तुम्ही सांगकामे होणार ’ असें म्हणून पुढें आणखी विचारण्याचें त्यांनी सोडून दिलें.

सोलापुरास १९२० सालीं परिषद झाली, तेव्हां नेमस्त व ब्राह्मणेतर यांनी मारामारीची तयारी केली होती. स्वागताध्यक्षांचें भाषण चालू असतां मंडपांत चलबिचल उडाली. बाहेरून दगड येऊं लागले. तेव्हां लोकमान्य म्हणाले, “ आंतले दगड जेव्हां बाहेर गेले तेव्हांच बाहेरचे आंत येऊं लागले ! ” ( आ. २-१३६. )

सुरतेच्या कॉंग्रेसनंतर बरेच दिवस वर्तमानपत्रांतून शिवीगाळी चालू असे. त्या वेळीं एके दिवशीं चहा घेतांना मुलांना टिळक विनोदाने म्हणाले, “ तुम्ही सर्व चहाबरोबर कांहीं ना कांही खात असता, पण मी काय खातों सांगा पाहूं ? ” ते चहाबरोबर कधीच कांही खात नसत. म्हणून मुलांनी म्हटलें ‘ तुम्ही तर कांहीच खात नाहीं. ’ त्यावर टिळक हसून म्हणाले, “ मी रोज ताज्या शिव्या खात असतों ! ”

एकदा कोठे तरी चार मंडळींसह बैठकींत टिळक बसले असतां पैसाफंड रानडे हे स्वयंसेवक या नात्याने तेथें उभे होते. टिळक त्यांना म्हणाले, ‘ अहो, बसा. तुम्ही उभे कां राहतां ? ’ तेव्हा रानडे संकोचाने विनयपूर्वक

९०८७५९

म्हणाले, ' मी येथे उभा असलेलाच बरा.' त्यावर टिळक म्हणाले, ' तुम्ही सदैव उभे आहां, म्हणूनच आम्हांला स्वस्थपणानें बसून काम करतां येतें ! '

सन १९०५ सालीं पुण्यांत सरतानसिंह नांवाचे निशाणबाज गृहस्थ आले होते. मत्स्यवेध, अदृश्यवेध, शब्दवेध वगैरे निशाणबाजीच्या अद्‌भुत प्रकारांत त्यांचा अगदी हातखंडा होता. त्यांचे प्रयोग गायकवाडवाड्यांत झाले. शब्दवेधाच्या प्रयोगाची तयारी चालली होती. राणाजींचे डोळे बांधण्यांत आले. नंतर निरनिराळ्या प्रकारचीं मडकीं आणण्यांत येऊन राणाजीना त्यांचा रंग सांगण्यांत आला व त्यांपैकी प्रत्येकाचा आवाज ऐकवण्यांत आला. नंतर तीं मडकीं दूर अदलाबदल करून ठेवण्यांत आलीं. या आदलाबदल केलेल्या मडक्यांचे आवाज राणाजींना पुनः ऐकवावयाचे होते. पण प्रेक्षकांत या वेळीं भयंकर गोंगाट चालला असल्यामुळे मडक्यांचा आवाज त्यांना ऐकूं येणें अशक्य झालें. तेव्हां लोकांना शांत करण्याकरिता लोकमान्य उभे राहिले व विनोदाने म्हणाले, " हा शब्दवेध आहे, म्हणून लोकांनी शांत राहणेंच जरूर आहे. राणाजी मडक्यांच्या आवाजावरून वेध करणार आहेत. तेव्हां जर का कोणाचा बोलतांना मडक्यासारखा आवाज निघाला, तर नेमका त्याचाच वेध होईल हें लक्षांत ठेवा व अगदी स्तब्ध बसा ! " हें ऐकून एकच पळ विलक्षण हशा पिकला; पण लगेच त्याच्या उलट तेथे अरण्यवत् शांतता झाली ! ( आ. २-४३२. )

एकदा मिरजेचे खरेशास्त्री लो. टिळकांच्या भाषणाचा प्रस्ताव करतांना म्हणाले, " लोकमान्यांनी विलायतेहून स्वराज्याचें गांठोडें आणलें आहे. तेव्हां ते चार शब्द तुम्हांला सांगतील. " यावर टिळक म्हणाले, " वेदान्त-शास्त्राच्या सिद्धान्ताप्रमाणें मोक्ष कोणी कोणास देऊं शकत नाही. आपल्या जवळच तो आहे. मायेचें पटल दूर झालें की मोक्ष ! " तुकोबांनी म्हटलें आहे " नाही देवापाशीं मोक्षाचें गांठोडें । आणोनि निराळें द्यावें हातीं । " त्याप्रमाणें मीहि म्हणतों " नाही बादशहाशीं स्वराज्याचें गांठोडें । आणोनी निराळें द्यावें तुम्हां ! "

कोणत्याहि व्याख्यानानंतर आभारप्रदर्शन नित्याची बाब होऊन बसली आहे. जसें कांहीं तें धर्मकृत्यांतलें देवदेवक. त्या देवतांचें शास्त्रोक्त आवाहन व विसर्जनहि झालेंच पाहिजे. त्यावांचून चालावयाचें नाही ! एका सभेनंतर टिळक म्हणाले—

" आभारप्रदर्शनास आमच्या वेदान्तशास्त्रांत आधार नाहीं. समजा, लग्न लागल्यावर नवऱ्याने नवरीचे व नवरीने नवऱ्याचे आभार मानले, तर तें योग्य होईल काय ? लग्न जसें दोघांचें कार्य, तसेंच स्वराज्य मिळविणें हें सर्वांचें कार्य आहे. "

प्रसंगावधानालाहि एखाद्या वेळीं आंतून विनोदबुद्धीचें अस्तर मिळालें म्हणजे कसें सोळा आणे काम होतें हें पुढील उदाहरणावरून दिसतें—एकदा सातारच्या महाराजांना टिळकांनी विंचुरकरांच्या वाड्यांत पानसुपारी केली होती. तेव्हां नजर चुकवून त्यांच्या एका हुजऱ्याने ताटांतील एक रुप्याची वाटी खिशांत घातली. फक्त टिळकांच्या हें लक्षांत आलें होतें. नंतर महाराज जाण्याच्या वेळीं थोड्या हलक्याच आवाजाने टिळक त्या हुजऱ्यास म्हणाले, " तुमच्या महाराजांच्या हक्काबरोबर तुमचा हाहि हक्क आतां नाहीसा झाला आहे ! " हुजऱ्याने निमूटपणाने रुप्याची वाटी काढून दिली हें सांगावयास नकोच.

प्रतिपक्षाबद्दल बोलणें निघालें किंवा टिळकांशीं कोणी अडवणुकीचा वाद खेळूं लागला, तर विनोदाबरोबरच त्यांत समर्पकपणा, औचित्य आणि हजर-जबाबीपणा हेहि गुण प्रकट होत. टिळक मोठे की गोखले मोठे ? रानडे मोठे की टिळक मोठे ? संस्कृतांत टिळक अधिक विद्वान की भांडारकर त्यांच्या-हून श्रेष्ठ ? असले वाद त्या वेळीं दर तरुण पिढीने केलेलेच आहेत. संमति-वयाच्या वादांत टिळकांनीं भांडारकरांशीं दोन हात केले होते. यामुळें तत्का-लीन तरुण विद्यार्थी ' संस्कृतांत टिळक श्रेष्ठ की भांडारकर श्रेष्ठ ? ' असा अभिमानाने वाद घालीत. एकदा दत्तोपंत तुळजापूरकर यांनी हा प्रश्न समक्ष टिळकांनाच विचारला. त्यावर टिळकांनीं उत्तर दिलें कीं, ' मला संस्कृताच्या बाबतींत एखादी गोष्ट अडली की मी माझी शंका भांडारकर यांना विचारतो यावरून आमच्यांत कोण अधिक श्रेष्ठ हें ओळखा ! '

एकदा लो. टिळकांच्या चिरंजिवांच्या लग्नांत रँग्लर परांजपे हे टिळ-कांच्या घरीं पानसुपारी घेण्याकरिता आले. जवळच दादासाहेब खापर्डे होते. ते रँग्लर परांजपे यांना उद्देशून हसत म्हणाले—"Two mathematicians never agree."

यावर टिळक चटकन् म्हणाले—" But they agree on fundamental principles." ( आ. २-१३५ ).

वर्ध्याचे डॉ. वि. वि. बापट यांनीं पुढील आठवण सांगितली आहे—

माझ्या भाचीचें लोकमान्यांच्या धाकट्या चिरंजीवाशीं लग्न ठरविण्याकरिता मी लोकमान्यांकडे गेलो होतों. मुलगी पसंत झाल्यावर साहजिकच मी हुंड्याचा प्रश्न काढला. त्याबरोबर ताडकन् त्यांनीं उत्तर दिलें कीं, " तुम्ही काय करावयाचें तें करा; मला हुंडा नको. " मी म्हणालो, " बरें, पण करणीसंबंधानें तरी खुलासा व्हावा; म्हणजे पुढे रुसवारुसवीस जागा राहाणार नाही." त्यावर ते म्हणतात, " अहो, तुम्ही दोन्हीहि बाबतींत निर्धास्त असा. आमच्या येथे रुसावयाला कोणी नाही; व तसें कांही झाल्यास मी पाहून घेईन. बोलक्या सुधारकांचा मला अनुभव आहे. एका मित्राच्या कार्यांत तो असाच नाडला गेल्यामुळें ऐनवेळीं मला सावकाराचें घर पाहून समजूत काढावी लागली." या गोष्टीवरून सोशल कॉन्फरन्सची आठवण होऊन ते पुढे म्हणाले की, " तुमच्याकडील एक बडे गृहस्थ हुंड्याच्या ठरावावर सभेत भाषण करणार होते, हें मला कळतांच मी सेक्रेटरीस कळविलें की, दुजोरा देणाऱ्यांच्या यादींत माझें नांव घाला ! हें त्या गृहस्थास समजतांच ठराव पुढे येण्याच्या वेळेस हे गृहस्थच हजर राहिले नाहीत."

लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर एकदां त्यांच्या खेळीमेळींतील एका स्नेह्यानें त्यांस ' तुम्ही अलीकडे मवाळ झाला आहांत ' असें रोखठोक तोंडावर म्हटलें. " यास कांही पुरावा द्याल का ? " असें लोकमान्य त्यांस म्हणतांच सदर गृहस्थ उसळून त्यांस म्हणाले, ' मवाळ झालों नाही, अशाबद्दल तुम्ही तरी कांही पुरावा देऊं शकाल ? ' जरा संकोचित वृत्तीने टिळक म्हणाले, " माफी न मागता मी सहा वर्षें तुरुंगांत राहिलों यापेक्षा आणखी तो पुरावा काय पाहिजे !" यावर रागावून ते गृहस्थ म्हणतात, " बळवंतराव, ही वकीली करून आम्हांस असे फसवितां काय ? तुम्ही सहा वर्षें शिक्षा भोगलीत हा तुमचा मोठेपणा कोण मान्य करीत नाही ? पण लक्षांत असूं द्या; सहा वर्षांच्या पूर्वीच्या तुमच्या बाण्याचें तें फळ आहे. आमचा आक्षेप तुम्ही सुटून आल्यापासून मवाळ झाला आहांत असा आहे. यावर काय उत्तर ? " चटकन् लोकमान्य म्हणाले, " अहो, तुम्ही म्हणतां तसा मी

मवाळ झालों असतों, तर माझ्या ऑफिसच्या स्टाफवर तुरुंगांतून आलेले वामनराव जोशी, भट, बापट हे कोणास पाहावयास मिळालेच नसते. मवाळांच्या स्टाफवर यांपैकीं कोणा एकास ठेवून दाखवा पाहूं ?"

कै. विष्णु गोविंद विजापूरकर यांनी पुढील आठवण सांगितली आहे— "सुरतेची काँग्रेस मोडल्यानंतर समेट घडवून आणण्यासाठी सुरतेच्या छावणींत वरचेवर सभा होत असत. त्या वेळीं झालेलीं लोकमान्यांचीं भाषणें फार परिणामकारक होत. एका सभेमध्ये तडजोड करण्यासाठी मुख्त्यार-मंडळ नेमण्याची त्यांनी सूचना केली व त्या मंडळाचे चिटणीस रा. नरसिंह चिंतामण केळकर असावेत असें त्यांनी म्हटलें. तेव्हा श्रोत्यांपैकी एकजण म्हणाला, "त्यांचे दोन चिटणीस आहेत, तेव्हां आमचेहि दोन असावेत." त्याबरोबर एक पळहि न थांबतां लोकमान्य ठासून म्हणाले, "नको हो, एक पुरे; आमचा एक त्यांच्या दोघांबरोबर आहे !" यांत हजरजबाबीपणा तर दिसलाच पण आपल्या माणसाविषयी अभिमान व त्याचा गौरव करण्याची सहज साधलेली लकब, आणि प्रतिपक्षापेक्षा आपली श्रेष्ठता असल्याबद्दलची खात्री त्यांच्या ठिकाणीं आहे, हेंहि व्यक्त झाल्याने लोकांनी कौतुकदर्शक टाळ्यांचा गजर केला.

पूर्वी १८९८ सालीं मद्रासेकडे जातांना टिळकांनी निजाम हैद्राबादेंतून प्रवास केला होता. गुंतकल स्टेशनावर कोणी एक सामान्य मुसलमान टिळकांच्या डब्यांत बारकाईने निरखून पाहूं लागला. एकाने त्याला विचारले 'क्या देखते हो'. 'एक आदमी जेलसे छूटकर इसी गाडीमे मद्रास जा रहे है, यह सुनकर उनको देखने हम लोग आये है.' असें म्हणून टिळकांकडे अंगुलीनिर्देश करून तो म्हणाला, 'वह यही महाराज है.' असें म्हणून लोकमान्यांना दोनतीन वेळा लवून त्याने सलाम केला. यावर लोकमान्यांच्या परिवारापैकीं एकाने त्यांना विचारले, "आपल्यासबंधाने याला कुणी सांगितलें ? आपण होऊन आपला शोध करीत करीत तो येथे आला व आपल्याला पाहतांच त्याला किती तरी आनंद झाला. याचें कारण काय असेल बरें ?"

"याचें कारण तुम्हीच," टिळक उद्गारले. "तुम्ही लोकांनी माझ्या तुरुंगवासाचा इतका बभ्रा केला नसता तर या बिचाऱ्याला तरी तो कसा कळता ?"

१९०८ सालच्या खटल्याच्या वेळीं बॅ. बॅप्टिस्टा यांना यावयाला थोडा वेळ लागला म्हणून त्यांच्या येण्याची टिळक वाट पाहत होते. यावर कोणी सुचविलें, बॅप्टिस्टा येईपर्यंत दुसऱ्या कोणातरी वकिलाला काम सुरू करण्यास सांगावें. बॅप्टिस्टा आल्यानंतर ते आहेतच ! यावर टिळक म्हणाले, ' एखाद्या सतरा वर्षांच्या वधूला तीस वर्षांचा वर पाहिजे असला तर पंधरा-पंधरा वर्षांचीं दोन मुलें त्याऐवजी देऊन कसें निभेल ? '

लोकमान्य टिळक व त्यांचे सहकारी यांनी ' न्यू इंग्लिश स्कूल ' काढलें. तेव्हां सगळ्यांना पगार फारच स्वल्प म्हणजे अवघा तीस रुपये होता. तेव्हां त्यांचा एक सहकारी थट्टेने म्हणाला, " यांतून आमच्या दहनाला पुरेल इतकी तरी शिल्लक अखेर कशी उरणार ! "

यावर टिळक म्हणाले—" त्याची नको तुम्हांला काळजी. विभूति-पूजेकरितां जरी लोकांनी आपल्या देहाचें जतन न केलें, तरी निदान आरोग्यरक्षणाकरिता तरी त्यांना आपलें दहन करणें भाग आहे ! " ही आठवण १८८० च्या सुमाराची म्हणचे सार्वजनिक आयुष्याच्या अगदी प्रारंभीची आहे. तथापि मृत्यूच्या वेळच्या शेवटच्या आजारांतहि ते कृत्रिम अथवा नैसर्गिक ग्लानीच्या व बेशुद्धीच्या अमलांतून बाहेर पडले म्हणजे एखादी विनोदी कोटि उच्चारून आसपासच्या मंडळींना हसवून सोडीत. डॉक्टरांनी जेव्हां इन्जेक्शन दिलें तेव्हां ते सावधपणाच्या स्थितींत म्हणाले—' काय हो, Injection by Proxy करण्याची युक्ति कोणी शोधून काढलेली नाही काय ? '

यावरून दिसून येईल की, टिळकांचा स्वभाव प्रारंभापासून अखेरपर्यंत विनोदी होता.

( सह्याद्रि ऑगष्ट १९४२ ).

* * *

# निंदा पावलेले देशभक्त...

ज्या ज्या वेळेला राजकारणाविषयीं विचार माझ्या मनांत येतो त्या त्या वेळीं, ' वारांगनेव नृपनीतिं अनेकरूपा ' हें सुभाषित मला आठवते व मौज वाटते. वारांगनांचा उल्लेख जसा अनादरानें केला जातो, तशाच प्रकारें राजकारणांत आपणाशीं मतभेद असलेल्या देशभक्तांचा नामोच्चारहि धिक्कारानें केला जातो. कांहीं लोक या निंदेतून तरतात, तर कांहीं बुडतात, हें चाललेंच आहे. राजकारण हें नेहमीं अस्थिर व चंचल असल्यामुळें वारांगने-सारखे 'अनेकरूप' आहे. त्यांत कोणाचें सतत एकमत असत नाहीं, एकच पक्ष असूं शकत नाही, त्याचे सल्लागार, साथीदार-अनुयायी तेच असू शकत नाहीत, आजचे जिवलग मित्र तेच उद्या कट्टे दुष्मन होतात व ज्यांनीं पूर्वी जन्मभर वैर केलें तेच उद्या सहकारी होण्याचा ' योग ' येतो; आणि आज लोकप्रियतेचा मुकुट धारण करणारा कदाचित उद्यां लोकनिंदेच्या फांसावर चढतो; असें ज्या राजकारणाचें स्वरूप त्याचे वर्णन सुभाषितकारानें 'वारांगनेव' यापेक्षां दुसऱ्या कोणत्या शब्दांनीं करावें ? मला तर असें वाटतें कीं, राजकारणाविषयींचा आपल्या आयुष्यांतील सर्व अनुभव व तत्वज्ञान सुभाषितकारानें या एका ओळींत सांठविला असेल. एका जुन्या नाटकांतील पद्यांत म्हटल्याप्रमाणें " निंदा जनीं त्रास, अपमान उपहास, अर्थी विपर्यास " हेच भोग लोक-कल्याण साधावयाला जाणाऱ्याच्या नशिबीं येतात. असे खरे लोकनायक केव्हांहि

थोडेच असणार ! पण राजकारण जे अजकाल रंगलेलें आढळतें तें राजकारणाच्या हुल्लडींत खऱ्या देशभक्तांच्या बरोबर खोटे देशभक्तहि मिसळून जो खेळ खेळतात त्यामुळेंच रंगतें एरव्ही नव्हे. "Politics is the last resort of scoundrels" असे हरीभाऊ आपटे विनोदानें वर्णन करीत, तें कांही त्यांनी आजूबाजूचा त्या वेळचा अनुभव पाहिल्याशिवाय केलेले नाही !

आजकालच्या लघुकथांमधून संसारांतील अनेकविध अनुभवांची चित्रें मनोविश्लेषण करून मांडण्यांत येतात; पण राजकारण कांही संसाराहून वेगळे नाही. जें संसारांत तेंच राजकारणांत. संसार काय,' राजकारण काय, करणारी माणसें तीच ना ? थोडे मन विशाल केलें तर आपणा संसारी माणसांनाहि आत्मौपम्य बुद्धीनें राजकारणाचे धागेदोरे समजण्यास अवघड नाहीं; पण प्रचलित राजकारणांत तितका निर्विकारी स्पष्टपणा येण्यास थोडा काळ जावा लागतो, याला इलाज नाही. पण कालांतरानें का होईना, राजकारणाचे धागेदोरे व त्यांत भाग घेणाऱ्या व्यक्तींचे हेतु यांवर इतिहासाचा प्रकाश पडतो. निंदा व छळ पावलेल्या राजकीय व्यक्ति आपलें समर्थन करितांना जी 'भावी इतिहासा'ची वेळोवेळी ग्वाही देत असतात, त्याचें कारणहिं हेंच आहे.

या दृष्टीनें राजकारणाचा विचार केला तर कितीतरी व्यक्तींची उदाहरणें उद्बोधक वाटतील. मग तीं उदाहरणें इतिहासांतून अगर आजकालच्या राजकारणांतून कोठूनहि घ्या. क्लाइव्हप्रमाणें वॉरन हेस्टिंग्जला ब्रिटिश राज्याचा संस्थापक मानतात. पण हाऊस ऑफ कॉमन्सनें सात वर्षें त्याच्या डोक्यावर जे चौकशीचें सुदर्शनचक्र धरले होतें त्यांत त्याची लोकप्रियता धुळीला मिळाली ! एवढा ब्रिटिश राज्याचा संस्थापक, पण हलकट माणसाप्रमाणें पैसे खाल्ल्याचा व बेगमांना बुचाडल्याचा त्यावर आरोप होता. बेकन हा इंग्लंडांतील मोठा विद्वान् मनुष्य व राजकारणांतहि लब्धप्रतिष्ठित होता. पण न्यायाधीश असतांना पैसे खाण्याची त्याला जन्मभर खोड होती. पार्लमेंटनें त्याला एकमतानें शिक्षा केली त्याबाबत स्वतःसबंधी बेकननें असें लिहून ठेवलें आहे कीं "माझ्याइतका न्यायनिपुण मनुष्य गेल्या पन्नास वर्षांत झाला नाही, पण पार्लमेंटने मला जी शिक्षा

दिली तितकी न्याय्य शिक्षाहि गेल्या दोनशें वर्षांत कोणाला दिली गेली नसेल !" इंग्रज प्रधान वॉलपोल तर "Every man has his price" असें म्हणून सार्वजनिक बाबतींतील लांचलुचपतीचें उघड समर्थन करीत असे व यावरून तेव्हांच्या राजकारणांत व पुढचाहि पार्लमेंटचा इतिहास पाहिला तर त्यांत सात्त्विक व सच्चे किती होतें व हरिभाऊ आपट्यांनीं वर्णिल्या-प्रमाणें 'बदमाष' किती होते हें दिसेल.

देहांत शिक्षा दिल्यानंतर जिला इंग्रजांनीं देवदूताच्या पदवीवर चढविले अशाबद्दल जोन ऑफ आर्कचें उदाहरण प्रसिद्ध आहे. तिच्या विरुद्ध जें 'चार्ज शीट' तयार केलें होतें त्यांत "ती पुरुषाचे कपडे घालते आणि मुलासारखें आपले केस कापतें" ( Bob ) असले हास्यास्पद आरोप होते. पण छळ पावलेल्या व्यक्तीबद्दल काळच सूड घेतो. जोनला जाळल्यानंतर पांच वर्षांनीं जोनच्या आईकडून जोनच्या खटल्याची फेरतपासणी होण्याचा अर्ज देवविला गेला. त्यांत सुमारें शंभर साक्षीदारांच्या जबान्या झाल्या. व केवळ इंग्रजांच्या कारवाईमुळें जोन ऑफ आर्कवर खटला करून तिला जाळण्यांत आलें, असा कबुलीजबाब स्वतः ज्यानें पूर्वीं फिर्यादी-पक्ष घेतला होता त्यानेंच दिला. नंतर न्यायाधीशांनी जोनवरील प्रत्येक आरोप नाशाबीत ठरवून तिचें चारित्र्य निष्कलंक असल्याचें जाहीर केलें. आपल्या देशावर तिनें निःसीम प्रेम केले, अंतःकरणापासून प्रीति केली, यापेक्षां तिचा काय गुन्हा होता ? छळ पावलेली एक देशभक्त वीरकुमारी म्हणून जितकें जोन ऑफ आर्कचें कौतुक होईल तितकाच तिला "मरणाआधी सरणांत" घालणाऱ्या इंग्रजाच्या न्यायनीतीचा धिक्कार होईल.

हातीं सत्ता व अधिकार असूनही लोकनिंदा कशी टाळतां येत नाही, याबद्दल नाना फडणिसाच्या चरित्रांत दाखला आहे. नारायणरावाचा खून करविणाऱ्या राघोबाच्या वंशाची इतःपर सेवा करावयाची नाही, म्हणून जो बारभाईचा पक्ष नाना फडणीसानें स्थापला त्यालाच अखेर दुसऱ्या बाजीरावाचें राजपद मान्य करण्याची पाळी आली ! याचें कारण बाजीरावानें फार चातुर्यानें लोकमत आपल्या बाजूचे बोलके केलें. लोक असे बोलत, "बाजीराव तरी औरसच ना ? तो तरी पेशव्यांचे घराण्यांतलाच ना ? मग औरस वंश सोडून चिमाजी आप्पाला दत्तक घेणें याला धर्मशास्त्र म्हणावयाचें

की नाना फडणीसांचा स्वार्थीपणा म्हणावयाचा ?" अर्थात् लोकमत आपल्या काबूंत ठेवणें याला जर राजकरण म्हणावयाचें असेल तर या दत्तक प्रकरणांत नाना हरला आणि बाजीरावानें त्यावर मात केली असें म्हटलें पाहिजे.

पेशवाईच्या अखेरीला या दत्तक प्रकरणांत जो लोकनिंदेचा अनुभव नानाला आला तसाच अनुभव ताईमहाराज केसमध्यें टिळकांना आला. त्यावेळीं लोक उलट्या काळजाने हवे ते आरोप कसें हलकटपणानें करीत याचें मूर्तिमंत शब्दचित्र टिळक चरित्रांत दिलें आहे:—

"टिळकांसारख्या एवढ्या थोर शिकलेल्या माणसानें कायद्याच्या कैचींत धरून एका पोरसवदा अजाण विधवेला छळावें ना ? तिला हवा तो मुलगा ती दत्तक घेईल. आपल्या करड्या अधिकाराची नागवी तलवार तिच्यावर टिळकांनीं काय म्हणून धरावी ?" असा कुत्सित गवगवा सुधारकांनी, गावांतील लब्धप्रतिष्ठितांनीं चालविला होता. ताई महाराजांची मजल तर, आपल्या जबानींत टिळकांच्या चारित्र्याबद्दल वाईट ध्वनि काढण्यापर्यंत गेली होती ! आणि टिळकांचे खाजगी चारित्र्य हीन आहे असें लोकांना पटवतां आलें तर टिळकांच्या लोकप्रियतेला खग्रास ग्रहण लागेल, अशा समजुतीनें सरकारनें त्या खाजगी खटल्याची सर्व सूत्रें आपल्या हातांत ठेवली होती. म्हणूनच ज्या दिवशीं सेशन कोर्टात स्ट्रॅची यांनीं विरुद्ध निकाल दिला त्या-वेळीं आपल्या आयुष्यांतील तो सर्वांत मोठा संकटकाळ असें टिळकांना वाटलें असल्यास नवल नाही. पण अखेर "खरें तेंच टिकलें" आणि टिळकांच्या निंदकांची फजिती झाली. टिळक 'लोकमान्य' असले तरी, जन्मल्या पहिल्या दिवसापासून ते लोकप्रियतेच्या शिखरावर बसले नव्हतें. लोकनिंदेच्या खडतर अग्निदिव्यांतूनच त्यांना जावें लागलें !

टिळक जहाल व गोखले नेमस्त म्हणून गोखल्याना तुलनेने लोकप्रियता अशी कधींच मिळाली नाही. त्यांचे कौन्सिलमधील राजकारण, श्रम व स्वार्थत्याग सामान्य माणसास कधींच दिसत नसे. उलट, प्लेगच्या जुलमाच्या-वेळीं त्यांनीं सरकारची माफी मागितल्यावरून त्यांची अप्रियता त्यावेळीं कळसास पोचलीं व १९०८ सालीं मोर्लेशी गुप्त खलबतें करून त्यांनीं टिळकांना तुरुंगवास घडवला, या मानीव संशयाचें सुदर्शनचक्र त्यांच्या डोक्यावर किती तरी दिवस फिरत होतें. १९१० सालीं नाशिकच्या कटाच्या

खटल्यांत एका आरोपीने 'न्यायमूर्ती दावर व नामदार गोखले यानांही जॅकसनप्रमाणेंच देहांत शासन देण्याचें ठरलें होतें' असें सांगितलें. अर्थात्, लोकनिंदेच्या दृष्टीने त्या वेळच्या महाराष्ट्रीय तरुणांत गोखल्यांच्याबद्दल काय काय भावना असतील, हें सांगावयाला नकोच !

आगरकरांची सुधारक मतें लोकांना आवडत नसत, म्हणून जिवंतपणीच त्यांची प्रेतयात्रा लोकांनी काढली. हरबिलास शारदा यानांही आपल्या तिरडीच्या मिरवणुकीचे दर्शनसुख लोकांनी कसें दिले, याची हकीकत तेंहि एखादेवेळीं गमतीने सांगतात. सर फिरोजशहा मेहता यांच्या गालांवर जेव्हा सुरतेच्या कॉंग्रेसमध्यें एकानें जोडा भिरकावून दिला तेव्हा "हें माझ्या पंचवीस वर्षांच्या देशसेवेचें बक्षिस" असे उद्‌गार त्यांनी खेदानें काढलें, असें म्हणतात. आणि ज्या सुरेंद्रनाथ बानर्जींना लोकांनी "बंगालचा अनाभिषिक्त राजा" म्हणून आदरानें राज्याभिषेक केला तेच पुढें राजकारणाच्या भरधांव गर्दीत लोकांच्या दृष्टीने 'मवाळ' ठरले व त्यांच्यावर 'शेम शेम' करून लोकांनी एकदोन सभाहि मोडून टाकल्या.

मनुष्य स्वतः काय बोलतो, काय करतो याला महत्त्व न देतां तो कोणाशी स्नेहसंबंध ठेवतो, तो कोणांत बोलतो, मिसळतो यावरून लोक जे तर्क बांधतात, तें पुष्कळदां मोठें गमतीदार असतात. श्री. न. चिं. केळकर हे नामदार गोखल्याशीं स्नेहसबंध ठेवीत म्हणून ते गोखल्यांच्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत जाणार होते असा एक तत्कालीन समज होता. व तसे समजण्याला तरी यावेळी लोकांना कारण काय, तर शिवरामपंत परांजपे किंवा खाडिलकर यांच्याप्रमाणें केळकर जहालपणाची भाषा बोलत नसत. व नेमस्त झालें तरी तेंहि देशभक्त आहेत, अशी भावना ठेवीत, इतकेंच. पण कोणी इतका विचार करीत नसे, कीं गोखल्यांच्या सोसायटीला जाऊन मिळण्याचे केळकरांच्या मनांत होते तर त्यांना न घेण्याला तशी आडकाठी किंवा कोणाची बंदी अशी काय होती ? राष्ट्रीय पक्षांतही केळकराशीं स्पर्धा करणारे अनेक पुढारी होते, ते असल्या आरोपाची सांथ मोठ्या आनंदाने करीत. पण स्वतः टिळकांनी त्या निराधार बातम्या एक दिवस देखील खऱ्या मानल्या नाहीत. शंकरराव लवाटे यांनी एक दिवस हा प्रवाद टिळकांच्या कानांवर घातला, तेव्हा या बातमीवर अविश्वास दर्शवून त्यांनी असें उद्‌गार

काढलें की "तात्या जर गोखल्यांच्या सोसायटींत गेले तर गोखल्यांना एक जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही." टिळकांना मनुष्यस्वभावाची पारख किती अचुक होती, एवढेंच त्यावरून दिसतें. टिळकांच्या गैरहजेरींत राष्ट्रीय पक्ष व कॉंग्रेस यांच्यांत समेट करण्याचा केळकरानी फार प्रयत्न केला. त्यावेळी केळकरांचा 'नेमस्तांच्याकडे ओढा' असल्याबद्दल त्यांच्या प्रतिपक्षांनी असेंच काहूर केले. पण तुरुंगांतून सुटल्यावर "केळकरांनी केले तेंच बरोबर होते" असा टिळकांनी स्पष्ट हवाला दिल्यावर प्रतिपक्षांची तोंडे बंद झाली.

पुष्कळदां, जहालपणानें बोलणें हेंच देशभक्तीचे लक्षण मानले जाते व तसें जो बोलूं इच्छित नाही तो नादान तर ठरतोच, पण यावरून त्याला कांही 'कारण' असेल, असेंहि लोक बरळतात. ज्यांनी चाळीस वर्षे राजकीय देशसेवेंत घालविली त्या पंडित मालवीयांना तर 'देशभक्त' म्हणून मान्य करण्यास हरकत नाही ना? पण १९२० सालच्या असहकारितेच्या चळवळींत म. गांधी हे जहाल व मालवीय 'मवाळ' अशी स्थिति होती. कारण सरकार व लोकपक्ष यांच्यांत ते कांही तरी समेट व मध्यम मार्ग काढण्याची खटपट करीत होते ना! व मला एक प्रसंग तर असा आठवतो की, शिवाजी-मंदिरांत जाहीर सभा भरली असतां म्हैसूरकर नांवाच्या एका हंगामी वक्त्यानें "That traitor Malaviya" असे शब्द उच्चारून आपली जीभ कलंकित केली. पुण्यांतील श्रोतृसमाज कितीहि चिकित्साखोर असला तरी असला फाजीलपणा कोणी तेथें चालूं देत नाही. व म्हैसूरकर यांना या अतिप्रसंगाबद्दल सपशेल माफी मागावी लागली!

पण राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत असल्या आरोपाबद्दल कोणीहि विषाद मानीत नाहीं किंवा तें फार वेळ मनावर घेत नाहीं. ज्यांना स्वतःच्या शक्तीचा आत्मविश्वास आहे व ज्यांचें दिल आणि सदसद्विवेक बुद्धि आरशासारखी साफ आहे त्याना असले आक्षेप व कुशंका कानावर येऊन त्यांची फारतर करमणूक होत असेल इतकेंच. कौन्सिल प्रवेशाचा पुरस्कार करून ज्या अणे—केळकरांनीं प्रथम महाराष्ट्रपक्ष स्थापिला आणि जो कौन्सिल—प्रवेश सोळा वर्षांनीं कॉंग्रेसनें झकत मान्य केला त्या कौन्सिलवाल्या पक्षाचा उल्लेख आज इतकें वर्षें 'देशद्रोही' या शिवीशिवाय होत नसे. पण ही शिवी आतां

निरर्थक म्हणून फुकटच गेली ना? जें विशेषण फुकट गेले तें विशेषण लावण्यांत तरी काय फायदा? १९२२ सालीं गंगाधरराव देशपांडे फेर व नाफेर पक्षांतील समेटाकरितां पुण्यास श्री. केळकर यांच्या घरीं पाहुणे म्हणून उतरले असतां, अनेक नाफेरवाल्या आक्षेपकांशीं केळकर यांनीं असा युक्तिवाद केला कीं, “ सध्यांच्या चळवळींत महाराष्ट्र पाठीमागें आहे अशी नुसती मोघम हाकाटी करूं नका. ज्याच्याबद्दल तुम्हांला बोलावयाचें असेल त्याचें नांव घेऊन बोला. या मोघम विशेषणांनीं जर कोणाची खरी बदनामी झाली असेल तर ती महाराष्ट्राची मात्र झाली ! ”

प्रचलित राजकारण हें सतत वाहणाऱ्या नदीप्रमाणें आहे. नदीचें पात्र बदलूं शकतें, तसेंच वाहत्या राजकारणाचे आहे. मग आपल्या राजकीय मतांबद्दल दुरभिमान बाळगणें व पक्षद्वेष माजवणें हीं दोन्ही व्यर्थच नाहींत काय? मला असें वाटतें, कीं आपल्या मतांबद्दल योग्य अभिमान बाळगून सुद्धां “ अखेर खरें काय ठरेल हे निश्चित कोणी सांगावें ? ” अशी थोडीशी विनयपूर्ण संदेह बुद्धि माणसानें प्रगट करणेंच शहाणपणाचें ठरेल. “ हा म्हातारचळ का पोरखेळ ? ” हा लेख लिहून टिळकांनीं न्या. रानड्यांवर टीका केली तेव्हा, आपल्या अनुयायांची समजूत पाडतांना रानडे म्हणाले की “ टिळक हें आपणाप्रमाणेंच देशभक्त आहेत. ज्या दोषांबद्दल टिळकांनी नेमस्त पक्षावर टीका केली ते दोष नेमस्त पक्षांतच नाहींत, याची आपण प्रथम खात्री करून घेतली पाहिजे. कोणी सांगावें, माझ्यापेक्षां अखेर टिळकांचेंच म्हणणें खरें असल्याचा निर्णय कदाचित् इतिहास देईल. ” ही वृत्तीच खऱ्या उदारपणाची आहे. दुसऱ्या पक्षाच्या मतांचा धिक्कार करण्यानेंच आपली मतें खरी ठरतील असें कोणी समजूं नये. केवळ निंदेची हुंडी कर्तृत्वाच्या यशाच्या शिक्यावर चढण्याचा संभव कमी. प्रतिपक्षाला हंसणें फार सोपे आहे. पण “ He who laughs last, laughs best ” ही म्हण राजकारणांत सदैव लक्षांत ठेवली तर, निंदेच्या हास्याची लकेर ओठांवर उमटवतांना कोणीहि दहा वेळ विचारच करील !

( चित्रा—दिवाळी अंक १९३६ )

★ ★ ★

# वसईच्या मोहिमेतील ‘ हेतुसंशोधन ’ !

वसईच्या उत्सवाचे साखरपेढे व प्रसाद हातीं पडल्यावर घरोघरीं जातांना कोणा एकाला शंका आली की या युद्धाचा हेतु काय ? आमच्या घोळक्यांत बहुतेक सर्वजण तरुण होते. त्यांत कोणी कवि होते, कोणी मुत्सद्दी होते, कोणी इतिहाससंशोधक होते, कोणी संपादक होते, कोणी व्यापारी होते. एक शिकारीहि आमच्यांत होते. लष्करी नोकरी नसल्यामुळें करमणुकीकरिता ते केव्हा केव्हा शिकारींत वेळ घालवीत. आज उत्सवाकरिता जसे सर्व जातींचे व धंद्याचे लोक जमले होते तसेच दोनशें वर्षांपूर्वीं, पेशव्यांनी वसईच्या तटासमोर जी दीड लाख फौज उभी केली त्यांतहि असेच नसतील का अठरापगड जातींचे लोक ? त्यांत कोणी कारकून असतील, कोणी सुरुंग खोदणारे असतील, कोणी हकीम-वैद्य असतील, कोणी मुहूर्त काढून देणारे ज्योतिषी असतील, कोणी भिस्ती असतील, कोणी धान्य पुरवणारे व्यापारी असतील, तर कोणी युद्ध करा म्हणणारे असतील, तर कोणी करूं नका म्हणणारे असतील ! कोणी वतनाच्या आशेने आले असतील, तर कोणी आपसांतील राजकीय स्पर्धेकरिता आले असतील. कोणी धर्मयुद्धाच्या सात्त्विक भावनेने त्यांत गेले असतील, तर कोणी सेवाधर्माच्या नाइलाजाने, म्हणजे कोणताच विशेष हेतु नसून त्यांत पडले असतील. यापूर्वी एकाच फिरंग्याच्या कां, अनेक फिरंग्यांच्या हाता-

खाली हिंदु लोकांनी स्वामिनिष्ठा दाखवून मराठ्यांशीं लढाया मारल्या नव्हत्या काय? यामुळें अशी कल्पना निघाली की, मंडळींत खाजगी सभा करावी, सर्वांनी त्यांत भाग घ्यावा व आपापल्या कल्पना सांगाव्या.

त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं सभागृहांत तमाम लोक आले; कारण आमच्या खाजगी सभेची वाच्यता पुष्कळच झाली होती. त्यांत कित्येक निर्विकारी होते. कित्येक सभा जिंकण्याकरिता आले; आपल्या जातीला श्रेय मिळावें म्हणून कांहींजण आले होते. कित्येक नुसतीच वादाची गंमत पाहण्याकरिता जमले होते.

विषय कुतूहलाचा आणि विनोदबुद्धीहि उत्पन्न करण्यासारखाच असल्याने अध्यक्षांची सूचना करतांना एकाने थोडें थट्टेने भाषण केलें. 'तो म्हणाला, " आजच्या सभेमुळें इतिहाससंशोधकांचा मात्र आपणांवर रोष होईल, याकरिता अध्यक्षांनी जपूनच अध्यक्षस्थान स्वीकारावें ! कारण पिकविकच्या शिलालेखाच्या संशोधनांत ज्याप्रमाणें शिळेवरील लेख अर्वाचीन ठरला, मात्र शिळा म्हणजे दगड हा प्राचीन ठरला, तशी कदाचित् आपल्या हेतुसंशोधनाची गति होण्याचा संभव आहे. कारण प्रत्येक गोष्टीला कदाचित् कांहीं हेतु असला, तरी तो निर्णायक रीतीने सांगणें मोठें कठीण काम आहे. परमेश्वराने जग निर्माण केलें तें काय हेतूकरिता ? कवि काव्य निर्माण करतो तें रात्रीं त्याला नीटशी झोप लागत नाही म्हणून ? की वाचकांना आनंद देण्याकरिता ? कलावान मनुष्य कलाकृति निर्माण करतो ती स्वतःच्या निरुपाधिक आनंदाकरिता ? की उपदेशाच्या हेतूकरिता ? आईच्या प्रेमाइतकें तर शुद्ध सात्त्विक दुसरें कांहीं नाहींना ? पण आई मुलाला पाजते तें मुलावर उपकार करण्याकरिता की स्वतःचा स्तनभार हलका करण्याकरिता ? निपुत्रिक लोक दत्तक घेतात ते मरणोत्तर स्वतःला पिंडदान मिळेल या समाधानाकरिता ? की बिनवारशी इस्टेट सरकारांत जाईल म्हणून मिळकतीला वारस उत्पन्न करून ठेवण्याकरिता ? पतिव्रता स्त्री पतीवर प्रेम करते ती पतीकरिता, की ' आत्मनस्तु कामाय ' म्हणजे स्वतःच्या सुखाकरिता ? फाशी जाणारा देशभक्त आत्मार्पण करतो तें देशाच्या हिताकरिता ? की स्वतःच्या मनाची तळमळ शांत करण्याकरिता ? पेशव्यांच्या पन्नास हजार लोकांनी जें वसईला आपलें रक्त सांडलें तें उदंड स्नानसंध्या करण्याला सांपडावी या हेतूकरिता ?

की मुलूखगिरीच्या हौसेकरिता? याचें उत्तर वरच्या तात्त्विक प्रश्नाइतकेंच अवघड नाही काय?"

अध्यक्षांच्या सूचनेला पाठिंबा देणाराने असेंच नकारात्मक भाषण केलें. तो म्हणाला "हेतुसंशोधनाच्या इच्छेने आपण चर्चा पाहिजे तेवढी करावी. पण निर्णय अगर ठराव मात्र अगदी वेगळ्या भाषेंत लिहावा. पूर्वीपासून आजतागायत दप्तरी भाषा लिहिण्याची अशीच परंपरा आहे. कोणी राजकीय पुढारी राजकीय हेतूने जरी विलायतेला गेला तरी, 'सुभाषबाबू हे प्रकृतीसाठी हवाबदल करण्याकरिता आयर्लंडांत गेले असता लॅन्सबरी अगर डी व्हॅलेरा यांनी एक दिवस त्यांना चहाला बोलावलें होतें' इतकाच मोघम उल्लेख नाही वर्तमानपत्रें करत? आपणहि त्याच सनातन रीतीचा अवलंब करावा. शिवाय असें करण्याला सनातन अर्वाचीन हेतूंचे दाखलेहि पुष्कळ सांपडतील. भारतीय युद्ध करणाऱ्या श्रीकृष्णाने 'न धरी शस्त्र करीं मी' म्हणजे 'मी नाही' असेंच म्हटलें होतें. नानासाहेब बंडवाले तर बंडाचें पुढारीपण पत्करण्याला 'मी नाही' असें म्हणत होते. लोकांनी त्यांना घोड्यावर घातलें! प्रणयाचें उदाहरण घेतलें तरी, कोणतीहि तरुणी 'मी नाही' असेंच प्रथम लज्जेने म्हणत असते. आणि संततिनियमनाचें उपाय—परमेश्वरी इच्छा दुसरी असल्यामुळे—फुकट जाऊन जरी तिच्या घरांत मुलांबाळांचे नंदनवन दिसूं लागलें, तरी तिचा हेतु संततिनियमनाचाच होता असें ती प्रतिज्ञेवर लिहून देईल! अशी जेथे स्थिति तेथे परमेश्वर मुलें निर्माण करतो की आईबाप त्यांना जन्माला घालतात याचेंच संशोधन करण्याची पाळी आली असें म्हणणें प्राप्त नाही काय?"

यावर सभेंत हशा पिकून अनेकांनी टाळ्या वाजवल्या. अध्यक्ष स्थानापन्न होतांना इतकेंच म्हणाले की, "अध्यक्षाची सूचना व अनुमोदन देणारांनी हेतुचिकित्सेविषयी जितकीं चांगलीं भाषणें केली तितकींच जर इतर वक्तेहि करतील, तर मला फारसें कामच उरणार नाही, व सभेचा उद्देश सिद्धीस जाईल. वसईच्या युद्धाचा कांही तरी हेतु होता हें गृहीत धरून, काय हेतु होता इतक्यापुरतीच वक्त्यांनी पाहिजे तेवढीच चर्चा करावी."

यानतर प्रथम एका कॉमरेडने भाषण केलें. तो म्हणाला—'वसईच्या युद्धाचा हेतु राजकीय नव्हता व धार्मिक अगर सामाजिक तर नव्हताच नव्हता.

जगांतल्या एकूण एक आंदोलनांचा खरा हेतु अर्थिक असतो. सर्व जुने लिहिलेले इतिहास रद्द समजून या नव्या दृष्टीने फिरून लिहिले पाहिजेत! कोणी म्हणतात अल्लाउद्दीनाने पद्मिनीच्या अभिलाषाने चितोडवर स्वारी केली. पण कामप्रेरणा होण्याला तरी पैशाचें स्वास्थ्य त्याचेजवळ भरपूर होतें हीच गोष्ट कारण झाली. विषयसाधन असो की राज्यसाधन असो, हे सर्व पैशाचे खेळ आहेत. पैसा हें जगाचें एकमेव सूत्र आहे. आर्य लोक उत्तरध्रुवाकडून दक्षिणेकडे आले ते जीवनकलहाकरिता, धर्मप्रसाराकरिता नव्हे! तसेंच पुढे पोर्तुगीज, डच्च व इंग्रज. कांहीं आर्थिक कारणामुळे जर आज इंग्रजांचा सर्व व्यापार बसेल, व हिंदुस्थान राखणें हें आर्थिक दृष्ट्या तोट्याचें आहे असें खरोखर इंग्रजांच्या प्रत्ययाला येईल तर, इंग्रज एक दिवसहि या देशांत राहणार नाहीत. केवळ मुलुखगिरी हाहि हेतु प्रत्येक युद्धांत नसतो. भाराभर मुलुख किंबहुना जग जिंकलें तरी त्याचें करावयाचें काय? तें संभाळतां न आलें तर त्याचा काय उपयोग? आपल्या सामर्थ्याच्या अहंकाराकरिता मुलुख जिंकला पण उदारपणें तो परत दिला अशींहि उदाहरणें इतिहासांत नाहीत असें नाही.'

या नंतर एकाने वसईच्या युद्धाच्या हेतु धार्मिकच होता असा रीतसर उपन्यास केला—'आपण हिंदु लोक धार्मिक आहों ही गोष्ट आजच्या दृष्टीने कशीहि असो, पण फार प्राचीन काळापासून तसे आहों ही जर खोटी नाही तर त्याबद्दल तक्रार करण्यांत काय फायदा! अभ्युदय आणि निश्रेयस असे आमच्या व्यवहारधर्माचे दोन भाग आहेत. पण आणखी खरें बोलावयाचें तर—अभ्युदय कशाकरिता? तर निश्रेयसाकरिता. असा दोन्ही गोष्टींत दृढ कार्यकारणभाव आहे. कितीहि अभ्युदय झाला तरी पाश्चात्य सुधारणेची भरभराट आपण धर्मप्रवण हिंदु लोक त्याज्यच मानूं. कारण ती वाट निश्रेयसापासून फार दूर जाणारी आहे. स्वराज्य व स्वधर्म या कल्पना अभ्युदय व निश्रेयस याहून निराळ्या नाहीत. शिवाजीने रामदासाला स्वराज्य अर्पण केलें, या गोष्टीची थट्टा कोणी असें म्हणून करो की, शिवाजीने रामदासाच्या झोळींत टाकली ती केवळ चिठ्ठी होती; सहीशिक्क्याची सनद नव्हती. आपण असेंहि वाटल्यास समजूं की निरिच्छ ब्राह्मणाला राज्य दिलें यांत देणाराचा राज्य खरे देण्याचा हेतु नव्हता; घेणाराचा तें घेण्याचाहि

हेतु नव्हता. अर्थात् हें दान हा उच्च प्रतीचा गौरव अगर भाषालंकार होता. तथापि निश्रेयसाकरिता अभ्युदय हें जें आपल्या संस्कृतीचें वैशिष्ट्य तें शिवाजीने बरोबर ओळखलें होतें. एरवी 'गोब्राह्मण-प्रतिपालक' अशीं अक्षरें शिवाजीने आपल्या ब्रीदावर कोरण्याला काय कारण होतें? भगव्या झोळींत राज्य टाकणाऱ्या शिवाजीची उच्च मानसिक संस्कृति पाहून रामदासांनी मार्मिक बुद्धीने व आनंदाने खचित मान डोलावली असली पाहिजे! अनेक राजवटी आल्या व गेल्या; पण ब्राह्मणांच्या बुद्धीची शाबास अशी की कोणत्याहि सामाजिक अगर राजकीय स्थित्यंतरांत 'निश्रेयसा-करिता अभ्युदय' हें जें आपल्या संस्कृतीचें मूळ सूत्र व वैशिष्ट्य तें त्यांनीं दृष्टीआड होऊं दिलें नाही. 'सर्व कर्मे वर्णाश्रमधर्मे चालविलीं.' 'वर्णाश्रमधर्माची पुनः स्थापन केली' असें वर्णन आणि 'गोब्राह्मणप्रतिपालन' हें ब्रीद मराठी राज्यकर्ते मानीत होते असे किती तरी उल्लेख मराठी इति-हासांत काढून दाखवितां येतील आणि तीच परंपरा पेशव्यांनी पुढे चालविली. भौतिक सुधारणा या पाऊणशें वर्षांत उदयाला आली. पण त्याचेपूर्वी हिंदुस्थानांतच नव्हे तर पाश्चात्य देशांतहि लोकांच्या कल्पनेवर व मनावर धर्माचेंच अधिराज्य होतें. मग तें तसें असावें की नसावें ही गोष्ट बरोबर अगर चूक कशीहि म्हणा. वसईच्या तहांत धार्मिक हक्कांबद्दल तसें कलम नसेल घातलें. 'धर्मद्वेष्टे यांचा नाश आपल्या पुण्याईने झाला' असें शाहूच्या पत्रांत चिमाजी अप्पाने लिहिलें; आणि 'फिरंग्यांनी हिंदुधर्मांत छळ आरंभला म्हणून राजश्री अप्पा यांनी स्वारी केली,' असें पत्रांत समशेर बहाद्दर दमाजी गायकवाड याने वर्णन केलें, यावरून तत्कालीन लोकांची भावना दिसत नाही काय?'

यानंतर एका संपादकांनीं भाषण केलें, ते म्हणाले—सगळ्या अडीचशें वर्षांत धर्मयुद्ध म्हणण्यासारखें हें एकच एक युद्ध झालें; पण तहात पहाल तर धार्मिक अटींचा पत्ता नाही. मग हें युद्ध नियम समजावें का अपवाद मानावा? धार्मिक हेतूने युद्धाला प्रेरित होण्यासारखी मराठ्यांची प्रवृत्ति दिसते की थोडी वेगळी असावी असें दिसतें? हजारों देवळे व हिंदु बाट-विले गेले पण राजसत्ता असतांहि कोणी त्यांना शुद्ध करून परत धर्मांत घेण्याचा उद्योग केला नाही! 'उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया' हा

केवळ हर्षोग्दार आहे, वस्तुवर्णन नव्हे. ‘ धर्मद्वेष्टे ’ या शब्दांतहि ‘ गोरे ’ या शब्दाप्रमाणेंच तिरस्कार स्पष्ट दिसत असला तरी युद्धाचें कारण असें कांहींच दर्शविलें जात नाही. अप्रिय माणसाला युक्तीनें शह द्यावयाचा म्हणजे व्यवहारांत जें रुचेल व पचेल असें अगदी वेगळें कारण आपण सांगतों व मनांतली भावना झांकून ठेवतों. मुत्सद्दी राजकारण करीत असलें तरी त्यांनाहि व्यवहार हा चुकत नाही. तो योग्य रीतीने म्हणजे बाहेर बरें दिसेल अशाच तऱ्हेने करावा लागतो. ‘ गोगलगाय आणि पोटांत पाय ’ असा अपवादहि मुत्सद्यांना सोसावा लागतो. पण जें मनांत आहे तें पुष्कळदा बाहेर बोलतां येत नाही. त्यांची कालची कृति ही आजच्या कृतीशीं विसंगत दिसते. आणि असाहि एखादा सूड, भवितव्यता त्यांवर घेते की ज्या हेतूबद्दल बेलभंडार घेऊन शपथप्रमाण केलें त्याच हेतूच्या विरुद्ध आचरण करण्याची पाळी येते. राघोबाला विरोध करणाऱ्या नाना फडणिसाला आपल्याच हाताने बाजीरावाला गादीवर बसविण्याची पाळी आली यापेक्षा विरोधाभासाचें आणखी दुसरे उदाहरण कोणतें पाहिजे? व्यवहार म्हणजे इतका वाईट, खडतर व कठीण आहे. म्हणून मला वाटतें, ‘ धर्मवृद्धीकरिता स्वराज्य ’ हें म्हणणें व्यवहाराला धरून नाही. त्यांत पुष्कळच अतिशयोक्ति व शब्दालंकार आहे. ‘ धार्मिक स्वातंत्र्य उरलें नाही ’ असें म्हणण्यापेक्षां ‘ धार्मिक स्वातंत्र्यदेखील उरलें नाहीं ’ याने वस्तुस्थितीची नीट कल्पना येते व हेतु-विपर्यासहि होत नाही. कोणाच्याहि उपाधींत न पडतां, देवघराच्या एकांतांत ध्यानस्त बसण्यालाहि स्वतःचीं अशीं पांच मिनिटें हक्काने लाभत नाहीत; मग तो घराबाहेर पडल्यावर परवशतेचा अपमान पदोपदीं कसा मनाला जाचत असेल? वरील वाक्यांतील ‘ देखील ’ या शब्दांत धार्मिक हानीपेक्षांहि राजकीय स्वातंत्र्याची हानीच अधिक अभिप्रेत आहे.

रस्त्यांत डोळ्यासमोर गोवध होत असतांना शिवाजीने तरवार काढली आणि गरीब गायीची हत्या करणाऱ्याला कंठस्नान घातलें असें कोणी वर्णन केलें, तर तें मी अक्षरशः खरें मानीन. आर्तत्राणाकारिता शस्त्र हें स्वतःचें भूषण मानणारा कोणीहि शूर मनुष्य असेंच वर्णन करील. पण मुलांच्या क्रमिक पुस्तकांत माधवराव पेशव्याची अशी एक गोष्ट दिली आहे की, एका गरीब ब्राह्मणाचें घर निजामाच्या दिवाणाने जबरदस्तीने घेतलें; म्हणून

त्या ब्राह्मणाने माधवराव पेशव्यांकडे दाद मागितली. आणि माधवरावाने पन्नास हजार फौज निजामाच्या राज्यांत घुसवून ब्राह्मणाला त्याचें घर परत मिळवून दिलें ! ही गोष्ट खरी मानावयाची तर माधवराव पेशव्यांना राजकारणी न मानतां हरिश्चंद्राचाच अवतार मानलें पाहिजे ! मुसलमानी राजांपैकी अगदी कर्मठ वेडापीरदेखील याहून वेगळें वर्तन करणार नाही. त्या वेळच्या मोठ्या राजकारणांत सहज होऊन जाणारें एका गरीब ब्राह्मणाचेंहि त्यानें काम केलें, ही गोष्ट त्याची व्यवहारदक्षता दर्शवते. पण वरील स्वारीचा व ब्राह्मणाच्या घराचा कोणी कार्यकारणभावाच्या दृष्टीने एकमेव संबंध लावील, तर त्याला तुम्ही काय नांव द्याल ? ''

त्यानंतर एक राजकारणी गृहस्थ म्हणाले—' हातच्या खड्याला आरसा कशाला ? जें आज तेंच दोनशें वर्षांपूर्वी, आणि तेंच दोनशें वर्षांनंतरहि ! मनुष्यस्वभाव सर्व काळीं सारखाच. गांधींचें स्वराज्य आणि चळवळ सर्व आत्मिक आहे. पण तुम्ही आम्ही जे त्यांत पडलों ते धर्माकरिता का राजकीय हक्काकरिता ? आणि हैद्राबाद सत्याग्रहाची गोष्ट घ्या. निजामाने धर्मकृत्यें करण्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलें, आणि समजा, सर्व राजकीय सुधारणा परत घेतल्या, तर तुम्हांला चालेल ? हैद्राबादेचा लढा धार्मिक की राजकीय याचें तुम्हीच आपल्या मनाशीं उत्तर द्या म्हणजे झालें ! ''

यानंतर शिकारी गृहस्थांना बोलण्याची इच्छा झाली. ते म्हणाले— ' वकिलांइतकें मुद्देशीर मला बोलतां येणार नाही; पण शिकारींत 'लक्ष्यवेधा'चा अनुभव असल्यामुळे मी सहसा आजूबाजूला जाणार नाही. जीं माणसें पराक्रमी असतात—मग तो पराक्रम राजकारणांतला असो की धर्मकारणांतला असो—त्यांना आम्ही शिपाईबाण्याचीं माणसें फार चाहतों. कारण त्यांचे गुण आम्हांला बरोबर कळतात. राजकारण ही एक शिकारच आहे. अनेक जणांनी साधावी आणि मारावी तेव्हा शिकार होते. दोघा-चौघा शिकाऱ्यांपैकी नशिबाने कोणा एकाच्याच गोळीने सावज मरतें हें खरें; पण त्याकरिता शें-पन्नास माणसांना किती तरी तयारी दोन दोन दिवस आधी करावी लागते. कोणी काठ्या घेऊन रान वेढतात, कोणी हांक घालतात, कोणी माग ठेवतात; यांत जरी एकच एक चूक झाली की शिकार फसते. मग पुनः सर्व खेळ ! मग सांगा, शिकारीचें श्रेय या पन्नास लोकांपैकी

कोणा-कोणाला द्याल ? शिकारींत सामील झालेले कांही सगळेच शूर नसतात; त्यांत कांही घोड्यावर घातलेले, कांही आयत्या वेळीं अवसान आलेले, कांही हुच्चे, कांही लुच्चे असा सरमिसळ जमाना असतो. तुमच्या राजकारणांत नाही का एक म्हण—Politics is the last resort of scoundrels ! तसेंच शिकारींतहि असतें. शिकारींत कोणी जिज्ञासेने तर कोणी केवळ गमतीकरिता सामील होतात. सावजाऐवजी चुकून एखाद्या वेळीं अशा गंमत बघणारालाच गोळी लागते; मग त्याचा 'हुतात्मा' व्हावयाला वेळ लागत नाही ! आम्ही तर एकदा अशा माणसाची एक जंगी मिरवणूक काढली होती.

पुष्कळदा असें घडतें की, सावज समोरासमोर येऊन शिकाऱ्याला त्याच्याशीं दोन हात करावे लागतात. स्वतःच्या जिवाकरिता मनांतून दोघेहि एकमेकाला भितात; पण संधि सांपडेल तर अगोदर हल्ला करण्याला टपलेले असतात. बचावाकरिता अशा चढावाचीच जरूर असते. याला Aggressive defence म्हणतात. जिवावर बेतलेल्या शिकाऱ्याला अशा चढावाचें महत्त्व फार चांगलें कळते ! म्हणूनच अफजुलखानाने शिवाजीवर हल्ला अगोदर केला की शिवाजीने खानावर केला असा हेतूचा वाद जेव्हा इतिहाससंशोधक करतात, तेव्हा आम्ही फक्त हसतों ! प्रतिस्पर्ध्यांचा हेतु काय हें त्याच्या डोळ्यांतल्या तेजावरून सामनेवाल्याला बिनचूक कळतें; फक्त तें कळत नाही इतिहाससंशोधकांना ! शिकारींत अनेक सामील होतात, ते घरीं आले म्हणजे अनेक गोष्टी सांगतात. त्यावरून कोणाचे काय हेतु हें कसें समजावयाचें ? 'The beauty of the hunt is in the chase, not in eating flesh' या म्हणींत सांगितल्याप्रमाणें, शिकारी शिकार करतो तो शिकारीच्या आनंदाकरिता करतो; मांस खावयास सांपडावें म्हणून नव्हे ! आता यातलें खरें कोणतें तें तुम्हीच इतिहाससंशोधक ठरवा !"

यावर अध्यक्ष समारोपांत म्हणाले की "हेतुमीमांसेला उपयोगी असा पुष्कळ पुरावा अनेक उदाहरणांनिशीं आजच्या सभेंत पुढे आला आहे. त्याची शहानिशा प्रत्येकाने आपल्या मनाशीं करावी. यांतली निर्णायक गोष्ट म्हणजे सभा नव्हे, स्वतःचें मन होय. आपणच आपला रोजचा व्यवहार तपासून पाहिला तर आपण जें करतों त्यापेक्षा कितीतरी कमी लिहितों.

भानगडी व खुलासे कागदाला एक टांकहि न लावतां आपण केवळ समक्ष बोलून उरकतों व जितकें बोलतों त्यापेक्षा सहेतुकपणें मुद्दामच इतकें कमी लिहितों की, ज्याला तें सर्व माहीत आहे त्यालाच फारतर त्या चिठ्ठीचा अर्थ समजावा; इतरांना कांहींहि कळूं नये; किंवा कळलें तर फारतर एक-दशांश कळावें. व्यवहारांत उमजण्याचा भाग पुष्कळच असतो. आणि म्हणूनच पुस्तकी ज्ञान वेगळें आणि व्यवहारचातुर्य वेगळें असें आपण समजतों. राजकारण आणि व्यवहारचातुर्य भिन्न नाहीत, एकच आहेत. दोहोंमध्येहि मनुष्याच्या वागण्याचें व्याकरण एकच आहे. Language is to conceal thought असें म्हणतात. याचा अर्थ, सकृद्दर्शनीं भाषेवरून जितका व्यवहार लक्षांत येतो त्यापेक्षा खरा व्यवहार कितीतरी पट अधिक किंवा कितीतरी वेगळाहि असूं शकतो.

इतिहास हा शब्द सोडलेला धडा आहे हें विसरून उपयोगी नाही. स्वतःचें तारतम्य आणि सूक्ष्म व्यवहारचातुर्य हीं अंगीं असलीं तरच या धड्यांत कोणते शब्द सोडलेले आहेत हें कळून तो धडा कांहींसा वाचतां येईल. आपण बोलतों त्यापेक्षा कमी लिहितों, लिहितों त्यापैकी किती तरी फाडून टाकतों अगर फाडून टाकण्याच्या योग्यतेचें मानतों. चालू व्यवहारांतील शब्दांत गौरव भलेपणा किती, अर्थवाद किती व प्रत्यक्ष व्यवहार किती, हें आपण चांगलें जाणतों. मग तोच मनुष्यस्वभावाचा नियम दोनशें वर्षें पाठीमागे नेऊन, शिवाजीने रामदासाला राज्य अर्पण करतांना कांहीं तशी सनद किंवा बेदावापत्र लिहून दिलें नव्हतें, असें कोणी विचारणें यांत कांहींच चूक नाही. गौरव किंवा अर्थवाद याला वस्तुस्थितीचें रूप देऊन कवीने कल्पनाचित्र रंगविणें वेगळें, आणि हेतुचिकित्सा करतांना त्या शब्दांना शब्दप्रामाण्य देणें वेगळें! दुसऱ्या एका वक्त्याने, ब्राह्मणाला त्याचें घर मिळ-वून देण्याकरिता माधवराव पेशव्याने पन्नास हजार फौज निजामावर पाठविली त्याचा उल्लेख केला. पण ब्राह्मणाला त्याचें घर परत मिळणें आणि 'त्या-करिता' पन्नास हजार फौज चालून जाणें एवढ्या दोनच गोष्टी कार्यकारण-भावासारख्या एकत्र जोडून ठेवल्या तर, माधवराव पेशवा शहाणा ठरेल की मूर्ख ठरेल? मला तर असें उघड वाटतें की, त्या स्वारीला आणखी चारपांच कारणें खात्रीने असतील. ही गोष्ट लिहिणाराच्या तीं कारणें डोक्यांत

आलीं नसतील, किंवा हीं राजकीय कारणें त्या आततायी ब्राह्मणाला कळण्यासारखीं नसतील ! सगळ्या गोष्टींना कांही हेतु व उद्देश असला तरी तात्कालिक निमित्तकारण कांही लागतें किंवा पुरतें. एका गरीब ब्राह्मणाची निजामाच्या दिवाणानें आगळीक केली एवढें निमित्त त्या वेळीं माधवराव पेशव्याला पुरलें असेल. पण त्यालाहि हेतु—ब्राह्मणाची दया अगर ब्राह्मण्यरक्षण हें नव्हे. तर ' आत्मनस्तु कामाय. ' जीवनकलहाच्या झगड्यांत बलिष्ठ जे दुर्बळांना पाठीशीं घालतात ते परोपकाराकरिता नव्हे, तर स्वतःच्या सामर्थ्याची हौस अगर अहंकार मिरविण्याकारिता. दुर्बळांचें समाधान ' स्नानसंध्येला मुबलक पाणी ' मिळालें म्हणजे होतें. सामर्थ्यवंतांच्या वप्रक्रीडेंत सहस्रावधि सैनिक आणि राज्यें यांची उलथापालथ होते !

व्यवहार किंवा राजकारण हीच मुळी संकीर्ण बाब आहे. ती करणारी व्यक्ति एकच एक असली तरी तिचे संकीर्ण हेतु असतात. मग शिकारीप्रमाणें जें राजकारण साधण्याला अनेकांचे हात लागतात, त्यांत हेतूंची किती सरमिसळ होत असेल हें सांगण्याचें कारणच नाही. वसईच्या युद्धाचें हिंदुधर्मावर हात हें एक तात्कालिक निमित्त कारण झालें, अगर युद्धाच्या अनेक हेतूंपैकी तोहि एक होता असें कोणी समर्याद बोलेल तर, तितक्यापुरतें तें मान्य करतां येईल. पण तो हेतु धार्मिकच होता, किंवा राजकीयच होता असा कोणी ' च ' चा आग्रह धरला म्हणजे आली पंचाईत ! कारणमीमांसा समजणें म्हणजेच इतिहासाचें खरें ज्ञान होय. व हें ज्ञान, चालू व्यवहार व राजकारण यांचा हात घट्ट धरून ठेवूनच लाभेल, एरवी नाही. इतिहास, व्यवहार व राजकारण हीं अगदी अभिन्न होत. काव्य करण्यापेक्षाहि जसें काव्यदृष्टीला महत्त्व अधिक त्याप्रमाणें इतिहाससंशोधनापेक्षा ऐतिहासिक दृष्टीलाच किंमत विशेष होय. "

( सह्याद्रि—सप्टेंबर १९३९ )

★ ★ ★

# संभाजीचे अखेरचे उद्गार

औरंगजेबानें संभाजीस ठार मारलें. त्या वेळीं "तुझी बेटी देत असशील तर बाटतो" असे उद्गार मल्हारराव चिटणीस यांच्या बखरींत संभाजीच्या तोंडीं असल्यानें, तसाच समज प्रचलित आहे. अलीकडे संभाजीच्या उत्सवप्रसंगींदेखील हे उद्गार असेच अनुवादले जातात. असे उद्गार शिवाजीच्या मुलाच्या तोंडीं शोभत नाहींत असे देखील कोणास वाटत नाहीं याचें नवल वाटतें ! तथापि त्या वेळचे संभाजीचे नक्की उद्गार काय होते किंवा असणें संभवनीय आहे याचें तारतम्यानें अधिक संशोधन व्हावयास पाहिजे. ऑर्मनें आपला इतिहास चिटणिसाच्या बखरीच्या सुमारें २०।२५ वर्षें अगोदर प्रसिद्ध केला व जी माहिती त्याला मिळाली ती कंपनीच्या इंग्रजी दप्तराचा पडताळा पाहून त्यानें तारतम्यानें लिहिली. त्यांत संभाजीचे शेवटचे उद्गार चिटणीस–बखरीपेक्षां अगदीं वेगळें आहेत. "पैगंबराची निंदा केल्याबद्दल संभाजीची धिंड काढून औरंगजेबानें त्याची जिव्हा छाटविली. तथापि त्यानें पुनः निरोप पाठविला कीं, धर्मांतर करीत असशील तर अजून तुला जीवदान देतो. यावर संभाजीनें लिहून कळविलें कीं, "जरी प्रत्यक्ष तुझी बेटी मला दिलीस तरी मी मुसलमान होणार नाहीं !"— ("Not if you would give me your daughter in marriage." ऑर्म, पृ. १६४) तात्पर्य, बेटी देण्याचा उल्लेख संभाजीच्या तोंडून निघाला

होता, पण तो अगदीं वेगळ्या अर्थानें ! चिटणीसांच्या म्हणण्याप्रमाणें बेटी दिली तर संभाजी मुसलमान खात्रीनें होणार होता ! ऑर्मेच्या इतिहासप्रमाणें **" बेटी दिलीस तरी मी मुसलमान होणार नाहीं ! "** असे संभाजीनें निक्षून उद्गार काढले होते ! ! या दोन वाक्यांत किती तफावत आहे हें वाचकांना सांगण्याचें कारण नाहीं.

चिटणिसानें संभाजीच्या तोंडीं घातलेल्या उद्गगारांवरून, संभाजीला ते उद्गार भूषणास्पद मानावयाचे कीं दूषणास्पद मानायचे असा विकल्प माझ्या तरी मनांत ऑर्मेचा इतिहास वाचण्यापूर्वी कित्येकदां येऊन गेला. ' बादशहाची बेटी मिळेल तर बाटतों ' या म्हणण्यांत हिंदु धर्माला किंवा संभाजीच्या मोठेपणाला तरी साजण्यासारखें काय आहे ?

संभाजीचा शेवट दारुण न होता तर, संभाजीनें केलेला पितृद्रोह व घोर अनाचार पाहून, आणि विशेषतः शिवाजीनें मृत्युसमयीं त्याचेबद्दल जें मत विचारपूर्वक प्रदर्शित केलें होतें ते पाहतां, इतिहासांत त्याचे स्थान काय ठरलें असतें हा प्रश्नच आहे. तथापि आपल्या अखेरच्या जाज्वल्य व तेजस्वी उद्गारांनीं संभाजीनें या सर्वांवर विस्मृतीचा पडदा टाकून महाराष्ट्रांत स्वतः-संबंधानें हळहळ व सहानुभूति निर्माण केली यांत संशय नाहीं. पण लोक-मताच्या प्रासंगिक अगर नैमत्तिक आविष्कारापेक्षां इतिहासाची अपेक्षा अधिक असते. मनुष्याचे सर्व ऐतिहासिक मोठेपण केवळ त्या व्यक्तिच्या मरणप्रसंगावर किंवा चार दोन प्रासंगिक उद्गारांवर अवलंबून ठेवण्यापेक्षां समग्र जीवनावरून त्याची पारख होणें यांत अधिक डोळसपणा व तारतम्य आहे असें उघडच वाटतें; व या बाबतींत खुद्द शिवाजीची साक्षच संभाजीच्या विरुद्ध जाईल ! पण तो वेगळा विषय आहे. ऑर्मेनें प्रसिद्ध केलेले संभाजीचे उद्गार प्रचलित समजुतीविरूद्ध कसे आहेत व संशोधकांकडून त्याचा विचार व्हावा इतकेंच येथें दर्शविण्याचा हेतु आहे.

( वाङ्मयशोभा–१९४३ )

* * *

# दत्तोपंत आपटे लेख-संग्रह

दत्तोपंत आपटे स्वर्गवासी झाल्याला दोन वर्षें झालीं ! त्यांच्या अस्तित्वाची उणीव प्रत्येक इतिहास-संशोधकाला पदोपदीं किती जाणवते हें शब्दांनी सांगतां येत नाही. कारण इतिहाससंशोधनांत नव्याने पडलेल्या होतकरू लेखकांना त्यांचें मार्गदर्शन वडील मनुष्याने लहान मुलाला बोटाने धरून चालवावें इतकें सुखकर होतें. त्यांची विद्वत्ता किती तरी मोठी. पण त्या विद्वत्तेचा गर्व किंवा अहंकार याचा लवलेशहि अंगीं नाही. कोणीहि लहान मुलाने त्यांच्याजवळ जावें आणि त्यांच्याशीं बोलावें. दरिद्री पण निस्पृह जीवनांत आनंद मानणारा, केवळ विद्येकरिता विद्येची उपासना करणारा, आणि देशहित व परोपकार यांत उभे आयुष्य वेंचणारा असा मनुष्य खरोखरी सांपडणें दुर्मिळ आहे. जगांत मनुष्य एक वेळ पैसा सोडतो, पण सत्ता आणि मान यांची इच्छा त्याला सुटत नाही. बिचाऱ्या दत्तोपंतांनी या गोष्टीचीहि इच्छा कधी केली नाही ! अशा मनुष्याच्या ऋणांतून मुक्त होणें ही गोष्ट फार अवघड आहे.

त्यांचें स्मारक म्हणून नुकताच त्यांचा एक संकीर्ण लेखसंग्रह प्रसिद्ध झाला आहें; तसेंच शिवचरित्र-ग्रंथमाला, त्यांनी इतर ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावना इ० नीट वाचल्यास दत्तोपंत हे नुसते एक जाडे विद्वान् व मेहनती इतिहास-संशोधक नव्हते, तर फार मोठ्या प्रतीचे ‘ तत्त्वज्ञ ’ होते याची खात्री पटते.

इतिहास-लेखनांतील खरेशास्त्री यांचा व्यवस्थितपणा तसेंच राजवाडे यांच्या प्रतिभेची चमक या दोहोंचाहि त्यांच्या अंगीं कांही अंशीं मिलाफ झाला होता. ते थोडें लिहीत, पण त्यांच्या लिहिण्याला तत्त्वज्ञानी मनुष्याच्या शब्दाची किंमत होती. असा मनुष्य आपल्या अगदी जवळ वावरत असला तरी त्याची किंमत एकदम समजत नाही, हळूहळू समजते. त्यांच्या लेखसंग्रहाचें समीक्षण करण्याचा माझा अधिकार नाही. तथापि ज्या विशेष गोष्टी मला आढळल्या, त्यांचें या लेखांत केवळ दिग्दर्शन करणार आहें.

दत्तोपंतांच्या इतिहास-संशोधनाचें एक टोंक थेट वेदांगज्योतिष व ज्योतिर्गणितांत व दुसरें टोंक पेशवाईअखेरच्या इतिहासापर्यंत असल्याने, त्यांच्या बुद्धीचा प्रांत केवढा व्यापक होता हें लक्षांत येईल. वेदांगज्योतिष म्हणजे काय हें सामान्य मनुष्याला कळतहि नाही. लो. टिळकांनी भाडारकर स्मृतिग्रंथांत वेदांगज्योतिषांतील ' हरवलेली सांख्यकारिका ' मनाने जुळवून एक लेख लिहिला. वेदांगज्योतिषाचें पुस्तक लो. टिळकांना फुरसत न सांपडल्याकारणाने त्यांच्या हयातींत प्रसिद्ध झालें नाही. पण आपलें हस्तलिखित त्यांनी दत्तोपतांना वाचण्यास दिलें होतें व या विषयावर लो. टिळकांशीं त्यांनी चर्चाहि केली होती. अलाहाबादचे पंडित सुधाकर द्विवेदीं यांनी, टिळक मंडालेच्या तुरुगांत जाण्याच्या आधी, वेदांगज्योतिषावर मॉडर्न रिव्ह्यूंत लेख लिहून कांही वाद सुरू केला होता. त्यांच्या मताने वेदांगज्योतिषांतील तीनचार श्लोकांचा आज अजीबात अर्थ कळत नाही व या कूट श्लोकांची उपपत्ति लावतां येत नाही. पुढे लो. टिळक तुरुंगांत गेल्यामुळे हा वाद तितकाच राहिला. पण या तीनचार श्लोकांपैकी एकाचा अर्थ दत्तोपंत यांनी लावून दाखविला, अशी आख्यायिका आहे. वेदांगज्योतिष या विषयांत मला कांहींच कळत नाही, तथापि श्री. स. वि. बापट यांच्याबरोबर लो. टिळकांच्या आठवणी जमा करीत असतांना ही आठवण मी अशीच वीस वर्षांपूर्वी ऐकली होती, म्हणून ती येथे मुद्दाम दिली आहे. टिळक स्वतः संशोधक असल्यामुळे इतिहाससंशोधकांबद्दल त्यांना अर्थातच प्रेम वाटे. एकदा दत्तोपंतांनी त्यांना विचारलें की, इतिहाससंशोधन हा नुसता काथ्याकूट आहे, समाजाला त्याचा तादृश उपयोग कोणता ? याला उत्तर काय ? ' यावर टिळकांनी त्यांना सांगितलें की, " अशा आक्षेपकांना तुम्ही

उत्तर देण्याच्या भानगडींत पडूं नका. संशोधन हा विषय असा आहे की, ज्याची मति त्यांत चालत असेल, त्याने त्यांत यथाशक्ति आपली हौस पुरवून घेऊन संशोधनाचा आनंद सेविल्याशिवाय राहूं नये. सर्वच गोष्टी नफातोट्या-कडे पाहून करावयाच्या नसतात. जातगोत, राष्ट्र वगैरे सर्व विचार बाजूस ठेवून, ज्या विषयाकडे बुद्धि वाहील तिला तिकडे वाहूं द्यावें. या बाबतींत संशोधकाने स्वतःच्या मनावर सक्ती करूं नये. अमुकच विषयावर तूं संशोधन कर असा कोणी दुसऱ्यास आग्रह करूं नये! संशोधनांत सत्याचा एक किरण जरी लाभला, तरी त्याने जो आनंद होतो त्यापुढे जगांतील साऱ्या गोष्टी तुच्छ वाटतात. चित्ताची एकाग्रता होण्याला पुष्कळ गोष्टी अनुकूल लागतात. पण संशोधनाची सवयहि त्यांतल्या त्यांत महत्त्वाची असल्यामुळे ती वाढ-विण्याचा तुम्ही प्रयत्न करा. पाणिनी अष्टाध्यायीचीं सूत्रें रचींत एका गुहेंत बसला असतां त्या मैदानाच्या आसपास दोन सैन्यांची गांठ पडून शेंकडों लोक मृत्युमुखीं पडले. सायंकाळीं पाणिनीची स्वारी बाहेर आली तेव्हा शेंकडो मुडदे पडलेले पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. कारण तेथे मोठें युद्ध झालें या गोष्टीची त्याला वार्ता देखील नव्हती!"

दत्तोपंतांच्या लेखसंग्रहांत अनेक विषयांचे संकीर्ण लेख समाविष्ट असल्या-मुळें हा संग्रह मनोरंजक झाला आहे. तसेंच दत्तोपंतांच्या बुद्धीचा व्यापक-पणाहि त्यावरून सहज दिसणारा आहे. भारतीय ज्योतिर्गणिताचा अभ्यास, अंकगणित व भास्कराचार्य, भास्कराचार्यांची कोष्टकें, शिवकालीन पंचांगशुद्धि व पंचांगसाधन, पाश्चात्यांच्या पंचांगाची सुधारणा, पेशवाईतील काल-गणनेचीं टिपणें इत्यादि विषय कांहीसे रुक्ष व क्लिष्ट खरे; पण सामान्य मनुष्याला त्यांत गोडी उत्पन्न होऊन त्याचा त्यांत प्रवेश व्हावा ही जी दत्तोपंताच्या अंगीं विशेष कला होती ती ते लेख वाचून चटकन् लक्षांत येते. खरी विद्वत्ता तीच की कोणत्याहि विषयांत सामान्य मनुष्याला ती सुगमता प्राप्त करून देते! स्वतःला तो विषय उत्तम समजला असल्याशिवाय सामान्य मनुष्यापुढे तो मनोरंजक करून दाखवितां येत नाही! असे उत्तम शिक्षक मी दोनच पाहिले. एक प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक व दुसरे दत्तोपंत आपटे! कै. केरूनाना छत्रे तसेच शंकर बाळकृष्ण दीक्षित यांची विद्वत्ता अशांपैकी होती असें सांगतात. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचें 'ज्योति-

विलास ', तसेंच भारतीय ' ज्योतिः शास्त्राचा इतिहास ' हीं पुस्तकें जो वाचील त्याला खरी विद्वत्ता हा काय पदार्थ आहे हें कळून येईल. एका लेखांत त्यांच्यासंबंधीं दत्तोपंतांनी लिहिलें आहे की, " भारतीय ज्योतिः-शास्त्राचा इतिहास हें पुस्तक लिहिण्याकरिता दीक्षितांनीं पांचशेपेक्षा जास्त संस्कृत ग्रंथांचें बारकाईने वाचन केलें. त्यांनी शेंकडों दुर्बोध स्थळें सुबोध केली. " ते आपलीं पुस्तकें इंग्रजी भाषेंत लिहिते तर एकदम त्यांना जग-प्रसिद्धि लाभती. पण केंवळ मराठी भाषेच्या अभिमानाने त्यांनी आपलें उत्तम सिद्धांतिक लेखन मराठी भाषेंत केलें. आणि मान व कीर्ति यांचाहि हव्यास न धरितां निष्कांचन जीवित पत्करलें. या ध्येयवादित्वाचा खोल परिणाम दत्तोपंतांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाही.

दत्तोपंत मनाने देशभक्त नसते तर जुन्या इतिहासाचें संशोधन करण्याचें किचकट व जिकीरीचें काम त्यांनी केलें नसतें. संशोधकाचें कामहि इतकें कंटाळवाणें असतें की, जेव्हा डोंगरभर कापूस पिंजावा तेव्हा कदाचित् बोटभर सूत त्यांतून निघतें ! इतिहाससंशोधकांच्या श्रमावर दुसऱ्यांनें इतिहास लिहिणें हें त्याहून पुष्कळ सोपें म्हटलें पाहिजे. कांही लोकांनी केवळ इतिहास-संशोधन करावें, व कांहींनी इतिहासाच्या संकलनाचें काम करावें, असा श्रम-विभाग प्रवृत्तिभेदानुसार इष्ट असेल; पण हीं दोन्ही कामें एकमेकांना थोडीबहुत माहिती असलीं पाहिजेत; त्याशिवाय इतिहास-लेखन व संशोधन हीं दोन्ही धड होणार नाहींत. दत्तोपंतांनी जेधे-शकावली व शिवभारत यांवरून शिवाजीची खरी जन्मतिथि सांपडतांच सरदेसाई, जदुनाथ सरकार, वाकसकर यांच्या-विरुद्ध इतका उत्तम पाठपुरावा केला की, इतिहाससंशोधनाचें शास्त्र म्हणजे काय, आणि त्याचा उपयोग कसा करतात याचें उत्तम प्रात्यक्षिक त्यांनी दाखविलें असें म्हटलें पाहिजे. आणि तें देखील प्रतिपक्षाबद्दल वावगा एक शब्दहि न लिहितां ! जदुनाथ सरकार यांना त्यांनी जाहीर आव्हान दिलें होतें की, भारत इतिहास मंडळांतच नव्हे तर हिंदुस्थानच्या कोणत्याहि शहरीं चार विद्वानांसमक्ष पुरावा मांडून आपण त्यांची खात्री करण्यास तयार आहों. पण या गोष्टीला जदुनाथ सरकार किंवा सरदेसाई तयार झाले नाहीत तरी लोकांची खात्री पटल्याशिवाय राहिली नाही. " शक्ति असेल तर तुम्ही इतिहास लिहून दाखवा उगाच बोलण्यांत काय अर्थ आहे ? " असें विधान

रियासतीच्या एका प्रस्तावनेंत भारतइतिहास-मंडळांतील संशोधकांना उद्देशून सरदेसाई यांनी केलें. त्यालाच एका अर्थी उत्तर देण्याकरिता शिवाजी-निबंध ग्रंथमालेचे नऊदहा खंड संपादित करून दत्तोपंत आपटे यांनी सक्रिय उत्तर दिलें. वासुदेवशास्त्री खरे ज्याप्रमाणे शंभर ऐतिहासिक पत्रें वाचून त्यांतलीं दहा निवडीत आणि त्या दहांमधून इतिहासाचें एक पान लिहीत, या हिशेबानें जवळ जवळ पांच हजार पृष्ठें या ग्रंथमालेंत प्रकाशित करून, त्या साधनांतून त्यांनी सुमारें पांचशें पानांचें शिवचरित्र निर्माण केलें. यांत स्वतः दत्तोपंतांनीं सुमारें दीडशें पृष्ठें लिहिलीं व मुख्य संपादक या दृष्टीने इतरांना नमुनेदार मार्गदर्शन केलें.

मराठेशाही कशाने बुडाली ? राष्ट्र उदयाला येतें तें कशाने ? विलयाला जातें तें कशाने ? शिवाजीने स्वराज्य उभारलें त्यांत त्याचा स्वतःचा भाग किती ? इतरांचा किती ? इंग्रजांचे खरे गुण किती आणि परिस्थितीचें पाठबळ त्याला किती ? हे प्रश्न शरिरांत वास करणाऱ्या आत्म्याप्रमाणे दत्तोपंतांच्या दृष्टीपुढे नित्य जाग्रत होते. या विषयांची त्यांची अखंड चाळणा सुरू होती. यामुळेच दत्तोपंतांच्या शब्दाला तत्त्वज्ञान्याच्या विधानाची किंमत होती. ते फार जपून विधान करीत. त्यांत अव्याप्ति नसे पण अतिव्याप्ति न करण्याबद्दलहि ते फार दक्षता बाळगीत. केलेलें विधान परत घेण्याचा किंवा त्यांत दुरुस्ती करण्याचा प्रसंग सरदेसाई यांच्याप्रमाणे आपटे यांजवर एकदाहि आला नाही हेंच त्याचें गमक होय. पानिपतचा फेरविचार, राघोबा व माधवराव, शहाजीच्या जन्मापूर्वीची परिस्थिति, बाजीरावाच्या ध्येयाची मीमांसा, वगैरे इतिहासविषयक लेखांत इतकी कसोशीची विवेचक बुद्धि वापरली आहे की राजवाडे यांच्या प्रस्तावना खंडाप्रमाणे दत्तोपंत आपटे यांचा हा लेखसंग्रह अत्यंत मौल्यवान व वाचनीय वाटेल यांत शंका नाही. इतिहास-चर्चेंत ऐतिहासिक दृष्टीला जें महत्त्व आहे, तितकें कशालाच देतां येणार नाही. ही दृष्टि ज्याच्या व्यासंगामुळे आपणांस लाभते त्यांचेबद्दल कृतज्ञताबुद्धि वाटणें स्वाभाविक नाही काय ?

( सह्याद्रि—जानेवारी १९४६ )

* * *

# शेजवलकरांचे लेख

शेजवलकरांच्या लेखांचा दुसरा भाग हातीं नुकताच आला. त्या पुस्तकानें माझ्या मनाला कोणत्याहि रीतीनें आनंद वाटला नाहीं, याचें कारण, शेजवलकरांच्या लिखाणांत प्रसाद किंवा विनोद औषधालाहि सांपडत नाहीं. ' जोडे आणि विनोद आंत आणूं नयेत ' अशी, त्यांनीं आपल्या खोलीवर पाटी लावली आहे किंवा काय न कळे ! त्यांनीं आपल्या विकृत टीकेनें अनेक थोर लोकांची विटंबना केली आहे, हें पाहणाराला आनंद कसा वाटेल ? पण माझ्या मनाला रागहि आला नाहीं, कारण अशा माणसाच्या पुस्तकावर टीका करतांना मनःक्षोभ उत्पन्न होईल, राग येईल हें माहित असल्यामुळें, तो राग न येऊं देण्याचा मीहि मनाशीं संकल्पच केला होता.

या पुस्तकांत शेजवलकरांनीं " आपलें मन बालकाप्रमाणें स्वच्छ आहे, कोणत्याहि व्यक्तीवर किंवा संस्थेवर आपला दांत नाहीं " असें म्हटलें आहे : ( पृ. ४३ ) पण त्यांच्या इतकी द्वाड बुद्धि आणि द्वाड लेखणी फार थोड्यांची असेल. शेजवलकरांची बुद्धि कुशाग्र आहे, पण कांटेरी तारेप्रमाणें तिला ठिक-ठिकाणी इतके कांटे आहेत कीं, चुकून जरी त्याला एखाद्याचा हात लागला तरी तो रक्तबंबाळ व्हावा ! पण अशाहि मनुष्याला मनसोक्त लिहूं द्यावें, नाहीं म्हणूं नये. याचें एक कारण असे कीं, वेगवेगळ्या प्रसंगीं हींच माणसें परस्परविरोधी विधानें करतात. कारण त्या शिवाय प्रसंग साजरा

होतो कसा ? अशा व्यक्तींच्या लिखाणाचा, अनेक मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आणि वर्षानुवर्षांच्या कालखंडावर पसरलेल्या लेखांचा एकत्र संग्रह म्हणजे एकप्रकारें अपशब्दभांडारच ! पण त्यामुळेंच त्या व्यक्तीचें 'समग्र-दर्शन' आपणांस एकाच ठिकाणीं घेतां येणें शक्य होते. हाहि फायदा लहान नाहीं !

शेजवलकर हे फार विद्वान्-अतिशय विद्वान्, कोणाला कल्पना नसेल इतके विद्वान् गृहस्थ आहेत ! पण त्यांत गंमत हीं कीं, अखिल जगानें दखल घ्यावी असा आइनस्टाइनच्या योग्यतेचा विद्वान् येथें डोळ्यांसमोर असतांना, महाराष्ट्रांत कोणीहि त्याची दखल सुद्धां घेत नाहीं; उपक्षेमुळें त्यांचें जीवित तर व्यर्थ जातच आहे, पण सारें जग विनाशाच्या खड्ड्यांत जात आहे, अशी शेजवलकरांची अगदीं जळजळीत भावना आहे ! या लेखसंग्रहांत कित्येक वाक्यें अशीं आलीं आहेत कीं, शेजवलकर स्वतःचा अहंकार आणि राग यामुळें बेहोष झाले आहेत असें दिसेल.

"शय्येवरून" या लेखांत शेजवलकर स्वतःबद्दल लिहितातः "मी काळा आदमी झालों हें मला बाधलें. हिंदुस्थानांत जन्मलों हें मला बाधलें. ब्राह्मण जन्मलों तेंहि बाधलें. फार काय, कऱ्हाडा जन्मलों तेंहि बाधल्याशिवाय राहिलें नाहीं !" (पृ. ३३) असलें रडगाणें कोणीहि आजपर्यंत गायलें नाहीं ! शेजवलकर हिंदुस्थानांत न जन्मते तर काय मॅक्समुल्लर झाले असते ? पण जगानें त्यांची उपेक्षा केली असें त्यांना वाटतें खरें ! याकरिता समाजाला जळजळीत शाप देतांना ते म्हणतात- "या अधोगामी समाजाचा 'बास्तिलगड' खणून, काढून त्याची माती क्रांति-सागरांत वाहून जाईपर्यंत त्याच्या प्रगतीची आशा नाहीं हेंच खरें !"

साऱ्या विद्वानांबद्दल एक प्रकारची अढी शेजवलकर यांनीं बाळगली आहे. "महाराष्ट्र साहित्यिकांचा जो आम्हांस परिचय आहे, त्यावरून पुरें माप प्रत्येकाच्या पदरांत घातल्याशिवाय ते कोणतीहि गोष्ट कबूल करतील, वावदूकपणा करून पुन्हां फांटे फोडणार नाहींत, असा आम्हांला विश्वास नाहीं. हल्लीं महाराष्ट्रांत विद्वान् हा शब्द इतका स्वस्त झाला आहे कीं, आतां अविद्वान् म्हणण्यास कोण उरला असें म्हणण्याची पाळी आली आहे !" (पृ. १२०) सर्वांबद्दल माणसाची अशी भावना होणें ही मोठी आपत्तीच म्हणावयाची ! मनुष्य विद्वान् झाला म्हणून सगळ्या जगाला लाथ मारण्याच

अधिकार आला, असें त्याने काय म्हणून मानावें ? निर्ममत्व, विनय, अहिंसा हीं त्याच्याजवळ अगदींच असू नयेत काय ? लोकमान्य टिळक असें म्हणत असत कीं, " जगांत एकापेक्षां एकेक सरस असे इतके विद्वान् आहेत कीं, कोणीहि आपल्या शहाणपणाची घमेंड मारण्याचें कारण नाहीं ! " टिळकांचें हें वाक्य शेजवलकरांच्या गांवींहि नसेल तर तें त्यांनीं आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावें !

**टीकेला उत्तर नाहीं !**

आणि शेजवलकरांजवळ विद्त्ता तरी कसलीं आहे ? कोणत्या विषयावर त्यांनीं किती ग्रंथ लिहिले आहेत ? स्वतंत्र संशोधन असें त्यांनीं कोणतें केलें आहे ? कशाकरितां त्यांना तत्त्वज्ञानी म्हणावयाचें, असे विचारतां येणार नाहीं काय ? इतिहासाशिवाय त्यांनीं काय वाचलें आहे ? आणि त्यांतहि विध्वंसक टीका आणि वावदूकपणा यांशिवाय त्यांनीं काय लिहिलें आहे ? असें त्यांना कोणी खडसून विचारलें तर शेजवलकर काय उत्तर देतील ? शेजवलकर यांच्यावर सह्याद्रि मासिकांत मर्मभेदक टीका करणारा एक लेखक वीस वर्षांपूर्वी त्यांना भेटला होता ! ( ही टीका 'शय्येवरून' याच लेखाकरितां होती ) त्या टीकेला श्री. शेजवलकर यांनीं एका अक्षरानेंहि उत्तर दिलें नाहीं ! श्री. न. चिं. केळकर हें सह्याद्रीचे त्या वेळीं संपादक असल्यामुळें शेजवलकर आपणांवरील टीकेला उत्तर देते तर न्यायबुद्धीनें श्री. केळकर यांनीं तें खात्रीनें छापलें असते ! पण नवल असें कीं, ज्यावर इतकी टीका झाली, ती पहिल्या खंडाची प्रस्तावना या दुसऱ्या भागांत त्यांनीं पुन्हां जशीच्या तशी छापली आहे ! सदभिरुचीला सोडून असलेली ही प्रस्तावना प्रकाशकांनीं संपूर्ण गाळावयासच हवी होती. एखाद्या गोष्टीचा पुनरुच्चार करणें म्हणजे तो गुन्हा पुन्हां करणेंच नव्हे काय ?

**सरदेसाई यांना अन्याय**

औचित्य आणि तारतम्य यांचें शेजवलकर यांना इतकें वावडें आहे कीं, एकाद्यानें त्यांना आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली तर ते अशी लिहितील कीं, लेखकाचा सर्व ग्रंथच्या ग्रंथ संपूर्ण पुसला जाऊन त्याची मूर्खांत गणना व्हावी ! या पुस्तकांतील पहिलाच लेख सरदेसाई यांच्या 'नानासाहेब पेशवे' या पुस्तकाला शेजवलकर यांनीं लिहिलेली

प्रस्तावना आहे ती यासाठीं पाहावी ! यांत सरदेसायांच्या ग्रंथांतलें अमुक ग्राह्य, अमुक ठिकाणीं आपला मतभेद आहे असें कोठें नाहींच ! केवळ नांवादाखल पुस्तकाच्या पहिल्या चार ओळींत आणि पुस्तकाच्या शेवटीं एकदां सरदेसायांचा उल्लेख ! याखेरीज सर्व प्रस्तावनेंत सरदेसायांच्या पुस्तकाचें नांव नाहीं ! दुसऱ्याच्या मतभेदाला वाव द्यावा, अशा सौजन्यानें शेजवलकर यांना सरदेसाई यांनीं जी संधि दिली किंवा प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली, त्याबद्दल सरदेसाई यांना खरोखर पश्चाताप करण्याची पाळी आली असेल ! त्या पुस्तकाचे प्रकाशक भसे यांनीं सदर प्रस्तावनेचा उल्लेख 'कठोर आणि हृदयविदारक' या विशेषणांनीं केला आहे ! सरदेसाई यांनीं कांहीं ठिकाणीं पेशव्यांच्या धोरणांबद्दल किंवा नाना फडणवीस यांवर टीका केली असली तरी मराठ्यांच्या इतिहासाबद्दल आणि राजवाडे, खरे, साने, न्या. रानडे वगैरे सर्वांच्या संशोधनकार्याबद्दल त्यांना आदर होता. कारण त्या आधारावरच सरदेसायांना आपली इतिहासाची इमारत उभारतां आली ! मराठेशाहीचा विस्तार सर्व हिंदुस्थानभर पसरवून शिवाजीचेंच उद्दिष्ट पेशव्यांनीं सफल केलें, शिवाजीचाच मार्ग त्यांनीं पुढें चालविला याबद्दल त्यांना शंका नव्हती ! पण शिवाजीचा मार्ग संपूर्णपणें पेशव्यांनीं गुंडाळून ठेवल्यामुळें पेशवाईचा नाश झाला, असलें नवें वावदूक ढोंगी मत शेजवलकर यांनीं हल्लीं पुढें आणलें आहे; आणि त्याकरितां पूर्वीच्या सर्व संशोधकांना त्यांनीं मूर्खांत काढलें आहे ! !

**म्हणे, सारा इतिहास खोटा !**

शेजवलकर लिहितातः—"चिपळूणकर, राजवाडे, रानडे प्रभृतींनीं महाराष्ट्रेतिहासाचें जें काल्पनिक रूप सिद्ध केलें त्याला इतिहासाचा आधार नाही" (पृ. ८१). "आजवर मराठींत लिहिलेल्या इतिहासापैकी **तीन चतुर्थांश भाग** एकांगी, अतिशयोक्तिपूर्ण, विपर्यस्त, खोटा आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही." (पृ. ७७). "बाळाजी विश्वनाथाने आणलेल्या सनदा स्वराज्याच्या नसून दास्याच्या होत्या हें अजून उमगत नाही." वगैरे वगैरे. तात्पर्य, गेलीं ऐंशी वर्षें जें इतिहासाचें कार्य झालें तें जर सर्व फुकट, तर शेजवलकरांच्या खऱ्या इतिहासाचा अद्यापि कां प्रकाश पडत नाही ? त्यांनी असें कोणते संशोधन केलें आहे, की ज्याच्या आधारावर पूर्वीचें सर्व

संशोधन ते खोटें ठरवितात ? श्रीयुत शेजवलकर यांची इतिहासविषयक मतें ( नव्हे चुकलों : तत्त्वज्ञान ! ) संपूर्णपणें तपशीलवार खोडून काढतां येणें शक्य आहे. यापूर्वी कै. दत्तोपंत आपटे, श्री. न. र. फाटक वगैरेंनी त्यांना उत्तरहि दिलें आहे. बोलूनचालून हे इतिहासांतले वाद. त्यांत निर्णायक काय, हें कोण व कसें ठरविणार ? दिल्लीचें राजकारण हें हिंदुस्थानच्या राजकारणांतील कायमचें प्यादें होतें; दक्षिणेंतील निजामाला आधीं बुडवायला हवा होता, असें शेजवलकर यांचें मत. आणि हें केलें नाही म्हणून नानासाहेब पेशव्यांपासून नाना-फडणिसांपर्यंत शेजवलकर हे सर्वांना मूर्ख मुत्सद्दी ठरविणार ! स्वतःच्या खोलीबाहेर पडण्याचाहि ज्याच्या अंगांत पराक्रम नाही, त्यानें पानिपतच्या लढाईबद्दल पेशव्यांना नांवें ठेवावींत, किंवा ज्याला स्वतःच्या हातचें वर्तमानपत्र जामिनकोंपासून वाचवितां आलें नाही, त्यानें पेशवाईचें रक्षण न करतां आल्याबद्दल नाना फडणिसास दोष द्यावा हें सारख्याच शहाणपणाचें नाही काय !

### अव्वल इंग्रजींतील विद्वान्

इतिहासावर जे पांच लेख या पुस्तकांत आले आहेत त्यांचें केवळ वर दिग्दर्शन केलें. त्यावर अधिक विस्तारानें या लेखांत लिहितां येणेंहि शक्य नाही. पेशवाई बुडाल्यावर अव्वल इंग्रजीचा मनु आला. त्यांत बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादाभाई नौरोजी, लोकहितवादी ही पहिली पिढी; दुसऱ्या पिढीचे भाऊ दाजी, मंडलिक, भांडारकर, तेलंग, न्यायमूर्ति रानडे वगैरे; आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, टिळक वगैरे तिसऱ्या पिढीचे. इंग्रजी शिक्षण, इतिहास, राजकरण, वृत्तपत्रें वगैरे सर्वांचा उगम पहिल्या तीन पिढ्यांतील विद्वानांपासून झाला व हें त्यांचें ऋण कोणीहि आनंदानें कबूल करील. या पुस्तकांत बाळशास्त्री जांभेकर, न्या. रानडे, लोकहितवादी, लो. टिळक वगैरेंबद्दल श्री. शेजवलकर यांनीं जे लेख लिहिले आहेत ते सर्वसामान्य माहितीच्या दृष्टीनें चांगले आहेत ह्याबद्दल वाद नाही. वर उल्लेख केलेली पहिल्या तीन पिढ्यांतील माणसें खरोखरच गुणांनीं इतकी श्रेष्ठ होतीं आणि ज्या काळांत तीं वावरत होतीं तो काळ इतका अधोगतीचा होता की, त्यांची खरी किंमत त्या काळीं लोकांना कळली नाही ? आज शंभर वर्षांनीं त्यांची खरी किंमत आणि ऐतिहासिक योग्यता आपणांस

कळतें. पण असें नेहमींच घडतें. समोर असलेल्या मनुष्याची ऐतिहासिक योग्यता लक्षांत न आल्याबद्दल सामान्य मनुष्याला दोष देतां येत नाही. कांही काळ त्यांचें नांव मागें पडल्यासारखें वाटलें तरी कालांतराने ऐतिहासिक संशोधनांत त्यांचें नांव उजळ रीतीनें वर येतें. हाहि सत्याचाच एकप्रकारें विजय नव्हे काय? म्हणून या लोकांची सहेतुक उपेक्षा झाली किंवा त्यांचें नांव कोणी मुद्दाम दडपून टाकलें असा कोणी विषारी प्रचार करण्याची जरूरी नाही. लोकशिक्षणकार जांभेकर यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांचेबद्दल, आणि शेजवलकरांनीं लोकहितवादीबद्दल तसा प्रचार केला आहे. महाराष्ट्रांतलें पहिलें वर्तमानपत्र, पहिली इंग्रजी शाळा यांची सुरुवात मुंबईस झाली, त्यांत बाळशास्त्री जांभेकर यांचा पुढाकार होता ही गोष्ट ऐतिहासिक रीतीनेंच शाबीत होते. पाश्चात्य सुधारणेच्या सुरुवातीचा पहिला मान मुंबईकडे जातो, पुण्याकडे नव्हे, असें डॉ. जयकर यांनीं आपल्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे, तें कोणीहि मान्य करण्यासारखें आहे. पण त्याचीहि उपपत्ति अशी सांगतां येते की, शिवाजीपासून तो तहत् पेशवाईअखेरपर्यंत मुंबई इंग्रजी अंमलाखालीं व इंग्रजी संस्कृतीखालींच वाढली होती. मग पाश्चात्य सुधारणेची प्रथम सुरुवात मुंबईतच कां न व्हावी?

### विष्णुशास्त्री व लोकहितवादी

पुण्यांतल्या पहिल्या पिढीचा मान लोकहितवादी यांजकडे जातो. 'द्रष्टे' हें विशेषण त्यांना सार्थ रीतीनें लागतें. इंग्लंडप्रमाणें याहि देशास पार्लमेंट हवें, ज्या वेळीं आपण इंग्रजाइतकें शहाणे होऊं त्या वेळीं इंग्रज आपोआप या देशांतून निघून जातील, हे शंभर वर्षांपूर्वीं लिहिलेले त्यांचे शब्द पाहून कोणीहि त्यांचें शहाणपण मान्य करील. "विद्येचा हव्यास, निरलसपणा आणि उद्योग ही पाहतां त्यांचेवर विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी केलेली टीका सर्वच्या सर्व सोडून दिली तरी चालण्यासारखें आहे" असें टिळकचरित्रांत श्री. केळकर यांनीं म्हटलें आहे. पण लोकहितवादीवर विष्णुशास्त्री यांनीं टीका केल्यामुळें त्यांचे नांव बुडालें, अशी जी शेजवलकर यांनीं हाकाटी केली आहे ती खोटी आहे. "विष्णुशास्त्री यांच्या टीकेमुळें लोकहितवादी यांचे मत मागें पडलें ही गोष्ट खरी नाही! त्याला इतर ऐतिहासिक कारणें आहेत" असें डॉ. इनामदार यांनीं लोकहितवादीच्या शतपत्रांचे जें नवें

पुस्तक अलीकडे प्रसिद्ध झालें आहे, त्याच्या प्रस्तावनेंत साधार विवेचन केले आहे.

**विशेषणांचा हास्यास्पद वाद**

पण वाङ्मयांत नेहमीं वाद होतो तो एकाद्या व्यक्तीची ऐतिहासिक योग्यता ठरवितांना; व त्यांतहि अनेक मोठ्या व्यक्तींपैकी आपणांस हव्या असलेल्या व्यक्तीचें विशिष्ट स्थान एखाद्या 'विशेषणानें' दर्शवितांना. अशा प्रसंगीं अभिनिवेशामुळें अनेकांचे हातून इतकें हास्यास्पद वर्तन घडतें कीं, त्याचें नवल वाटतें! या बाबतींत शेजवलकर यांचे प्रस्तुत पुस्तक आणि त्यांचेच 'दोस्त' लोकशिक्षणकार जांभेकर यांनीं लिहिलेलें बाळशास्त्री जांभेकर यांचें चरित्र, यांचें उदाहरण ठळक रीतीनें दाखवून विचारतां येईल कीं, "आधुनिक महाराष्ट्राचा जनक" ही एक पदवी जांभेकर यांनाच द्यावयाची, तर न्या. रानडे यांना कोणत्या पदवीनें संबोधावयाचें? आणि लोकहितवादी किंवा चिपळूणकर यांचेकरितां कोणती पदवी निर्माण करावयाची? बाळशास्त्री जांभेकर यांच्या हाताखालीं दादाभाई नवरोजी शाळेंत शिकत होते–असतील. आणि जांभेकरांबद्दल दादाभाईंना आदरहि असेल. म्हणून भारतीय इतिहासांतील दादाभाई नौरोजी यांचें स्थान काढून कोणी बाळशास्त्री जांभेकर यांना दिलें तर तें उघडच हास्यास्पद होणार नाहीं काय? पण हा सर्वच प्रकार केवळ विशेषणांच्या वादाचा असून इतका बालीशपणाचा आहे कीं, शहाण्या माणसानें एक क्षणभर देखील त्यांत आपलें मन गुंतवून तें विकारदूषित करूं नये. श्रीयुत न. चिं. केळकर यांनीं दोन हजार पृष्ठांचें टिळकचरित्र लिहून त्यांत कोठेंहि टिळकांना विशेषण वापरलें नाहीं ही गोष्ट येथें मुद्दाम सांगतों. श्री. केळकर यांच्याबद्दल हेटाळणी-दर्शक उद्गार शेजवलकरांच्या पुस्तकांत दोन चार ठिकाणीं आले आहेत, त्याकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करून हा लेख लिहिला आहे. तथापि सदभिरुचीचा एवढा जरी गुण वरील व्यक्तींचीं चरित्रें लिहितांना श्री. शेजवलकर यांनीं श्री. केळकर यांजपासून घेतला असता तरी त्यांची फजिती टळली असती!

**उत्पाती शेंडेनक्षत्राचा प्रताप**

टीका करण्याला योग्य अशी आणखीं पांचपन्नास उदाहरणें या पुस्तकांत काढून दाखवितां येतील, पण तीं सर्व सोडून देतों. हें समग्र पुस्तक मीं

खरोखर कष्टानें वाचलें. तें वाचतांना उद्वेगाचा इतका कढ येई कीं, दहा पांच पानें वाचल्यावर पुस्तक खालीं ठेवावें लागे. अशा पुस्तकांची उपेक्षा केली तर समाजाची त्याला मान्यता आहे, असा विपरीत अर्थ होत असल्यामुळें, नाइलाजानें लेखणीला श्रम द्यावे लागतात. ज्या पुस्तकांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांना देशभक्त न म्हणतां, त्यांचा उल्लेख 'पोटभरू लेखन कामाठी' असा करण्यांत येतो (पृ. ३६), न्या. रानडे, टिळक, आगरकर, चिपळुणकर वगैरे सर्वांची 'सदाशिव पेठी' या विशेषणाने संभावना होते (पृ. ४४), सावरकर, अणे, मुंजे, देशबंधु दास हे देखील ज्याच्या गालिप्रदानांतून सुटत नाहींत (पृ. ३८) त्या पुस्तकाला नांव काय द्यावें किंवा कोणत्या शब्दांनीं त्याचा निषेध करावा हें कळत नाहीं. ज्याच्या लेखणींत इतकें जहर आहे कीं, ठिकठिकाणीं अंगार उधळल्याचा प्रत्यय यावा, त्याच्या हांतून वाङ्मयसेवा किंवा इतिहास कोठून निर्माण होणार ? तत्त्वज्ञानी लोक जगावर संकटें आणतात, अशी म्हण आहे. शेजवलकरांसारख्या तत्त्वज्ञाला शेंडेंनक्षत्राची किंवा धूमकेतूची उपमा साजेल ! आकाशांत शेंडेंनक्षत्र उगवलें म्हणजे त्याच्या विस्तीर्ण धूमसदृश पुच्छामुळें इतर नक्षत्र-तारकांपेक्षां तें वेगळें दिसतें. त्यामुळें त्याचें कौतुकहि होते. पण त्यामुळेंच सृष्टीवर उत्पात, विध्वंस आणि रक्तपात यांची आपत्ति येणार अशी जाणती माणसें खूणगांठ घालून ठेवतात ! शेजवलकरांच्या पुस्तकाकडे कोणीहि याहून वेगळ्या दृष्टीनें पाहण्याचा संभव नाहीं.

(साधना–३–३–१९५९)

* * *

# मुसोलिनीचें आत्मचरित्र

**मो**टेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानांतून जातो, असें जें गडकऱ्यांनीं लिहिलें आहे त्याची आठवण मुसोलिनीच्या चरित्रावरून होते. आज मुसोलिनी सम्राटासारखा सत्ताधीश असला तरी त्याचें हें सर्व वैभव स्वकष्टार्जित आहे. तो शिपाई गडी आहे. वास्तववाद तो चांगला जाणतो. रणांगणांत मृत्यु या क्षणीं येणार असे दररोज वाटत असतां त्यासमोर निर्भयपणानें वावरणें ही वास्तववादाची परिसीमा होय. "माझें खरें चरित्र जर तुम्हांला समजून घ्यावयाचें असेल तर तें माझ्या आयुष्याच्या पंधरा वर्षांत सांपडेल" असें त्यानें स्वतःच म्हटलें आहे. या दृष्टीनें त्याच्या आत्मचरित्रांतील पुढील हकीगत मनोरजक वाटेल :

माझी माझ्या आईवर फार प्रीति होती. तिचे वर्तन अत्यंत शांत तितकेंच धीर गंभीर होतें. तिचें नांव रोसा. मी लहान होतो तेव्हांपासून तिची थोरवी मला कळत असे. मला त्यावेळीं कुठला धाक असला तर तो म्हणजे आईचा राग. लहानपणीं खोड्या केल्या कीं आईला कळेल या भीतीनें मी आजीच्या पाठीमागें किंवा शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या घरांत दडून बसत असे.

मी लहानपणीं ज्या शाळेंत जात होतो ती घरापासून दोन मैल दूर होती. इतर मुलें माझ्याशीं परकेपणानें वागत. जणुं कांहीं मी एखाद्या शत्रु-मुलखांतूनच त्यांचेकडे आलों होतों! मग मारामाऱ्या होत, लागे, खरचटे.

अशातच शाळेचे दोस्त जमा करतां येतात. कारण ही मैत्री निर्हेतुक असते. माझा अभ्यासक्रम इतरांप्रमाणेंच कसातरी पुरा झाला. शेवटली पदवी परीक्षा झाल्यानंतर येऊन जाऊन म्हणजे काय कीं कोठेंतरी शाळामास्तर अगर प्रोफेसर व्हावयाचें. मला त्या गोष्टीची फारशी उत्सुकता नव्हती. राजकीय कामांत ज्यांनी आपलें नांव पुढें काढलें तीं माणसें प्रथम शाळामास्तरच होतीं. मलाहि थोडी पायपिटी करून व शिफारशीच्या एकदोन चिठ्या मिळवून एका शाळेंत नोकरी पटकवितां आली. वर्षाच्या अखेरीला मी मुलांना एक निबंध लिहावयास सांगितला. त्याचा विषय असा होता—By persevering you thrive—‘ धीर धरा म्हणजे ऊर्जितकाळ येईल.’

पण त्या तात्पुरत्या नोकरीनें माझें भागण्यासारखें नव्हतें म्हणून मी स्विझर्लंडला गेलों. खिशांत पैसे अगदीं थोडे म्हणजे जवळ जवळ नव्हतेच ! अंतःकरणांत मात्र धमक होती. कुटुंब, घर किंवा भोंवतालची ओळखीची परिस्थिती सोडून परदेशाच्या अनोळखी जगांत पाऊल टाकावयाचें होतें. पण मनाशीं म्हटलें, “ काय होईल तें होईल. एकदां पाहूं या तर खरें !”

माझ्या देशाची सीमा ओलांडून मी स्विझर्लंडांत पाऊल टाकलें तेव्हां अडचणी अनेक आल्या. त्या पावलोपावलीं येतच होत्या. त्या काय काय आणि किती सांगाव्या ? त्यांच्याशी तोंड देतांना मन दगडासारखें घट्ट झालें. निश्चयाच्या कठोरतेचीं मनावर पुटांवर पुटें चढवावी लागली, तेव्हांच ते कठीण दिवस पार पडले. मी परदेशांत पाऊल टाकलें तेव्हांच माझ्या बाळपणालाही मी रजा दिली. अंगांत मोठेपणाचा, कर्तेपणाचा संचार झाला. कांहीं एका अभिनिवेशानें मनाची पकड घेतली व त्यांत मला माझें व्यक्तित्व दिसूं लागलें म्हणून परमेश्वरानें पाठविलेल्या संकटाचें मी आभार मानतों. माझ्या आयुष्यांत सुखाचे क्षणही थोडे आले. त्यांचा माझ्या आयुष्यांत कांहींच उपयोग झाला नाहीं. संकटाचें मात्र तसें नाहीं. टाकीचे घाव सहन करावे लागले, पण माझ्या निश्चयाच्या मूर्तीला देवपणाची कळा आली.

कोठेंतरी सुखाची कायमची नोकरी मला मिळाली नाहीं हे तरी मी दैवाचे मोठें उपकारच मानतो. आयुष्यांतील विविध अनुभव जो मला जमा करतां आला तो एरव्ही आला नसता. नोकरीचा निर्वेधपणा म्हणजे असाच ना कीं तुमची नोकरी चांगली पांच पंचवीस वर्षें टिकावयाची; मग दरदोन-

चार वर्षांनी कुठें अडीच, पांच, सात, दहा, अशीं क्रमानें पगारांत वाढ व्हावयाची, साहेबानें खूष व्हावयाचे आणि मग तुम्हीही सुखाचा सुस्कारा सोडून आयुष्याच्या उतार वयांत ते पेन्शन भोगीत बसावयाचे !—कोण याला सुख म्हणत असतील ते असोत. छे ! छे ! मला तर असलीं स्थिति जन्मांत पटली नसती. आज माझ्या हातांत मनाच्या दृढ निश्चयाचें जें पोलादी हत्यार आहे तें सुखाच्या सावलींत मी वाढून माझ्या हातांत आलें नसतें. आयुष्याच्या झगड्यांत वेळीं सर्वस्व ओतावें लागलें. आणि अनेक वेळेला मोठें दारुण आणि खडतर दिवस भोगावे लागले; तेव्हांच मला आज आहे ही परिस्थिति प्राप्त झाली.

स्वीसमध्यें असतांना मी मजुरांचे व गवंड्याचें देखील काम केलें. आणि घर कशी बांधतात याचा धडा घेतला. फावल्या वेळांत मी कविता करीत असें किंवा फ्रेंच-इटालीन किंवा इटालीयन फ्रेंच अशी भाषांतरें करीत असे.

माझ्या भोंवतीं पुष्कळ स्नेही सोबती जमा होत. त्यांची मला करमणूक वाटे. त्यांतले कित्येक माझ्याप्रमाणेंच देशांतर करून आले होते. त्यांच्या अडचणींत लक्ष घालून त्यांना कांहीं तरी वाट दाखविणें अशा गोष्टी मी मोठ्या आवडीनें करी. राजकारण हें मात्र मी कधींहि पैशाकरितां केलें नाहीं. स्वतःच्या स्वार्थाकरितां सार्वजनिक कामांत पडून गबर व्हावयाचें या गोष्टीचा मी नुसता तिरस्कारच नव्हे तर धिःकार करतो !

कामकऱ्याचें आयुष्य मी पत्करले होतें खरें. पण दुपारची वेळ भागतच नसे. कित्येकदां खायला नाहीं म्हणून उपवास काढावें लागत. पण निग्रहानें मी दोन गोष्टी केल्या. कधींहि कोणाची उसनवारी केली नाहीं आणि राजकारणांत ओळखीचे जे कोणी स्नेहीसोबती होते त्यांनाही कधीं याचना अगर दैन्य दाखविलें नाहीं. एकेक गरजा आखडत मी त्या कमी केल्या; आणि जे थोडे पैसे लागत ते मी घरून मागवीत असे.

लॉसेनमध्यें नागरिकशास्त्र आणि अर्थशास्त्र यावर पॅरेटो यांचीं सुंदर व्याख्यानें होत असत. मी तीं ऐकावयास जात असे. पुढें मीही व्याख्यानें देण्याला सुरवात केली. त्याचा परिणाम इतकाच झाला की मला स्विझर्लंडला रामराम ठोकावा लागला.

व्हेरोना येथें मी सैन्यांत असतांना एक मोठी दुःखकारक गोष्ट घडली ती म्हणजे माझ्या आईचा मृत्यु होय. माझ्यावर तिच्या कितीतरी आकांक्षा

गुंतल्या होत्या. माझा भविष्यकाळ तिला दिसत होता. तिचें वय मरतेसमयीं सारें अठ्ठेचाळीस वर्षांचें होते. तिनें खरोखर मनुष्याच्या शक्तीबाहेर श्रमसायास केलें होते. मी फॉर्लिममध्यें असतांना एक सोशॅलिस्ट वर्तमानपत्र माझ्या हातीं येऊन मला संपादक होण्याची संधि लाभली. इटलीच्या राजकारणाची गुंतागुंत एकदां रक्तपात झाल्याशिवाय सुटणार नाहीं अशी माझी खात्री होती. मी त्याच धोरणानें लिहूं लागलों. महायुद्धाच्या आधीं दोन वर्षें मिलानमधील अवंति पत्राचा मी डायरेक्टर निवडून आलों.

याच सुमाराला माझा बाप वारला. त्याचे वय सत्तावन्न होते. त्यांत चाळीस वर्षें त्यानें सार्वजनिक कामांत लक्ष घातलें. त्याचे विचार आंतरराष्ट्रीय आणि उदार असत. स्वतःच्या मतासाठीं त्यानें तुरुंगवासही भोगला होता. जी कांहीं थोडी वडिलार्जित मिळकत होती ती परोपकार करतांना देऊन देऊन त्यानें खर्च केली. त्याला गरीबींत मरण आलें. तीनचार हजार लोक त्याच्या स्मशानयात्रेला गेले होते. त्याची एक मोठी उत्कट बलवत्तर इच्छा होती. ती म्हणजे आम्ही त्याच्या मुलांनीं मोठें व्हावें आणि आमची लोकांत कीर्ति व्हावी!

मिलानमध्यें राहून मी अवंतीपत्राचा जम बसविला. पत्राचा खप एक लाखापर्यंत जाऊन मी पक्षाचा पुढारी झालों. माझें वजन पुष्कळ वाढलें. पण बहुजन-समाजाची लोकप्रियता मिळविण्याकरितां मी माझ्या तत्वापासून एक रेंसभरहि हाललों नाहीं. माझें कौटुंबिक आयुष्य सुखाचें होते आणि माझी मुलगी एडा ही तर माझ्या सुखाचें निधानच होती. बाहेरच्या आयुष्याच्या धक्काबुक्कींतून मी घरीं आलों म्हणजे मला तर तें विश्रांतिस्थानच वाटे.

मनुष्याच्या जीवनावर त्याच्या मित्रांचा अगर ज्यांच्याशीं त्याचा सहवास घडतो त्यांचा परिणाम होतो अशी सामान्य समजूत आहे. जे दुर्बळ मनाचे अगर चांगल्या शब्दांनीं बोलावयाचें तर संस्कारक्षम असतात, त्यांच्या मनावर इतरांच्या संस्काराचा ठसा उमटत असेल. पण ज्यांचे स्वतःचें मन खंबीर असेल त्यांचेबद्दल मला असें मुळींच वाटत नाहीं. माझें शाळेंतले सोबती अगर राजकीय मित्र अगर युद्धांत खांद्याला खांदा लावून लढणारे दोस्त यांपैकीं कोणाचाहि माझ्या मनावर यत्किंचित देखील परिणाम झालेला

नाहीं. त्यांचा सल्ला मी पुष्कळदां ऐकला आहे. पण ज्याला अंतिम निर्णय म्हणतात तो मी दुसऱ्याच्या शब्दावर कधींच अवलंबून ठेवला नाहीं. माझें अंतःसाक्षी मन व प्रेरणा यांचाच निकाल मी निर्णायक मानला. ज्यांना 'स्वत्व' नसते त्यांच्याच निश्चयाचें सुकाणूं इतरांना हातांत घेऊन फिरवितां येतें. जी गोष्ट मित्रांची तीच पुस्तकांबाबत. एखाद्याचे शील बदलतें अगर स्वभाव बदलतो ही गोष्ट साफ खोटी आहे. जें जातींचें असेल तेच खरें. पुस्तकांत काय आहे ?

आयुष्य आणि त्यांत दररोज येणारा अनुभव हा सर्वांत मोठा शिक्षक आहे. मी जर कोणत्या ग्रंथाला गुरु केला असेल तर तो आयुष्यांतील अनुभव हाच. अनुभवानें जें शहाणपण येतें त्यापुढें जगांतील हजारो तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतील शिक्षण फुकट आहे. मी मित्रांना चाहतो व स्मरतोहि. पण मैत्रीसंबधानें माझ्या कल्पना कांहीं विशिष्ट आहेत. संकटांनीं मैत्रीची किंमत ठरते. मग युद्धानें तर मैत्रीचा कस लागत असेल यांत नवल काय ? कारण सर्वनाशापुढें जें टिकलें तेंच खरें.

मी सगळ्या जगाचा इतिहास काळजीपूर्वक वाचला आहे. माझ्या मनावर त्याचा उत्कट असा कांहींच परिणाम झाला नाहीं. इटलीचें राष्ट्रीयत्व व लॅटिन संस्कृति यांचा मात्र मी मनापासून भोक्ता आहे. राजकारणांत किंवा इतरहि ठिकाणीं विधायक बुद्धि मला आवडते. अमेरिकन राष्ट्र असेच विधायक आहे. तोंडानें वाचाळपणा अगर 'मुत्सद्देगिरी' करणाऱ्या राष्ट्रापेक्षां जगाच्या संपत्तींत जे आपली विधायक भर घालतात त्यांचें मी मनापासून कौतुक करितों. पण दुसऱ्याच्या शोधावर स्वतः गबर झाल्याची उदाहरणेंहि कांहीं राष्ट्रांची दाखवितां येतील. अशा बनियेगिरीचा मला नुसता तिरस्कारच नव्हे तर, मनःपूर्वक द्वेष वाटतो. अमेरिकेंत विधायक बुद्धीचे विद्वान् इतके आहेत व अमेरिकेचा स्वभावहि इतका उमदा आहे कीं, संस्कृतीचे सुवर्णयुग आज अमेरिकेमध्यें अवतरलेलें दिसेल !

(मौज–जून १९३८)

★ ★ ★

# मुसोलिनी व स्त्रिया

गेल्या महायुद्धांत मरण प[illegible] लिनी ह्यानें स्त्रियांच्याबद्दल प्रदर्शित केलेले विचार समाजसुधारकांपेक्षां राज्यकर्त्या मुत्सद्याला शोभेसेच आहेत. नेपोलियन बोनापार्ट व मुसोलिनी या दोघांचे स्त्रियांबद्दलचे विचार पुष्कळसे जुळतात. स्त्रियांच्या समान हक्कांबद्दल नेपोलियनने कधीं चौकशी केली नाहीं व राजकारणांत 'स्त्रियांच्या' म्हणून असलेल्या मताला तो फारशी किंमत देत नसे. कुटुंबसंस्था हा समाजाचा मुख्य घटक व मातृत्व हें स्त्रीचें समाजांतील परमोच्च स्थान, अशी त्याची विचारसरणी होती. एकदां संभाषणांत मॅडेम् दी एस्टाइल या प्रसिद्ध विदुषीनें "येथें जमलेल्या सर्व स्त्रियांत श्रेष्ठ कोण?" असा त्यास प्रश्न केला असतां 'तुम्ही' हें अपेक्षित उत्तर न देतां नेपोलियनने उत्तर केलें, "जिला सर्वांत जास्त मुलें असतील ती!" मुसोलिनीचीहि विचारसरणी नेपोलियनच्याच मासल्याची आहे.

मुसोलिनी म्हणतो :—मनुष्याला तारुण्यदशा प्राप्त झाली कीं, आयुष्यांतील महत्त्वाकांक्षा व प्रेम हीं बरोबरच उदयाला येतात. शक्य तर हीं दोन्हीहि साधावीं अशी त्याची अपेक्षा असते. पण पुष्कळवेळां ह्या दोहोंची गुंतागुंत झालेली आढळते. प्रेमभंग झाला तर शहाणा मनुष्य आपल्या आयुष्यक्रमाकडे वळून तें यशस्वी कसें करतां येईल ह्याच्या मार्गाला लागतो. पण पुष्कळांच्या

बाबतींत हें घडून येत नाही व कित्येक माणसें प्रेमाकरितां अंतिम स्वार्थत्याग व वाटेल ते साहस करण्याकरितां तयार होतात. प्रेम व निराशा ह्यांच्या झगड्याचीं आपण अनेक अद्‌भुतरम्य वर्णनें वर्तमानपत्रांतून हरघडी वांचतों. जगांत जे अद्‌भुत शोध लागतात त्यानें मनुष्याचें मन वेधून जात नाहीं; राजकारण, सामाजिक प्रश्न अगर युद्धकथा ह्यांमध्यें त्यांचें मन तितकेसें रमत नाहीं. पण जगाचें मन ह्या स्त्रीविषयक प्रश्नांत नेहमीं आटोकाट गढून गेलेलें असतें ! जगाला जणुं कांहीं असेंच वाटतें कीं, स्त्री हा गूढ व कधीं न सुटणारा प्रश्न आहे !

मग या स्त्रीविषयक कोड्याचें उत्तर काय? कांहीं जुन्या विचाराच्या लोकांना असें वाटतें कीं ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति '. तिला नेहमीं गुलामांप्रमाणें दास्यांतच वागविलें पाहिजे. स्त्री ही जात्याच पापमार्गाकडे वळणारी आहे असें त्यांचें मत आहे. पौर्वात्य कवींनीं पुष्कळदां तिच्या सौंदर्याचीं वर्णनें करून तिच्यामध्यें कांहीं गूढ शक्ति आहे असें प्रतिपादन केलें आहे. हीनवर्गांतून तर तिची स्थिति एखाद्या कष्टाळू राबणाऱ्या जनावराप्रमाणेंच असते. तिनें फक्त काम करावें व राबावें. कष्ट करणें हा जणूं काय तिला कायमचा शापच होय.

पण मनुष्यजातीनें स्त्रीच्या मातृत्वाच्या पदवीबद्दल नेहमीं अत्यंत आदरभावच दाखविला आहे. स्त्रीमध्यें स्त्रीचे दोष असोत किंवा नसोत; स्त्रीच्या मातृत्वाच्या कल्पनेंत एकहि दोष आढळून येणार नाही; पण स्त्रीकडे इतर दृष्टीनें पाहिलें की ही स्थिति बदलते. स्त्रीच्या सौंदर्याप्रमाणेंच तिच्यात बेइमानीपणाहि खचून भरला आहे असें मनुष्यास वाटतें व याच गूढामध्यें मनुष्याची सर्व संशोधक कल्पनाशक्ति [illegible] होते. सर्व जगाचे गंभीर वाङ्मय एका बाजूला व प्रीतिविषयक वाङ्मय दुसऱ्या बाजूला घातलें, तर नेहमीं दुसऱ्या प्रकारच्या वाङ्मयाचेंच पारडें जड ठरेल ! लहान मुलें अरण्यांतील राजकन्या व राजपुत्र ह्यांच्या गोष्टी अगदी लक्ष लावून ऐकतात. समाजाचीहि तीच स्थिति आहे. गंभीर विषयांची पुस्तकें लायब्ररींच्या कपाटांतून धूळ खात पडतात; पण कादंबऱ्या व नवलकथा यांच्या पुस्तकांचा नेहमीं पाऊस पडत असतो ! एखाद्या वैमानिकानें पृथ्वी ओलांडण्याचा पराक्रम केला तर त्याचे महत्त्व क्षणभर टिकतें व गुलाबाच्या फुलाप्रमाणें दुसऱ्या क्षणीं कोमेजून

जातें; पण कल्पित कादंबऱ्यांतील प्रणयी नायकनायिकांबद्दल वाचकांना जणूं असें वाटत असते की, आपण ह्यांची हकिगत वाचून काळजी केली नाहीं तर दुसरा कोण करील? प्रणयकथा हेंच जगाचें विश्रांतिस्थान व मुख्य करमणूक झाली आहे!

अलीकडे पाश्चात्य देशांत स्त्रिया स्वतंत्र बनूं लागल्या व उद्योगधंदा करून पुरुषी वृत्तीचें अनुकरण करूं लागल्या म्हणून त्यांचे स्वभावगुण कसे बदलणार? प्रेमपाशांतून स्त्रीची कधींहि मुक्तता होणें शक्य नाहीं. आपलें घर सोडून स्त्रिया काय अलीकडेच नव्यानें काम करूं लागल्या आहेत? सुधारलेल्या अगर बिनसुधारलेल्या सर्व देशांत आणि सर्व काळीं त्यांनीं आजवर घरकामच केलें आहे. आपल्या सहनशक्तीची व सोशिकपणाचीहि त्यांनीं कधीं मर्यादा पाळली नाहीं. शेतांतून राबणें व सूत कातणें विणकाम करणें ह्या गोष्टी त्या पूर्वीं करीत होत्या; तें काम त्या आज कारखान्यांत जाऊन करतात इतकेंच. पण फरक कोठें पडला? यांत्रिक युगामध्यें पूर्वींच्या उद्योगधंद्याचें जसें रूपांतर झालें, तसेंच स्त्रीच्या श्रमाचेंहि झालें. पण कष्ट करणें व राबणें हें तिचें नशीब पूर्वींपासून आतांपर्यंत सारखेंच आहे.

जग बदललें, पण स्त्रीचें स्त्रीत्व व स्त्रीगुण कांहीं बदलले नाहींत! पुरुषांचे कपडे घालणें, केंस कातरणें, मोटारगाड्यांसारखीं वाहनें स्वतः हांकणें, शिक्षण घेऊन स्वतंत्र उद्योगधंदा करणें, सिगारेट ओढणें, पुरुषी खेळ खेळणें इत्यादि सर्व गोष्टी स्त्रियांनीं केल्या तरी आधिभौतिक सुधारणेचा उदय होण्यापूर्वीं तिच्यांत स्त्रीत्वाचे जेवढे स्वभावधर्म होते तेवढेच आजहि आहेत! मनुष्यप्रयत्नानें सर्व सृष्टि बदलली; पण विधात्यानें निर्माण केलेली स्त्री ही मनोगुणानें तशीच कायम राहिली; बदलली नाहीं. बायकांनीं केंस कापले अगर विजारी घातल्या तरी, त्यांना पुरुष कोण म्हणेल? स्त्रियांनीं केंस कापलेले मलाहि आवडतात; या बाह्य देखाव्यानें आम्हीं आतां पुरुषांच्याप्रमाणेंच स्वतंत्र झालों असें त्यांनीं म्हटलें तर तें निष्फळच नाहीं काय?

घोड्यावर बसणें व पुरुषी पेहेराव करणें हें नुसतें ‘अनुकरण’ होय, व अनुकरण म्हटलें म्हणजे त्यांत सत्यता नसल्याची ती एक कबुलीच होय. पुरुषांच्या कार्यक्षेत्रांतहि पुरुषी गुणांना हार न जाणारी, जगाचें लक्ष वेधून घेणारी स्त्री दहा लाखांत क्वचित् एखादीच सांपडते. पण या अपवादानें

स्त्रिया व पुरुष ह्यांचे मनोगुण व कार्यक्षेत्र हीं भिन्न आहेत असेंच उलट सिद्ध होतें पुरुषाप्रमाणेंच जगांत स्वतंत्र होण्याचा स्त्रिया हवा तेवढा प्रयत्न करोत; पण स्त्रीस्वभावाचें सहजरम्य स्वाभाविक सद्‌गुण यामुळें नष्ट होतील हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. स्त्रियांनीं पुरुष होण्यांत शहाणपणा असता तर विधात्यानें त्यांच्या ठायीं स्त्रीत्व निर्माणच केलें नसतें. जलाशयांत प्रतिबिंब पडावें त्याप्रमाणें स्त्रीची बुद्धि व हृदयस्थ मनोगुण हा पुरुषांच्या भावनांचा दुसरा एक अर्धा भागच होय. त्यांत कांहीं साधर्म्य आहे पण कांहीं वैधर्म्यहि आहे. ह्या दोनहि अर्धभागांची एकमेकांत देवघेव होत असते. दोघांनाहि एकमेकांना कांहीं तरी द्यावयाचें असतें.

स्त्री पुरुषाला जिंकते कीं पुरुष स्त्रीला जिंकतो ? हें त्यांच्या अनुरागाच्या प्रथमावस्थेकडे पाहिलें तर चांगलें लक्षांत येईल. प्रथमतः पुरुषाला हुलकावणी दाखवून स्त्री त्याच्यापासून जरा दूर जाते; पण पुरुषपाशांत आपण अखेर पकडलें जावें अशीच तिची इच्छा असते. स्त्री पुरुषास मोह पाडते व आपणांकडे त्याचें लक्ष वेधते. सौंदर्य व चंचलता हीं तिचीं शस्त्रें असतात व या गुणांनीं पुरुष एकदां मोहांत सांपडला कीं त्यांच्यामध्यें शर्यत सुरू होते. पुरुषानें हल्ला करावा व स्त्रीनें हार खावी असें होतां होतां पुरुष हा स्त्रीला कायमची ताब्यांत घेतो. निसर्गसिद्ध सौंदर्य व बुद्धिचापल्य हे स्त्रीत्वाचे गुण पुरुषाच्या कठोर देहसामर्थ्याशीं झुंज करण्यास तिला उपयोगी पडतात. हाच तिचा शस्त्रसंभार ! त्याखेरीज दुसरीं शस्त्रें तरी तिनें कोणतीं उपयोगांत आणा-वयाचीं ? स्त्रीनें पुरुषास जिंकणें ह्या कल्पनेंतच विरोधाभास आहे. पुरुषाकडून स्त्री जिंकली जाऊन ती त्याच्या सर्वस्वी ताब्यांत गेली, म्हणजेच तिनें हें प्रेमयुद्ध जिंकलें असें म्हणावयाचें. स्वतः जिंकलें जाण्याकरितांच युद्धाचा हा सर्व खटाटोप असतो; व तिच्या मोहास्त्रामध्यें न सांपडून पुरुष तिच्याशीं सामना न करतां निघून जातो, तेव्हां स्त्रीचा ह्या युद्धांत सर्वस्वी पराभव होतो असें म्हटलें पाहिजे !

स्त्री ह्याप्रमाणें पुरुषाच्या आधीन झाल्यानंतर ती त्याचा दैवी अर्धभाग होते. पुरुषशक्तीचें कौतुक वाटणें व लतेप्रमाणें परावलंबी बनून त्याचा तिनें आधार घेणें ह्या गोष्टी अगदीं स्वाभाविक आहेत. स्त्रिया कांहीं वेळ पुरुषां-विरुद्ध बंड करोत, पण त्यांत अखेर त्यांना नामोहरमच झालें पाहिजे. स्त्रिया

कितीहि स्वतंत्र झाल्या तरी त्यांचें स्वातंत्र्य पुरुषाच्या नेहमीं आवाक्यांत असतें आणि स्त्रीच्या शक्तीचें मोजमाप नेहमीं त्यांच्या हिशेबांत असतें. सार्वजनिक चळवळी करण्याचा हक्क, मतें देण्याचा हक्क, अगर मालमत्तेत मालकी मिळविण्याचा हक्क असे वाटेल ते हक्क स्त्रिया मिळवोत; पण हे सर्व हक्क केवळ पुरुषाच्या मर्जीखातरच मिळालेले आहेत.

पुरुषाच्या महत्त्वाकांक्षेशीं स्त्रीच्या प्रेमाचा फारसा संबंध असेल असें वाटत नाहीं. प्रेम हा पुरुषाच्या मनाचा केवळ एक भाग होय. हा भाग स्त्री आपल्या ताब्यांत घेऊ शकेल; पण पुरुषाच्या महत्त्वाकांक्षेला स्त्रीला हात लावतां येत नाहीं. **प्रेमभावें जीव जगिं या नटला** ' ही केवळ कविकल्पना आहे. त्यांत वास्तविक सत्य नाहीं. पुरुषाच्या शक्तीचे खरें अधिष्ठान स्त्री होय असें मानणें चुकीचें आहे; कारण हें अधिष्ठान नाहींसें झालें, तर पुरुषाच्या सर्व वैभवशक्तीचा डोलारा ढांसळून जाईल असेंच म्हटलें पाहिजे ! पण खंबीर महत्त्वाकांक्षेचीं माणसें स्वतःच्या जोरावरच उदयाला येतात. स्त्रीच्या शक्तीची त्यांना मदत लागत नाहीं असें मला वाटतें.

पण अशा माणसांसहि स्त्रीचें साहचार्य असणें ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. सृष्टींतील मार्दव हें तिच्यामुळेंच त्याला आकलन होतें. दया, प्रेम व सहानुभूति या नाजूक कल्पनांच्या आडव्या धाग्यादोऱ्यांनीं सर्व विश्वाच्या आयुष्यक्रमाचा पट विणला जात असतो. त्याची कल्पना त्याला स्वतःच्या स्त्रीवरूनच अनुभवास येते. जगाची एक बाजू त्याला तळहातावर घेतलेल्या लोलकाप्रमाणें स्वच्छ दिसते. मनुष्याचें कठोर मन जेव्हां सर्व जगाशीं युद्ध पुकारून निकरानें लढाई देण्यास सज्ज होतें, त्यावेळीं त्याच्या वज्रासारख्या मनावर मायेची पाखर स्त्रीच घालते; आणि वज्रासारख्या कठोर निश्चयाबरोबर कुसुमाचें मार्दवहि आपल्या अंगीं आहे हें त्यावेळीं मनुष्याचें प्रत्ययास येते !

मनुष्याचें जीवितकार्य जगांत वेगळें आहे. अप्रतिहत बुद्धीनें मनुष्यानें आपली महत्त्वाकांक्षा जिंकून सिद्ध केली पाहिजे. या भगीरथ कार्यात स्त्री हें केवळ विसाव्याचें विश्रांतिस्थान होय. पुरुषाचें दृष्टीनें प्रेम ही गोष्ट आयुष्यातल्या 'अनेक गोष्टींपैकीं एक' इतकीच त्याची किंमत. पण स्त्रीची गोष्ट तशी नाहीं. पुरुष हेंच तिचें जगांतील सर्वस्व होय. म्हणून प्रत्येक स्त्रीनें लग्न केलेंच पाहिजे. पुरुषानेंहि कुटुंबसंस्थेकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. कारण सुसंघटित कुटुंब हाच राष्ट्राचा पाया होय. (वाङ्मयशोभा) ऑक्टोबर १९५३

★ ★ ★

# भाग्यतारा

इतिहासांत मनुष्यमात्रांचें लक्ष वेधून घेणारीं जीं थोडीं स्त्री-चरित्रें आहेत, त्यांत नेपोलियनची राणी जोसेफाईन हिचें चरित्र आहे. नेपोलियननें आपल्या कीर्तीची जी भव्य कमान उभारली त्यांत जोसेफाईनचें प्रेम हा मुख्य चिरा किंवा चावीचा दगड होता. एक प्रकारें जोसेफाईनचें चरित्र म्हणजे नेपोलियनचेंच चरित्र होय; पण जोसेफाईनचें चरित्र समजल्याशिवाय नेपोलियनच्या अंतर्मनाचें चरित्रहि बरोबर समजूं शकत नाही. मनुष्याचें मन हा इतिहास संशोधकांनाहि कांहीसा घोटाळ्यांत पाडणारा विषय आहे; आणि त्यांत स्त्रीचें मन हा विषय किती नाजूक व गुंतागुंतीचा असेल हें सांगण्याचें कारण नाही. त्या मनाचा छडा कधीं तरी कोणाला लागेल काय ? जोसेफाईनचें व्यक्तिमत्वहि असेंच कांही असामान्य होते की त्यानें नेपोलियनला भारलें होतें. स्वतः नेपोलियनचें व्यक्तिमत्व लहानसहान नव्हतें. युरोपांतील त्यावेळची कोणतीहि मोठी व्यक्ति सान्निध्यांत आली तरी त्या व्यक्तीवर नेपोलियन आपली छाप पाडूं शकत असे. कोणताहि मनुष्य नुसता नजरेसमोर आल्याबरोबर त्याच्या अंतर्मनांतले विचार नेपोलियनला कळत ! पण अशांहि नेपोलियनचें मन प्रथम भेटींत चार शब्दांत जोसेफाईननें जिंकून घेतलें होतें ! तिच्या आवाजांतच तसें कांही आकर्षण होतें. आणि त्या आवाजांत तिच्या आत्म्याचें जें गूढ आध्यात्मिक आकर्षण होतें तें सामावलें होतें.

फ्रान्सच्या दरबारांत त्यावेळीं मॅडेम रिकामीर, मादाम टालियन, मादाम एस्ताईल अशा अनेक रूपसंपन्न आणि विद्वान् युवति होत्या. पण त्यांची छाप नेपोलियनवर पडली नाही. सुप्रसिद्ध गायिका ग्रॅझिनी, वालेवास्का किंवा जॉर्जिना यांनीं कांही काळ नेपोलियनचें चित्त हरण केलें. पण तें फक्त कांही काळच. आकाशांत सहस्रावधि नक्षत्रें चमकत असलीं तरी आपल्या शीतल प्रकाश-किरणांनीं विश्वावर अधिराज्य चालविणारा जो चंद्रमा त्याचा तीं पराभव करूं शकत नाहीत! नेपोलियननें पुढें जोसेफाईनचा त्याग केला; पण तो केवळ राजकीय कारणाकरितां, म्हणजे गादीला वारस पुत्र हवा म्हणून. पण हें करतांना त्याला अमर्याद दुःख झालें. त्याच्या आयुष्यांतील ती सर्वात मोठी चूक होती. प्रणयजीवन हाच मनुष्याच्या आयुष्याचा मूलाधार आहे, असें सिद्धांति सांगतात तें खोटें नाही. त्या प्रणयजीवनाशीं प्रतारणा झाल्याबरोबर त्याचे पुढचे सर्व आयुष्य उध्वस्त झालें! वॉटर्लूच्या लढाईवर निघतांना या युद्धांत आपणांस जय मिळेल असें त्याचे मनच त्याला सांगत नव्हतें. आणि पुढें तसेंच घडून आलें! " जोसेफाईनसारखी स्त्री फ्रान्समध्येंच काय पण त्रिखंडांतहि आढळणार नाही. तिच्या गुणांना तुलनाच नाही " असे उद्गार सेंट हेलिना येथें नेपोलियननें कित्येकदां काढले. नेपोलियनप्रमाणेंच जोसेफाईनचीं कित्येक चरित्रें प्रसिद्ध झाली आहेत. याकरितां तिची माहिती थोडक्यांत देत आहे :

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जीं माणसें आपल्या कर्तबगारीनें उदयाला आलीं त्यांत नेपोलियनप्रमाणेंच जोसेफाईन हिचेंहि नांव घेतलें पाहिजे. तिचा नवरा सरदार बोहारने याचा फ्रेंच राज्यक्रांतींत शिरच्छेद झाल्यानंतर आकस्मिक योगायोगानें तिची व नेपोलियनची गांठ पडली, आणि पहिल्याच भेटींत दोघांच्या मनांत प्रेमाचा उदय झाला. वास्तविक जोसेफाईन ही त्यावेळीं बारस, गोहियर, वगैरे प्रधानमंडळींत आणि उच्च लोकांत वजन असलेली स्त्री होती. आणि त्यामानानें नेपोलियन हा सामान्य ब्रिगेड-जनरल म्हणजे कोणीच नव्हता! तिचें वयहि त्याच्यापेक्षां सहा वर्षांनीं मोठें होतें. पण दोघांनीं एकमेकांना पाहिल्यावर यांपैकीं कोणतीहि गोष्ट त्यांना आडवी आली नाहीं. तिच्या प्रथम दर्शनानें नेपोलियनला असें झालें कीं मनांत कांहीं जन्म-जन्मांतरीची स्मृति जागृत व्हावी; किंवा एखादी हरवलेली अमूल्य वस्तू

सांपडावी ! त्या एकाच क्षणानें दोघांच्याहि आयुष्यांत स्थित्यंतर झालें; आणि अवघ्या पंधरा दिवसांत त्यांनी विवाहापर्यंत सर्व मार्ग आक्रमण केला ! लग्न रजिस्टर पद्धतीनें झालें आणि त्यावर बारस व गोहियर या दोघां प्रधानांनीं साक्षीदार म्हणून सह्या केल्या.

विवाहानंतर दुसऱ्याच दिवशीं नेपोलियन इटालीच्या मोहिमेवर रवाना झाला आणि पंधराच दिवसांत वर्मसर, आलविंझी या कसलेल्या ऑस्ट्रियन सेनापतींचा त्यानें पराजय केला. यामुळें फ्रान्समध्यें ज्याच्या त्याच्या तोंडीं त्याचें नांव झालें. पण एकीकडे या लढाया करतांना दुसरीकडे जोसेफाईनच्या विरहाची आणि पूर्वीं पॅरिसमध्यें असतांना तिच्या सहवासांत घालविलेल्या धुंद रात्रींची त्याला फार आठवण होत असे. या काळांत त्यानें जोसेफाईनला लिहिलेलीं पत्रें प्रेमानें वेडावलेल्या तरुणासारखीं आहेत. पांखराप्रमाणें पंख लावून ती त्याजकडे उडून येती तर हवीं होतीं. अखेर शत्रूचा पराजय केल्यावर मिलानच्या राजवाड्यांत त्यानें तिला आणवलें. याच वेळीं नेपोलियनची बहीण-भावंडें व आई यांची व जोसेफाईनची प्रथम भेट झाली. पण नवल असें कीं ती कोणाच्याच पसंतीला उतरली नाहीं ! या वेळेपासून जोसेफाईननें ठरविलें कीं हें गोत नेपोलियनचें; माझें नव्हे. ती त्यांचेवर अवलंबून नव्हती, किंवा त्यांच्या कुटुंबांतहि तिला रहावयाचें नव्हतें. तिचें वय यावेळीं बत्तीस वर्षांचें होतें आणि जमाना स्वतंत्र होता !

एकीकडे नेपोलितन युद्धांत गुंतलेला असतांना जोसेफाईननें बारस, गोहियर या प्रधानांशीं फार कौशल्यानें संबंध ठेवले होते. नेपोलियनच्या राजकारणी पत्रव्यवहारांत ती जातीनें लक्ष घालीत असे. कोणता शब्द कोणाला केव्हां बोलावा याचें ज्ञान तिला उत्तम होतें. यामुळें तिचा शब्द फुकट जात नसे. इटालीमधील विजयानंतर पॅरिसमध्यें एक स्वतंत्र मोठें घर घेऊन तिनें शृंगारलें. त्या घरांत इटालीमधून आणलेली नामांकित चित्रें, पुतळे, नजराणे आणि कित्येक अमोलिक वस्तूंचा संग्रह तिनें केला होता. कोणतीहि सुंदर वस्तु असो, पडेल ती किंमत देऊन विकत घेण्याचा तिला हव्यास असे. मालमेझांच्या राजवाड्याची जमीन सुमारें शंभर एकर तिनें दीड लक्ष फ्रँकला विकत घेऊन तेथें असा अप्रतिम बाग उठविला कीं, आजहि-मालमेझांचा राजवाडा हेंच जोसेफाईनचें पाहण्यासारखें स्मारक

आहे. तिची सौंदर्यदृष्टि इतकी अपूर्व होती कीं, युरोपखंडांतील साऱ्या फॅशन्सचा उगम जोसेफाईनपासून होता ही गोष्ट अनेक चरित्रकारांनीं मान्य केली आहे. तिच्यात एकच दोष होता, तो म्हणजे तिची खार्चिक राहणी. ती इतका खर्च करी कीं, सामान्य मनुष्याची छाती फाटून जावी. तिचें जितकें उत्पन्न त्याच्या दुप्पट खर्च ती करी. पण नेपोलियन त्या खर्चाला निमूट-पणानें मान्यता देत असे. या एका वाक्यांत तिच्या साऱ्या संसाराचें वर्णन करितां येतें. पण अमूप खर्च करतां येणें हेंहि दैव आहे !

जोसेफाईनच्या खार्चिक स्वभावाबद्दल नेपोलियननें कधीं तक्रार केली नाहीं, पण तिच्या भावंडांच्या आणि नणंदांच्या अंगाची मात्र आग होत असे. शेवटीं ही स्पर्धा व मत्सर इतक्या थराला गेली कीं, नेपोलियन दूर ईजिप्तच्या स्वारीवर गेला असतां जोसेफाईनच्या नैतिक आचरणाबद्दल या भावंडांनीं प्रवाद उठवून त्याचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केला. पण नेपोलियन हा खरोखरच शहाणा मनुष्य म्हटला पाहिजे. कारण संशयाच्या आहारीं जाऊन त्यानें आपल्या संसाराची राखरांगोळी केली नाहीं ! ज्या पाप-कृत्याचा तिच्यावर आरोप होता तें तिनें केलेलें नसल्यामुळें, या आपत्तीला तिनें निर्भयपणानें तोंड दिलें, आणि त्या निर्भयपणामुळेंच तिच्या चारित्र्या-विषयीं नेपोलियनची खात्री झाली. या वेळचें तिचें एक पत्र उपलब्ध असून वाङ्मयांत चिरकाल राहील. या पत्रांत तिनें लिहिलें आहे, "तुझी व माझी पहिली ओळख झाली तेथेंच जर आपण थांबतों, पुढें गेलों नसतों, तर बरें झालें नसतें काय? पण मला विवाहाला उद्युक्त करण्याला तूंच कारण झालास ! आपलें दोघांचें प्रेम न पाहवून कोणातरी हितशत्रूच्या मनांत त्या प्रेमाच्या ताटांत माती कालविण्याचें आलेलें दिसतें ! पण या अफवांवर तुझा विश्वास बसतो हें नवल नव्हे काय ?"

नेपोलियनच्या मनांतील संशयाचें निराकरण झालें याचें अंतस्थ कारण म्हणजे, जोसेफाईन हीच आपली भाग्यदेवता आहे असा नेपोलियनचा मनोमन विश्वास होता. आपणाला जें भाग्य लाभलें आणि वेळोवेळीं जो उत्कर्ष झाला, तो आपणांस जोसेफाईनची जोड न मिळती तर झाला नसता, असें त्याला प्रामाणिकपणें वाटत असे. आणि याचें प्रत्यंतर त्याला ताबड-तोब पहावयास मिळालें. कारण त्यानें यानंतर आठ दहा दिवसांतच डिरे-

क्टरीची सत्ता काबीज केली. त्यांत जोसेफाईनची त्याला बहुमोल मदत झाली. हा कट जर थोडा कोठें फसता किंवा षट्कर्णी होता, तर नेपोलियनला आपलें शीर गमावण्याची पाळी होती! पण एकीकडे डिरेक्टरींतील प्रधानांशीं सलोख्याचे संबंध ठेवून, आणि ज्या दिवशीं कटाचा बार उडावयाचा त्या दिवशीं बारस व गोहियर यांना बोलण्यांत गुंतवून ठेवून तिनें डिरेक्टरींवर प्यादेमात केली! ती राजकारणी नव्हती हें खरे तितकेंच चतुर होती हेंहि खरें आहे.

या नंतर नेपोलियननें ' फर्स्ट कॉन्सल ' म्हणजे सर्वाधिकारित्वाची सत्ता मिळविली. आणि ऑस्टरलिझ व जेना या सुप्रसिद्ध लढाया जिंकून अर्धे युरोपखंड ताब्यांत आणलें, तेव्हां फ्रेंच राष्ट्रानें " फर्स्ट कॉन्सल " हें पद त्याला तहहयात व वंशपरंपरा बहाल केलें. आतां येथेंच थांबावें, राजपदापर्यंत धांव घेऊं नये असें जोसेफाईनला वारंवार वाटत असे. १७९६ सालीं नेपोलियन एका साध्या ब्रिगेडचा अधिकारी होता. पांच वर्षांनीं डिरेक्टरीची सर्व सत्ता त्याचे हातीं आली; व नंतर पांच वर्षांनीं त्यानें " बादशहा " होण्याची गोष्ट लोक बोलूं लागले; एवढें स्थित्यंतर अवघ्या दहा वर्षांत घडलें. हें नवल खरें, पण तें घडलें हेंहि तितकेंच खरें. याकरितां लाभलेलें भाग्य टिकवून धरावें, उतावळेपणानें तें जाईल असें करूं नये; प्रत्यक्ष राजपदांतच इतकें काय मोठेपण आहे? जितके मोठेपण अधिक तितकें शत्रुत्वहि जास्त. सोळावा लुई हा राजा बादशहा असतांहि त्याचा लोकांनीं शिरच्छेद केलाच ना? म्हणून प्रत्यक्ष राजपदापेक्षां एक पायरी कमी असें कोणतेंहि मोठे पद नेपोलियननें भूषवावें असें तिला वाटे.

हा तिचा संयम वाखाणण्यासारखा होता. पण राजकारण हें असेंच असतें कीं तें एकदा सुरूं झालें कीं त्याची गति थांबत नाहीं. प्रतिस्पर्ध्यांची आशा नाहींशीं करण्याकरितां, त्यांना जरब दाखविण्याकरितां नको ती गोष्ट करून दाखविण्याची बुद्धि होते! १८०४ सालीं काडोडलच्या नेतृत्वाखालीं एक फार मोठा कट जुन्या राजपक्षपाती लोकांनीं केलेला उघडकीला आला. म्हणून जुन्या बुरबॉन घराण्याची आशा संपूर्ण नाहींशीं करण्याकरितां नेपोलियननें ' बादशहा ' हें पद सर्वानुमतें धारण करण्याचें ठरविलें!

येथपर्यंत मजल आल्यानंतर जोसेफाईनच्या मनांतील भीति नाहींशी झाली. नेपोलियननें आपणांबरोबरच सम्राज्ञी म्हणून तिलाहि पोपकडून राज्याभिषेक करविला. आणि तिची लोकप्रियता इतकी मोठी होती कीं लोकांनीं ती गोष्ट आनंदानें मान्य केली. या समारंभापूर्वी, नेपोलियनशीं पूर्वी केवळ करारानें झालेलें लग्न फिरून ख्रिस्ती विधिपूर्वक करून आपल्या विवाहाची तिनें गांठ पक्की करून घेतली होती ! राज्यारोहणाच्या समारंभांत नेपोलियनचा बादशाही झगा उचलण्याला त्याचे भाऊ आणि जोसेफाईनचा झगा उचलण्याला तिच्या नणंदांना हातभार लावावा लागला, ही एक प्रकारें त्यांनीं केलेल्या शत्रुत्वाची दैवानें परत फेड केली होती. अशा प्रकारें जोसेफाईनच्या लहानपणीं एका जिप्सी बाईनें "तूं फ्रान्सची राणी होशील" असें जें भविष्य तिला सांगितलें होतें तें अक्षरशः खरें झालें !

नेपोलियनची आई मात्र या अलौकिक समारंभाला हजर राहिली नाहीं. ऐश्वर्य आणि ऐहिक वैभव या गोष्टींवर तिचा विश्वासच नव्हता. "हें सारें एक दिवस नाहींसें होणार आहे" असें ती म्हणत असे. वैभवाच्या दिवसांतहि तिच्या हातून खर्च करवत नसे. "आई, तूं फार कंजूषपणानें वागतेस !" अशी नेपोलियन तिची थट्टाहि करी. यावर ती इतकेंच उत्तर देई—"बाबारे, एखादे दिवस तुलाच माझ्जवळ पैशाची मागणी करण्याची वेळ येईल ! कोणी सांगावें, वेळ कधीं सांगून येत नसते !" आणि पुढें तसें झालेंहि.

यानंतर आणखी पांच वर्षें गेलीं. नेपोलियनची सद्दी दिवसेंदिवस वाढत्या कक्षेंत आहे असें त्याच्या दराऱ्यामुळें भासत होतें. पण जाणत्या लोकांना वेगळें वाटत होतें. शुद्ध पौर्णिमेनंतर देखील आकाशांत आपल्या शुभ्र तेजानें चंद्रमा प्रकाशतच असतो, पण त्याच्या एकेक कला दिवसेंदिवस कमी होत आहेत, त्याला क्षय लागला आहे हें जाणत्या माणसांना कळल्याशिवाय राहात नाहीं. जोसेफाईनपासून आपल्याला मुलगा होत नाहीं या गोष्टीबद्दल पूर्वी नेपोलियनला महत्त्व वाटलें नाहीं. पण आतां दोघांनाहि ती अंतस्थ चिंतेची बाब होऊन बसली. जोसेफाईनचा मुलगा अजेन याला दत्तक घेऊन वारस म्हणून जाहीर करावें असें त्यानें प्रथम योजिलें. पुढें जोसेफाईननें आपली मुलगी हॉरटेन्स हिचें नेपोलियनचा सर्वांत धाकटा भाऊ लुई याच्याशीं लग्न जमवून बोनापार्ट व बोहारने या दोन कुळांत ऐक्यभावना आणली. या

हॉरटेन्सला सुदैवानें मुलगा झाला. त्याचेंच नांव चार्लस नेपोलियन असें ठेवून, त्याला वारस करावें असें दोघांच्याहि मनांत होतें. पण दुर्दैवानें हा मुलगा पांच वर्षांचा होऊन वारला, त्यामुळें गाडी पुनः पूर्वपदावर आली !

राज्याचाहि विस्तार इतका अवाढव्य झाला होता कीं, सदासर्वकाळ लढाया करीत बसणें शक्य नव्हतें. त्या राज्याला शांतता आणि स्थिरता यावयाची तर रशिया किंवा ऑस्ट्रिया अशा बलिष्ठ सत्तेशीं सोयरिकीचें नातें जोडूनच हा प्रश्न सुटेल असें त्यांच्या मनांत येऊं लागलें होतें. पण तिकडूनहि अडचण अशी होती कीं, जोसेफाईननें जसें त्याचे मन व्यापलें होतें तसें कोणीहि स्त्री व्यापूं शकली नसती ! ज्या माझ्या पत्नीला मी सम्राज्ञीपदावर चढविलें तिला त्या पदापासून मीच वंचित करणार काय ? अशा विचारानें त्याच्या मनांत उदासीनता येत असे. जोसेफाईनशीं त्याचे मन इतकें एकरूप झालें होतें कीं, त्याच्या अंगावरून नुसती वाऱ्याची झुळूक गेली तरी त्याच्या अंतर्मनांतील विचार जोसेफाईनला कळत असत ! याच मनःस्थितींत तीं दोघें एकत्र असतां, दालनांतील खिडकीजवळ नेपोलियनला नेऊन पश्चिम क्षितिजावर प्रकाशत असलेला शुक्राचा तारा जोसेफाईननें त्याला दाखविला. “ तो पहा माझा भाग्यतारा ! आपणाला जें ऐश्वर्य लाभलें तें या माझ्या भाग्यताऱ्याचें फळ आहे ! केवळ तुझ्या नशिबानें तें मिळालें नाही ! आपण दूर झालों कीं हें भाग्य संपलेंच समज !” काय असेल तें असो; नेपोलियनचें मनहि त्या दिवशीं इतकें भाराक्रांत झालें होतें कीं, एखाद्या लहान मुलाप्रमाणें तिच्या गळ्यांत गळा घालून तो रडला. “ जोसेफाईन मी काय करूं ? सगळेजण राजकारणाकरिता मला भरीला घालतात; पण तुला सोडावें असें मला वाटतच नाही ! ”

पण कालांतरानें तोहि समय आला. कणाकणानें आणि क्षणाक्षणानें बदलत नाहीं असें या जगांत काय आहे ? त्याप्रमाणें नव्या लग्नाचा विचार कायम झाल्यावर मनाचा निश्चय करून त्यानें तिला कळविला आणि पुढें कुटुंबियांसमक्ष एकदोन दिवसांनी घटस्फोटाचे विधि, दोघांच्या सह्या होणें वगैरे रीतसर पार पडलें. नेपोलियननें आपल्या आवडत्या राणीची कोणत्याहि रीतीनें अवहेलना केली नाहीं; किंवा तिला कमीपणा येईल अशी गोष्ट घडूं दिली नाहीं. तिची ‘ सम्राज्ञी ’ ही पदवी, तनखा, इतमाम, राहण्याची



नेपोलियन बोनापार्ट

[ मूळ रंगीत चित्रावरून–
चित्रकार : का. न. केळकर ]



रानी जोसेफाइन

व्यवस्था वगैरे सर्व तिच्या दर्जाला शोभेल अशी त्यानें लावून दिली. आणि त्याप्रमाणें टुलरीजचा राहता राजवाडा सोडून ज्या दिवशीं जोसेफाईन मालमेझांच्या वाड्याकडे निघाली त्यावेळी तिच्या सर्व परिवाराच्या डोळ्यांतून दुःखाश्रू निघाल्याशिवाय राहिले नाहीत !

त्यानंतर सहा वर्षें जोसेफाईन हिनें 'परित्यक्ता' म्हणून काढलीं. या काळांत तिच्याजवळ संपत्ति होती, पण वैभवानें सुखी होणारें मन नव्हतें. ज्यावर आपले प्रेम त्याला पहावयाचे नाही, ओठावर शब्द आले तरी बोलायचे नाही, हंसूं आले तरी हंसायचे नाहीं असा तो अज्ञातवास होता. जीवितहेतू संपल्यानंतरचे तें जिणें होतें. त्यांत आनंद कसला ? मत्सर किंवा द्वेष या भावना साऱ्या जन्मांत तिने कोणाबद्दलहि बाळगल्या नाहीत. आणि सारा जन्म अनेकांच्या आदरातिथ्यांत गेला. पण आतां तिच्याकडे कोणी कशाकरिता जावयाचे ? नेपोलियनने ऑस्ट्रियाच्या राजकन्येशीं लग्न केल्यानंतर त्याला मुलगा झाला, त्यावेळी सारें पॅरिस आनंदोत्सवांत उजळून निघालें. त्या बाळाला एकदां डोळे भरून आपणांला पाहातां येणार नाही काय ? पण आतां तें कसें घडणार ? तिच्या बलिदानानेच हा दिवस उगवला होता. तिच्या डोळ्यांत अश्रु पाहून एका मायेच्या मैत्रिणीने तिला जवळ केलें आणि तिला विचारलें, "तुझी इच्छा तृप्त झाली तर आतां तूं कां रडतेस?" जोसेफाईन म्हणाली, "त्याच्या सुखाशिवाय आणि इच्छेशिवाय माझी दुसरी कोणतीहि इच्छा नव्हती. पण हें सारें माझ्या बलिदानाने मी घडवून आणलें. बलिदानांत कांहीतरी यातना होणारच. मग मी तुमच्याजवळ पोटभर रडूंहि नये काय ?"

या नंतरचा नेपोलियनच्या अपकर्षाचा इतिहास सुप्रसिद्ध असल्याने त्याचा निर्देश अगदी थोडक्यांत करतां येण्यासारखा आहे. नेपोलियनचे दुसरें लग्न ही फार मोठी राजकीय चूक ठरली. आणि ऑस्ट्रिया हा शेवटपर्यंत फ्रान्सच्या मित्रपक्षांत न येता शत्रुपक्षांतच राहिला. १८१२ सालीं नेपोलियनला रशियावर स्वारी करण्याची दुर्बुद्धि सुचली. त्यात त्याचे अडीच लक्ष सैन्य गारद झालें. आणि त्यापुढील दोन वर्षांत सर्व युरोपने फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें त्यांत, ज्या भाऊ-बहिणी किंवा नातलगांना त्याने राज्यें दिलीं होतीं तेहि विरुद्ध पक्षाला जाऊन नेपोलियनचा पाडाव झाला ! नेपोलियन एल्बाहून

परत आल्यावर जोसेफाईन वारली होती. आणि वॉटर्लूच्या युद्धाला निघतांना आपणांस युद्धांत जय मिळेल असें त्याचे मनच त्याला सांगत नव्हतें. त्या युद्धांत पराजय झाल्यानंतर देशत्याग करितांना मालमेझांच्या राजवाड्यांत जाऊन, ज्या शय्येवर जोसेफाईन मृत्यू पावली तेथें कित्येक प्रहरपर्यंत नेपोलियन दिग्मूढ अवस्थेंत बसला होता. शुक्राचा तारा अस्त पावला होता. आणि त्या देवतेचा अनन्यभक्त अगतिकपणें अंधारांत चांचपडत होता! ज्या मृत्यूनें जोसेफाईनला जवळ केलें, त्याला नेपोलियनच्या अंतःकरणांतील हांक ऐकूं गेली नाही काय?

ललना—एप्रिल १९६०

★ ★ ★

# राणी कीं रखेली ?

नेपोलियनची प्रियतम सम्राज्ञी जोसेफाईन हिची हकिगत मागील प्रकरणांत सांगितली. त्याच्या दुसऱ्या राणीची, मेरि लुईसा हिची हकिगत आता सांगावयाची आहे. विसंगतीचें याहून मोठें उदाहरण आढळणार नाहीं. कारण अमृतसेवन केल्यानंतर आमटीचा भुरका मारण्याची इच्छा कोणी करीत नाहीं ! पण या बाबतींत इतिहासाचा खरोखरच नाइलाज आहे. अगदीं शहाणीं म्हणविणारी माणसेंदेखील बुद्धिभ्रंश झाल्याप्रमाणें विपरीत वर्तन करतात, आणि सर्वस्व गमावून हाय हाय करीत बसतात. मग असल्या विसंगतीची दखल इतिहासानें तरी का घेऊं नये ? सामान्य लोकांत वावरलेली पण अंगीं जन्मसिद्ध राज्ञीपदाचें गुण असलेली कोठें ती जोसेफाईन ; आणि राजघराण्यांत जन्म पावून मोठेपणाचा एक देखील गुण अंगीं नसलेली कोठें ती मेरी लुईसा भिकारीण !! पण जोसेफाईनला टाकून नेपोलियनला मेरी लुईसाशी लग्न करण्याची इच्छा झाली तेव्हांच त्याला भिकेचे डोहाळे लागले ! हें दुसरें लग्न तारीख एक एप्रिल रोजीं लागलें, तेव्हां सहजच नेपोलियनच्या नशिबीं " एप्रिल फूल " होण्याचें आलें. आणि तेंहि मूर्खपण असें तसें नव्हे; तर आयुष्याची आणि कीर्तीची देखील विटंबना होण्यासारखें.

आचरणानें नेपोलियनच्या कीर्तीची धुळधाण केली त्या स्त्रीची हकिगत लिहितांना इतिहास लेखकालाहि संकोच व उद्वेग वाटल्याशिवाय कसा राहील ? असो.

नेपोलियननें जोसेफाईनला काडी मोडून दिल्यावर एक महिनाभर त्यानें अत्यंत विमनस्क स्थितींत घालविला. त्याला खाणेंपिणेंहि सूचलें नाहीं. टुलरीजच्या राजवाड्यांतून जोसेफाईन गेल्यावर कांहीं तासांतच नेपोलियननेंहि तो वाडा सोडला आणि स्थलांतर करून तरी बरें वाटेल या कल्पनेनें तो ट्रायनन येथें जाऊन राहिला. या पहिल्या महिन्यांत जोसेफाईनशी त्याचा दररोज पत्रव्यवहार होता आणि तीं दोघें कितीहि समजूतदार विवेकीं असली तरी या दुःखामुळें जोसेफाईनच्या प्रकृतीवर परिणाम होऊं नये इतकी त्याला काळजी वाटत होती. एकदां त्यानें तिला ट्रायनन येथें जेवणास बोलावलें होतें व जेवणाचे वेळीं तीं दोघे, हारटेन्स व कॅरोलिन अशी चौघेच होतीं. तींच प्रेमाचीं माणसें, पण प्रसंग कसा विचित्र पाहा. जेवणांत लक्ष नसल्यामुळें जोसेफाईन दुसरीकडे पाहात होती. जेवतांना कोणीहि एकमेकांशी अक्षरसुद्धां बोलत नव्हते. आणि नेपोलियननें दोनतीन वेळां खिशांतील हातरुमालानें डोळ्यांतील आंसवें टिपून घेतलीं. मनांतलें दुःख एकमेकांना कळत होतें, पण याला उपाय नव्हता. आपल्याच हातानें त्यानें जाणूनबुजून हें पाऊल टाकलें होतें. म्हणून हें दुःख बाजूला सारून पुढल्या मार्गाला लागणेंच होतें.

याप्रमाणें दोन महिने घालविल्यानंतर वधूशोधनाकरितां नेपोलियन कामाला तांतडीनें लागला. रशियाच्या झारशीं त्याची अत्यंत दोस्ती होती. त्याच्या बहिणीशीं लग्न केलें तर युरोपच्या राजकारणांत रशियासारखी बलाढ्य सत्ता आपल्या बाजूस कायमची राहील असा त्याचा अंदाज होता. पण झारच्या आईनें निक्षून याविरुद्ध मत दिल्याकारणानें ती बाब रहित झाली. यानंतर ऑस्ट्रियाच्या राजकन्येचें नांव पुढें आलें. वास्तविक ऑस्ट्रिया फ्रान्सचा हाडवैरी. पंधरा वर्षें नेपोलियननें फ्रॅन्सिसशीं लढाया केल्या व ऑस्ट्रियाची धुळधाण केली. वंशानें पाहिलें तर हॅप्सबर्ग घराणें आणि फ्रान्सचें बुर्बोन घराणें यांचा नात्यानें जवळचा रक्तसंबध. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर बुर्बोन वंशाचा संपूर्ण उच्छेद करून नेपोलियन गादीवर आला, म्हणजे बुर्बोन घराण्याच्या मुळावरच आला नाहीं काय ? बिचारा सोळावा लुई व त्याची राणी मेरी

अंतोनात यांचा अवघ्या वीस वर्षांपूर्वी फ्रेंच लोकांनीं शिरच्छेद केला ! ही गोष्ट त्यांचे नातेवाईक कसें विसरतील ? या भावना विसरण्यासारख्या नव्हत्या. पण लगेच त्याचें स्वार्थी मन असा फसवा युक्तिवाद सांगे कीं, ऑस्ट्रियाची राजकन्या फ्रान्सची राणी होणें, म्हणजे पर्यायानें बुर्बोन वंशाचा नातेवाईकच गादाची अधिकारी होणें नव्हे काय ? निदान या गोष्टीनें तरी जुन्या राजपक्षीयांचें वैर सपावें ! तो स्वतः राजकुळांत जन्माला आला नाहीं त्याला आतां उपाय नाहीं. पण खुद्द ऑस्ट्रियाच्या राजकन्येशींच त्यानें लग्न केलें, म्हणजे तरी फ्रान्सची गादी ही परंपरेनें इतर घराण्यांहून कमी नाही असें लोकांनीं कां न मानावें ?

त्यावेळीं ऑस्ट्रियाचा चतुर वकील मेटर्निच पॅरिसमध्यें होता. त्याच्या मध्यस्तीनें ऑस्ट्रियाच्या बादशहाकडून या विवाहाला त्यानें संमति मिळविली. ही संमति त्यानें आनंदानें किंवा सुखासमाधानानें दिली असें नव्हें; कसेंहि करून ऑस्ट्रियाची धुळधाण थांबो, इतक्याच राजकीय विचारानें दिली. या विवाहानें फ्रान्स व ऑस्ट्रिया यांत प्रेम, सलोखा किंवा चिरकाल शांतता उत्पन्न होईल यावर मेटर्निच यांचा विश्वास नव्हतां ! आणि ऑस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सिस याचा त्याहून नव्हता ! ! पण नेपोलियन मात्र या मोहजालांत फसला ! गरजवंताला अक्कल नसते किंवा असली तरी त्यावेळीं नाहीशीं होतें याचें हें उत्तम उदाहरण होय. पिढ्यान् पिढ्या चालत आलेले आणि रक्तानें माखून निघालेलें वैर एका क्षणांत नाहींसें होणार; आणि केवळ एका लग्नसंबंधामुळें तेथें विश्वास उत्पन्न होऊन प्रेमाचें नंदनवन उभें होईल, हा केवढा भ्रम ? जोसेफाईननें एका पत्रांत ही गोष्ट त्याला स्पष्टपणें कळविली होती. पण विवेकाचा सडा तुटल्यामुळें नेपोलियनच्या बुद्धीचा पतंग गोते खात वाहतीला लागला होता. त्याच्या ही गोष्ट लक्षांतहि आली नाहीं !

मग नेपोलियनची पुरी फजिती करण्याच्या दृष्टीनें दैवानेंहि त्याच्या हेतूला साथ दिली ! सुमति, दुर्मति आणि नियति या अदृश्य रूपानें अंतरिक्षांत वावरणाऱ्या देवता जवळच होत्या. नेपोलियनच्या अंतर्मनांतील बेत आणि मनोराज्य ऐकून त्यांनाहि मौज वाटली.

सुमति दुर्मतीला म्हणाली, “ ताई ! ताई ! ऐकलास ना हा लग्नाचा

बेत. एका शहाण्या मनुष्यानें वेडे होण्याचा बेत केला आहे. अशा वेळीं तुझा पाय पुढें असेलच ? ”

दुर्मति म्हणाली—“ शहाण्या मनुष्याला मूर्खपणानें वागण्याची हौस आली तर आपण तरी ती मौज कां न पाहावी ? ‘ झोंपी गेलेला जागा झाला ’ त्याची गोष्ट तुला आठवते ना ? अबूल हसनचा बादशहा करणें आणि बादशहाचा पुनः अबूल हसन करणें, ही गोष्ट माझ्या तळहातचा मळ आहे. नेपोलियन बादशहाचा ‘ अबूल हसन ’ करायचा इतकंच ना ? ”

“ पण त्याकरितां आधीं त्याचें एकाद्या राज्यकन्येशीं लग्न लावून दिलें पाहिजे म्हणजे त्या नाटकाला खरा रंग येईल ” नियति म्हणाली. “ राजाच्या घरीं लग्न निघालें म्हणजे करवल्या हव्यातच. चला, आपण सर्वजणी त्या लग्नांत सामील होऊं म्हणजे शेवटपर्यंत आपणाला हा खेळ पाहावयास मिळेल ! ”

जोसेफाईनच्या लग्नविच्छेदानंतर बरोबर तीन महिन्यांनीं, ता. १५ मार्च सन १८१० रोजीं ऑस्ट्रियाच्या राजकन्येला मागणी होऊन साखरपुडा झाला आणि १ एप्रिल रोजीं पॅरिस येथें हें लग्न रजिस्टर पद्धतीनें झालें. वधूवरांची प्रथम भेट ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या सरहद्दीवर कॉंपीन या गांवीं ठरली होती. कारण फ्रान्सचा पूर्वींचा बादशहा सोळावा लुई आणि ऑस्ट्रियन राजकन्या मेरी अंतोनात या वधूवरांची भेट या गांवींच पडली होती. बुर्बान राजघराण्यांत ज्या ज्या प्रथा व संकेत पाळण्यांत येतात ते सर्व काटे-कोरपणानें व दक्षतेनें या लग्नांत पाळण्यांत आले होते. लोकांचा उत्साह किंवा पैशाचा खर्च यांत कमतरता नव्हती. आणि जणूं कांही आपलें हें पहिलेंच लग्न अशा समजुतीने लग्नाचा समारंभ—जेवणावळी, मानपान, देणग्या, दीपोत्सव, इत्यादि गोष्टी महिनाभर झडत होत्या !

मेरी लुईसा ही केवळ एकोणीस वर्षांची अल्लड तरुणी होती. ती मध्यम उंचीची, फुलासारखी टवटवीत, ताम्रगौर असून, प्रथमदर्शनी ती गर्विष्ट असावी असें वाटे. पण तिच्यांत कसलेंच व्यक्तित्व म्हणजे स्वतःची बुद्धि नव्हती. श्रीमंतांच्या घरीं वाढलेल्या मुली जशा सुस्वभावी आणि बावळ्या असतात त्यांतलीच ती होती. Innocent या शब्दाने तिचे चांगलें व वाईट दोन्ही वर्णन समर्पकपणाने होईल. एखाद्याला तोंडावर मूर्ख म्हणावयाचे नसले

म्हणजे चतुर मार्मिक माणसें 'इनोसेंट' या शब्दाचाच उपयोग करतात!! प्रेम किंवा स्त्री-पुरुषसंबंध तिच्या शिक्षणांतून इतक्या कटाक्षाने वगळण्यांत आला होता की सृष्टीची उत्पत्ति कशी होते किंवा परंपरा पुढें कशीं चालते या गोष्टीचें लग्न होईपर्यंत तिला काडीमात्र ज्ञान नव्हतें. तिच्या अनुचरांत सर्व स्त्रियाच होत्या, पुरुष एकहि नव्हता. लग्नापूर्वीं ज्या पुरुषाची तिची ओळख होती तो म्हणजे तिचा पिता. आणि आतां ज्या पुरुषाची तिची ओळख झाली तो म्हणजे नेपोलियन. इतिहास किंवा कथा-कादंबऱ्यांतून तरी पुरुषांच्या गोष्टी याव्यात ? पण ते ते भाग तिच्यावर सक्त देखरेख ठेवणाऱ्या शिक्षकिणी पुस्तकांतून कात्रीने कापून टाकीत असत. असे शिक्षण मिळालेली अल्लड कुमारी आतां फ्रान्सची राणी झाली होती !

जोसेफाईन आणि मेरी लुईसा या दोघींत किती अंतर आहे हें जाणत्या लोकांच्या लक्षांत यावयाला वेळ लागला नाहीं. जोसेफाईन व नेपोलियन वयानें बरोबरीचीं, सारख्याच अनुभवाचीं, सार्वजनिक जगाशीं समरस होणारी होती. या उलट मेरी लुईसा नेपोलियनपेक्षां वीस वर्षांनीं लहान असून त्याची मुलगी शोभली असती ! या स्त्रीला त्याचें मन काय कळणार ? आणि राजकारणांत तरी ती काय भाग घेणार ? जोसेफाईनच्या अंगीं परोपकार बुद्धि इतकी होती कीं हजारों लोकांचें ती मायपोट होती. कोणाहि याचकाला तिनें कधीं विन्मुख धाडलें नाहीं. अनेक कलावंत, फेरीवाले, उदमी, दुकान-वाले, रत्नपारखी वगैरे हजारों लोकांचा चरितार्थ जोसेफाईनवर अवलंबून असे व ते सर्वजण तिची फार आठवण काढीत ! मेरी लुईसाशीं कोणाचाहि संबंध येत नसे. ती सदासर्वकाळ आपल्या महालांत बसून असे. नेपोलियननें फक्त एक चालती बोलती बाहुली विकत घेतली होती. आणि मुलें ज्याप्रमाणें बाहुलीशीं खेळतात, तिच्यावर प्रेम करतात, त्याप्रमाणें तिचें मनरंजन करण्या-करितां तो आतां तासानुतास आणि दिवसानुदिवस वेळ खर्चित असे. पेश-वाईत अल्पवयीन मुलीशीं चौथें लग्न केलेले श्रीमंत जसे दिवस घालवीत तसा त्याचा कार्यक्रम होता. आणि इतक्या सगळ्या प्रियाराधनाचा हेतु काय ? तर पुत्रप्राप्तीची आशा ?

सुदैवानें ही गोष्ट सफल होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां दरबारांत इतर राजकारणाच्या सर्व गोष्टी पाठीमागें पडून, राणीसाहेबांना पुत्र होणार कीं

कन्यारत्न होणार, हाच सर्वांच्या चर्चेचा विषय होऊन बसला. प्रसूतीच्या रात्रीं राजवाड्याच्या खालच्या दालनांत अनेक उमराव, मुत्सद्दी, सरदार तसेंच दरबारी लोक जमा झाले होते आणि वरच्या मजल्यावर आप्त–स्वकीयांची गर्दी उडून गेली होती. हेतु हा कीं, मुलगा झाल्याची बातमी आपणांला आधीं कळावी. किंवा आपण ती इतरांना कळवावी. मेरी लुई-साला हें पहिलें बाळंतपण जिवावरचें गेलें. एका मागोमाग येणाऱ्या वेणा सहन होईनात. व वारंवार आक्रोश करीत ती निश्चेष्ट पडून होती. नेपो-लियनला तिचे हाल पाहावेनात. तो गोरामोरा आणि चिंताक्रांत होऊन शेजारच्या दालनांत जाऊन बसला. रणांगणावर शेंकडो मृत्यु व यातनांना तोंड देणारा नेपोलियन यावेळीं स्वतःच्या बायकोची तडफड पाहून अगदीं खचून गेला आणि उभे राहण्याचीदेखील त्याच्या अंगांत शक्ति राहिली नाही ! शस्त्रक्रिया करून पोट चिरण्याची वेळ येते कीं काय असाहि धास्तीचा समय आला होता. पण कशी तरी धडपड करून अखेर तिची सुटका झाली न ती सुखरूपपणें प्रसूत झाली. बायको जिवानिशीं सुटली याचा आनंद नेपोलियनला इतका झाला कीं, मुलगा झाला या गोष्टीकडे त्याचें किंवा इतरांचें प्रथम लक्षहि गेलें नाही. पण नंतर मुलगा झाल्याचें आढळतांच, ती बातमी प्रथम राजवाड्यांत व नंतर राज्यांत दाही दिशांना पसरण्याला वेळ लागला नाही. मुलगी झाली तर एकवीस तोफा, पण मुलगा झाला तर मात्र एकशें एक तोफा होतील असें राज्यांत आधीच जाहीर झालेलें असल्यामुळें, तोफांचे आवाज सुरूं होतांच लोक उत्कंठेनें लक्ष देऊन ऐकूं लागले. एकविसावी तोफ झाल्यावर ती उत्कंठा अगदीं शिगेला पोंचली. आणि बाविसाव्या तोफेचा धडाका ऐकतांच रस्त्यांत लोक अक्षरशः हर्षानें वेडे होऊन नाचूं लागले ! सर्व पॅरिस शहर दीपोत्सवानें उजळून निघालें. आणि आंत दिवे लावलेलें व गॅसनें भरलेलें प्रचंड विमान पॅरिसच्या तळावरून आकाशांत निघालें तें उंच उंच जात सर्व जगभर ही आनंदाची बातमी घोषित करण्याकरितां वारा नेईल तिकडे आकाशमार्गानें जाऊं लागलें. या पुत्रजन्मामुळें नेपोलियनच्या आनंदाचा कळस झाला ! आणि आपणाइतका सुखी मनुष्य साऱ्या जगांत दुसरा कोणीहि नसेल असें त्याला वाटूं लागलें ! त्या आठवड्यांत डाकेला दुसरा विषय नव्हता. नेपोलियननें कित्येकांना

स्वहस्तें पत्रें लिहिलीं. त्यांत स्मरणपूर्वक एक पत्र जोसेफाईन राणीला होतें—
" प्रियतम जोसेफाईन ! मला मुलगा झाला. माझ्या सुखाची परमावधि झाली ! "

नेपोलियनचा मुलगा ही त्याचीच प्रतिकृती होती. तो त्याच्या रक्तमांसाचा होताच, पण त्याच्या सर्व भावना, संस्कार, वासना, आणखी जें जें असेल तें तें सर्व त्या मुलांत प्रतिबिंबित झालें होतें. चंद्रबिंब कलाकलांनीं वाढावें, किंवा पाकळीपाकळीनें फूल विकसित व्हावें त्याप्रमाणें, वर्ष दोन वर्षांच्या अवधींत त्या मुलानें इतके गुण प्रकट केले की त्यानें नेपोलियनला वेड लावलें. त्याला वाटे हा खरा जन्मसिद्ध राजा ! आपणापेक्षां याचें राजतेज कांहीं आगळेंच आहे ! कारण त्यानें राजकन्येच्या पोटीं जन्म घेतला आहे ना ! सामान्य माणसाची राजकुलाबद्दल अशीच भाबडी भावना असते. पण असें ' नेपोलियन 'ला वाटलें हें विशेष नव्हे काय ? या राजपुत्राकरितां त्यानें एक टोलेजंग प्रासाद सीन नदीच्या उत्तर तीरावर बांधण्याचें ठरविलें. या राजवाड्याची कल्पना इतकी भव्य व विस्तीर्ण होती कीं पॅरिसमधील सर्व इमारतीपेक्षां ती सुंदर व उठावदार झाली असती. पण दुर्दैवानें ही इमारत प्रत्यक्षांत कधींच अस्तित्वांत आली नाहीं. या मुलाची जोपासना मादाम मॉनतेस्क्यू या अनुभविक स्त्रीकडे होती. तिच्या हाताखालीं गव्हेंनस् म्हणून चार हुशार स्त्रिया, एक अंगापिंडानें सशक्त आणि उत्तम दूध असलेली दाई; शिवाय पांचपंचवीस दासदासी होत्या त्या वेगळ्याच.

पण नवल असें कीं, अंतःकरणाच्या मायेची ऊब जितकी नेपोलियनच्या अंगीं होती तितकी स्वतः मेरी लुईसा हिच्या अंगी नव्हती. नेपोलियनचें मुलाबद्दलचें उत्कट वात्सल्य पाहून त्या मुलाला स्वतः अंगाखांद्यावर घेण्याची तिला भीति वाटत असे. न जाणों त्याची मान अवघडली किंवा कांहीं दुखावलें तर ग्या काय ? म्हणून त्याला ती स्वतः फारसा हातहि लावीत नसे. या मुलाला एकदा डोळे भरून पाहावें असें जोसेफाईनला फार वाटे. पण नुसती ती भेटीला येण्याची गोष्ट नेपोलियननें मेरी लुईसा हिचेजवळ काढतांच, तिनें रडून इतका आकांत केला कीं, नेपोलियनला तो बेत सोडून द्यावा लागला ! मग नेपोलियननें एकदां स्वतःच या मुलाला घेऊन ट्रायन-

नच्या बागेंत फिरवून आणण्याचा बेत केला, आणि ओझरतें कां होईना या मुलाचें दर्शन जोसेफाईनला घडविलें.

कसें एकेकाचें नशीब असतें पाहा; हा मुलगा दहा बारा वर्षे अगोदर जन्मता तर नेपोलियनच्या वैभवाचा ऐन मध्यकाळ त्याला पहा-वयास सांपडला असता ! पण नेपोलियनचा भाग्यसूर्य अस्ताकडे कलण्याला सुरुवात झाली तेव्हां त्याचा जन्म झाला ! या मुलाला बापाचा सहवास अवघा तीन वर्षेंच लाभला. आणि पुढें त्याचें सर्व आयुष्य जगाच्या दृष्टीआड अज्ञातवासांत किंवा नजरकैदेंत जावयाचें होतें. पण या पहिल्या वर्षांत त्या चिमखड्या अर्भकानें टेप रेकॉर्डिंगप्रमाणें इतके संस्कार आपल्या अंतःकरणांत सांठविले होते कीं, आपल्या बालवयांत पाहिलेलें सर्व वैभवशाली विश्व त्याला पुढें निरंतर आठवत होतें. त्याच्या जन्मानंतर एकाच वर्षानें नेपोलियननें रशियाची आत्राढव्य स्वारी करण्याचें काम अंगावर घेतलें; आणि त्यांत त्याचें दोन अडीच लक्ष सैन्य गारद झालें ! यानंतर नेपोलियनचा पडता काळ आला. इतर राष्ट्रांनीं त्याचे विरुद्ध कंबर कसली. आस्ट्रियाच्या बाद-शहावर त्याचा विश्वास होता. पण तेथेंहि अविश्वासाचे सुरुंग पेरलेले त्याला आढळून आलें प्रत्यक्ष मुलीचा बापच तिच्या विरुद्ध उठला; प्रत्यक्ष आजाच आपल्या नातवाचा शत्रू बनला, हें दृश्य कोणाचेंहि अंतःकरण विदीर्ण करण्या-सारखें होतें. पण हें राजकारण आहे. राजकारणाइतकें निर्दय आणि स्नेह-शून्य जगांत दुसरें कांहींहि नसेल ! या बाबतींत जोसेफाईनचेच शब्द खरे ठरले. ती त्याला म्हणाली होती, “ ऑस्ट्रिया व फ्रान्स हे तीन पिढ्यांचे जन्मसिद्ध हाडवैरी आहेत ! जोपर्यंत नेपोलियन बलिष्ट आहे तोपर्यंतच ऑस्ट्रिया नमून वागेल. पण एकदां त्या सत्तेला उतरती कळा लागली असें दिसलें, कीं ऑस्ट्रिया डोकें वर काढील, आणि मैत्रीची भाषा साफ झुगारून देईल !”

रशियाचे स्वारीपूर्वी आस्ट्रिया अंतस्थपणें शत्रुपक्षांत होता; त्यानंतर उघड-पणानें शत्रुपक्षांत मिळण्याची त्याची तयारी झाली. नेपोलियनचा मेटर्निचचे मैत्रीवर विश्वास होता; कारण त्यानेंच हें दुसरें लग्न जमवून दिलें होतें. पण नंतर त्याला आढळून आलें कीं, मेटर्निच याचीं बोलणीं जरी मखमालीनें मढविल्याप्रमाणें मृदु दिसलीं तरी त्या पाठीमागची मूठ पोलादी होती ! तो कसलेला मुत्सद्दी होता. तो कोणताच सामोपचार ऐकेना; आणि अशा अप-

मानकारक अटी सांगूं लागला कीं, तहाचें बोलणें अशक्य व्हावें ! हें पाहून नेपोलियन उद्वेगानें म्हणाला, " युद्ध करण्याची या राष्ट्रांना जर इतकी खुमखुम असेल, तर अंतःकरणाची तृति होईपर्यंत त्यांची इच्छा पुरी होईल ! तैमूरलंगाप्रमाणें मला कैदी म्हणून एकाद्या पिंजऱ्यांत फिरविण्याची यांची इच्छा दिसते ! पण सिंहाला चवताळून सोडणें हें किती भयंकर आहे हें त्यांच्या प्रत्ययाला येईल ! "

इतकें सगळें होत असतां मेरी लुईसा हिचे असें कधींहि मनांत आलें नाहीं कीं, आपल्या बापाकडे धांव घ्यावी आणि ऑस्ट्रियानें तटस्थवृत्ति स्वीकारावी अशी त्याची विनवणी करावी. हें त्यावेळीं अगदीं शक्य होतें; पण तिनें केलें नाहीं ! युद्धाला निघतांना आपल्या पश्चात् नेपोलियननें राणी मेरी हिला राज-प्रतिनिधी नेमलें. तिला व राजपुत्राला शाही पथकाचे हवालीं करून जातांना नेपोलियनला गहिंवरून आलें. पॅरिसचें रक्षण कसोशीनें करावें व काय वाटेल तें झालें तरी आपली राणी व मुलगा यांना शत्रूचे ताब्यांत देऊं नये. ही जबाबदारी आपला भाऊ जोसेफ यानें पत्करावी असें ठरलें होतें. या युद्धांत नेपोलियननें जीं वीरकृत्यें केलीं व लष्करी हालचाली केल्या त्या कोणालाहि आश्चर्यानें थक्क करून सोडण्यासारख्या होत्या. सर्व युरोपच्या सैन्याचा दळभार फ्रान्सवर उठलेला पाहून त्याची वृत्ति अत्यंत प्रक्षुब्ध होऊन गेली. अनेक ठिकाणीं त्यानें शत्रूचा पराभव केला. पण सर्व आघाड्यांवर तो एकटाच लढणें शक्य नसल्यामुळें शत्रू-सैन्याच्या टोळ्या पॅरिसपर्यंत पोंचल्या !

मग राणी व राजपुत्र यांनीं पॅरिसमध्यें राहून राजधानी लढवावयाची, कीं त्यांना दुसरीकडे हलवावयाचें असा रोकडा प्रश्न उत्पन्न झाला. आणि त्याबाबत नेपोलियनचा भाऊ जोसेफ, राणी, प्रधानमंडळ यांचीं खलबतें होऊं लागलीं. मेरी लुईसा साऱ्या मुलखाची भित्री होती. तिचें मन पळ काढण्याकडे झुकत होतें. जोसेफ याचा सल्लाहि तोच होता. नेपोलियनची आई तेथें होती; तिला मेरी लुईसा हिनें विचारलें; तिनें उपरोधिकपणानें इतकेच उत्तर दिलें कीं, " तुझी कीर्ति व दर्जा याला शोभेल असें वाग म्हणजे झालें !" जोसेफाईनची मुलगी हॉरटेन्स राणीला म्हणाली, " यावेळीं पॅरिस सोडून पळून जाणें म्हणजे राजमुकुट गमावणें आहे ! नुसता तुमचाच

नव्हे, तर मुलाचाहि !" पण ज्याच्या अंतःकरणांत धीर नाहीं त्याला हे हिताचे शब्द रुचले नाहींत. राजपुत्राला घेऊन पळून जाण्याचेंच तिनें अखेर ठरविलें. आणि तें सुद्धां कोठें ? तर आपल्या पित्याकडे, म्हणजे शत्रुपक्षाकडे !

बिचारा नेपोलियनचा मुलगा यावेळीं अवघा तीन वर्षांचा म्हणजे खरो-खरीच अर्भक होता. घाईनें राजवाडा सोडून जाण्याकरितां खालील चौकांत धांवपळ सुरू होऊन जेव्हां तमाम गाड्यांची रांग लागली तेव्हां त्यानें रडून आकांत केला. "तिकडे बाबा शत्रूशीं लढण्याला गेले असतां मी हा राजवाडा सोडून जाणार नाहीं. या तरवारीनें मी शत्रूशीं लढेन !" असा त्यानें पुष्कळ आक्रोश केला. त्याला नेण्याकरितां आलेल्या दासींच्या अंगाला चावे घेतले, दिवाणखान्यांत बिछायती व पडदे यांना घट्ट धरून ठेवलें. पण त्याच्या सत्या-ग्रहाचा कांहींहि उपयोग न होतां, दाईनें त्याला बळजबरीनें ओढून गाडींत बसविलें ! या मुलाला आपल्या बापाचें दर्शन त्यानंतर कधींहि घडलें नाहीं ! आणि नेपोलियन पॅरिसकडे आल्यानंतर तोफेचा एक देखील गोळा न उडतां आपली राजधानी शत्रूचे ताब्यांत गेली, आणि आपली राणी व मुलगा परागंदा झालेली पाहून त्याची मनःस्थिति किती दारुण झाली असेल याची वाचकांनीच कल्पना करावी !

यानंतर पॅरिसच्या तहान्वयें नेपोलियननें राज्यावरील सर्व हक्क सोडून देऊन त्यानें एल्बा बेटाचा बादशहा व्हावें, आणि मेरी लुईसा हिला पार्मा परगणा आंदण मिळावा वगैरे शर्ति ठरल्या. त्याप्रमाणें नेपोलियन एल्बा-कडे रवाना झाला. त्याचें राज्य गेलें, पण तो स्वतः, राणी लुईसा किंवा तिचा मुलगा ही कैदी नव्हती, स्वतंत्र होती. आणि मुलाला घेऊन एल्बा येथें नेपोलियनकडे तिला केव्हांहि जातां आले असतें. पण प्रकृति किंवा औषधोपचार या सबबीखालीं तिनें टाळटाळ चालविली. आपल्या मुलाबद्दल नेपोलियनचें मनांत फार उत्कंठा होती आणि त्याला घेऊन लुईसा आज येईल, उद्यां येईल अशी तो उत्कंठेनें वाट पाहात होता. पण एका वर्षांतहि ती गोष्ट घडून आली नाहीं ! याचें कारण, मेरी लुईसा हिच्या सर्व हाल-चाली तिचा बाप फ्रान्सिस व त्याचा मुत्सद्दी मेटर्निच यांच्या धोरणानें नियंत्रित होत असत ! त्यांनींच तिला दुर्मार्गाला लावलें. मेरी लुईसा हिचे अंगीं स्वाभिमान किंवा स्वतःचें व्यक्तित्व असतें तर तिनें खात्रीनें यांतून

वाट काढली असती. पण तें कांहीहि न करतां, काउंट निपर्ग या नांवाच्या एका सामान्य जर्मन शिलेदाराच्या प्रेमपाशांत पडून तिनें ख्याली-खुशालींत दिवस काढण्याचें ठरविलें. या तिच्या प्रियकराला त्याची पहिली विवाहित स्त्री व पांच अपत्यें होतीं. वयानें तो ३९ वर्षांचा असून 'एकाक्ष' होता ! बोलतांना आंधळा डोळा दुसरीकडे करून व मान एकीकडे करून बोलण्याची त्याला संवय होती. यामुळें एखादा निर्ढावलेला बेरड पळून जातांना किंवा झुकांडी देतांना जसा दिसतो तसा त्याचा थाट दिसत असे ! पण असेंहि असून बदफैलीपणांत मात्र तो प्रवीण असे. तेवढी विद्या त्याला उत्तम येत होती. "लता ही नेहमीं जवळ असणाऱ्या वृक्षाला आलिंगन देते !" अशी म्हण आहे, ती मात्र मेरी लुईसानें खरी केली ! पण ही लताहि भिकारच होती आणि ज्या झुडपाचा तिनें आश्रय केला तें रोपटेंहि क्षुद्र व विषारी होतें. कोठें तो साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेणारा आणि आकाशाशीं स्पर्धा करणारा नेपोलियनसारखा महावृक्ष; आणि कोठें हा लाचारी आणि पापकर्दमांत लोळणारा काउंट निपर्ग ! याहून जगांत विपरीत किंवा विचित्र काय असेल ? पण अशाहि गोष्टी घडतात हेंच खरें !

मेरी लुईसाची अशी कल्पना होती की, नेपोलियनची सद्दी आतां संपली. एल्बाहून तो परत येणें किंवा त्याला पुनः राज्य मिळणें ही अशक्य गोष्ट आहे. पण नेपोलियन जसा ईजिप्तहून परत आला तसा खरोखरच एल्बाहून निघून त्याने फ्रेजस बंदरांत पाऊल ठेवलें आणि पुनः फ्रान्सची गादी लोकांच्या जयजयकारांत हस्तगत करण्याला त्याला पंधरा दिवसहि लागले नाहीत ! पतिपत्नि-मीलन होण्याला ही एक सुवर्णसंधि आली होती. आणि अपत्यस्नेहाने आर्त झालेल्या नेपोलियनने लुईसाच्या अपराधांची क्षमा केली असती. पण नेपोलियनकडे जाण्याला लुईसाला तोंडच उरलें नव्हतें. कारण यावेळी काउंट निपर्गपासून ती गरोदर राहिली होती !

योगायोगाने या काउंट निपर्गची बायको १८१५ साली वारली. आणि उजळ माथ्याने लुईसावर प्रेम करण्याला तो मोकळा झाला. पण नेपोलियन जिवंत असतांना लुईसाचा माथा उजळ होता काय ? हजारों माणसें नेपोलियन व लुईसा यांचे लग्नाला हजर होती त्याची वाट काय ? मग तिच्या स्वार्थी मनाला तसलाच उपदेश करणारे मायावी हितचिंतक आणि कायदे-

पंडित भेटूं लागले ! त्यांनी असा आव आणला की मेरी लुईसा व नेपोलियन यांचे लग्न मुळी कायदेशीर रीतीने झालेलेंच नव्हतें ! नेपोलियन व जोसेफाईन यांचे लग्न ख्रिस्ती विधिपूर्वक स्वतः पोपने लावलें; आणि तें रद्द करण्याचा अधिकार फक्त पोपशिवाय दुसऱ्या कोणासहि नव्हता. याचा अर्थ असा की जोसेफाईन हीच त्याची अद्यापहि धर्मपत्नि होती ! आणि हे म्हणणारे कोण ? तर स्वतः मेरी लुईसाच ! ! जोसेफाईनला राज्ञीपदापासून वंचित करून जी स्त्री तिच्या उरावर पांच वर्षे नाचली ती मेरी लुईसाच हा युक्तिवाद तोंडाने बोलू लागली ! ज्या स्त्रिया स्वैर आचरण करतात त्याकडे जगाने लक्ष देण्याचेंहि कारण नाही. पण त्यांचा युक्तिवाद खरा मानून आज १९४७ साली त्यांचे समर्थन करणारे डॉर्मर क्रेस्टनसारखे इतिहासकार किंवा चरित्रलेखक भेटतात ही आश्चर्याची गोष्ट नाही काय ?

नेपोलियनची सेंट हेलिनाला रवानगी झाल्यानंतर मेरी लुईसा हिला निपर्गपासून आणखी चार पांच मुलें झाली ! तिचें हें आचरण इतकें अधम होतें कीं, इतिहासानें या स्त्रीचें नांव पुसून टाकून मौन स्वीकारलें आहे. आणि आम्हांलाहि एका थोर मनुष्याच्या स्त्रीची हीन बाजू लिहितांना शरमेनें खाली मान घालावीशी वाटतें ! नेपोलियनच्या ऐश्वर्याचा अस्त पाहिलेल्या त्याच्या मातृदेवतेवर दुःखांत भर म्हणून आपल्या सुनेचें स्वैराचरण आणि अपकीर्ति पाहण्याचे दिवस आले. उद्वेगानें ती म्हणाली, “ मेरी लुईसा ही नेपोलियनची केवळ ‘ रखेली ’ होती, याहून तिची योग्यता आम्ही मानीत नाहीं ! ” तिने आपल्या नवऱ्याला मर्मांतिक दुःख दिलें आणि मुलाच्या जन्माचेंहि वाटोळें केलें ! यावेळीं जोसेफाईन मृत्यु पावली होती म्हणूनच पुढचे अपकीर्तीचे दिवस तिला पाहणें टळले. पण सर्व लोक नंतर तिची आठवण फार फार काढीत. ते म्हणत, “ कोठें ती राणी जोसेफाईन, आणि कोठें ही रखेली ! तें चित्र पाहा, आणि हें चित्र पाहा ! ”

( ललना–मे १९६० )

★ ★ ★

# नेपोलियनचे धर्मविषयक विचार

माझ्या मनोमंदिरांत दोन व्यक्तींनी चिरस्थान मिळविलेलें आहे. एक नेपोलियन बोनापार्ट व दुसरे स्वामी विवेकानंद. समुद्राला जशी पौर्णिमेच्या चंद्रदर्शनाने भरती येते त्याप्रमाणे विवेकानंद किंवा नेपोलियन यांचें कोठेहि चित्र दृष्टीस पडलें तरी माझ्या मनांत अनुराग, आपलेपणा उत्पन्न होतो. ही नुसत्या चित्राची गोष्ट, मग ज्या वेळीं हीं माणसें लोकांपुढे साक्षात् वावरत होतीं त्या वेळीं हजारो लाखो लोकांवर त्यांनी कशी मोहिनी पाडली असेल हें सांगण्याचें कारण नाही. कोणी म्हणेल, नेपोलियन किंवा स्वामी विवेकानंद यांची तुलना तरी कशी होते? एक विरक्त साधु संन्यासी, तर दुसरा ऐहिक राजस महत्त्वाकांक्षेच्या पाठीमागे लागलेला क्षत्रिय वीर. एकाने शाश्वत आनंदाची प्राप्ति करून घेतली तर दुसऱ्याचे नशिबी अपयश, निराशा व दुःख आलें. हें जरी खरें असलें तरी ही तुलना अशी करावयाची नसते. मोठेंपण हें सगळें एकाच ठराविक सांच्याने मोजीत नाहीत. जगांत व्यास-वाल्मीकि झाले तसेच राम, कृष्ण, शिवाजी वगैरे क्षत्रिय वीरहि झाले. आणि धर्मचिंतन करण्याला विरक्त साधु संन्यासी किंवा शंकराचार्यांसारखे ब्रह्मचारी अवश्य असले तरी, समाजांत वर्णव्यवस्था आणि धर्मस्थापना करण्याला राजसत्ता आणि क्षत्रियांचें बाहुबलच उपयोगी पडलेलें आहे. नेपोलियनच्या धर्मविचारांचें महत्त्व या दृष्टीनेच आहे. भारतीय इतिहासांत जे राजे अजरा-

मर झाले त्यांच्या बिरुदावलींत त्यांनी केवळ दिग्विजय करून पृथ्वी पादाक्रांत केली एवढेंच नसतें. तर त्यांनी समाजांत वर्णव्यवस्था उत्पन्न करून ‘ धर्म-स्थापना ’ केली असेंहि लिहिलेलें आढळतें. याचाच अर्थ, त्यांच्या शाश्वत कीर्तीचें अधिष्ठान त्यांनी केलेल्या धर्मस्थापनेंत होतें. नेपोलियनच्या हातून हेंच घडलें. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं फ्रान्स निरीश्वरवादी बनलें होतें व खिस्ती धर्माची राज्यांतून साफ हकालपट्टी झाली होती. धर्मोपदेशकाचें कोणी तोंडहि पाहण्यास तयार नव्हतें. हें सर्व बदलून टाकून नेपोलियनने राष्ट्रांत पुनः अधिकृत रीतीने खिस्ती धर्माची स्थापना केली हेंच त्याच्या खऱ्या मोठेपणाचें लक्षण होय.

अगदी लहानपणीं नेपोलियन देवळांत जाऊन प्रार्थना करण्याला खळखळ करीत असे. त्या वेळीं त्याची आई लिटिशिया ही त्याच्या कानशिलांत एक सडकून चापट मारून त्याला शिक्षा करीत असे. कारण ती स्वतः परम धार्मिक असून दररोज देवळांत जाऊन प्रार्थना केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसे. या गृहशिक्षणाच्या संस्काराचा मुलाच्या मनावर कायमचा ठसा उमटला. एरवी, शिक्षणाकरितां दहाव्या वर्षीं घरापासून दूर परदेशांत राहिलेल्या नेपो-लियनच्या मनावर अन्य संस्कार कोणकोणते झाले असते, आणि विचारांत तो किती वाहवला असता हें सांगवत नाही. फ्रेंच राज्यक्रांतींत राजकीय स्वातंत्र्याच्या नांवावर जसे अत्याचार झाले तसे धार्मिक स्वातंत्र्याच्या नांवा-वरहि झाले. मंदिराची मोडतोड होऊन देवतांचें पुतळे फेकून दिले गेले. महिन्यांचीं जुनीं नांवें बदलून नवीं आलीं. नास्तिक तत्त्वज्ञान आलें. सात दिवसांचा आठवडा बदलला. कारण प्रार्थनेचा रविवार शेवटीं येतो म्हणून! मग धर्मप्रवचन करणारे धर्मोपदेशक हे ‘ गुन्हेगार ’ ठरले असतील हें सांगण्याचें कारणच नाहीं. पण नेपोलियनने सर्वाधिकार घेतल्यावर हळूहळू या भ्रष्टाचाराला पायबंद घातला आणि स्वतः बादशहा झाल्यावर तर त्याने अधिकृत रीतीने फ्रान्समध्ये खिस्ती धर्माची स्थापना केली. त्या वेळीं पोपला तसेंच त्याच्या आईलाहि फार आनंद झाला. मोठ्या कौतुकाने ती नेपो-लियनला म्हणाली, “ पूर्वीप्रमाणे आतां तुझ्या कानशिलांत चापट मारण्याचें मला कारण उरलें नाहीं ! ”

जीं खरींखुरीं मोठीं माणसें असतात त्यांना दुसऱ्याचें मोठेपण, मग तें

कोणत्याहि प्रांतांतलें असो, लक्षांत येण्याला वेळ लागत नाहीं. ॲलेक्झांडरची एकदां एका तत्त्ववेत्त्याशीं गांठ पडली, तेव्हां तो सकाळच्या थंडींत थोडें उन्ह खात बसला होता. ॲलेक्झांडरने त्याला विचारलें, " तुम्हांला मी काय द्यावें अशी तुमची इच्छा आहे ? मागून घ्या. " तो तत्त्ववेत्ता म्हणाला, " माझ्या अंगावरचें तेवढें उन्ह सोडून बाजूला व्हा ! " फिरोजशहा तघलख बादशहाची अशीच एक गोष्ट सांगतात. या फिरोजशहाला विद्वान माणसांची मोठी आवड असून त्यांनीं कांहींहि बोललेलें त्याला खपत असे. एकदां फिरोजशहा स्नानानंतर टॉवेलने आपलें अंग कोरडें करीत असतां एका आवडत्या विद्वानाशीं बोलत होता. बादशहा विनोदी होता. तो सहज म्हणाला—" उद्यां बाजारांत मला विकायला काढलें तर किती किंमत येईल ?"

विद्वान् म्हणाला, " येईल चार दिनार ! "

" काय चारच दिनार ? या टॉवेलचीच किंमत चार दिनार आहे. "

यावर विद्वान् म्हणाला, " मी तरी त्या टॉवेलचीच किंमत बोललों ! "

यावर बादशहा हसूं लागला. आपणाला विकून एक फुटकी कवडी देखील येणार नाहीं, असें थट्टेत का होईना पण निःस्पृहपणाने बोलणाऱ्या विद्वानाची या बादशहाला कदर होती. नेपोलियनची विख्यात जर्मन लेखक गटेशीं गांठ पडली तेव्हां त्याने प्रथम दर्शनींच असें उद्गार काढले कीं " अहाहा, गटे हा केवढा थोर पुरुष ! " याचाच अर्थ, विभूतिमत्व हें सर्वस्पर्शी असतें. पूर्वकर्मानुसार किंवा परिस्थितीनुसार त्याचें जीवितकार्य ठरलेलें असेल पण इतरत्र असलेले थोरपण त्याला चटकन् समजतें.

नेपोलियन स्वतः धर्मोपदेशक नसला तरी धर्माचें मोठेपण त्याला मान्य होतें. तो स्वतः विद्वान् असल्यामुळें मोठमोठे तत्त्ववेत्ते व धर्मसंस्थापक यांचे-बद्दल त्याला फार आदर होता. एकदा तो म्हणाला, ' महंमद पैगंबर हा माझ्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ मनुष्य होऊन गेला. माझें राज्य वीस वर्षेंहि राहिलें नाहीं. पण पैगंबराने लोकांच्या मनावर स्थापलेलें अधिराज्य आणि समाजव्यवस्था आज बाराशें वर्षें अबाधित टिकली आहे ! " त्याने इजिप्त-वर स्वारी केली तेव्हां इंग्रजांना शह देण्याकरितां पुढे हिंदुस्थानांत येण्याचा त्याचा विचार होता. इजिप्तच्या स्वारीवर निघतांना त्याने कोणते ग्रंथ बरोबर घेतले होते त्याची यादी उपलब्ध आहे. त्यांत भारतीय तत्त्वज्ञानाचा

इतिहास १२ खंड, वेद पुराणें, बायबल, कुराण, जस्टिनचे कायदे, टॅसिटस टयुसिडायडीसचा प्राचीन इतिहास, होमरचीं महाकाव्यें, प्लूटार्कचीं चरित्रें वगैरे इतर अनेक ग्रंथ आहेत. आपल्या स्वारीबरोबर अनेक संशोधक व विद्वानहि त्याने चर्चा करण्याकरिता नेले होते. या स्वारीचा उद्देश अर्थात् राजकीय होता. परंतु आशियांतल्या अनेक देशांत राजकारणाइतकेंच धर्माचें प्राबल्य आहे ही गोष्ट त्याचें लक्षांत होती. राजकारण व धर्म या दोहोंकडे पाहातांना त्याची दृष्टि कार्यसाधक होती. एकट्या पोपला मान दिल्याने जर लाखो लोकांवर सुखानें राज्य करितां येतें तर, त्याचेबद्दल आदर दाखविण्याला हरकत कसली? पोप म्हणजे धर्म या संस्थेचें प्रतीकच ना?

नेपोलियन सेंट हेलिना येथें असतांना त्याने धर्मासंबंधीं व्यक्त केलेले विचार खुलासेवार पाहावयास सापडतात. कारण आत्मविचाराला कारागृहाच्या एकांतवासाइतकें उत्तम स्थळ कोणतें? आणि तेंहि सर्व महत्त्वाकांक्षा आणि वैभव यांचा दारुण शेवट आपल्या डोळ्यांनीं पाहिल्यावर! साहजिकच या जगांतील कर्ताकरविता दुसराच कोणीतरी आहे, आणि मनुष्य कितीहि पराक्रमी असो, नियतीच्या हातांतलें तो केवळ बाहुलें आहे ही गोष्ट मनांत आपोआप उदय पावते. "Deeds of glory return but to the grave!" म्हणजे केवढाहि पराक्रम, कीर्ति किंवा वैभव असो, त्याचा शेवट चिताभस्मांत होतो. विनाश हेंच त्याचें अंतिम स्वरूप. मग ख्रिस्ताप्रमाणें ज्या भाग्यवान् महाभागांनी ऐहिक जगाचें हें नश्वर स्वरूप ओळखून वैराग्य हीच खरी संपदा मानली, ते आपणांपेक्षां शतपटीनें मोठे नव्हेत काय? सेंट हेलिनाच्या बंदीवासांत अशाच विचारांचा त्याच्या मनांत उदय झाला. त्याच्या परिवारांतील काउंट बारत्रां हा पक्का नास्तिक होता. आत्म्याचें अस्तित्व, ईश्वर, जीजस वगैरे तो कांहींच मानीत नसे. त्याच्याशीं बोलतांना नेपोलियन म्हणाला, "मी राज्यावर असतांना, माझ्या भोवतालचे सर्व सेनापति धर्म न मानणारे आहेत हें मला माहित होतें. म्हणून मी ख्रिस्तानुयायी आहें असें उघडपणें मी म्हणत नसे. पण मला वाटतें की, कोणी मानेवर तरवार ठेवून मला विचारलें असतें तरी मी सांगितलें असतें की, होय मी आस्तिक आहें. ख्रिस्ती सद्धर्मावर माझी श्रद्धा आहे. सेंट हेलिना येथें आल्यावर आतां तोहि प्रश्न नाहीं. येथेंच प्रतिकमय मंदिर उभें करून दर रविवारी मी प्रार्थना करणार आहे."

काऊंट बारत्रांकडे वळून तो म्हणाला, " शरीरापलीकडे आत्मा म्हणून कोणी आहे ही गोष्टच तुमचे लक्षांत कशी येत नाही कोण जाणे. पलीकडे रानांत तो गुराखी गुरें चारीत आहे. त्याचा आत्मा तुझ्याहून वेगळा नाहीं. त्याच्या पलीकडे गाई घोडीं वगैरे जनावरें आहेत. त्यांनाहि आत्मा म्हणून कोणी आहेच. यांत फरक फक्त बाह्य परिस्थिति व शिक्षण संस्कृति यामुळें पडेल तितकाच. पण जीवमात्रांत मन बुद्धि इत्यादि उत्पन्न करणारा, म्हणजे, यांचेंहि अनादिकारण कोणी असेलच. त्यालाच ' ईश्वर ' म्हणावयाचें. तो अनादि अनंत विश्वव्यापी आहे. त्याच्या पुढें तूं, मी स्वतः नेपोलियन, किंवा त्याची अचाट बुद्धिमत्ता हीं खरोखर नांव घेण्याच्यादेखील योग्यतेचीं नाहींत. अफाट समुद्रकिनाऱ्यावर पसरलेल्या वाळूच्या एका क्षुद्र कणाइतकी तरी आपली किंमत आहे काय ? विश्वांत व्यापून उरलेल्या ईश्वराचें अस्तित्व मला प्रत्यक्ष भासमान होतें. तुला जर तें समजत नसेल तर, गड्या, तूं दुर्दैवी निपजलास असें म्हटलें पाहिजे ! मनुष्याचे सगळे दोष मला चालतील पण जडवादी मनुष्य मला खपणार नाही. असल्या मानसिक विकृतीने माझ्या तर अंगावर कांटाच येतो ! चैतन्याने भरलेल्या मनुष्यदेहाकडे पाहूनहि, तो केवळ मातीचा गोळा म्हणून कोणी भौतिकवादाच्या गोष्टी सांगूं लागेल, तर त्याला मी कधीहि क्षमा करणार नाहीं ! "

एकदां जनरल बारत्रां त्याला म्हणाला, " येशूखिस्ताला आपण कितीहि थोर म्हटलें तरी, तो केवळ मानवदेहधारी विभूतीच ना ? ऑराफियस कन्फ्यूशियससारखा तो अत्यंत प्रज्ञावान असेल, किंवा सीझर ॲलेक्झांडर किंवा तुम्ही स्वतः याप्रमाणें लाखो लोकांवर आपल्या विभूतिमत्वाची मोहिनी पाडणारा तो असेल. पण विभूति म्हटलें तरी हातापायांचा मनुष्यच ना ? तो अतिमानुष म्हणजे परमेश्वर कसा असूं शकेल ? "

यावर नेपोलियनने उत्तर केलें कीं, " सामान्य माणसेंच विभूतीमत्वाची कल्पना करतात. ज्यांनीं दिगंत कीर्ति मिळविली, साम्राज्यें स्थापिलीं, त्यांच्या अंगीं अतिमानुष गुणांची कल्पना त्यांनीं केली. प्रौर्वात्य राष्ट्रांमधील देवळांतील सगळे देव असेच आहेत. त्यांचें मोजमाप लक्षांत येतें. पण खिस्त मानवदेहधारी नव्हता असें मला वाटतें. खिस्ती धर्मांतील ईश्वराची कल्पना निराकार आहे. विभूतिमत्व हें सान्त आहे. आणि जें सान्त आहे

त्याला मर्यादा असणारच. लायकरगस, न्यूमा, महंमद पैगंबर हीं समाजशासन करणारीं फार मोठी माणसें होऊन गेलीं. त्यांचें मोठेपण मी मान्य करतों. पण ते कांहीं साक्षात् ईश्वर नव्हते. त्यांनीं स्वतः असें कधीं म्हटलेंहि नाही. तीं माझ्यासारखींच माणसें होतीं. माझ्याप्रमाणेंच त्यांच्यांतहि गुणदोष होते असें मला आढळतें.

पण ख्रिस्ताची गोष्ट अशी नाहीं. त्याची प्रत्येक गोष्ट, त्याची बुद्धि, प्रेरणा, कार्यशक्ति, स्फूर्ति यांनी मी अगदी भारून जाऊन विस्मयचकित होतो. त्याच्या वाणींतील सत्यप्रतीति तत्काळ हृदयाला भिडते. त्याचा जन्म, त्याचा वृत्तांत, त्याची अलौकिक शिकवण आणि जगावर त्याने पाडलेला प्रभाव, त्याचें पुनरुत्थान, या गोष्टी इतक्या अद्भुत आहेत की त्यावर कितीहि विचार केला तरी माझ्या बुद्धीला हें गूढ कांही केल्या सुटतच नाही ! दिव्य साक्षात्कार झाल्याप्रमाणें जें ज्ञान त्याने प्रकट केलें तें मानवी बुद्धींतून स्फुरलें असें मी मानीतच नाही. त्या अपूर्व ज्ञानापुढे मानवी बुद्धि गुंग होते. हें ज्ञान प्रथम ख्रिस्तानेच सांगितलें. त्याच्यापूर्वीं कधी कोणी तें सांगितलें नाही व नंतरहि कोणी सांगितल्याचें आढळणार नाही. त्या ज्ञानाचा आधुनिक शास्त्रें, विज्ञान यांशीं कांहींहि संबंध नाही. ख्रिस्ताचें अध्यात्मज्ञान समजण्याला इतर कोणतीहि भौतिक शास्त्रें पढावीं लागत नाहीत. कसलीहि पूर्वतयारी करावी लागत नाही. केवळ श्रद्धा असली म्हणजे त्या ज्ञानाचा सर्व मार्ग आक्रमण होतो. ज्याला आपण शास्त्र, तत्त्वज्ञान म्हणतों तें केवळ पढीक शब्दज्ञान आहे. त्या ज्ञानाचा आत्म्याशीं किंवा मोक्षाशीं संबंध नाही. आत्मा व अध्यात्म यांखेरीज ख्रिस्ताला दुसरें कांहींहि महत्त्वाचें वाटत नाही. त्यापूर्वीं जगांत इतर ऐहिक शास्त्रज्ञानाचा बडेजाव होता. आत्म्याला जणुं कांही महत्त्वच नव्हतें. पण ख्रिस्तानें ती सर्व स्थिति पालटली. आणि " अध्यात्मविद्या विद्यानाम् " म्हणजे सर्व ज्ञानांत अध्यात्मज्ञानच श्रेष्ठ हें स्थापित करून, अध्यात्माला त्याचें सार्वभौमपद पुनः प्राप्त करून दिलें ! ही केवढी क्रांति आणि केवढा पराक्रम म्हटला पाहिजे. ख्रिस्ताला सुळी दिल्यावर, त्याचें पुनरुत्थान होऊन, त्याच्या भविष्यवाणीप्रमाणें त्याच्या धर्माचा अभूतपूर्व प्रसार झाला. आणि जें यश त्याच्या शिकवणीने साध्य झालें नाही तें त्याच्या बलिदानाने साध्य झालें ! पाशवी शक्तीशीं त्याच्या अनुयायांचा शतकानुशतकें हा आत्मिक झगडा

चालला होता. अखेर धर्मस्थापना होऊन आत्म्याच्या शक्तीचाच विजय झाला ! सीझर अॅलेक्झांडर यांचे जय कोठे, आणि हा अपूर्व दिग्विजय कोठे ! सीझरचे पराक्रम जिवंत माणसांनी केले. ख्रिस्ताचा पराक्रम तो मेल्यानंतर त्याच्या स्फूर्तीने घडवून आणला ! कार्थेजचे सैन्य हॅनिबॉलला तो असतांच विसरून गेलें. आणि वॉटर्लूसारख्या एका पराभवाने आपली दाणादाण झाली. आपली तुलना त्या दैवी आत्म्याशीं आपण कशाला करावी ? वैभवाच्या काळीं आपण सर्व जगासमोर सुवर्णाप्रमाणें चकाकत होतों. पण विपत्तीच्या भोवऱ्यांत आपणाला कथिलाची अवकळा आली. सीझर काय, शिकंदर काय, सगळ्या मोठ्या लोकांना नियतीने एकच घोर शिक्षा दिली, ती म्हणजे विस्मृतीची ! असेंच जग मलाहि विसरून जाईल. अरे, कसला नेपोलियन आणि कसला त्याचा पराक्रम घेऊन बसलास ! शाळा-कॉलेजांत पोरांनीं निबंध लिहिण्याच्या किंमतीचा तो विषय होईल ! "मृत्यू न म्हणे हा भूपति। मृत्यू न म्हणे हा चक्रवर्ति," हेंच खरें. ईश्वरी सत्ता आणि धर्माचे त्रिकालाबाधित साम्राज्य यापुढें मनुष्याचा पराक्रम अंगुष्ठमात्रच ना ? म्हणून शाश्वत जर कांही असेल तर तो धर्मच होय ! "

काउंट बारत्रां यावर कांहीच बोलला नाही. तो विचारमग्न होता हें पाहून नेपोलियन पुढे म्हणाला, "जीजस हा साक्षात् ईश्वर होता याबद्दल अजूनहि तुझी खात्री पटत नसेल तर, तुला सेनापति करण्यांत मीं मोठीच चूक केली असें म्हटलें पाहिजे ! " असो.

नेपोलियनचे हे धर्मविषयक विचार त्यांतील भारतीय विचारसरणीमुळे वाचकांना फार नवलकारक वाटतील. पण त्यांत नवल करण्यासारखें कांहीच नाही. जगांतील सर्व धर्म एकच त्रिकालाबाधित सत्य सांगतात. आणि जगांतील सर्व मोठ्या माणसांचे विचार सारखेच असतात. कारण सृष्टींतील विभूतिमत्व हा मुळांत एकाच दैवी शक्तीचा साक्षात्कार नव्हे काय ?

(जीवनविकास–नोव्हेंबर १९५८)

★ ★ ★

# अलौकिक ज्ञानपिपासा

" देश परचक्राच्या संकटांत सांपडून त्याची मानहानि होत असतां त्या देशाचा त्याग करून उदरनिर्वाहाकरितां दुसऱ्या देशांत जाण्याची मला बुद्धि झाली काय! धिःकार असो मला. शत्रूला पाठ दाखवून पळून जाणाऱ्या सैनिकाला ज्याप्रमाणें गोळी घालून मारतात, त्याप्रमाणें देहान्त प्रायश्चित हेंच मला योग्य आहे ! "

वरील उद्गार अंतःकरणाला पीळ पडून एका पत्रांत प्रांजलपणें काढणारा मनुष्य कोणी सैनिक नव्हता, मुत्सद्दी नव्हता, कीं राजकारणी नव्हता. विद्येची आणि विज्ञानाची सेवा करणारा एक फ्रेंच शास्त्रज्ञ होता. त्याचें नांव पाश्चर. १८७० सालीं फ्रान्स व प्रशिया यांचेमध्यें युद्ध होऊन फ्रान्सचा पूर्ण पराजय झाला. त्यावेळीं स्वदेश सोडावा लागून त्यानें इटलीमध्यें नोकरी पत्करली. तो तरुण असता तर त्यानें खचित सैन्यांतच नांव नोंदविले असते. पण पन्नाशीला वय टेकलें म्हणून सैन्यांत सामील होणे त्याच्याने झाले नाही. तथापि अंतःकरण देशाभिमानानें पूर्णपणें फुललेलें असल्यामुळें, स्वदेशाचा अधःपात झाला असतां आपण कांही करूं शकत नाहीं ही गोष्ट त्याच्या अंतःकरणाला शल्याप्रमाणें टोंचत होती. वरील उद्गार हे त्याचेच दर्शक होय. सरतेशेवटीं त्याने विवेकाने मनाशीं असा निश्चय केला कीं, आपल्या जवळ ना सैन्य, ना राजकारणी बुद्धि, येऊन जाऊन केवळ विद्वत्ता हें आपलें

हत्यार. विद्वत्तेनेच कां होईना, पण ज्या योगानें फ्रान्सचें डोकें पुनः अभिमानानें वर निघेल व त्याचा जगांत बोलबाला होईल असें कांहीं तरी आपण करूं व त्याकरितां आजन्म झटूं !

◆ ◆

पाश्चरचा जन्म १८२२ सालीं झाला. १८४२ सालीं त्यानें सायन्सची डिग्री घेतली. तो लिहितो, त्यावेळीं डुमस व फॅरॅडे या संशोधकांचीं व्याख्यानें इतकी उत्कृष्ट होत कीं, थिएटरांत नाटकाला जमावी त्याप्रमाणें कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांची गर्दी व खेंचाखेंच होत असे. सहाशें सातशें विद्यार्थी हीं व्याख्यानें ऐकण्यास येत. दृष्टीपुढें नवा क्षितिजप्रांत उदयाला यावा त्याप्रमाणें आपल्या प्रतिभेनें विद्यार्थ्यांचेपुढें हे शिक्षक नवें क्षितिज उभें करीत. पाश्चर याच्या अंतःकरणांत महत्त्वाकांक्षेचा उदय या व्याख्यानांमुळेंच झाला.

रसायनशास्त्रामध्यें पाश्चर यानें अप्रतिम गति केली. त्यानें Crystals बद्दल जो शोध लावला त्यामुळें प्रसिद्ध शास्त्रज्ञ वायट याला परमानंद झाला. वायट हा पाऊणशें वर्षांचा होता व त्यापुढें पाश्चर केवळ तरुण पोरसवदा होता. ज्या गोष्टीचा त्याला वीस वर्षें उलगडा लागत नव्हता तो शोध पाश्चर-सारख्या पोराचे हातून लागलेला पहातांच अंतःकरण भरून येऊन त्यानें पाश्चर याला गाढ आलिंगन दिलें !

सृष्टिचमत्कार लहानापासून थोरापर्यंत सगळेच पाहातात. पण त्याच्या मुळाशीं जाऊन कार्यकारणभावाचा शोध करण्याची इच्छा फारच थोड्यांना होते. प्रीस्टले याला हवेंत मनुष्याच्या आयुष्याला उपकारक ऑक्सिजन आहे असें आढळलें, तर त्याच हवेमध्यें अनेक कृमिकीटक जंतु असे आहेत कीं जे सृष्टींतल्या जीवनाला विघातक असून स्थित्यंतराला कारणीभूत आहेत —असा शोध पाश्चर यानें लावला.

उदाहरणार्थ, दूध हें कालांतरानें नासतें व त्याचें दहीं होतें. याचें कारण हे हवेंतले विशिष्ट जंतु होत हवेचा संबंध व स्पर्श सर्वांनाच होतो. हे कृमि त्या दुधावर बसून त्याचें रूपांतर घडवितात. ही गोष्ट प्रथम पुष्कळांना खरी वाटेना; त्यांना वाटे कीं प्रत्येक पदार्थांत जसे कांहीं अणु ( ॲटम ) असतात तसेंच परमाणूहि असतात. या परमाणूंमुळें ( मॉलिक्युल ) पदार्थांचें स्थित्यंतर होत असावें. याउलट, पाश्चर याचें प्रमेय असें होतें कीं, मृत्यूला आपण

सर्वनाश होणें असें समजतों. पण तें केवळ रूपांतर होय. रूपांतर हें अपरिहार्य आहे. रूपांतर म्हणजे मृत्यु नव्हे. तुमच्याप्रमाणेंच सृष्टिजातामध्यें हवेंतहि अनेक जीवतंतू असतात. त्यांच्या पदार्थमात्राशीं होणाऱ्या संसर्गामुळें पदार्थमात्राचें स्थित्यंतर होतें. रोगजंतु मनुष्याच्या शरीरांत प्रवेश करतात तेव्हां जीवनांतून मरणांत त्याच्या शरीराचें रूपांतर होतें. पदार्थमात्राचें जें मूळस्वरूप आहे तें बदलून त्याला विकृति उत्पन्न होण्याचें एरवीं कांहीं कारणच नाहीं. "मरणं प्रकृति शरीरिणां, विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः" असें कालिदासानें रघुवंशांत प्रतिभेनें लिहिलें आहे. पण तें नुसतेंच काव्य नाहीं. पाश्चर याच्या शोधाचें समर्पक व साद्यंत वर्णन करणारे याहून दुसरे शब्द सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे !

सन १८६९ सालीं रेशमाच्या किड्यांना जे विशिष्ट रोग होतात त्यांचा पाश्चर यानें सप्रयोग शोध लाविला. त्यापूर्वीं रेशमांच्या किड्यांची कितीहि चांगली पैदास केली अगर निगा ठेविली तरी हजारों किडे रोगांनीं मरत. सुरवंटाचें फुलपांखरूं होऊन त्यानें कोष करणें येथपर्यंत त्या किड्यांची मजलच जात नसे. पाश्चर याच्या शोधामुळें रेशमाच्या राष्ट्रीय धंद्याला फारच मोठें सहाय्य झालें. 'फरमेंटेशन'बद्दल जो त्यानें सिद्धान्त ठरविला होता त्याचा द्राक्षासवाचें कामीं उपयोग होऊं लागला.

१८७० सालीं फ्रँको जर्मन युद्ध झालें. हजारो जखमी सैनिक व रोगी रुग्णालयांत येत. लीस्टर यानें शस्त्रक्रियेमध्यें (अँटीसेप्टिक्स) रोग प्रतिबंधकांचा शोध लावलाच होता. पण त्यापेक्षां पाश्चर याची कल्पना अधिक मूलगामी होती. जखम नुसती कॅरबॉलिक ॲसिडनें धुतली तरी बाह्यरोगापासून जखमेचें निवारण होतेंच असें नाहीं. त्या त्या विशिष्ट रोगाचे असे कांहीं रोगजतु असतात कीं ते नुसत्या कॅरबॉलिक ॲसिडनें मरत नाहींत. त्या प्रत्येकाची खानेसुमारी करून त्याचे गुणदोष शोधून काढणें आवश्यक आहे. नुसत्या लढायांतच माणसें मरतात असें नाहीं. रोगांना हजारों लाखो माणसें बळी पडतात. याचें कारण रोगकारक विशिष्ट जंतु कोणता, त्याचे गुणधर्म काय, आणि त्याला प्रतिबंधक औषध काय याचें नक्की संशोधन झालेलें नसतें. कुटुंबातील माणसें अपमृत्यूनें दगावलेलीं असतात. पाश्चर याची पहिलीं कांहीं मुलें अशींच गेलीं होतीं. त्याला असें वाटे कीं शास्त्रीय

शोधांनीं जर आपण रोगावर विजय मिळविला तर कितीकांचे संसार सुखा-समाधानाचे दिसतील. कारण त्यावरील अपमृत्यूची अवकळा पुसून जाईल.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर पाश्चर यानें उतारा शोधून काढला. त्याची हकीगत फारच आश्चर्यकारक आहे. कुत्रें चावतें पण हें विष त्याच्या लाळेंत असतें का रक्तांत असतें? का मेंदूत असतें? का मज्जातंतूंत असतें? याचा शोध त्याला करावयाचा होता. कारण तेंच विष अंगांत इंजेक्शननें टोंचलें म्हणजे विषावर उतारा लागू होईल अशी त्याची कल्पना होती. म्हणून त्यानें एका पिसाळलेल्या कुत्र्याची थोडीशी लाळ नळींत घेऊन त्याची चव पाहिली!! कोण ही दुर्दम ज्ञानपिपासा! सरतेशेवटीं मज्जातंतूच्या एका विशिष्ट भागांत हें विष असतें, असा शोध लागल्यावर इंजेक्शनने हे प्रयोग त्यानें प्रथम कुत्र्यावर व मेंढ्यावर केले. एक वर्षभर हे प्रयोग यशस्वी रीतीने चालू होते. पण माणसावर हा प्रयोग करून पाहण्याला त्याची छातीच होईना.

एके दिवशीं मेस्तर नांवाच्या नऊ वर्षांच्या मुलाला त्याच्याकडे आणण्यांत आलें. त्या बिचाऱ्याला सर्व अंगभर दहापंधरा ठिकाणीं पिसाळलेलें कुत्रें चावलें होतें. पाश्चर याने आपण तयार केलेली उताऱ्याची लस टोंचली तरच कदाचित् तो वांचला तर वांचेल असा सल्ला दिला. पहिली एक-दोन इंजेक्शनें दिल्यावर त्या मुलाची प्रकृति पूर्ववत् आनंदी दिसूं लागली व बागेंतलीं कुत्रीं, हरणें, ससे यांच्याशीं तो खेळूं लागला. पण जसजसा इंजेक्शनचा डोस वाढू लागला तसतशी पाश्चर याची काळजी व चिंता वाढूं लागली. शेवटचें इंजेक्शन ज्या दिवशीं दिलें त्या दिवशीं मुलाने पाश्चर याच्या गळ्यांत हात घालून त्याचा प्रेमाने मुका घेतला व नंतर तो मुलगा झोपी गेला. पण पाश्चर याला मात्र सर्व रात्रभर क्षणभर देखील झोप आली नाही. त्याला क्षणोक्षणीं वाटे कीं आतां हा मुलगा जगणार की मरणार? ज्यांना पिसाळलेलें कुत्रें चावतें त्याचें विष कालांतराने मेंदूत भिनतें व पाणी दृष्टीस पडलें कीं विकृति उत्पन्न होऊन तो मनुष्य कुत्र्यासारखा भुंकूं लागतो. पाश्चर याला वाटूं लागलें की जणूं कांहीं आपला सर्व प्रयत्न फुकट जाऊन तो बिचारा मुलगा विषाच्या वेदनांनी कुत्र्यासारखा भुंकत आहे! पण ती संकट-मय रात्र संपून सकाळ झाली आणि देवाच्या दयेने तो मुलगा अंथरुणांतून हंसत उठला. पाश्चर याला त्यामुळें केवढी धन्यता वाटली असेल?

त्यापूर्वीं कुत्र्याच्या विषावर रामबाण उपायच नव्हता. एका शेतकऱ्याच्या मुलाला तर पिसाळलेलें कुत्रें चावून सहा दिवस झाले होते. तथापि पाश्चर यानें त्याला बरें केलें. कुत्र्यापेक्षां लांडग्याचें विष जहरीं. एक लांडगा पिसाळला व त्यानें एका मागोमाग एकोणीस रशियन लोकांच्या अंगाचे वाभाडे काढले. पंधरा दिवसानंतर पाश्चरचा तपास करीत ते सर्वजण आले. पाश्चर यानें आटोकाट प्रयत्न करून त्यापैकीं सोळा लोकांना मृत्यूच्या दाढेंतून काढलें. पुढच्या वर्षीं हा प्रयोग २६७१ लोकांवर करण्यांत आला. त्यापैकीं फक्त २५ लोक मेले. बाकी सर्व बांचले. म्हणजे शंभरांत एकच दगावला. यावरून पाश्चर यांचा सिद्धान्त प्रयोगानिशीं खरा ठरला.

पॅरिसमध्यें "पाश्चर-इन्स्टिट्यूट" ही संस्था सन १७८८ मध्यें स्थापन होऊन तिनें आजपर्यंत केवढें तरी परोपकाराचें काम केलें आहे! अशा रीतीनें पाश्चर यानें स्वतःच्या विद्वत्तेनें देशाचें नांव पुनः उजळ केलें व आपली प्रतिज्ञा खरी केली. देशभक्तापेक्षांहि विद्वानांचें कार्यक्षेत्र अधिक मोठें. कारण केवळ एका देशालाच नव्हे तर सर्व जगाला विद्वानांच्या विद्येचा उपयोग होऊ शकतो. 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' असें जे म्हणतात ते याचकरितां! देशांत विद्वान् थोडे असतात असें नाहीं; पण विद्वत्तेचें खरें चीज देशभक्तांच्या तळमळीनेंच होऊं शकतें, त्याशिवाय होत नाहीं. विद्वान् असूनहि निष्क्रियतेमुळें, किंवा देशाभिमान अगर परोपकार यांपैकीं कोणतीच उदात्त भावना अंगीं नसल्यामुळें, फुकट गेलेल्या विद्वानांची उदाहरणें हिंदुस्थानांत काय थोडी आहेत! यासाठीं तरुण पिढीनें पाश्चर याच्या जीवनचरित्रावरून फार बोध घेण्यासारखा आहे.

(वाङ्मयशोभा—मे १९५४)

* * *

# क्रांतिकारक हर्षल

हर्षल व नेपच्यून ही दोन नव्या ग्रहांचीं नांवें अलिकडे पंचागांत असतात. हर्षल म्हणजे प्रजापती व नेपच्यून म्हणजे वरुण. प्रजापती ताऱ्याचा शोध ज्या शोधकानें दुर्बिणीच्या सहाय्यानें लाविला त्याचें नांव 'हर्षल' असून हर्षलच्या शोधामुळें पंचागांत जसें एका नव्या ग्रहाचें नामकरण झालें, तसेंच मनुष्याच्या ज्ञानविषयक दीर्घ परिश्रमाचेंहि तें एक चिरंतन स्मारक झालें असें म्हटलें पाहिजे. खऱ्या विद्वानाला सर्व जगांत कोठेंहि 'पासपोर्ट' असतो. म्हणूनच शक, यवनादि नांवाबरोबर हिंदु पंचांगांतहि या खिस्ती संशोधकाचें नांव सदैव आदरणीयच राहील.

त्याचें जीवनचरित्रहि फार उद्बोधक आहे. हें हर्षल घराणें पिढीजात गायकांचें! गाणें, आर्केस्ट्रा वगैरेकरितां वाद्यवादन करणें, स्वतः वाद्यें तयार करणें वगैरे गुण हर्षल याचें अंगीं जन्मसिद्ध होते. त्याचा जन्म १७३८ सालीं झाला. त्याच्या पांचसहा भावंडांपैकीं बहीण कॅरोलिन हिचें त्याचेवर फार प्रेम होतें. तिचें लग्नहि झालें नाहीं. पण भावाला तिनें सर्व कामांत फार जिवाभावानें मदत केली. विलायतेंत बाथ शहर हें त्यावेळीं श्रीमंत, चैनी, रिकामटेकड्या लोकांचें आगर होतें. तेथें नाटकगृहांत अनेक नाटकें व नर्तकींचे नाच होत. वुइलियम हर्षल व त्याची बहीण कॅरोलीन् यांना या नाटकागृहामध्यें पियानो वाजविण्याची नोकरी मिळाली. कांहीं दिवसांनी तो संगीत–दिग्दर्शक झाला.

त्याचा आवडता विषय संगीत असला तरीं तो ज्योतिषी कसा झाला यांतहि नवल नाहीं. कारण संगीताचें ज्यांना उत्तम परिज्ञान आहे, त्यांना हें सहज समजतें कीं, संगीताची तालबद्धता हें केवळ गणित आहे. वुइलियम हा शास्त्रीय संगीतज्ञ होता म्हणूनच गणित उत्तम जाणणारा होता. गणितामधूनच त्यानें ऑप्टिक्स म्हणजे प्रकाशशास्त्रांत गति केली. त्यावेळीं दुर्बिणी वगैरे उपकरणें नसत म्हणून टेलिस्कोप व दुर्बिणी करण्यास तो लागला. दुर्बिणीच्या सहाय्यानें आकाशांतील दूरस्थ तारे व ग्रह यांचेमधील अंतराला मोठाच संक्षेप मिळून सर्व आकाशच त्याच्या हस्तगत झालें, म्हणून हर्षल हा ग्रहज्योतिषी झाला! अशी कारण-परंपरा आहे. प्रथम संगीत, नंतर गणित, नंतर ज्योतिषशास्त्र अशीं हीं शास्त्रें निरनिराळीं दिसलीं तरीं, आकाश हें जसें एक, किंवा समुद्र विस्तीर्ण असला तरी त्याचें पाणी जसें सगळें एकच, त्याचप्रमाणें विद्या अगर ज्ञान हें सर्व एकरूपच आहे. राष्ट्रें निरनिराळी दिसत असलीं तरी मनुष्य जात ही ज्याप्रमाणें एकच, त्याप्रमाणें शिकण्याच्या सोईकरितां शास्त्रें ही निरनिराळी असली तरी ज्ञान हें सर्व मुळांत एकच आहे. खरा विद्वान् मनुष्य एका शास्त्रामधून अगदीं सहज लीलेनें दुसऱ्या शास्त्रांत पदार्पण करून दाखवितो. सामान्य मनुष्याला मात्र त्यांत विरोधाभास दिसतो; कारण त्याला स्वतःला कोणतेंच शास्त्र नीटपणें अवगत नसते!

आज घरोघरीं दुर्बिणी आणि सूक्ष्मदर्शक यंत्रे विपुल झालीं असल्यानें त्याचे आपणांस महत्त्व वाटत नाहीं. पण हर्षलनें जेव्हां पहिली ओबडधोबड दुर्बिण तयार केली तेव्हां कितीतरी नवीन तारे कीं जे नुसत्या डोळ्यांनीं पूर्वीं दिसले नव्हते ते दिसू लागले. चंद्रबिंब नुसत्या डोळ्यांनीं तळहाताएवढें दिसतें तें नव्या दुर्बिणीनें ताटा एवढें दिसूं लागले. आणि त्याच्याशिवाय ही गोष्ट दुसऱ्या कोणालाहि कल्पनेनेहि दिसली नाहीं, मग प्रत्यक्ष डोळ्यांनीं कशी दिसणार? आकाशांतील ताराग्रहांचे तें विस्मयकारक जग हस्तगत झाल्यावर हर्षल याला केवढा आनंद व विस्मय वाटला असेल याची कल्पनाहि करतां येणार नाहीं!

या दूरदर्शक यंत्रांना मुख्यतः अंतर्वक्र असें प्रतिबिंबिक अथवा आरसे लागत. त्यांच्या योगानें ज्या अंतरावर व जशी प्रतिकृति ( Image ) पहावयास हवी होती, ती बाजारांत मिळणाऱ्या कोणत्या तरी आरशानें कशी

साध्य होणार ? याकरितां १७७२ सालीं स्वतःच हें प्रतिबिंबक घरीं तयार करण्याचें हर्षल यानें ठरविलें. आरसे तयार झाले तरी ते पॉलिश करण्याचें काम फार श्रमाचें होतें. कित्येकदां सोळा तास सतत काम करावें लागे. कामामध्यें दोन्ही हात गुंतून घाण झालेले असत. तेव्हां कॅरोलीन हिनें लहान मुलाला भरवितात त्याप्रमाणें भाजी भाकरीचे घांस त्यांच्या तोंडांत घालावें व करमणुकीकरितां अरेबियन नाईट अगर डॉन क्विक्झोट यांच्या गोष्टी वाचून दाखवाव्या ! अशा निष्ठेनें व हौसेनें दोघा बहीण भावंडांनीं सतत काम केल.

पुढें रंगभूमीवर नाटकाचा मोसम सुरू झाला. तेव्हां या खगोल शास्त्राच्या आवर्डामध्यें मोठाच व्यत्यय आला. पण हर्शल यानें आपलें दूरदर्शक यंत्र ऑपेरामध्यें बरोबरच नेलेलें असे. नाटकाच्या अंकाचा पडदा पडून प्रेक्षकांना चहा पिण्याकरितां सुट्टी झाली कीं तेवढ्या मधल्या वेळांत हर्षल हा नाटकगृहाच्या गच्चीवर जाऊन तारे पाहून येत असे !

अशा रीतीनें आकाशांतील दरेक तारा नीट बारकाईनें न्याहाळून १७७४ मध्यें त्याने ओरायन तारका पुंज प्रथम पाहिला ! हें यंत्र तयार करण्यापूर्वी त्याच्या दोनशें दुर्बिणी झाल्या. म्हणजे दोनशें वेळां हा प्रयत्न फुकट गेला होता ! ! १७८० सालीं त्याला कन्याराशींत प्रजापतिग्रह प्रथम दिसला. तो धूमकेतू आहे असें त्याला वाटलें. पण तो एक नवा ग्रह आहे अशी खात्री पटल्यावर रॉयल सोसायटीकडून या शोधाबद्दल त्याची फार वाहवा होऊन १८७२ सालीं त्याला सुवर्णपदक देण्यांत आलें.

ऑपेरामध्यें जीं माणसें हर्षल याजकडे केवळ संगीत-दिग्दर्शक या नात्यानें यापूर्वी पहात, त्यांना त्याचेबद्दल कीर्तिमान संशोधक म्हणून फार कौतुक वाटूं लागलें. हर्षल याला पुढें राजाश्रयहि मिळून सुमारे चाळीस वर्षें आपलें संशोधनाचें काम स्वस्थपणानें करतां आलें.

पण सर्वांत गंमत मात्र त्याची बहिण कॅरोलीन हिची. लहानपणीं तिला साधें घरकाम येत नाहीं म्हणून आईबाप व भावंडें हिडीस फिडीस करीत. रूपानें अगदीं सामान्य म्हणून तिचे लग्नही झालें नाहीं. पण हर्षल यानें त्या बहिणीला स्वतःच्या कामाला लावलें व हळूहळू यंत्रें कशीं लावून ठेवावयाचीं, वेध कसें घ्यावयाचे, पत्रकें कशीं लिहावयाचीं इत्यादि गोष्टी रोज पाहून तिच्या ध्यानांत सरावानें येऊं लागल्या. हर्षल एक दिवस परगांवीं गेला असतां

कॅरोलीन हिनें दूरदर्शक यंत्र लावलें, तो त्यांत एक नवाच धूमकेतू दिसला. या भोळ्या भाबड्या बहिणीनें एका नव्या धूमकेतूचा शोध लावला हें पाहून हर्षेल याला फार कौतुक वाटलें. पुढें तिनें असेंच वेध घेऊन नवे आठ धूमकेतू शोधून काढले ! तिचाहि ॲकेडेमीने सुवर्णपदक देऊन सन्मान केला, तेव्हां ती बिचारी त्या विद्वानांच्या सभेंत गोंधळून गेली.

हर्षेल ग्रहाचा शोध १७८१ सालीं लागल्यानंतर १८२० सालीं फ्रान्स-मधील बोवर्ड या ज्योतिषानें गुरु, शनि व हर्षेल यांच्या गति स्थितीची कोष्टकें तयार केली. गुरु व शनि यांची गतिस्थिति वेधास मिळे, पण हर्षेलचा मेळ बसेना. अर्थात् हर्षेलच्या पलीकडे एखादा ग्रह असून त्याचें गुरुत्वा-कर्षणामुळें हा फरक पडतो असें अनुमान झालें. ही नुसती कल्पना झाली, तरी गणित करून त्या पलीकडच्या ग्रहाचें अंतर काढणें व वेधानें प्रत्यक्ष तो ग्रह शोधून काढणें हें फार अवघड आहे. इंग्लंडांतील जॉन ॲडाम यानें हें गणित सन १८४५ सालीं प्रथम केलें. फ्रेंच ज्योतिषी ल्व्हरियर यानेंहि १८४६ मध्यें या ग्रहाचीं गतिमानें प्रसिद्ध केलीं व १८४७ च्या आरंभीं त्याचा भोग ३२५ अंश आहे असें काढलें, व त्याप्रमाणें बर्लिन येथील वेधशाळेंतून वेध घेतल्याबरोबर हा ग्रह स्पष्ट दिसला ! मनुष्याच्या अचूक गणितज्ञानाला हें केवढें सर्टिफिकेट आहे ! या ग्रहाला नेपचून असें नांव देण्यांत आलें. हा ग्रह सूर्यापासून २७७ कोटी मैल लाब आहे. कै. जनार्दन बाळाजी मोडक यांनीं युरेनस व नेपच्यून यांना प्रजापति व वरुण हीं फार अन्वर्थक नांवें दिलीं आहेत.

श्रीयुत शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या ‘ ज्योतिर्विलास ’ या सुंदर पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, वुइलियम हर्षेल व त्यांचा मुलगा जॉन हर्षेल यांच्यासारखे वेधकार त्यांच्यापूर्वीं झाले नाहींतच, पण आजपर्यंतहि कोणीं झाले नाहींत. या दोघांनीं विश्वाची खानेसुमारी केली असें म्हणण्यास चिंताच नाहीं. दोघां हर्षेलांनीं सुमारे पांच हजार तेजोमेघांचा शोध लावला आहे. जेथें तारा दाट तेथें तेजोमेघ थोडे आणि जेथें तारा फार पातळ तेथें दाट आहेत. सूर्यमालेंतील ज्योतींच्या गति इत्यादिकांविषयीं सांप्रत आपलें ज्ञान इतकें सूक्ष्म आहे कीं, रुपयांत दमडी इतकीहि कसर नाहीं असें म्हटलें तरी चालेल. ज्योतिष शास्त्रांतले सिद्धान्त हे वेधसिद्ध गोष्टींवरून स्थापित होणारे आहेत. मनुष्याची वेधशक्ति किती वाढेल व तो काय काय करील हें सांगवत नाहीं !

मौज—१९३८ * * *

# मानस-सरोवर दर्शन

हिमालय पर्वताच्या अत्युच्च अशा एव्हरेस्ट शिखरावर जाण्याचा कांहीं वैमानिकांनीं नुकतांच प्रयत्न केल्याचें वर्तमानपत्रांतून वाचकांना माहित झाले आहे. विमानांतून कां होईना पण प्रवास अत्यंत धाडसाचा आहे. कारण वर हवा अतिशय विरळ आहे व समुद्राच्या सपाटीवर नेहमीं राहणाऱ्या माणसाला इतक्या उंच वातावरणांत राहण्याची संवय नसते. याकारणानें आजपर्यंत फारच थोड्या लोकांनीं हें धाडस केलें आहे. नुकत्याच गेलेल्या मंडळींत लॉर्ड क्लिड्सडेल व मि. मॅक्ट्रिी हे विमानांतून एव्हरेस्ट शिखरावर गेल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

आज विमानांतून जाणारांचें जर इतकें कौतुक आपण करितों तर पायीं प्रवास करून मानस सरोवर गौरीशंकराची यात्रा करणाऱ्या प्रवाशांचे आपण खरोखर किती तरी अधिक कौतुक केलें पाहिजे.

हिमालयाच्या शिखरावर जाण्याची कल्पना फारच मोहक आहे यांत शंका नाही. हा पर्वत इतका उंच आहे कीं, पृथ्वीच्या मानदंडाची उपमा त्याला कवि यथार्थ रीतीने देतात. कालिदास वगैरें कवींच्या काव्यांतून तसेंच महाभारतांतून त्यासंबंधीं वर्णनें आलीं असून प्राचीनतेच्या अनेक रम्य काव्यमय आठवणी या गिरिराजाभोंवती विहरत असतात. पौराणिक कालीं अर्जुनानें हिमालयांत तपश्चर्या केली वगैरे अनेक उल्लेख सोडून दिले तरी हिंदी लोक अनेकवेळां या पर्वतावर जाऊन आले यांत शंका नाहीं.

ऐतिहासिक कालांत पाहिलें तर वॉरन् हेस्टिंगच्या वेळीं पूरणगीर या नांवाचा ब्राह्मण हिमालयांत इ. स. १७७३ सालीं सफर करुन आला. गंगेचा उगम पाहण्याचा अकबर बादशहाचा उद्देश होता व त्यानें त्याकरतां चांगल्या माहितगार माणसांच्याकडून एक नकाशाहि तयार करविला होता. हाच नकाशा पुढे इंग्रज प्रवाशांस मिळाला.

गंगा, सिंधु, सतलज, ब्रह्मपुत्रा वगैरे नद्यांचे उगम अनिश्चित होते अशी प्रथम इंग्रज लोकांची समजूत होती व त्यांच्या संशोधनबुद्धीचा अहंकार असा कीं गंगेच्या उगमाचा शोध अगर त्याची प्रथम चौकशी त्यांनींच केली! कोलब्रुक. ले, वेब, वगैरेंच्या लिहिण्यांत असा किंचित् ध्वनि उमटलेला दिसतो. कॅप्टन रेपर यांनें रक्षस्ताल सरोवर पाहिलें होतें. १८१२ मध्यें मूरक्रॅक्ट यानेंहि मानससरोवराबद्दल कांही माहिती लिहून ठेविली आहे.

जर्मन प्रवासी स्वेन हेडन यानें हिमालयाच्या सफरीसंबंधानें एक अतिशय सुंदर पुस्तक लिहिलें आहे. हा स्वतः धाडसी प्रवासी असून, उत्तम चित्रकार व लेखक होता. त्यानें या प्रवासाची फार उत्तम माहिती आपल्या पुस्तकांत दिली आहे. मानससरोवर हें नांव पुष्कळ हिंदूंना ऐकून माहित आहे. किंबहुना गौरीशंकर, कांचनगंगा, मानससरोवर, रक्षस्ताल इत्यादि नांवें ज्याला माहित नाहींत असें नेणते पोरही हिंदुस्थानांत विरळा. तथापि कल्पना वेगळीं व प्रत्यक्ष दर्शनाचा अनुभव वेगळा.

१७९२ सालीं बनारसच्या पूर्णापूरी गोसाव्यानें मानससरोवर पाहिलें. तो लिहितो "हें सरोवर अतिशय उंच अशा हिमपर्वताच्या मध्यभागीं असून त्याचा परीघ साठ कोस आहे. त्याची प्रदक्षिणा करण्याला सतत सहा दिवस चालावें लागतें. वाटेने कांठाकांठाने सुमारें २५ देवळें तिबेटी लामांनीं बाधलेलीं आहेत. लडाखपासून सात दिवसांच्या प्रवासानंतर कैलासगिरी अथवा गौरीशंकर हे शिखर लागतें. तेथें एका भूर्ज वृक्षाचें मुळांतून एक नदी निघते. तीच गंगा असावी.' स्वेन हेडन मानससरोवराचें खालीलप्रमाणें वर्णन करतो. 'हें सरोवर मन अत्यंत प्रसन्न करणारें आहे. प्राचीन कवींनीं देवांचें अधिष्ठान म्हणून याचें वर्णन केलें आहे. शुभ्र स्फटिकासारखा त्याचा पृष्ठभाग पाहिला म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गच त्यांत प्रतिबिंबित झाला आहे असें वाटतें. त्यांत अत्यंत सुदर हंस पक्षी आहेत. तिबेटांतल्या खाऱ्या मूस सरो-

वराप्रमाणें याचें पाणी नाहीं. रात्रीच्या प्रशांत वेळीं सरोवराच्या पृष्ठभागांवर मृत्युची भयानक शांतता वास करते. पाण्याची स्तब्धता इतकी असते कीं चांदण्या रात्रीं प्रवाशाच्या बोटीमुळें जेवढें रौप्य तरंग उठतील तेवढेंच. पण हिमालयाचें डोंगर व कडेपठार यांत वादळ सुरू झालें म्हणजे त्याच्या स्फटिकमय पृष्ठभागावर पर्वतासारख्या लाटा जोरानें उठून त्या किनाऱ्यावर आपटूं लागतात व त्यावेळीं त्यांचा आवाज इतका मोठा होतो कीं, हें सरोवर म्हणजे एक जागरूक स्थानच आहे असें वाटतें. सरोवराचें पाणी भरून बाहेर सांडतें त्यावेळीं उमा-महेशाच्या भीषण तांडव नृत्याचीच आठवण होतें.

'दिवसाच्या प्रत्येक क्षणांत व कोणत्याहि ऋतूंतल्या प्रत्येक दिवसांत या सरोवराची शोभा पहावी. ती इतकी मनोहर असते कीं, मन तृप्तच होत नाहीं. एकदां सरोवराच्या पश्चिम किनाऱ्यावर आम्हीं मुक्काम करून तबू ठोकला. तेव्हां शांतता नांदत होती, पण आम्हांला समजलें नाहीं कीं ही शांतता म्हणजे आगामी वादळाची भीषण सूचनाच होय. त्यावेळीं उत्तर आकाशांत डोंगरावर तुरळक ढग दिसत होते. थोड्याच वेळांत झंझावाताला सुरुवात झाली तेव्हां सरोवराच्या लाटा खवळून पाणी किनाऱ्यावर जोरानें आदळूं लागलें. तें पाणी पूर्वेच्या बाजूनें पाचू सारखें हिरवेगार पण आमच्याकडच्या बाजूस वसंत ऋतूंत कांहीं फुलांना नीलवर्ण येतो त्यासारखें दिसत होतें.

'संध्यासमयाच्या वेळीं सूर्य अस्तगिरीवर मावळल्यावर त्याचे सोनेरी किरण पर्वताच्या कड्यावर पडतात व खालीं त्याचें प्रतिबिंब सरोवरांत पडतें. यावेळीं सर्व आकाश सोनेरी झालेलें असतें. थोड्या वेळानें आकाशांत रक्तिमा उत्पन्न होतो, आणि अंधःकाराची छाया कड्यावर पडतां पडतां शेवटीं ते अगदीं काळेकाभिन्न दिसूं लागतात. उत्तरेकडे कैलास पर्वताचें मोठें भव्य शिखर दिसत असतें आणि त्याच्या मनोवेधक शोभेकडे टक लावून पहात असतां अंधःकार आपलें आवरण सर्व सृष्टीवर केव्हां घालतो हें कळत देखील नाहीं."

असो. हिमालयावर जाणारे पाश्चात्य प्रवासी आपली वर्णनें लिहून ठेवतील व त्यांत त्यांचा राष्ट्राभिमानहि दिसेल. तथापि या धाडसी प्रवाशांच्या यादींत हिंदी लोकांचें आजकाल नांवच नाहीं असें मनांत येऊन

कोणाला थोडी उद्विग्नताहि वाटेल. पण यापूर्वी मानससरोवराचा प्रवास आजच्या इंग्रज अगर जर्मन प्रवाशापूर्वी कोणी हिन्दी लोकांनीं केलाच नव्हता अशी वस्तुस्थिति नाहीं. पौर्वात्य लोकांना, धर्मदृष्टीनें म्हणा अगर कोणत्याहि कारणामुळें म्हणा, अशा हकीकती लिहून ठेवण्याची संवय नाहीं इतकेंच. इंग्रज अगर पाश्चात्य लोक येथें आले आणि हिमालयाच्या दुर्धर प्रवासाला प्रथम त्यांनींच पुढें पाऊल टाकलें ही गोष्ट ऐतिहासिक दृष्टीनें खरी नाहीं. मानस सरोवराभोंवतीं कितीतरी तिबेटी प्रदक्षिणा करीत असतात व त्यांच्याच भाविक स्तोत्रांनीं वातावरण निनादित होत असतें. या अनेक प्रवाशांपैकीं एकालाहि या स्थलांविषयीं माहिती लिहून ठेवण्याची बुद्धि झाली नाहीं, याबद्दल स्वेन हेडन यानें खेद व्यक्त केला आहे. या प्रवाशांची फक्त अनोळखीं पावलें आज कितीतरी शतकें मानससरोवराच्या प्रदक्षिणा-पथावर उमटलेलीं दृष्टीस पडतात हिमालयाच्या शिखरप्राकारांत परमार्थ बुद्धि ठेवून प्रदक्षिणा करणारा हा भाविक प्रवासी मन अंतर्मुख करतो आणि हिमालयाच्या मानससरोवराची ही प्रदक्षिणा म्हणजे जणूं स्वर्गाचाच प्रवास अशा भावनेनें चालत असतो. मागें उमटलेल्या स्वतःच्या पावलाकडे तो पाहात नाहीं, मग आपणांमागून येणाऱ्या इतर हौशी किंवा धाडसी प्रवाशांकरितां तो कसची माहिती लिहून ठेवणार ?

वाङ्मयशोभा—जुलै १९५३

★ ★ ★

# माझ्या अंतःकरणांतील जीवनज्योति

अगदी लहानपणापासून माझ्या मनावर कांहीं व्यक्तींनी अधिराज्य चालविलें आहे. आणि आज पन्नास वर्षें झालीं तरी, लहानपणीं मनांत उत्पन्न झालेलें प्रेम पुढे प्रौढपण आल्यावर उताराला लागलें नाही; तर उलट तें वृद्धिंगत झालें ! याचें काय कारण असेल तें असो. हा ‘ एक आंतरः कोऽपि हेतुः ’ म्हणावा असें वाटतें; त्याशिवाय हें कोडें उलगडत नाही. माझ्या लहानपणीं मी सात आठ वर्षांचा असतांना मला आठवतें की, ती. तात्यांच्या ( कै. न. चिं. केळकर यांच्या ) लिहिण्याचे खोलींत दोन तीन चित्रें होतीं. एक न्यायमूर्ति रानड्यांचें, दुसरें लोकमान्य टिळकांचें व तिसरें स्वामी विवेकानंदांचें. या तीन चित्रांपेक्षां आणखी कोणाचीं आमच्या घरांत चित्रेंच नव्हतीं ! पैकी न्या. रानड्यांचे चित्राबद्दल मला विशेष उत्सुकता किंवा आदर केव्हांच वाटला नाही. पण तशी गोष्ट लो. टिळक किंवा विवेकानंद यांच्याबद्दल नव्हती. लो. टिळकांचें चित्र १९०८ सालीं हाय-कोर्टापुढे भाषण करीत असतांचें होतें. “ ज्यूरीनें कसाहि निकाल दिला तरी मी पूर्णपणें निर्दोषी आहें असें माझें मन मला ग्वाही देत आहे. या जगांतील व्यवहारांचें नियमन इहलोकापेक्षा वरिष्ठ असलेल्या देवता करीत असतात; आणि मी भोगीत असलेल्या हालअपेष्टांनीच मीं अंगीकृत केलेल्या कार्याचा भाग्योदय व्हावा असाहि कदाचित् ईश्वरी संकेत असेल ! ” हे त्यांचे अमर

शब्द त्यावेळीं मला अगदी तोंडपाठ होते. आणि ईश्वराच्या घरचें नवल असें की, ज्या हायकोर्टानें त्यांना सहा वर्षें हद्दपारीची शिक्षा सुनावली त्याच हायकोर्टानें, आपल्या अन्यायाची निष्कृति करण्याकरिता, लो. टिळकांचे ते अमोघ शब्द हायकोर्टाच्या दिवाणखान्यांत सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवले! ब्रिटिश राज्य झाल्यापासून हिंदुस्थानांत आजवर कित्येक देशभक्त होऊन गेले. पण लोकमान्य टिळकांना जें स्थान माझ्या मनांत होतें तें कोणी घेऊं शकला नाही! या मुद्याचा वादविवादाने कधी निकाल लागण्यासारखा नव्हता. म्हणूनच मीं वर म्हटलें आहे की, "आंतरःकोऽपि हेतुः" याशिवाय याचें कोणीहि कारण सांगूं शकणार नाही. जें कारण माझें मलाच समजत नव्हतें तें मी दुसऱ्याला कसें पटविणार?

तीच गोष्ट स्वामी विवेकानंदांच्या चित्राची. तें त्यांचें चित्र अमेरिकेतलें होतें. त्यांचा तो पूर्णचंद्रासारखा मोहक चेहेरा आणि त्यावरचा भाव इतका परिणामकारक होता की इतकें अपूर्व सौंदर्य मीं आजवर कोणत्याहि चेहेऱ्यांत पाहिलें नाही, असें मला आजहि वाटतें. ही नुसत्या फोटोची गोष्ट. मग ज्या कोणी शिकागो परिषदेंत स्वामीजींना भाषण करितांना समक्ष पाहिलें असेल, त्यांच्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वाची कशी मोहिनी पडली असेल याची कल्पनाच केली पाहिजे! आणि तसेंच खरोखर घडलेंहि. स्वामीजींनी शिकागो परिषदेंत पहिलें भाषण फार तर दहापंधरा मिनिटेंच केलें असेल. पण व्यासपीठावर येऊन त्यांनी, "अमेरिकेंतील माझ्या भगिनीनो आणि बंधूंनो!" एवढे शब्द उच्चारले मात्र, सारा समाज लोहचुंबकाच्या शक्तीप्रमाणे एकदम आकर्षित होऊन उभा राहिला आणि त्यांचें अभिनंदन करण्याकरितां कित्येक मिनिटें टाळ्यांचा सारखा गजर होत राहिला. त्या परिषदेंतील सर्व भाषणांत स्वामीजींचें भाषण सरस होतें, असा दुसरे दिवशीं सर्व वर्तमानपत्रानी अभिप्राय दिला. आणि तेथूनच स्वामीजींच्या दिग्विजयाला प्रारंभ झाला. सीझरने म्हटल्याप्रमाणें "I came, I saw, I conquered" हे शब्द स्वामीजींच्या बाबतींत तंतोतंत खरे झाले. मला अभिमान वाटतो की ज्या व्यक्तींना मीं माझ्या अंतःकरणांत अगदी लहानपणापासून स्थान दिलें, तें त्यांचें स्थान, मी आज साठीच्या घराजवळ आलों असतांहि ढळलें नाही. आणि जितका जितका मी विचार करितों तितकें मला असें वाटतें की

लो. टिळक आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखीं माणसें शतकानुशतकांत एकेकदांच होणारीं. एवढी विचारसंपदा आणि प्रभावी व्यक्तिमत्व हें ‘ देणे ईश्वराचें ! ’’ आणि दुसरें असे मनांत येते की, थोर माणसें जीं दुसऱ्याचे मनावर कायमची छाप पाडतात याचें कारण त्यांची अध्यात्मिक किमया हेंच असावें. शब्दज्ञान हें प्रत्येकाजवळ थोडेंबहुत असतेंच. तें सांगणारेहि पुष्कळ असतात. पण मोठ्या माणसांचा संचार आणि कार्यसिद्धि ही एक शब्दहि खर्च न करितां झाल्याचीं उदाहरणें कितीतरी सांगतां येतील. त्याना आपला कार्यहेतु दुसऱ्याला पटविण्याला श्रम पडत नाहींत. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी किंवा स्वामी विवेकानंद यांच्या पाठीमागें जीं लाखों माणसें गेलीं तीं, त्यांनीं जें सांगितलें तें लोकांना समजलें म्हणून नव्हे; एका दृष्टिपातांत किंवा एका शब्दांत त्यांना काय म्हणावयाचें होतें तें लोकांना संपूर्ण समजलें ! याचेंच नांव “ अध्यात्मिक किमया. ” माझें मन अगदीं लहानपणापासून या दोन व्यक्तींकडे जें आकर्षिलें गेलें याचें कारण हेंच होय.

अमेरिकेस जाण्यापूर्वी सर्व हिंदुस्थानचा स्वामीजींनी पायीं प्रवास केला होता. जेथें पाणी देखील गोठून त्याचें बर्फ होईल अशा कडक थंडीत हिमालयांत असतांना अंगावर फक्त एका कफनींत त्यानी दिवस काढले. नंतर नर्मदेखाली दक्षिण हिंदुस्थानांत त्यांनी संचार केला. आणि पुणें, सातारा, महाबळेश्वर, बेळगांव मार्गे रामेश्वर पाहून नंतर मद्रासहून ते अमेरिकेस गेले. असें एक सुभाषित आहे की ‘ या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ’, म्हणजे सर्व जग ( अज्ञान ) निद्रेंत घोरत असतां संयमी हा जागृत राहून संचार करीत असतो. फार प्राचीन काळापासून हा आर्यावर्त ऋषिमुनींचें वसतिस्थान आहे. भारताला पारतंत्र आलें तरीहि ऋषितुल्य माणसें येथे निर्माण होण्याचें कधींहि थांबलें नाही. न्या. रानडे हे अशाच महर्षींपैकी होते. लो. टिळकांनी त्यांच्याबद्दल म्हटलें आहे कीं, “ पारतंत्र्याच्या काळांत महाराष्ट्राचा अगदी थंडगार गोळा झाला असतां, त्यांत ऊब कशी उत्पन्न होईल, आणि त्याचे हातांपायांत चलनवलन कसें सुरू होईल याबद्दल अहर्निश निदिध्यास बाळगून, त्याबद्दल सतत उद्योग जर कोणीं केला असेल तर तो माधवरावजींनी होय. ”

न्या. रानड्यांप्रमाणेच बंगालमध्ये विवेकानंद निर्माण झाले. लोकमान्य

टिळकांची व विवेकानंदांची गांठ पडली होती. त्याची हकीगत त्यांच्या इंग्रजी मराठी चरित्रांतून फारशी प्रसिद्ध नाही, ती लो. टिळकांच्या आठवणींत श्री. प्र. ना देशपांडे यांनी सांगितलेली उपलब्ध आहे. ती टिळकांच्या शब्दांतच पुढे देतों. १८९२ सालीं सुमारें दहा दिवस लो. टिळकांच्या घरींच स्वामीजींचा मुक्काम होता. ती हकीगत सांगतांना लो. टिळक म्हणाले, " १८९२ सालीं एकदा मी मुंबईहून पुण्यास परत येण्यास निघालों असतांना, एक संन्यासी सेकंड क्लासांत मी बसलों होतों त्या डब्यांत बसले. त्यांचें-बरोबर कांहीं गुजराथी मंडळी पोचविण्यास आली असून त्यांनीच त्यांचे तिकीट काढून दिलें होतें. आणि पुण्यास कोणाची ओळख नव्हती म्हणून माझी ओळख देऊन त्यांना माझे येथेच मुक्काम करण्यास सांगितलें. पुण्यास आल्यावर घरांतील एक स्वतंत्र खोली त्यांस दिली. त्यांचा मुक्काम तेथे आठदहा दिवस होता. स्वामींबरोबर सामानसुमान फक्त मृगाजिन, दंडकमंडलु, दोन छोट्या, आणि थोडीशीं पुस्तकें, येवढेंच होतें. ते फारसें कोणाशीं बोलत नसत. मी मात्र मधूनमधून त्यांच्याशीं बोलत असे. त्या वेळीं आमचें हिराबागेंतील क्लबांत, दर आठवड्यास क्लबाची सभा भरत असे. कोणी तरी एकजण एखाद्या विषयावर भाषण करी, आणि मग त्या विषयावर चर्चा होत असे. सर्व भाषणें इंग्रजींत होत. एके दिवशीं आमच्या या सभेस मीं स्वामींस बरोबर नेलें त्या दिवशीं कै. काशिनाथ गोविंद नातू वकील यांनी भाषण करून एका तत्त्वज्ञानविषयक प्रश्नाचा पूर्वपक्ष मांडला. त्यावर नित्याप्रमाणे चर्चा व्हावयाची, परंतु विषय नेहमींपेक्षा निराळा, म्हणून लवकर बोलावयास कोणी उठेना. तेव्हां मीं स्वामीस म्हटलें, " आपणांस कांही बोलावयाचें असल्यास बोलावें. " त्यानंतर स्वामींनी या विषयावरील उत्तरपक्ष सुमारें तासभर भाषण करून इतक्या उत्तम तऱ्हेने व अस्खलितपणें मांडला, कीं सर्व मंडळी आश्चर्यचकित होऊन गेली. त्या दिवसापासून शहरांतील मंडळी त्यांचेकडे वरचेवर येऊं लागली. त्यांच्याशीं स्वामींची श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदें इत्यादिकांवर संभाषणें होत असत. स्वामींनी आपलें नांव सांगितलें नव्हतें. श्रीमद्भगवद्गीता हा माझा आवडता विषय. त्यासंबंधीं मीं स्वामींशीं दोनतीन वेळां चर्चा केली. आणि गीतेचें सार व मर्म, निष्काम कर्मयोगच आहे, अशी मजप्रमाणे त्यांचीहि निष्ठा असल्याबद्दल माझी खात्री झाली.

दिवसेंदिवस स्वामींकडे जास्त जास्त लोक येऊं लागले, तेव्हां एक दिवस, 'उद्या आपण जाणार' असें मला सांगून स्वामींनी दुसरे दिवशीं पहाटें कोणी निजून उठण्यापूर्वीच प्रयाण केलें.

"पुढें चारपांच वर्षांनीं स्वामी विवेकानंद अमेरिकेंत दिग्विजय करून स्वदेशीं परत येण्यास निघाले, तेव्हां मार्गांत ठिकठिकाणीं त्यांचा मोठा सन्मान होऊन मानपत्रांचा त्यांजवर वर्षाव होऊं लागला. ते सिलोन-मध्यें आल्यावर कोलंबो येथील एका इंग्रजी दैनिकांत अशा समारंभाची हकीकत देऊन त्यांचा फोटोहि प्रसिद्ध करण्यांत आला होता. तो पाहून, आपले येथें राहून गेलेले ते हेच स्वामी होत, असें मला वाटूं लागलें. आणि मीं त्यांस तसें पत्र लिहून कळविलें; आणि कसेंहि करून बंगाल्यास परत जातांना आमच्या पुण्यास दर्शन देऊन जावें, अशी त्यांस विनंती केली. त्यांचें उत्तर आलें आणि माझी अटकळ खरी ठरली. 'सुमारें दोन महिन्यांचा कार्यक्रम ठरून गेला आहे, यामुळें या खेपेस पुण्यास येण्यास सवड होणार नाही, तरी पण पुढे सवड करून येईन.' असें त्यांनी पत्र लिहिलें होतें. हें पत्र फारच गौरवयुक्त आणि भारदस्त होतें. "तें आपल्या संग्रहीं मिळेल काय" असें मीं विचारतां लोकमान्य म्हणाले, "तें शक्य नाही. १८९७ सालाचें खटल्यापासून, पत्रव्यवहार खाजगी असो की सार्वजनिक असो, त्यांतील अतिशय महत्त्वाचे कागद मात्र वेगळे काढून बाकीचे चट् सारें अग्निनारायणास दर आठवड्याला समर्पण करण्याचा आमचा संप्रदाय पडून गेला आहे. तथापि मला त्या पत्राची चांगली आठवण आहे." असें म्हणून त्यांतील कांही वाक्यें त्यांनी बोलून दाखविलीं. लोकमान्य पुढ सांगूं लागले, "पुढे कॉंग्रेसचे निमित्ताने मी १९०१ सालीं कलकत्त्यास गेलों होतों, तेव्हां स्वामी विवेकानंदाचा बेलूर येथील मठ पाहाण्यास गेलों होतों. तेथील सर्व स्वामींनी आमचें चांगलें स्वागत केलें. आणि त्यांचा तो शहराजवळ पण एकान्त असलेला मठ, भोवतालची झाडी वगैरे पाहून चित्त प्रसन्न झालें. याहि वेळीं विवेकानंद स्वामींशीं आम्हीं अनेक विषयांवर चर्चा केली. 'धर्म' हा जरी स्वामींचा मुख्य विषय असला, तरी सर्वप्रकारच्या सार्वजनिक विषयांत त्यांची चांगली तयारी होती, आणि त्यामुळें त्यांच्याशीं कोणत्याहि विषयावर चर्चा करण्यास उल्हास वाटे. लोकजागृती, लोकशिक्षण, किंबहुना परमहंसदीक्षेंत

असूनहि सर्वप्रकारचा लोकसंग्रह करण्याची त्यांची उत्कट इच्छा संभाषणांतून दिसून येत असे. त्या खेपेच्या संभाषणांत एकदां ते म्हणाले की, "कोणाच्या बुद्धीचा प्रभाव त्याचे स्वतःचे प्रांतांत लवकर चांगलासा दिसून येत नाहीं. आपलीहि धर्मावर श्रद्धा आहे. तेव्हां मला वाटतें, आपण संसारत्याग करून धर्मजागृति व लोकशिक्षण हीं कामें करण्यासाठीं आमच्या बंगल्यात येऊन राहावे. आणि त्याच कामासाठीं मीं महाराष्ट्रांत खपावें !" मीं त्यांना ताबडतोब उत्तर दिलें कीं, "मी संन्यास कधींच घेणार नाहीं. माझ्याने जीं कार्यें व्हावयाचीं, तीं गृहस्थाश्रमांत राहूनच होतील. शिवाय ज्याच्या त्याच्या प्रातांत कोणाचा बुद्धिप्रभाव चांगला दिसून येत नाही, हेंहि मत मला मान्य नाहीं. उलट जो पुढारी आपल्या प्रांतांत पहिल्याने पुढल्या रांगेत येईल, तोच पुढें दुसऱ्या प्रांतांत व सर्व देशांत पुढें येण्याचा अधिक संभव असतो, असें माझे मत आहे."

स्वामीजींची भेट झाल्यावर लो. टिळक कलकत्त्याहून परत आले. त्यानंतर कांहीं महिन्यांतच, १९०२ सालीं स्वामीजी समाधिस्त झाले. यामुळें महाराष्ट्राला त्यांच्या भेटीचा योग आला नाही. वंगभंगाची सुप्रसिद्ध चळवळ १९०५ सालीं झाली. आणि लो. टिळकांच्या सर्व कार्यांचा पुढच्या वीस वर्षांतच भर होता. हें पाहून केव्हां केव्हां असें माझ्या मनांत येई की, स्वामीजी जगते तर हवे होते! 'प्रबुद्ध भारत' हालू लागलेला पाहून त्यांना फार फार आनंद झाला असता. पण आज याहून वेगळा विचार मनांत येतो. तो असा कीं या जगांत प्रत्येकाचें कांहीं नियत कार्य असतें. आणि त्याला आयुष्यहि त्या कार्यापुरतेच असतें. स्वामीजी जगते तर हवे होते, हें तुम्हा आम्हांस वाटून काय उपयोग? ईश्वरी संकेत किंवा योजना काय असेल ती खरी. एखादे वेळ असें मनांत येते कीं, भारतांत एक वेळ टिळक पुनः होतील, पण स्वामी विवेकानंदांसारखा मनुष्य मात्र पुनः निर्माण होणार नाहीं ! !

(जीवनविकास—मे १९५७)

* * *

REFBK-0010876